म. ग्रं. सं. ठाणे
विषय
स. नं.

# श्री …मायण



REFBK-0008714

ठेजाव!

श्रीरामसमर्थ

## सप्तकाण्डात्मक

# श्री दासायन

## पूर्वार्ध

( आदि – पुरश्चरण – तीर्थाटन – सुंदरकाण्ड )

( श. ८८४–१५७०

REFBK-0008714

REFBK-0008714

प्रथम आवृत्ति

लेखक : अनंतदास रामदासी,

श्रीराममंदिर – गिरड, ता. हिंगणघाट, जि. वर्धा.

रथसप्तमी १८७७

मूल्य चार रुपये

प्रकाशक :

रामदास श्रीधरशास्त्री जोशी

व्यवस्थापक, श्रीसमर्थ पाठशाळा, जुनीवस्ती

हिंगणघाट, जि. वर्धा

( सर्वाधिकार– प्रकाशकाचे स्वाधीन )

पुस्तकें मिळण्याचीं स्थानें—

१. व्यवस्थापक– श्रीसमर्थपाठशाळा
जुनी वस्ती, हिंगणघाट, जि. वर्धा

२. श्री. शं. ग. प्रभुदेसाई, २०३ शुक्रवार, पुणें.

मुद्रक :

शंकर रामचंद्र दाते

यशवंत छापखाना,

२००।३ सदाशिव, पुणें २

॥ श्रीराम समर्थ ॥

# भूमिका

श्रीसमर्थसद्गुरूंनीं या सप्तकांडात्मक श्रीदासायनास ज्याला निमित्त मात्र पुढें केलें त्या लेखकाची भूमिका ' युक्ति नाहीं बुद्धि नाहीं विद्या नाहीं विवंचिता ' या प्रकारची आहे. अज्ञान व दुर्गुण ही त्याची मिरास आहे. अर्थात् या चरित्रांत लेखकाचें कर्तृत्व कांहींच नाहीं. सर्व समर्थभक्तांकडून आणिलेली ही भिक्षा–कोरान्न नव्हे, माधुकरी आहे. वाकेनिशी टिपण, स्वानुभवदिनकर, गिरिधरकृत श्री समर्थप्रताप, मेरुस्वामींचा श्रीरामसोहळा, तंजावरच्या भीमस्वामींनीं लिहिलेलें त्रोटक श्रीसमर्थचरित्र, हनुमंतस्वामीकृत बखर, भीमस्वामी शहापुरकर यांचें भक्तिलीलामृत, एक्केहाळीच आत्माराममहाराज यांनीं लिहिलेला ' रामदासी संप्रदायाचा विश्वकोश ' असें ज्यास म्हटलें जातें तो श्रीदासविश्रामधाम, लक्ष्मणस्वामी शिरगांवकरकृत श्रीसद्गुरुस्तवराज (अप्रकाशित), उद्धवसुत, आत्मारामबोवा चोरेकर महिपतिबुवा ताहराबादकर व राजारामप्रासादी यांनीं लिहिलेलीं समर्थचरित्रें, श्रीरामदास–गुणार्णव (अप्रकाशित) अशा अनेक चरित्रकारांकडून मिळालेली माधुकरी या दासायनरूप पात्रांत एकत्र झाली आहे. श्रीसमर्थवाग्देवतामंदिरांतील शेंसवाशें बाडें आणि सत्कार्योत्तेजक सभेचीं सर्व प्रकाशनें–विशेषतः श्रीरामदास–रामदासी मासिकांत वेळोवेळीं प्रसिद्ध झालेली समर्थवाङमय व चरित्र यांविषयींची चर्चा अवलोकन करून त्या आधारें या चरित्राची मांडणी झाली आहे.

## सप्तकाण्डें

आदिकाण्ड, पुरश्चरणकाण्ड, तीर्थाटनकाण्ड, सुन्दरकाण्ड, राजकारणकाण्ड, लोकोद्धारकाण्ड आणि उत्तरकाण्ड असे सात विभाग या चरित्राचे योजिले आहेत. पूर्वजवृत्तापासून 'सावधान' ऐकिल्यानंतर श्रीसमर्थ पंचवटीस पोहोंचेपर्यंतचा विषय प्रथमकाण्डांत आहे. द्वितीय काण्डांत टाकळी पंचवटीस १५४२ पासून १५५४ पर्यंत झालेली तपश्चर्या, इतर ग्रंथलेखनादि कार्य, शहाजीराजे व बालशिवाजी यांची भेट हे प्रसंग आहेत; तिसऱ्या तीर्थाटन काण्डामध्यें यात्रापरिभ्रमण आणि देशाची तत्कालीन राजकीय व धार्मिक

परिस्थिति यांचें वर्णन आहे. वाचकांस राजकीय स्थित्यंतराची कल्पना शाळेंतील इतिहासावरून थोडीशी असते; पण तिचा भयानकपणा 'श्रीसमर्थ-अवतार' या श्री. नानासाहेब देव यांच्या ग्रंथांतील 'देशकालपरिस्थिति' प्रकरणावरून अगदीं स्पष्ट दिसतो; त्या परिस्थितीचें तितकें विस्तृत वर्णन अन्यत्र कोठेंहि आढळत नाहीं. तथापि त्या सविस्तर वृत्तांतांतहि 'असल्या दुबळ्या व विषयलंपट राजवटींचा कहरी जुलूम जनतेनें निमूटपणें कां सहन केला ?' हा प्रश्न अनुत्तरित राहतो. लोकांचा परधार्जिणेपणा व आपसांतील फूट हीं त्या अवनतीचीं दोन कारणें राजकीय इतिहासांत सांपडतात. त्याहूनहि महत्त्वाचें तिसरें कारण श्री. सेतुमाधवराव पगडी यांच्या 'सुफी संप्रदाय' या पुस्तकावरून ध्यानीं आलें. तें हें कीं, परधर्मीय प्रचारकांच्या अनेक प्रकारच्या प्रकट व गुप्त कारवायांयुळें जनता प्रज्ञाहत व स्वाभिमानशून्य बनली होती. हें प्रज्ञाहतत्व खालच्या वरच्या सगळ्या थरांत सारखें पसरलें होतें. विदेशी धर्मप्रचारकांच्या या कारवायांमुळेंच दिल्लीचे पृथ्वीराज चव्हाण व देवगिरीचे रामदेवराय हे पराजित झाले; महंमद घोरी दिल्लीपर्यंत चढाई करून आला आणि अल्लाउद्दीन खिलजीची मुसंडी दिल्लीहून रामेश्वरापर्यंत एकदम जाऊन धडकली—हा सर्व या विधर्मी प्रचाराचा परिणाम होय ! हें सगळें दृष्टीपुढें आल्यामुळें 'समुदाय न करितां उणें। दिसेल परमार्थीं' 'फड नासोंचि नेदावा', 'मराठा तितुका मेळवावा', 'आपुलीं करूनियां दुरी। पराव्यासी करी मित्री। तो एक मूर्ख।' इत्यादि प्रकारच्या समर्थांच्या उपदेशाचें आणि त्यांनीं योजिलेल्या 'गुप्तपणा'चें महत्त्व ध्यानीं आलें आणि स्वधर्मी राजसत्तेचा पाठिंबा मिळविण्यांतील त्यांचा हेतुहि स्पष्ट कळला. तीर्थाटन काण्डांतील ८ व ९ सर्ग वाचकांनीं पुन: पुन: मनन करावे.

'१५७६ मध्यें समर्थ शिवतरच्या सुंदरमठांत राहण्यास गेले' या संशोधकांच्या कल्पनेमुळें सुंदरकाण्डाची मर्यादा प्रथम १५८० पर्यंत ठरविली होती. पण श्री शिवछत्रपतींचीं 'मावळे व कोंकणे लोकांचीं राजकारणें' शहाजी राजांची अटक व सुटका आणि श्रीसमर्थांच्या १५६६ ते १५७०–७१ पर्यंतच्या हालचाली यांचें मनन जों जों अधिक होऊं लागलें, तों तों १५८० ची प्रथम ठरविलेली सुंदरकाण्डाची कालमर्यादा कमी करीत

जावें लागलें, आणि आतां ती १५७० पर्यंत या चरित्रांत आणून ठेवली आहे. १५८० च्या पहिल्या कल्पनेप्रमाणें जीं प्रकरणें सुंदरकाण्डाचीं म्हणून लिहिलीं होतीं, तीं ८।९ प्रकरणें पुढें राजकारण काण्डांत घालण्याचें ठरवावें लागलें.[१]

पुढील राजकारणकाण्डांत १५७० पासून बहुतेक १५९६ तील ' नवसाच्या समाराधनेपर्यंतचें' श्रीसमर्थचरित्र येईल. ज्या प्रसंगांचे कालानुक्रम निश्चित करतां येत नाहींत पण ज्यांवरून श्रीसमर्थांच्या प्रयत्नांतील विविधतेचें व व्यापक दृष्टीचें दर्शन होतें, असे अनेक प्रसंग लोकोद्धार काण्डांत येतील आणि उत्तरकाण्डांत श्रीसज्जनगडीं समर्थांचा रहिवास, त्या ५।७ वर्षांतील महत्त्वाचे प्रसंग आणि समर्थशिष्य–प्रशिष्यांचीं चरित्रें द्यावींत असा हेतु आहे.

आतां संतचरित्रांतील दैवी चमत्कार व इतिहास यांविषयीं थोडें स्पष्टीकरण करावयाचें आहे. कित्येक विद्वानांस सांप्रदायिक बुद्धीविषयीं तिटकारा वाटत असतो. पण प्रस्तुत लेखकाचा तर समर्थसंप्रदायांत प्रवेश होऊन ५० वर वर्षे होऊन गेलीं; तेव्हां त्याच्या ठिकाणीं सांप्रदायिक बुद्धीचे म्हणून गुणदोष जे कांहीं असतील ते या ग्रंथांत भरपूर आहेत. श्री समर्थांविषयींचा आदर तर शाळेंत शिकत असतांनाच गु. पांगारकरांच्या सहवासानें त्याच्या मनांत उद्भवला आणि श्रीसद्गुरु चौंडेमहाराजांचे कृपेनें तो आज चार तपें उत्तरोत्तर वाढत आहे. श्रीसमर्थचरित्राचें चिंतन जों जों करावें, तों तों त्या महापुरुषाचें लोकोत्तर महानुभावित्व, अलौकिक कर्तृत्व, प्रचंड व्याप, लोकोद्धारची चौफेर दृष्टि इत्यादि सामर्थ्याचे एकेक अपूर्व प्रकार पाहून मन दंग होऊन जातें. तेव्हां एका श्रद्धाळू व अविद्वान् माणसानें निमित्तमात्र होऊन लिहिलेलें हें त्या महापुरुषाचें चरित्र थोर विद्वानांच्या आदरास कसें पात्र होईल ? पण भक्तभाविकांस मात्र तें आवडेल असें वाटतें.

---

१ प्रस्तावना लिहिण्यासाठीं डॉ. शं. दा. पेंडसे यांचेकडे जीं कांहीं अमुद्रित प्रकरणें पाठविलीं होतीं त्यांत यांपैकीं कांहीं होतीं आणि त्यांचा उल्लख त्यांनीं आपल्या प्रस्तावनेंत केलाहि आहे. पुढें तीं प्रकरणें राजकारण काण्डांत घालण्याचें निश्चित झालें तरी प्रस्तावनेंतील त्यांचा उल्लेख तसाच ठेवला आहे. अशासाठीं कीं, त्यावरून वाचकांस पुढील चरित्राची थोडी रूपरेषा कळावी.

या चरित्रांत वर्णिलेला एकहि प्रसंग निराधार नाहीं. वाकेनिसी टिपण मुख्य प्रमाण धरून श्रीसमर्थप्रताप व हनुमंतस्वामीकृत बखर यांचे आधारें हें दासायन बहुतांशीं लिहिलें असून इतर चरित्रांतून आवश्यक तेथें भर घातली आहे. चरित्ररचनेंत विषयवार मांडणीकडे लक्ष प्रथम पुरवून मग कालानुक्रम शक्य तेवढा संभाळला आहे. प्रसंगांचे काल-निर्देश जेथें निःसंशय वाटले तेथें तसे दिले आहेत; अनुमानानें ठरवावे लागले तेथें तसें स्पष्ट म्हटलें आहे. 'श्रीसमर्थावतार' हा ग्रंथ प्रसिद्ध झाल्यानंतर सुप्रसिद्ध समर्थभक्त नानासाहेब देव एकदां म्हणाले होते 'ह्या सगळ्या चरित्रग्रंथांतून समर्थदर्शनापेक्षां चरित्रकारांच्या मतांचेंच प्रदर्शन जास्त होतें.' दासायन लिहीत असतां श्री. नानासाहेबांचें हें वाक्य मनांत सतत घोळत होतें. स्वतःचें मतप्रदर्शन न होतां पूर्व चरित्रग्रंथांतून वर्णिलेंलें श्रीसमर्थचरित्र, होईल तितकें इतिहासास धरून वर्णन करण्याचा प्रयत्न केला आहे. 'न्यून तें पुरतें' करून घेणें समर्थभक्तांकडे आहे.

श्रीसमर्थांचें सर्वच चरित्र चमत्कारांनीं भरलेलें आहे. देवतादर्शन-संभाषण, मृतांस जीवदान, अंतींद्रिय दृष्टि, दिव्यश्रुति, परिचित्तज्ञान, एकाच वेळीं अनेक ठिकाणीं प्रकट होऊन निरनिराळीं कार्यें करणें, 'महापर्वतीं काष्ठवृत्ती' वर्षभर पडून राहणें, 'व्याघ्रसिंहेंसी भांडणें', स्वतःच्या आध्यात्मिक भूमिकेस यत्किंचित् धक्का न लागूं देतां व्यवहारांतील व राजकारणांतील बारकाया दक्षतेनें सांभाळणें, असे असंख्य चमत्कार त्यांच्या चरित्र-ग्रंथांत आढळतात. ते सर्व असंभवनीय अंधश्रद्धेचे म्हणून त्याज्य समजण्याकडे बुद्धिनिष्ठ भौतिकवाद्यांचा कल असतो. परंतु असे चमत्कार आतां पाश्चात्य शास्त्रज्ञांच्या प्रायोगिक कसोटींस उतरत आहेत. ते असत्य मानतां येत नाहींत. पहिल्या महायुद्धांतील दोस्त सैन्याचे अधिपति मार्शल फॉक यांच्या चरित्रांत पुढील गोष्ट आहे. :— मार्नच्या लढाईत जखमांच्या वेदनांनीं तळमळत पडलेला एक फ्रेंच सार्जंट आपल्यासारख्या कांहीं जखमी फ्रेंच–जर्मन सैनिकांस घेऊन जवळच्या एका मोडक्या चर्चमध्यें गेला. ते सगळे तहानभुकेनें अर्धवेडे झाले होते. २।३ दिवसांत त्यांना धान्याचा कण कीं पाण्याचा थेंब मिळाल नव्हता; चर्चमध्यें कांहीं नव्हतें, बाहेरून येण्याचा संभव नव्हता.

येशू खिरस्ताचें एक चित्र तेथे होतें. त्यास उद्देशून त्या सार्जंटनें निष्ठेनें प्रार्थना केली कीं ' मला नको, पण माझे सोबती व हे जर्मन यांना तरी अन्न दे.' त्याला वाटलें आपली प्रार्थना येशूनें ऐकिली. चर्चमधील प्रकाश प्रखर होत जाऊन चित्रांतील येशू खालीं आला व त्यानें सर्वांना अन्न दिलें. त्यानंतर त्यांना झोंप लागली आणि ते उठले तों त्यांचा द्वैतभाव गेला. सगळें फ्रेंच व जर्मन एकमेकांस भाऊ भाऊ म्हणून ओळखूं लागले ! तेवढ्या अन्नावर तसल्या रोगट हवेंत व जखमी स्थितींत ते सगळे तीन दिवस जिवंत राहिले ! मार्शल फॉकनीं या गोष्टीची कसून चौकशी केली आणि उद्गार काढले कीं ' येशू खिरस्तास स्वर्गांतून खालीं आणावयाला श्रद्धेनें केलेली प्रार्थना पुरेशी आहे.' ए. जे. रसेलसारख्या शास्त्रज्ञानें ती गोष्ट सत्य म्हणून मान्य केली असून 'योगसिद्धि व ईश्वरसाक्षात्कार' या डॉ. वि. म. भट यांच्या ग्रंथांतील आरंभींच्या उपोद्घातांत प्रि. ह. भ. प. दांडेकर यांनीं ती उद्धृत केली आहे. संतचरित्रांतील सर्व चमत्कार खोटे मानणें हा चिकित्सेचा अतिरेक वाटतो. चमत्कार खरे असूं शकतात. त्यांत भाबडेपणा शिरण्याचा संभव असतो, नाहीं असें नाहीं; पण थोड्या सरावानें तो ओळखतां येतो. तसेंच शिवसमर्थकालाच्या इतिहासाची साधनसामुग्री आज पूर्णतया उपलब्ध नाहीं, त्या अपुऱ्या साधनांवर विश्वसून कोणत्याही प्रसंगाची वा कालाची निश्चिति करितां येत नाहीं. शिवाय, संतचरित्रांतील सगळेच लहान मोठे प्रसंग भक्तिभावास पोषक व मार्गदर्शक असतात. म्हणून श्रीसमर्थचरित्रांतील कोणताहि महत्त्वाचा प्रसंग अनैतिहासिक किंवा चमत्कार म्हणून असंभवनीय या सबबीवर वगळला नाहीं. 'सकळां वडील देव । त्यासीं होतां अनन्य भाव । मग हा प्रकृतीचा स्वभाव । पालटों लागे ' अशी चमत्कारांची उपपत्ति श्रीसमर्थांनीं दिली आहे. (सुंदर कांड पृ. १७२ पहा) पाश्चिमात्य शास्त्रज्ञ टिरेल यानें (The Personality of Man) 'मनुष्याचें व्यक्तिमत्त्व' या ग्रंथांत म्हटलें आहे कीं, अणुशक्तीची धास्ती खाल्लेल्या या जगांत सुरक्षितपणा पाहिजे असेल तर नराचा नारायण होणें शक्य आहे अशी माणसाची दृढ श्रद्धा हवी. (योगसिद्धि व ईश्वर साक्षात्कार पृ. ४१२ ) ती श्रद्धा व फलप्राप्ति मिळविण्याचा फार सोपा उपाय श्रीसमर्थांनीं सांगून ठेविला आहे ' प्रभाते मनीं राम चिंतीत जावा। पुढें वैखरीं राम आधीं वदावा । सदाचार हा थोर

सांडूं नये तो । जगीं तोचि तो मानवी धन्य होतो' एवढें सोपें साधन करण्या-कडे तरी तरुणांची चित्तवृत्ति वळावी या हेतूनें श्रीसमर्थचरित्रांतील चमत्कारहि त्यांच्या शक्याशक्यतेकडे विशेष लक्ष न देतां या चरित्रांत पृष्ठ-संख्येचें बंधन संभाळून देतां येतील तितके दिले आहेत.

श्रीसमर्थचरित्र प्रपंचपरमार्थाचा उपदेश करणारें आहे. त्याचा अभ्यास करतांना शब्दज्ञानी वितंडवाद्यांच्या वाग्जंजाळांत न शिरतां निर्मल निष्ठेनें त्याचें मन:पूर्वक वाचन चालूं ठेवावें म्हणजे त्यांतील रहस्यभागाचें आकलन हळुहळू होत जातें. तुकाराममहाराजांसारख्या महापुरुषांनीं सुचविलें आहे कीं ' भुंकतीं तें द्यावीं भुंकों । आपण त्यांचें न शिकों । ' श्रीज्ञानेश्वर माऊलीहि तोच सावधगिरीचा इषारा देत आहेत. 'पाहे पां दूध पवित्र आणि गोड । पासीं त्वचेचिया पदरा आड । परि तें अव्हेरूनि गोचिड । अशुद्ध काय नेघती ' ।।५७।। ९ अ. स्वानुभवापुढें शुष्क शाब्दिक काथ्याकूटाची किंमत ती काय ? श्रीसमर्थचरित्राच्या अभ्यासानें आत्मकल्याणाचा सुलभ मार्ग सांपडावा अशी ज्यांची इच्छा असेल त्यांना ' तुमचें मन मजवरी बहुत आहे ते तुमचे आवडीच्या गुणें कल्याण होईल ऐसें नेमस्त चिन्ह दिसतें ' या समर्थवचनावर पूर्ण विश्वास ठेवून इहपर कल्याणप्रद अशा त्यांच्या चरित्राचें व उपदेशाचें श्रवणमनन नित्य करावें अशी विनंति आहे

लेखकाच्या माहितीप्रमाणें श्रीसज्जनगड येथील शके १८३१–३२ च्या सामुदायिक जपानुष्ठानांत सप्तकांडात्मक दासायनाची कल्पना ती. श्रीसद्गुरु चौंडेमहाराजांस प्रथम स्फुरली. तदनुसार कांहीं पद्यरचना त्या अनुष्ठानांत व नंतर सवडीनुसार त्यांनीं केली. पण पुढें ती सगळी वहीच प्रवासांत गहाळ झाली. श्रीसमर्थभक्त नानासाहेब देव यांनींहि एका लेखांत ही सप्तकांडा-त्मक दासायनाची कल्पना सुचविल्याचें चरित्रसाधनांचें अवलोकन करीत असतां लेखकास दिसून आलें. कै. कृ. ह. दीक्षित यांनींहि अशीच मांडणी करून एकदोन पुस्तकें प्रसिद्ध केल्याचें स्मरतें. ती. श्रीचौंडेमहाराजांनीं आपलें पद्यात्मक दासायन पूर्ण करण्याची आज्ञा लेखकास बऱ्याच वर्षांपूर्वी केली होती. पण कांहीं अनवधान व कांहीं गोरक्षणी कार्याचा व्याप यांमुळें त्या गुर्वाज्ञेचें पालन झालें नाहीं. तथापि, आई प्रसंगीं आपल्या लेंकराचें

नाक दाबून त्याला दूध पाजते तसें झालें. शके १८५७ पासून मध्यप्रांतांतील गिरड येथील श्रीसांप्रदायिक राममंदिराची सेवा लेखकाचे गळयांत पडली आणि त्या निमित्तानें प्रवचनांचे प्रसंग वरचेवर येऊं लागले. प्रवचनाचे शेवटीं समर्थांची गोष्ट सांगतांना ठरीव १०।५ गोष्टींपेक्षां अधिक कांहीं आठवत नसे. थोडया मुक्कामांचे प्रसंग निभावून जात; पण पुढें एकेका गांवीं दोन दोन महिने सतत प्रवचनें करण्याचे प्रसंग उद्‌भवूं लागले, तेव्हां मात्र समर्थचरित्राच्या अभ्यासाची निकड भासूं लागली. म्हणून शके १८७७ च्या भाद्रपदापासून तीन महिनेपर्यंत धुळयास मुक्काम केला. त्या-वेळीं श्रीरामदासी वाङ्मयाचे संशोधनाचा हेतु मुख्य ठेवून श्रीचरित्र होईल तेवढें अभ्यासावें अशी कल्पना प्रथम होती. पण संशोधनाचें कार्य एकटया-दुकटयानें व थोडया अवधींत होणारें नाहीं हें दिसून आल्यावर सगळें लक्ष श्रीसमर्थचरित्राच्या साधनाकडे द्यावें असें योजिलें. त्या प्रयत्नांचें हें फल श्रीदासायनाच्या रूपानें श्रीसमर्थकृपेनें वाचकांपुढें आलें आहे.

लेखकाची वरील भूमिका लक्षांत घेऊन दिनकरस्वामी, भीमस्वामी, मेरुस्वामी, हनुमंतस्वामी इत्यादि श्रीसमर्थशिष्यप्रशिष्यांच्या झोळयांतून जमविलेली ही माधुकरी समर्थभक्त वाचकांनीं गोड करून घ्यावी अशी प्रार्थना आहे.

## उपकृति–स्मरण

श्रीदासायनास साह्यभूत झालेल्या उपकारकर्त्यांचें स्मरण करतांना प्रथमतः अकारणकरुण अशा श्रीसमर्थसद्‌गुरूंचे चरण आठवतात. त्यांच्याच कृपेनें 'मनुजता, सुवंशीं जनीं व भलें द्विजत्व' लाभलें; त्यांच्याच इच्छेनें कै. गु. पांगारकरांसारख्या निष्ठावंत व प्रेमळ गुरुजनांच्या सहवासाचा योग लहानपणीं आला. गोजीवन श्रीसद्‌गुरु चौंडे महाराज यांच्या चरणांशीं चार तपेंपर्यंत वसून भक्तियुक्त कर्मयोगाचें दर्शन घेतां आलें आणि आज शरिराच्या वृद्ध व रुग्ण अवस्थेंत हें श्रीदासायन लिहिलें जात आहे, हें सर्व त्यांच्याच कृपेचें फळ होय. 'समर्था तया काय उत्तीर्ण व्हावें ?' त्यांच्या नामाचा उच्चार करीत श्रीचरणीं 'कायावाचामनोभावें' लीन होणें एवढेंच आपल्या हातीं आहे. आधुनिक संतकवि व संतचरित्रकार सुप्रसिद्ध सत्पुरुष श्रीदासगणु महाराज यांचें अकल्पित दर्शन होऊन त्यांचें आशीर्वादयुक्त

प्रोत्साहन मिळण्याचा योग अनायासें आला. डॉ. शं. दा. पेंडसे या विद्वद्वर्यांनीं प्रस्तावना लिहून आणिली; ह. भ. प. प्रि. शं. वा. दांडेकर यांनीं अनेक कामांची गर्दी मागें असतांहि पुरस्कार लिहून दिला;' म. म. दत्तोपंत पोतदार यांनींहि सवडींत सवड काढून उपोद्‌घात लिहिला. लो. ना. डॉ. माधव श्रीहरि उपाख्य बापूजी अणे यांनीं अनेक महत्त्वाचे व्याप मागें असतां आणि शरीर व्याधींनीं अंथरुणास खिळलेलें असतां मुद्रितें वाचून विस्तृत अभिप्राय दिला; या सर्व थोर थोर सज्जनांचे किती उपकार आठवावे ? ही लेखकाची पात्रता नव्हे; तर सद्‌गुरु समर्थांची दया आहे ही!

त्याच समर्थकृपेमुळें पुढील सर्व योग जुळून आले. प्रारंभासच गोजीवन श्रीसद्‌गुरु चौंडे महाराजांचा आशीर्वाद मिळाला आणि काम नेटानें सुरू झालें. सुप्रसिद्ध श्रीसमर्थभक्त नानासाहेब देव आणि त्यांच्या दोन संस्था—सत्कार्योत्तेजक सभा व श्रीसमर्थवाग्‌देवतामंदिर—यांच्या भांडारांतील हा सगळा माल श्रीदासायनांत भरला आहे. 'मी तंव हमाल भारवाही।'या दोन संस्थांच्यामुळेंच दुर्मिळ असे जुने श्रीसमर्थचरित्रग्रंथ व श्रीसांप्रदायिक अन्य वाङ्मय अभ्यासावयास मिळालें. विशेषत: श्रीसमर्थवा. मंदिराचे सांप्रतचे कार्यकारी विश्वस्त श्री. न. वा. शिदोरे व त्यांचे सहकारी श्री. शं. वा. जोग यांच्या आपुलकीच्या वागणुकीमुळें धुळ्यास तीन महिनेपर्यंत चरित्रसाधनें स्वस्थपणें अभ्यासतां आलीं. या अवधींत धाराशिवचे वकील श्री. व्यं. कृ. जितुरकर यांनीं प्रकृति नीट नसतांहि ही साधनसामग्री जमविण्याचे कामीं सर्व प्रकारें साहय केलें. धुळें पांजरपोळचे व्यवस्थापक श्री. कौजलगी यांचीहि मदत चांगली झाली.

हें चरित्र पुण्यास छापण्याचें ठरल्यानंतर भारत इतिहास संशोधक मंडळ, केसरी—मराठा ग्रंथालय, श्रीमंत आबासाहेब मुजुमदार, इत्यादिकांकडील ग्रंथ अभ्यासावयास मिळाले; पुणें ट्रेनिंग कॉलेजचे माजी प्रिन्सिपॉल श्री. पो. पा. बटीन यांनीं तिसगांव मढीची माहिती अगत्यपूर्वक आणून दिली ( तिचा उपयोग पुढील राजकारण काण्डांत व्हावयाचा आहे. ); डॉ. वि. म. भट यांच्या 'योगसिद्धि व ईश्वरसाक्षात्कार', 'या शास्त्रेंसहित आत्मप्रचीति' च्या ग्रंथाधारें श्रीसमर्थचरित्रांतील कांहीं चमत्कारांचा उलगडा आधुनिकांस पटेल अशा प्रकारें करतां आला. हैदराबादचे श्री. सेतुमाधवराव पगडी एम्. ए. यांच्या 'सुफी संप्रदाय' या पुस्तकामुळें शिवसमर्थकालीन भारताच्या पार-

तंत्र्याच्या अनेक कारणांपैकीं एका महत्त्वाच्या कारणाचा शोध लागला. व त्या वेळच्या लोकस्थितींचें भयानक स्वरूप स्पष्ट दिसलें. भूमचे श्री. नागोराव टेकाळे यांनीं आपल्या संग्रहांतील दासविजयाची लेखी पोथी नकलण्यास दिली व वे. मू. गोपाळदेव राजोपाध्यें यांनीं तिची प्रत करून पाठविली. श्रीसमर्थांची कुंडली व सुंदरकांडांतील ८–९ सर्ग यासंबंधींच्या कांहीं शंका श्री. तात्यासाहेब करंदीकर यांनीं दूर केल्या, भा. इ. सं. मं. चे कार्यवाह श्री. शं. ना. जोशी यांनीं शिवसमर्थसंबंधीं ऐतिहासिक माहिती पुरविली व वाचनास ग्रंथ दिले आणि त्या मंडळाचे पुराणवस्तुरक्षक श्री. ग. ह. खरे यांनीं मंडळाचे संग्रहांतील श्रीसमर्थजन्मभूमि जांब येथील चार दुर्मिळ फोटोंचे ब्लॉक्स करण्याची परवानगी दिली. श्रीगोवर्धनसंस्थेचे कार्यवाह श्रीरघुनाथ-बुवा चौंडे व त्यांचे सहकारी श्री. पु. ह. देशपांडे यांनीं मुद्दाम जाऊन वाईचे रोकडोबा व अकरामारुती यांचे फोटो काढून आणिले आणि दासायनाच्या पुण्यांतील कार्यालयाची सर्व व्यवस्था करून दिली. क्षेत्रमालिकाप्रकाशकमंडळीचे व्यवस्थापक श्री. गोंधळेकर पुणें यांनीं आपल्या श्रीसज्जनगड चित्र सामुदायांतील जरूर त्या चित्रांचे ब्लाक्स करण्यास संमति दिली आणि आपल्या संग्रहांतील चित्रांचें दुर्मिळ पुस्तकहि त्यासाठीं दिलें; श्रीसज्जनगडावरील श्रीसमर्थ–सेवा मंडळाचे उपाध्यक्ष श्री. बाबूराव वैद्य यांनीं टाकळी संगम व मारुती आणि महाबळेश्वर मारुती असे तीन ब्लॉक्स पुस्तकांत घालण्यास दिले. वरील प्रकारें ज्या संस्थांचे व सज्जनांचे अनेकशः उपकार झाले त्यांचे उतराई कसें होतां येईल!

विशेष कौतुकास्पद गोष्ट श्री. शत्रुघ्न बाळकृष्ण चौंडे यांची. पुणें येथील अभिनव कला प्रसारिणी संस्थेच्या विद्यालयांतील दुसऱ्या वर्षाचे ते विद्यार्थी आहेत. परीक्षेचे दिवस जवळ आले असतांहि केवळ आनुवंशिक श्रीसमर्थप्रेमानें त्यांनीं मुखपृष्ठावरील 'कलिकालव्याघ्रावरोधन' हें चित्र मार्मिक रीतीनें काढून दिलें आणि दासायनाच्या शोभेंत उत्कृष्ट भर घातली याबद्दल त्यांचें कौतुक करावें तेवढें थोडें आहे.

या सर्व चित्रांचे ब्लॉक्स वेळेवर व चांगले करून दिल्याबद्दल श्री. के. जोशी यांस आणि मुद्रण व तत्संबंधीं सर्व कामें आपलेपणानें व्यवस्थित

करून दिल्याबद्दल यशवंत मुद्रणालयाचे धनी श्री. शंकर रामचंद्र दाते यांस कितीहि धन्यवाद दिले तरी अपुरेच होतील.

श्री. शंकर गणेश प्रभुदेसाई यांच्या अमोल साह्याचा उल्लेख करणें म्हणजे आत्मश्लाघा करण्यासारखेंच होईल, इतक्या आत्मीयतेनें त्यांची सेवा या पूर्वार्ध प्रसिद्धीचे कामीं झाली असून उत्तरार्धहि लवकर प्रसिद्ध व्हावा असा त्यांचा प्रयत्न आहे. फलद्रूप करणें श्रीसमर्थांकिडे आहे. त्यांच्याच विनंतीवरून श्री. नामदेवराव ऊर्फ आण्णासाहेब राऊत यांनीं आपल्या बैठकीची जागा स्वत:ची गैरसोय करून घेऊन श्रीदासायनाच्या कार्यास्तव मोकळी करून दिली. या कार्यालयांतील सर्व प्रकारचीं लहानमोठीं कामें रा. यशवंत रंगनाथ महाजन या परांडे येथील तरुण विद्यार्थ्यानें मन:पूर्वक केलीं आणि सर्वांत मुख्य आवश्यकता द्रव्याची, तो भार परांडे व धाराशिव येथील निष्ठावंत श्रीसमर्थभक्तांनीं यथाशक्ति उचलला. सर्वच साह्यकर्त्यांचा नामोल्लेख येथें झाला असेल असें म्हणवत नाहीं. कांहीं नांवें विस्मरणानें राहिलीं असतील. उल्लेख झाला असो वा नसो, ह्या सर्व रूपांनीं श्रीसद्‌गुरुसमर्थांनीं साह्य पुरविलें आणि ही भिक्षेची हुंडी प्रसिद्धीच्या शिक्यावर पोहोंचविली.

श्रीदासायनाचा उत्तरार्ध कसा असेल ? केव्हां प्रसिद्ध होईल ? असें कित्येक ग्राहक एव्हांपासूनच विचारूं लागले आहेत. त्यावर लेखक काय उत्तर देणार ? तो नुसता लेखकच. ज्या सद्‌गुरु समर्थांकिडे या दासायनाचें कर्तृत्व आहे ते वाचकांची जिज्ञासा पूर्ण करतील. तथापि एवढें कळविण्यास हरकत नाहीं कीं पांचव्या राजकारण काण्डापैकीं तीनचतुर्थांश मजकुराची कच्ची प्रत लिहून तयार असून पुढील दोन काण्डांचीहि साधनसामग्री जमत आली आहे. शक्तिबुद्धि देऊन सर्व पूर्ण करून घेणें श्रीसमर्थसद्‌गुरूकडे आहे. एक्केहाळीकर आत्माराम महाराजांच्या शब्दांनीं शेवटीं विनवणी आहे कीं– लिहिलें भोळ्याभावें पुसतां सांगवेना । यालागीं प्रार्थना सर्वांप्रति ॥ १ ॥ सांभाळीत जावें तुम्ही मायबापें । आहे त्यांत सोपें करुनी दावा॥ २ ॥ मुख्य स्वात्मानंददात्यासी रिझवा । घ्यावी हेचि सेवा दिनाहातीं ॥ ३ ॥

श्रीचरणरज

पुणें, रथसप्तमी,
श. १८७७.

**अनंतदास रामदासी**

# प्रस्तावना

(लेखक– डॉ. शं. दा. पेंडसे, एम्.ए., एम्.ओ.एल्., पी.एच.डी. वेदान्ततीर्थ)

प्रस्तुत 'श्रीदासायन' या श्रीसमर्थरामदासचरित्राचे लेखक श्री. अनंतदास रामदासी हे समर्थसंप्रदायांतील एक तपस्वी वृद्ध पुरुष आहेत. श्रीराम व श्रीसमर्थ यांच्या अखंड चिंतनाची तपश्चर्या अनेक तपें ते करीत आहेत. समर्थचरित्राचें व समर्थवाङ्मयाचें अध्ययन हा या तपश्चर्येचा एक भाग आहे. या अध्ययनाचें फळ म्हणून त्यांनीं 'समर्थांचा गाथा' प्रसिद्ध केला व त्याला अभ्यासपूर्ण प्रस्तावना लिहिली. त्यानंतर 'विद्यार्थ्यांचे समर्थ रामदासस्वामी' हें समर्थ-वाङ्म्यांतील उत्कृष्ट वेच्यांचें पुस्तक त्यांनीं प्रसिद्ध केलें. आणि आज ते 'श्रीदासायन' या सप्तकांडात्मक समर्थचरित्राचा पूर्वार्ध प्रसिद्ध करीत आहेत. त्यांत समर्थांच्या पहिल्या १२ वर्षांचें चरित्र सांगणारें आदिकांड, नंतरच्या १२ वर्षांचें 'पुरश्चरण कांड,' त्यानंतरच्या १२ वर्षांचें 'तीर्थाटन कांड' आणि नंतरचें 'सुंदरकांड' यांचा समावेश झाला आहे.

श्रीसमर्थांचीं अनेक लहानमोठीं, जुनीं–नवीं चरित्रें आतांपर्यंत प्रसिद्ध झालीं आहेत. हीं सर्व चरित्रें काळजीपूर्वक वाचून आणि समर्थांच्या प्रसिद्ध व अप्रसिद्ध वाङ्मयाचा आधार घेऊन प्रस्तुत चरित्र श्री. अनंतदासांनीं लिहिलें आहे. त्यांतील विशेष असा आहे कीं, जुनी आध्यात्मिक दृष्टि न सोडतां नवीन ऐतिहासिक दृष्टीचा उपयोग या चरित्रांत केला आहे. समर्थांच्या वडिलांनीं व स्वतः समर्थांनीं केलेल्या पुरश्चरणांचें वर्णन या आध्यात्मिक दृष्टीनें अतिशय वाचनीय झालें आहे. अनेक वर्षें नियमानें उपासना करून तिचें सुफलदायित्व ज्यांनीं थोडेंबहूत अनुभविलें आहे त्यांनाच या विषयाची गोडी कळणें शक्य आहे. या दृष्टीनें आदिकांडांतील 'तपस्वी दांपत्य' 'श्रीसूर्यवरदान' 'श्रीरामदर्शन' हे सर्ग वाचकांनीं अवश्य वाचावे. श्रद्धापूर्वक पुरश्चरण करणारांना हृदयस्थ श्रीराम दर्शन देतो व त्यांचे सर्व पापताप नाहींसे करून धन्य करतो यांत अनुभविकांना कधींच शंका वाटत नाहीं. हृदयीं असतां मी रामू। सर्व सुखाचा आरामु। कां भ्रांतासि कामु। विषयावरी ॥ असें ज्ञानेश्वरांनीं म्हटलें आहे. विषयसुखावांचून अन्य-सुखाची ज्यांना कल्पनाहि नाहीं अशा करंट्यांना हा श्रीराम कसा दिसणार?

समर्थांचे वडील सूर्योपासक होते व नंतर रामोपासकहि झाले. रोज बाराशें गायत्रीजप, बाराशें सूर्यनमस्कार, अर्घ्यप्रदान आणि सूर्यावलोकन-पूर्वक आदित्यहृदय–कवचांचा पाठ हा त्यांचा नित्यक्रम कधींच चुकला

नाहीं. वयाच्या ३६ व्या वर्षापर्यंत हें पुरश्चरण केल्यावर सांगतेच्या वेळीं जेव्हां तेजस्वी ब्राह्मण प्रकट होऊन ' वरं ब्रूहि ' म्हणाला, तेव्हां ' कांहींहि मागण्याची इच्छा राहूं नये ' हा वर सूर्याजीपंतांनीं मागितला. यालाच निष्काम उपासना म्हणतात. परिपूर्णतेचें, सर्व कांहीं मिळाल्याचें हें चिन्ह आहे. अशा तपस्वी आणि तेजस्वी पित्याला श्रीरामनवमीच्या दिवशीं माध्यान्हीं श्रीसमर्थांसारखा तेजस्वी पुत्र व्हावा यांत काय आश्चर्य ! समर्थ ज्या घरामध्यें ज्या ठिकाणीं जन्मले त्याच ठिकाणीं श्री. नानासाहेब देव यांनीं समर्थांची तेजःपुंज मूर्ति स्थापन केली आहे. भाविकांनीं तिचें दर्शन अवश्य घ्यावें. समर्थ भेटल्याचा आनंद होऊन अश्रुधारा वाहतील.

वडिलांची परंपरा पुढें चालवून श्रीसमर्थांनीं टाकळीला वयाच्या १२ ते २४ व्या वर्षापर्यंत गायत्रीपुरश्चरणाची सूर्योपासना आणि श्रीराममंत्रजप करून श्रीरामाची कृपा संपादन केली आणि देशकालपरिस्थिति प्रत्यक्ष पाहण्याकरितां ते तीर्थाटनाला निघाले. या परिभ्रमणांत परकीयसत्तेनें केवळ राजकीय क्षेत्रांतच नव्हे तर धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रांतहि किती भयानक आक्रमण केलें आहे हें त्यांच्या लक्षांत आलें. जें जें म्हणून भारतीय असेल त्याचा विनाश करणारें आणि राष्ट्रास सर्व बाजूंनीं धुळीस मिळविणारें हें आक्रमण होतें याचे निदर्शक अनेक आधार, समर्थ वाङ्मयांतून आणि तत्कालीन ऐतिहासिक ग्रंथांतून श्री. अनंतदासांनीं दिले आहेत. स्त्रिया व मुलें यांचा अपहार व विटंबना, मूर्ति व देवलयांचा भंग, लूट, जाळपोळ, कत्तल यांचें संतापजनक थैमान देशांत कसें चाललें होतें, मुसलमानी सुफी साधु मुस्लिम धर्माचा प्रसार कसा करीत होते व आमचे बावळट लोक त्यांच्या भजनीं कसे लागले होते याचें साधार विवेचन या प्रकरणांत सांपडेल आणि रामदासांच्या काळीं मुसलमानांचा जुलूम कमी झाला होता आणि सुफीपंथ व भागवत धर्म यांत देवघेव झाली होती हें म्हणणें कसें बिनबुडाचें आहे तेंहि लक्षांत येईल.

या सर्व परिस्थितीमुळें निराश न होतां, स्वधर्म आणि स्वराज्य यांच्या स्थापनेकरितां समर्थांनीं समुदाय व संघटना करण्यास प्रारंभ कसा केला याचें वर्णन सुंदरकांडांत केलें आहे. महाबळेश्वरचें ब्रह्मारण्य, दुर्गम पण निसर्गसुंदर घळी, त्या घळींतील एकांतवासांत समर्थांनीं चालविलेलें लोककल्याणाचें चिंतन व योजिलेले उपाय व गुप्तरूपें केलेल्या उदंड संघटना यांच्या

वर्णनामुळें हें प्रकरण नांवाप्रमाणेंच सुंदर झालें आहे. यवनांच्या उपद्रवामुळें त्या काळीं मंदिरांतील मूर्ति पुष्कळदां सुरक्षित व गुप्त जागीं ठेवाव्या लागत. पंढरपुरच्या पांडुरंगाची मूर्ति अशा रीतीनें अनेक वेळां गुप्तजागीं न्यावी लागली आहे. चाफळच्या राममंदिरांतील मूर्ति प्रसंगीं सुरक्षित जागीं नेतां यावी म्हणून चाफळपासून दीडकोसावर समर्थांनीं एक गुप्त ठिकाण केलें. "समर्थे पर्वतीं केलें येक गुप्त सदन । प्रसंगें ठेवावया देवतार्चन । सूर्यप्रकाश उदक-सन्निद्ध उर्ध्वगमन । मार्ग सोपान करून जावें" असें या स्थळाचें वर्णन समर्थ-प्रतापांत आहे.

एकांतस्थळीं असणाऱ्या अशा घळींमध्यें समर्थांचा शोध घेत लोक येत आणि त्यांना आपलीं दुःखें सांगत. श्रीगुरुसमर्थ येकांतीं बैसतीं । प्रांतींचे लोक दर्शनासि येती । सकळ प्रांतींचा स्वामी परामर्ष घेती । **चिंता करिती विश्वाची** ।। देशकालवर्तमानें । आपण चिंताग्रस्त होती मनें । म्हणती कैसीं **वांचतील जनें । कैसीं ब्राह्मण्यें राहतील** ।। कैसी क्षेम राहेल जगति । **कैसीं देव देवाल्यें तगती । कैसे कुटुंबवत्सल लोक जगती** । कोणीकडे जातील हे ।। (स. प्र. २०) समर्थांच्या चिंतेचें स्वरूप व त्यांच्या कार्याचा व्याप यांची स्पष्ट कल्पना निराग्रही वृत्तीच्या वाचकांना या उताऱ्यावरून येईल.

ब्राह्मण्य म्हणजे ब्राह्मणांच्या ठिकाणीं अवश्य असणारे निर्लोभतादि गुण होत. त्यांचा त्या वेळीं लोप झाला होता. प्रतिकूल परिस्थितींत स्वतःच्या चारित्र्यानें लोकांना मार्गदर्शन करण्याच्या आपल्या कर्तव्यापासून ब्राह्मण भ्रष्ट झालेले पाहून समर्थांना वाईट वाटे. त्यांनीं हें महत्त्वाचें कर्तव्य करावें म्हणून समर्थांनीं त्यांच्यावर कडक टीका केली आहे. पोटाला मिळत नसेल तर भीक मागा पण यवनांचें दास्य करूं नका. स्वधर्म व स्वराज्य याकरितां जनमत जागृत करण्याचें तुमचें कार्य आहे असें त्यांनीं ब्राह्मणांना सांगितलें. हें कार्य करणाऱ्या महंतांची एक विशाल संघटनाच समर्थांनीं सिद्ध केली व त्यांना युक्तिबुद्धीनें भरून देशांतील अनेक ठिकाणीं पाठविलें. मठांचीं केंद्रें निर्माण करून तेथून 'अखंड चाळणा' करण्याचा आदेश त्यांना दिला व दर-वर्षी आपल्या कामाचा अहवाल समर्थांना त्यांनीं दिला पाहिजे असा दंडक घालून दिला. भयानक राष्ट्रीय आपत्तींत "कैसीं वांचतील जनें" हीच त्यांची चिंता होती. कारण 'दुसऱ्याचे दुःखें दुखवे । दुसऱ्याच्या सुखें सुखावे । अव-

येचि सुखी असावे । ऐशी त्यांची वासना' होती. या बाबतींत हा ब्राह्मण हा अब्राह्मण असा भेद त्यांच्याजवळ नव्हता.

कुंभारली घाटांतील हेळवाकची घळ गहन अरण्यांत आहे. पण तेथील निसर्गसौंदर्य व एकांत अत्यंत प्रसन्न आहे, असा आजहि अनुभव येतो. शिवतरच्या घळीला स्वतः समर्थांनींच ' सुंदर मठ ' असें म्हटलें आहे. पण तेथें आतां झाडी राहिलेली नाहीं. श्रीसमर्थ दहा संवत्सर पर्यंत कोठें न जातां 'सर्वग्रंथास' आरंभ केला.... आणि येकांतस्थानीं शिवतरचे घळींत जाऊन बसले " असा उल्लेख दिवाकर गोसाव्यांच्या एका पत्रांत आहे. या पत्रांतील आणि वाकेनिसी टिपण व अन्य प्रमाणें यांतील विरोध लक्षांत घेऊन ' सर्व ग्रंथ ' म्हणजे काय असावें याची श्री. अनंतदासांनीं मार्मिक चिकित्सा केली आहे[1] व मोरे प्रकरणाशीं या शिवतरच्या घळीतील वास्तव्याचा संबंध असणें कसें शक्य आहे हें समकालीन ऐतिहासिक घटनांवरून दाखविलें आहे. ' समर्थांनीं एक सारखे दहा वर्षे या घळींत राहून, दासबोध लिहिला ही कल्पना सोडून देण्यांत त्यांची ऐतिहासिक व चिकित्सक दृष्टीच दिसून येते. शके १५७१ च्या वैशाखांत शिवरायांना अनुग्रह दिल्यानंतर, आषाढीला समर्थ पंढरपुरास गेले होते. यावरून पांडुरंग निराळा व राम निराळा अशी त्यांची भावना नव्हती हें स्पष्ट होतें. ते अद्वैती असल्यामुळें पांडुरंगच राम स्वरूपांत त्यांना दिसत. वारकऱ्यांच्या ' रामकृष्णहरि ' या मंत्रांतहि रामाचा समावेश आहेच. भेद अल्पदृष्टि अनुयायी करतात. साधुपुरुष बाह्यतः वेगळे दिसले तरी अंतरीं मिळालेलेच असतात.

शेवटच्या ३४ व्या सर्गांत तिसगांव मठाधिपति दिनकर यांच्या ' स्वानुभव दिनकर ' ग्रंथांतील त्यांच्यावर झालेल्या गुरुकृपेचें रसपूर्ण वर्णन देऊन, वाचक त्या अनुभवाचा आनंद घेत असतांनाच दासायनाचा पूर्वार्ध समाप्त केला आहे. श्री. अनंतदासांनीं अनेक वर्षांचें वाचन आणि विचार यांच्या साहाय्यानें व श्रद्धा आणि चिकित्सा यांच्या योग्य समन्वयानें दासायनाचा लिहिलेला हा रसाळ पूर्वार्ध, वाचकांना त्याच्या उत्तरार्धा-विषयीं उत्कंठा उत्पन्न करील यांत शंका नाहीं.

नागपूर<br>
पौष व॥ ११ शके १८७७

शं. दा. पेंडसे

१ 'भूमिका' पृ. ३ पहा.

# उपोद्घात

श्री अनंतदास रामदासी हे स्वाभाविकच एक सुविख्यात आणि निष्ठावान् असे सांप्रदायिक रामदासी ( गिरड मठाधिपति ) आहेत. त्यांनीं भक्तिपूर्वक श्रीसमर्थवाङमयाचा अभ्यास केला असेल तर तें उचितच म्हटलें पाहिजे. प्रख्यात समर्थभक्त श्री. नानासाहेब देव यांनीं एकाग्रपणें श्रीसमर्थवाङमयसंग्रहप्रकाशनाचा महदुद्योग विशाल प्रमाणावर करून फार उपयुक्त अशी सामग्री प्रसिद्ध केली. आणखीहि प्रसिद्ध झाली पाहिजे. जन्मभर केलेल्या दृढ व्यासंगाचें फळ म्हणून देवांनीं श्रीसमर्थांचें विस्तृत चरित्र तीन भागांत प्रसिद्ध केलें आहे. त्यापूर्वीं हनुमंतस्वामी वगैरेंनीं लिहिलेलीं वा लिहविलेलीं चरित्रें प्रसिद्ध झालींच होतीं.

श्रीसमर्थ हे एक साक्षात्कारी सत्पुरुष म्हणून आबालवृद्धांस परंपरेनें ज्ञात आहेत. त्यांचीं जुनीं चरित्रेंहि सरस चमत्कारयुक्त श्रद्धावर्धक अशीं उपलब्ध आहेत. पिढयानिपिढया सहस्रावधि लोक त्या चरित्रांचें पठन करून समाधान पावत आले आहेत. मग अलीकडे श्री. देवांनीं तीन खंडांत नवीन चरित्र कशाला लिहिलें ? आणि त्यांचे मागून श्री. अनंतदास यांनीं हा श्रीदासायनाचा उद्योग कां चालविला आहे ? त्या जुन्या चरित्रांची गोडी कमी झाली आहे कीं भक्तमंडळींस त्यांचा वीट आला आहे ?

अंमळ विचार केला तर या शंका आपोआप विरून जातील. कवींचें पहा. समुद्र, अरण्य, वारा, पाऊस इत्यादि जुनेच विषय झाले तरी त्यांवर पुनः पुनः काव्यें होतच राहिलीं आहेत आणि रसिकांचीं मनें तृप्त होऊनहि त्यांचा रससेवनाचा हव्यास अतृप्तच राहिला आहे. उलट जों जों आहुति द्यावी तों तों अग्नि प्रज्वलितच होत जातो त्याप्रमाणें रसिकांची तृष्णा वाढतच जाते. जें रसिकाचें तेंच भाविकांचें. भाविकाला जों जों साधुसत्पुरुषांचीं चरित्रें पठनार्थ मिळतील तों तीं त्यांची गोडी सेवन करीत तो आपल्या मनाचें समाधान वाढवीत राहतो. नवीं चरित्रें तो वाचतोच पण जुन्यांचींहि पारायणें करीत असतो. खरें पाहिलें तर तो स्वार्थासाठीं हें सारें करीत असतो.

भक्तिश्रद्धापूर्वक लिहिलेलीं रसाळ चरित्रें वाचतांनाहि आशंका उत्पन्न होत नाहींत असें नाहीं. जेथें दोन श्रद्धाळू लेखकांच्या कथनांत भेद आढळतो तेथें भाविक देखील अडखळल्याशिवाय कसा राहील ? पण मनुष्याला जी बुद्धि दिलेली आहे, तीच शंकाहि उत्पन्न करते आणि समाधानाचाहि मार्ग तीच दाखविते. भाविक आहेत ते दोन सांप्रदायिक चरित्रांत विरोध आला तर समन्वयाचा मार्ग शोधतात आणि तेथेंहि अडवणूकच झाली तर एका संप्रदायाला प्रमाण मानतात किंवा ' अतर्क्य ' ' त्यांचे तेच जाणोत ' म्हणून गप बसतात.

घरांत ज्याप्रमाणें इकडे तिकडे वावरणारे उंदीर बिळें करीत असतात, एक बिळ बुजवावें तों तेथेंच पुनः त्याहून मोठें बीळ दुसऱ्या दिवशीं तयार. तें बुजवावें तों तिसरीकडे नवेंच बीळ घुशी नि उंदीर करून ठेवतात. आणि तरीहि आपण घरांत सुखानें वास्तव्य करीतच असतों. त्याप्रमाणें शंका आशंकांचे उंदीर मनांत बिळें करीतच असतात आणि आपला भावनांचा आणि विचारांचा संसार चालूच असतो.

अगदीं सत्पुरुषांनीं किंवा प्रत्यक्ष परमेश्वरांनीं जरी सांगितलें कीं ' इकडे बघूं नकोस ' तरी एखादी परम श्रद्धाळू सतीबाई समर्थांच्या भोजनाकडे डोळे फिरवतेंच फिरविते ! काय करील बिचारी ? ' प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति ! ' जिज्ञासा ही प्रकृति आहे आणि ती अनिवार प्रबळ असल्याचा प्रत्यय सर्व जीवांना येतोच येतो. तुम्ही कितीहि दाबा, चेंचा, ठोका, ती कोठेंतरी अगदीं मनांतल्या मनांत कां होईना, डोकें वर काढून तुम्हांला अस्वस्थ करितेंच ! सोडीत नाहीं.

उघडच आहे, मनुष्याला सत्य समजण्याची क्षुधा सतावीत असते. तो जर सत्याचा पाठलाग करीत राहील तर त्याला केव्हां तरी हें उमगल्याशिवाय राहणार नाहीं. कारण कीं सत्य हेंच परब्रह्म आहे. सत्य हाच परमेश्वर आहे. सत्याशिवाय दुसरें नाहीं. माणसांची ही धांवपळ कधींच संपणार नाहीं. आणि असें जोंवर आहे तोंवर एक झालें तरी दुसरें अशी श्रीसमर्थांसारख्यांचीं चरित्रेंहि लिहिलीं जातील, प्रसिद्ध होतील आणि त्यांचें पठनहि केलें जाईल

सत्याचें आकलन करतांना श्रद्धेचाहि आधार घ्यावा लागतो आणि चिकित्साहि करावी लागते. दुसऱ्यावर विश्वास ठेवणें याचें नांव श्रद्धा. उलट आपल्या बुध्दीच्या बळावर सर्व आशंकांचा निरास करून जें सत्यग्रहण करावयाचें त्याचें नांव चिकित्सा. केवळ चिकित्सक किंवा केवळ भाविक कोणी असूंच शकत नाहीं. भाविकहि चिकित्सा सोडीत नाहीं आणि चिकित्सकालाहि श्रद्धा टाकतां येत नाहीं. माणसाला एक खोड अशी आहे कीं कांहीं स्वतःला समजलें कीं टाळी वाजवून तो दुसऱ्याचें मन आकर्षित करतोच. दुसराहि यानें टाळी कां वाजविली म्हणून विचारूं लागतो. पहिला त्याला सांगूं जातो आणि दुसरा त्याचा श्रोता बनतो. श्रद्धेचा जोर प्रबळ असेल तर वक्ता जें सांगेल त्याला श्रोता मान डोलवीत जातो आणि बुद्धीचा जोर अधिक असेल तर श्रोता आशंकांची उतरंड वक्त्यापुढें उभी करतो! वक्त्यालाहि श्रोत्याला पटविण्याची ईर्ष्या सोडणार नाहीं आणि श्रोत्याची जिज्ञासाहि त्याला स्वस्थ बसूं देणार नाहीं. तिऱ्हाईत पहाणाऱ्याला श्रोत्यावक्त्याचा हा झगडा वाटतो, पण ज्याची जिज्ञासा जागृत झाली आहे त्यांना ती पुरी करून होईपर्यंत खरें समाधान लाभतच नाहीं. हा नित्याचा अनुभव आहे. 'श्रद्धामयोऽयं पुरुषः' हेंहि खरेंच आहे आणि 'बुद्धिर्यस्य बलं तस्य' हेंहि खरेंच आहे.

इतका प्रपंच करण्याचें कारण श्री. अनंतदासांच्या दासायनाच्या रचनेमागची भूमिका समजावी आणि आपण त्या भूमिकेचें ग्रहण कसें करावें याचा विचार करण्यास वाचकांस सुलभ व्हावें.

पूर्वीं श्रीसमर्थगाथा प्रसिद्ध केला त्यावेळीं श्रीसमर्थचरित्रांतले प्रसंग स्थलकालबद्ध करण्याचा प्रयत्न श्री. अनंतदासांनीं केलेला जिज्ञासूंना विदितच आहे. त्यानंतर श्रीसमर्थांचे भावरसपूर्ण सुंदर चरित्र 'श्रीदासायन' नांवानें लिहून प्रसिद्ध करावें हा हव्यास श्रीअनंतदासांच्या चित्तांत उदित झाला. श्रीदासायन नांवावरून श्रीरामायणाची आठवण सहजासहजीं होईल. वाल्मीकिरामायणाची रचना सप्तकाण्डात्मक आहे. श्री. अनंतदासांनींहि आपल्या श्रीदासायनाची रचना काण्डात्मक केली आहे. (१) आदि (२) पुरश्चरण (३) तीर्थाटण आणि (४) चौथें सुंदर या प्रमाणें चार काण्डांचा

श्रीसमर्थांची उभयविध भूमिका काय थोडीच अज्ञात असेल ? 'सारासार विचारणा' करण्याविषयीं साग्रहअनुरोध करतांना श्रीसमर्थांनीं काढलेल्या उद्‌गारांपैकींच पुढील दोन उद्‌गार आठवणीकरतां येथें उतरून घेतों :– भाविकें सात्त्विकें भोळीं त्यां नामस्मरणें रती । विवेकी जाणते घेती सारासार विचारणा ॥१॥ भाविकाला फलश्रुती । चमत्कारेंची निश्चयो । विवेको जाणते घेती । सारासार विचारणा ॥७॥ यावरून सात्त्विक, भोळ्या-भाबड्यांना श्रीसमर्थ एक जातींचे उपाय सांगतात, आणि जाणत्या विवेकी जनांना दुसरा साराचार विचारणेचा मार्ग दाखवितात. सारासार विचारणा जशी परमार्थांत, तशी व्यवहारांत चिकित्सा हें कळलें तर श्रद्धा व चिकित्सेच्या विरोधाला बराच फाटा देतां येईल.

वास्तविक मार्ग असा निष्पन्न होतो कीं 'विवेकी' चिकित्सा किंवा 'विवेकी'श्रद्धा याच ग्राह्य होतात. विवेक हेंच मनुष्याचें प्रधान लक्षण आहे. त्याचा त्याग केला तर मनुष्यत्वाला बाट लावला असें होईल. ज्ञानाचा अंत पामर माणूस कोठवर लावील ही मर्यादा ग्राह्यच करावी लागेल. पण म्हणून या मर्यादेचें भय दाखवून चिकित्सा गारद करतां येणार नाहीं किंवा तिच्यांत ढिसूळपणा शिरला तरी तो खपवून घेतां येणार नाहीं. चिकित्सा कठोरच पाहिजे, श्रद्धा मवाळच पाहिजे; ते ते त्या त्या वस्तूंचे तद्‌गत धर्मच आहेत. त्यांत न्यून झालें तर एकांगीपणाचा दोष बाधल्याशिवाय रहाणार नाहीं. चिकित्सा श्रद्धेला जवळ करीत नाहीं, श्रद्धा चिकित्सेच्या वाऱ्याला उभी रहात नाहीं. असें त्यांचें अहि-नकुलवत् नातें आहे. मनुष्य गारुडी आहे. तो दोघांनाही ताब्यांत ठेवून आपला खेळ दाखवितो किंबहुना असेंही म्हणतां येतें कीं तो 'सूत्रधार'हि कोणी निराळाच आहे. तो 'भ्रामयन्सर्वभूतानि यन्त्रारूढानि मायया' या धोरणानें आपली कळ चालवितो, तथापि यंत्रारूढ वस्तु यंत्राच्या नियमनांतच वागणार, निदान यंत्रारूढांनीं हें गृहीत धरून वागणेंच योग्य होईल.

श्री. अनंतदासांनाहि चिकित्सा सुटली नाहीं. नाहीं तर तें श्रीसमर्थांची कुंडली घेऊन परंपरेच्या कथनांतली विसंगति ते कां सुचविते ? श्रीसमर्थांचें वय अनुग्रहप्रसंगीं किती होतें ? दिनकरस्वामी प्रत्यक्ष समर्थशिष्य, ते या

प्रसंगीं श्रीसमर्थांचें वय अकरा वर्षांचें होतें म्हणतात. श्रीसमर्थांचा जन्म शके १५३० धरला तर अकरा वर्षें म्हणजे १५४१ यावा. मग शके १५३८ (दासायन पृ. ५७) ची वाट काय ? श्री श्रेष्ठांचें वय १५३८ त आकरा येईल. जाऊं द्या ही चिकित्सा. येथें अधिक कशाला? आपला मुद्दा एवढाच कीं, चिकित्सा सुटणार नाहीं किंवा टाळूं म्हटलें तरी टळणार नाहीं. "नानवाप्तमवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि" अशी मर्यादा प्रत्यक्ष भगवन्तांनींच घालून दिली आहे.

तात्पर्य, चिकित्सा आणि श्रद्धा या गंगायमुनांचे प्रवाह अखंड वाहातच राहातील आणि सत्याची गुप्त सरस्वती त्यांत जेथें मिळेल त्या त्रिवेणीवर आपण स्नान करून पुनीत होऊं या.

श्रीदासायनाचा उत्तरार्ध बिकट आहे, विविध आहे, भव्य आहे. श्री. अनंतदासांनीं सर्व जुन्या पारंपरिक ग्रंथांचें घुसळण चालू ठेवावें आणि आपल्या शुद्ध भावाचें नवनीत आम्हांला ओपावें. चिकित्सेचा कढ लावून आम्ही घृत काढून घेऊं. तेंच घृत आम्हांस 'आयुर्वै घृतं' या न्यायानें पुष्ट व तुष्ट करील. श्री जय जय रघुवीर समर्थ !

माघ शुद्ध पंचमी<br>शके १८७७<br>लोककल्याण, पुणें

**दत्तो वामन पोतदार**

---

सुप्रसिद्ध संतकवि व संतचरित्रकार

# श्री दा स ग णु म हा रा ज

यांचा आशीर्वाद

'दासायन' ग्रंथातें पाहुनि रसिकांस होतसे मोद ।<br>घ्यावा समर्थभक्तांनीं तो याचा अवश्य आस्वाद ॥

५९३ सदाशिव, पुणें

सकल संतांचा चरणरज<br>**दासगणू**

# पुरस्कार

समर्थभक्त श्री. अनंतदास रामदासी यांनीं लिहिलेल्या सप्तकांडात्मक श्रीदासायनाचीं कांहीं मुद्रितें व कांहीं हस्तलिखित भाग चाळण्यास मिळाले. श्रीसमर्थांचीं चरित्रें जितकीं लिहिलीं जातील तितकीं हवींच आहेत; कारण त्यांच्या जीवनाचें स्वरूप इतकें व्यापक व खोल आहे कीं, त्या स्वरूपाचे जे अनेक पैलू आहेत त्यावर टाकतां येईल तितका प्रकाश हवाच आहे. अलीकडे समर्थांचीं चरित्रें कांहीं प्रसिद्ध झालीं आहेत. पण तीं प्रामुख्यानें संशोधनात्मक स्वरूपाचीं असल्यानें सामान्य वाचकांस पेलण्यास जड वाटतात. विश्वसनीय माहितीवर उभारलेलें पण वादंग टाळून व संप्रदायशुद्ध लिहिलेलें चरित्र हवें होतें. ही उणीव या दासायनानें दूर होईल असें वाटतें.

या पुस्तकाची रचना आपण पुढील आधारावर केल्याचें 'भूमिकेंत' श्री. अनंतदासांनीं लिहिलें आहे. ते म्हणतात "श्रीसमर्थांच्या वचनाच्या आधारें प्रसंगांची शक्याशक्यता ठरविली आणि वाकेनिसी टिपण, समर्थप्रताप आणि बखरीची श. १८१० मधील प्रत यांच्या आधारें सुप्रतिष्ठित तर्कास धरून चरित्रप्रसंगांची संगती व कालानुक्रम निश्चित केला आहे." त्यांनीं पुढें यास 'सांप्रदायिकतेच्या गुणदोषांचा संसर्ग कोठें बाधला' असण्याचा संभव आहे असें म्हटलें आहे. पण मी समजतों चिकित्सक पण सांप्रदायिक लेखकच संतांचीं चरित्रें योग्य लिहूं शकतील. तेव्हां सांप्रदायिकता दोष तर नव्हेच, तो संतचरित्रकाराला आवश्यक असा गुण आहे. श्री. अनंतदास रामदासी यांनीं दोन तपांवर सांप्रदायसेवा केली आहे. यामुळें साधनमार्ग वगैरे काय याची त्यांना चांगलीच ओळख होऊन त्याबाबत लिहिण्याचा अधिकार त्यांस प्राप्त झाला आहे. त्यांनीं यापूर्वींच 'विद्यार्थ्यांचे श्रीसमर्थ रामदास स्वामी' म्हणून उत्कृष्ट पुस्तक प्रसिद्ध केलें आहे.

तात्पर्य, चिकित्सक व सांप्रदायिक पद्धतीचा मेळ घालून सोप्या व सरळ भाषेंत श्री अनंतदासांच्या लेखणींतून उतरलेलें हें सप्तकांडात्मक श्रीदासायन वाचकांस समर्थचरित्राची योग्य ओळख करून देईल अशी आशा आहे.

पौष व. ९ श. १८७७
पुणें २.

**शं. वा. दांडेकर**

# ना. डॉ. माधव श्रीहरि अणे यांचा अभिप्राय.

भगवद्भक्त हरिभक्तपरायण अनंतदास रामदासी यांनीं स्वतंत्र लिहिलेल्या ' सप्तकांडात्मक दासायन ' या ग्रंथाच्या पूर्वार्धाचीं मुद्रितें मला दाखविलीं. त्यांनीं लिहिलेली भूमिकाहि मी वाचली. त्यावरून माझें असें मत झालें आहे कीं, समर्थ रामदास स्वामी यांच्या चरित्राची यावरून वाचकांस यथार्थ कल्पना करतां येईल. कित्येक चिकित्सक बुद्धीच्या वाचकांस यांतील चमत्कारविषयक भाग हे निरर्थक वाटतील. परंतु प्राचीन संतांचीं चरित्रें जीं उपलब्ध आहेत व जीं तत्समकालीन सत्पुरुषांनीं लिहिलेलीं आहेत, त्यांतून जर हीं चमत्कारांचीं वर्णनें आढळतात तर तीं अर्वाचीन चरित्रकारांस वगळण्याचा काय अधिकार आहे? पाहिजे तर त्यांनीं त्यावर विश्वास ठेवूं नये; पण त्यास प्रसिद्धि न देणें हें योग्य होणार नाहीं. अनंतदास यांनीं यापूर्वी समर्थांच्या चरित्रविषयासंबंधानें गेल्या ५०–६० वर्षांत जें जें कांहीं लिहिलें व छापलें गेलें आहे त्याचा व समर्थभक्त शंकररावजी देव यांनीं धुळें येथील समर्थवाग्मंदिरांत जो बहुमोल हस्तलिखित पोथ्यांचा व इतर लिखितांचा संग्रह केलेला आहे, त्याचा अभ्यास करून मिळालेल्या माहितीचा प्रस्तुत ग्रंथांत उपयोग करून घेतला आहे.

वाल्मिकीय रामायणाच्या धर्तीवर हें दासायन लिहिण्यांत आलें आहे. पूर्वार्धांत पहिलीं चार कांडें आलीं आहेत. आदिकाण्ड, पुरश्चरण काण्ड, तीर्थाटन काण्ड व सुंदर काण्ड, हीं त्या काण्डांचीं दिलेलीं नांवें अन्वर्थक आहेत. तीर्थाटन काण्डांत तत्कालीन परिस्थितीसंबंधानें समर्थांनीं स्वतः निरीक्षण करून जें वर्णन आपल्या पत्रांतून व दासबोधादि ग्रंथांतून केलेलें आहे, त्यांत भावनावश होऊन अतिशयोक्ति केलेली नसून त्यांत केवळ वस्तुस्थितीचें निदर्शन आहे, हें दाखविण्यासाठीं त्या कालासंबंधानें सुप्रसिद्ध युरोपीय प्रवासी, दरबारी वकील व मान्य इतिहासकार यांच्या ग्रंथांतील वचनें संदर्भासह उद्धृत केलीं आहेत. ग्रंथांतील विवेचन व विधानें हीं सप्रमाण आहेत. त्यामुळें हें चरित्र शिक्षक व विद्यार्थी यांच्या हातांत देण्यास योग्य आहे.

कै. वा. आळतेकरांनीं लिहिलेलें चरित्र फार चांगलें व वाचनीय होतें: तो ग्रंथ आतां दुर्मिळ झाला आहे. शिवाय त्या ग्रंथाचे प्रकाशनानंतर

समर्थचरित्रासंबंधानें व कार्यासंबंधानें पुष्कळच लिखाण अधिकारी समजल्या जाणाऱ्या विद्वानांकडून प्रसिद्ध झालेलें आहे. भारतवर्षातहि त्यानंतर एक मोठी राज्यक्रांति होऊन गेली. जगांतील आंतरराष्ट्रीय राजकारणांत भारताला विशेष भाग घेणें प्राप्त झालें आहे. या कारणामुळें समर्थांच्या शिकवणुकीचे लोकांस स्मरण देण्यासाठीं आणि प्रचलित समस्यांच्या निरगांठी सोडण्यास मदत होण्यासाठीं समर्थांच्या चरित्राचें वाचन व मनन हें खचित उपयुक्त होईल. म्हणून अनंतदास रामदासी यांनीं सप्तकांडात्मक चरित्र लिहून प्रसिद्ध करण्याचा जो उपक्रम केला आहे तो सर्वथैव प्रशंसनीय आहे.

जेथपर्यंत भारतीयांत स्वातंत्र्यलालसा, धर्माभिमान, देशबांधवांच्या उन्नतीची कळकळ या गुणांची कदर राहील, तेथपर्यंत गोब्राह्मण प्रतिपालक छत्रपति शिवाजी महाराज व श्रीसमर्थरामदासस्वामी यांच्या चरित्राचे नवीन नवीन ग्रंथ निर्माण होत राहतील व आणखी नवीन चरित्रें लिहून त्यांचें गुणवर्णन करा अशी मागणी करणारा भाविक व गुणग्राही वाचकवर्गहि उत्पन्न होत राहील. श्रीसमर्थ व शिवाजीमहाराज यांची चरित्रगाथा ही भारतीय स्वातंत्र्यास अमर करणारी संजीवनी आहे. अलोपाथीचीं इंजेक्शनें उपयोगी पडतील कीं नाहीं याची शंका आहे. पण ही संजीवनी मात्र भारतीयांच्या स्वातंत्र्य-देहास सदा तरतरीत, निरोगी व कार्यक्षम ठेवील. म्हणून ती संजीवनी आबालवृद्धांस उपलब्ध करून देण्यासाठीं अनंतदास यांनीं जो उद्योग केला आहे त्याबद्दल मी पुन्हा एकवार अभिनंदन करतों व त्यांच्या या स्तुत्य प्रयत्नास अल्पकाळांत संपूर्ण यश येवो अशी सदिच्छा प्रकट करून हें अभिप्रायलेखन संपवितों.

३४२ सदाशिव पेठ<br>
पुणें २.<br>
ता. ११–२–५६

माधव श्रीहरि अणे

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| भूमिका . . . . . . . . . . . . . . . | १ |
| प्रस्तावना–डॉ. शं. दा. पेंडसे, एम्. ए. . . . . | ११ |
| उपोद्‌घात–म. म. दत्तो वामन पोतदार . . . . . | १५ |
| आशीर्वाद–श्रीदासगणुमहाराज . . . . . . . | २१ |
| पुरस्कार–ह. भ. प. प्रि. शं. वा. दांडेकर, एम्. ए. . . | २२ |
| अभिप्राय–ना. डॉ. माधव श्रीहरि अणे . . . . . | २३ |

विषय

**आदि काण्ड** . . . . . , . . . . . १– ७५

१ पूर्वजवृत्त (१), २ तपस्वी दांपत्य (५), ३ श्रीसूर्यवरदान (७), ४ श्रीरामदर्शन (९), ५ तत्कालीन जांब (१३), ६ श्रेष्ठ रामीरामदास (१९), ७ राणूबाईंचे डोहाळे (२१), ८ संकल्पसामर्थ्य (२४), ९ महाराष्ट्रभूचा अभ्युदयक्षण (२८), १० श्रीसमर्थांची कुंडली (३१), ११ बाळलीला (३५), १२ श्रीरामप्रभूचा कृपानुग्रह (५५), १३ सावधान (६०), १४ मेरुस्वामीकृत वर्णन (७२).

**पुरश्चरण काण्ड** . . . . . . . . . . ७६– ९९

१ तपश्चर्येस आरंभ (७६), २ पुरश्चरण कोणत्या मंत्राचें? (७७), ३ दिनचर्या (७८), ४ ग्रंथलेखन–अध्ययन (८०), ५ मायामोहिनी (८३), ६ लोकचर्चा (८४), ७ अलौकिक घटना (८५), ८ उद्धवाचा जन्म (८७), ९ पुरश्चरणाचा हेतु (८८), १० शहाजी महाराज व बालशिवाजी यांची भेट (९०), ११ पुष्पाचें चरित्र (९२) १२ काव्यसरितेचा उगम (९३), १३ टाकळीस श्रीमारुतीची स्थापना (९४), १४ मूर्ति शेणाची कीं सोन्याची ? (९६), १५ फलश्रुति (९७)

**तीर्थाटन काण्ड** . . . . . . . . . . १००–१५२

१ तीर्थयात्रेंतील हेतु व सामग्री (१००), २ खडतर प्रवास (१०१), ३ कोणकोणतीं तीर्थें पाहिलीं (१०४), ४ तीर्थयात्राक्रम (११०), ५ पैठणची घार (१२३),

विषय

६ मातृदर्शन आणि गंगाप्रदक्षिणा (१२५), ७ हिमकुंडांत देह झोकला!' याचा अन्वयार्थ (१३०) ८ परसत्तेचें आक्रमण (१३२), ९ परधर्मसंसर्गानें झालेला बुद्धिभ्रंश (१४०), १० दुहेरी आपत्तींचा परिणाम (१४६) ११ उपाययोजना (१५०).

**सुंदर काण्ड** . . . . . . . . . . . १५३–२३५

१ 'सुंदर काण्ड' सञ्ज्ञेचा अर्थ (१५३), २ महाबळेश्वरचें ब्रह्मारण्य (१५४), ३ श्रीरोकडोबा व धनगराची त्रिपदा गायत्री (१५९), ४ जरंडेश्वरीं रहिवास (१६१), ५ नांदत्या घरांत 'हें' म्हणतात का? (१६३), ६ चमत्कारमीमांसा (१७०), ७ चंद्रगिरीची घळ (१७४), ८ तुंबाभर गाईचें दूध द्या (१७८), ९ हा मूल आम्हांस द्यावा (१८०), १० प्रत्यहीं माझा नमस्कार। देवासी करावा (१८४), ११ मसूरच कां निवडलें? (१८६), १२ अनन्य निष्टेचें अद्‌भुत दर्शन (१८९), १३ पहिल्या उत्सवाची दुसरी देणगी (१९२), १४ आणखी एक हिरा लाभला (१९५) १५ मुसळाची करामत (१९६), १६ स्वप्नसाक्षात्कारानें खूण मिळाली (१९९), १७ अमंगलांतून मंगल निघालें (२०२), १८ देवालयें केलीं सामान्य हस्तें (२०४), १९ दिनानाथ हा राम येणार आहे (२०७), २० चाफळची पहिली श्रीरामनवमी (२०९), २१ या उत्सवपद्धतीचीं कांहीं वैशिष्टयें (२१४), २२ श्रीसमर्थांचें चाफळ (२१७), २३ प्राणजीस प्राणदान (२१८), २४ कळिकाळव्याघ्रावरोधन (२१९), २५ अकरा मारुती (२२४), २६ पूर्वार्धाचा उपसंहार (२३३).

प्रार्थना, माझें गाऱ्हाणें . . . . . . . . . . २३६

सूचि . . . . . . . . . . . . . . २३७–२४०

# चित्रांची सूचि


| | | |
|---|---|---|
| १ | श्रीराममंदिर व २ श्रीसमर्थमंदिर, जांब | ३३, ३४ |
| ३ | जांब येथील डोह व ४ पंचवटी | ५१, ५२ |
| ५ | (नाशिक) पंचवटी येथील श्रीरामाचें देवालय | ७० |
| ६ | टाकळी येथील संगम आणि ७ श्रीसमर्थांचें हस्ताक्षर | ८१, ८२ |
| ८ | गोमयाचा मारुती, टाकळी | ९५ |
| ९ | महाबळेश्वर येथील मारुती | १५६ |
| १० | श्रीरोकडोबा, वाई | १६० |
| ११ | श्रीजरंडेश्वर | १६२ |
| १२ | श्रीकरवीर निवासिनी | १८२ |
| १३ | मसूरचे मारुती | १८९ |
| १४ | श्रीशिव छत्रपति | १९३ |
| १५ | चाफळचें श्रीराममंदिर | २०५ |
| १६ | ,, श्रीराम | २०८ |
| १७व१८ | ,, भीममारुती व दासमारुती | २१२ |
| १९ | कळिकाळ व्याघ्रावरोधन. | २२४ |
| २० | सिंगणवाडी, शहापूर, बहेबोरगांव, उंबरज, मनपाडळें पारगांव, हनुमानघाट–मारुती श्रीक्षेत्रकाशी, माजगांव, बत्तीसशिराळे – मारुती | २२७–२३० |


श्रीसद्गुरो समर्था,

"तुझें चि सर्वही देणें सर्वही तुजपासुनी ।
संसारीं मोकळें केलें आनंदीं ठाव दीधला ।।
उत्तीर्ण काय म्यां व्हावें तुझें कृपेसी रोकडें ?"

आपल्या कृपेचें उतराई होतांच येत नाहीं. जन्मोजन्मीं अशीच कृपेची पाखर घालून सेवा घ्यावी. आपणांस अविदित असें काय आहे ? 'कलिकालव्याघ्रावरोधन' करून 'हद्द जाली सीमा जाली प्रचीत प्रचीतीस आली । कैसी आनंद वेळ वाहिली सुंदरमठीं ।' असा आनंदीआनंद या आनंदवनभुवनांत एका आनंदसंवत्सरीं आपण पिकविला. पण आज कालचक्र अगदीं उलटलें. तें आतां पूर्वस्थितीवर यावयाचें तर आपणच आपलें सामर्थ्य रोकडें दाखवावयास हवें. आपल्या अनाथ महाराष्ट्रियांस धीर देऊन सांगा ना एकदां --

'महाराज पुनः कधीं येणार ?' राष्ट्रोद्धार करणार !





श्रीमत्सद्गुरु गोजीवन श्रीचोंडेमहाराज व
ती. सौ. आईसाहेब

श्रीचरणसेवेसीं :–

आपणच लाविलेल्या अंकुराचें हें फळ आहे. श्रीसमर्थसेवेच्या प्रीतीचें बीज पन्नास वर्षांपूर्वीं रूजू घालून, त्यास वरचेवर जीवन देऊन व परोपरीनें सांभाळून या उन्नतावस्थेस आपण आणिलें.

दासायनीं रमविलात अनंतदास ।
स्वामी समर्थ वदवोत जगन्निवास ॥
लोकोपयोग घडवाल कथाप्रसंगें ।
हा बाळ नम्र विनवी निज अंतरंगें ॥

असा आशीर्वाद श्रीदासायनारंभीं देऊन आज तें पूर्ण करविणारे आपणच. तेव्हां 'तुझें चि तुजला दिल्हें हें म्यां कोठूनि आणिलें ?' विज्ञप्ति एवढीच कीं,

पायीं तव ही डोई, ध्यान मनासी तुझ्याचि चरणाचें ।
दास्यीं शरीर वागो, दीनाचें हेंचि मागणें साचें ॥
गो-गोप-संत-सज्जनसंगति देउनि सदैव मति जडवीं ।
सन्मार्गीं, गुरुसेवा देवा **दासा अनंत** मज घडवी ॥

पुण्यपत्तन
पुणें, रथसप्तमी
शके १८७७

**श्रीचरणरज**

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुध्द | शुध्द |
|---|---|---|---|
| १५ | २० | वद्ध | वृद्ध |
| ३० | दुसऱ्या परिच्छेदाचे शेवटीं 'कां न मानावें?' यानंतर पुढील मजकूर वाचावा :– वडील मुलाप्रमाणें या मुलासहि पैठणास नाथमहाराजांच्या दर्शनास नेलें. " नाथांनीं मुलाचें बहुत वर्णन करून हा मारुती अंश परम समर्थ होईल. कोण्ही शककर्ता कृष्णातीरीं होईल. याच्या योगें त्याची कीर्ति होऊन धर्मस्थापना होईल. उपासनेचे उत्तीर्ण होऊन जगदुद्धार करील. आम्ही अवतार समाप्त करतों. म्हणोन अत्यादरें निरोप दिल्हा." असें वाकेनिशी टिपणांतील तिसऱ्या कलमांत म्हटलें आहे. १५३० च्या फाल्गुनांत हा प्रसंग घडला. १५३१ च्या फाल्गुन व. ६ स एकनाथमहाराजांचें निर्याण झालें असें शि. च. प्रदीपांतील घोडेगांवकर शकावलींन म्हटलें आहे. | | |
| ३७ | शेवटची | बंध | बंधू |
| ४० | १५ | थोरचे वृक्षा | थोर वृक्षाच |
| ४० | १८ | टिंचिती जाण | टिंचिती पूर्ण |
| ६२ | ७ | अथ | अर्थ |
| ६३ | ४ | शु. स. ७ | शु. ७ स |
| ६९ | २३ | मानु | मानु |
| ८८ | १ | उद्धवांच | उद्धवांचा |
| ८९ | शेवटून २ री | ० पंक्तीवरील | ० पंक्ति, वरील |
| ११६ | शेवटची | अनग्रह | अनुग्रह |
| १४५ | १६ | जजरी० | जर्जरी० |
| १२८ | शेवटची | तत्काळाचि | तत्काळचि |
| १४८ | शेवटून ३ री | लटोनी | लुटोनी |
| १४९ | २ | शांमुखी | किती शांमुखी |
| १५७ | शेवटून ६ वी | नणे | नेणे |
| १७३ | शेवटून ६ वी | आपले न ज्ञाने० | आपलेन ज्ञाते० |
| १८४ | शेवटून २ री | कित्येय | कित्येक |
| १८५ | १ | ठियाणीं | ठिकाणीं |
| १९२ | शेवटची | प्रतिपश्चंद्र | प्रतिपच्चंद्र |
| १९५ | १३ | स्वधर्मापालक | स्वधर्मपालक |
| २०१ | ११ | नेणोंचि | नेणेंचि |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थळ
अनुक्रम १८८३४ वि
क्रमांक ९३२५ नों. दि.

श्रीरामसमर्थ

सप्तकांडात्मक

# श्री दा सा य न

ग्रंथ संग्रहालय ठाणे

( पूर्वार्ध )

## आ दि का ण्ड

### १ सर्ग—पूर्वजवृत्त

श्रीसमर्थ रामदासस्वामी ज्या कुलांत अवतरले तें देशस्थ ऋग्वेदी जामदग्न्य गोत्री ठोसर कुल सुमारें एक हजार वर्षांपूर्वीं बेदर प्रांतीं रहात होतें. त्या प्रांतांत दुष्काळ पडला म्हणून तिकडील अनेक लोक गंगातीरीं येऊं लागले; त्यांत कृष्णाजीपंत ठोसर हे आपल्या आप्तस्वकीय अशा चार कुटुंबांबरोबर निघून गंगादक्षिणतीरीं मौजें हिवरें (तर्फ तालखेडें, प्रांत बीड) येथें शक ८८४ मध्यें येऊन राहिले. त्यांचे उपाध्ये गणेशभट चाभाडे हे हिवऱ्यासच कृष्णाजीपंतांजवळ राहिले. बाकीच्यांपैकीं कोणी गुंज, कोणी देहगांव, अशा निरनिराळ्या गांवीं गेले. वेदरकडे असतांनाच कृष्णाजीपंतास (१) केशवपंत, (२) राघोपंत, (३) हरिपंत व (४) आत्मारामपंत असे चार पुत्र झाले होते. हिवऱ्यास आल्यावर त्यांना पांचवा मुलगा झाला त्याचें नांव दशरथपंत. हे दशरथपंत वयांत येण्याच्या पूर्वींच केशवपंतादि चार बंधूंनीं हिवरें, राक्षसभुवन, उकडगांव, आदिकरून ४८ गांवांची वसाहत केली. आणि तेथील कुळकरणीपण व ज्योतिषपण

यांची वृत्ति स्वीकारून बारा बारा गांवें प्रत्येकीं वांटून घेतलीं. ही वांटणी शक ९०४ मध्यें झाली.

पुढें दशरथपंत १५–१६ वर्षांचे झाल्यावर त्यांनीं मनांत विचार केला कीं, चवघे बंधु यांनीं ४८ गांवांची वृत्ति मिळवून आपसांत वांटून घेतली. आपण त्यांत विभाग मागावा हा धर्म कोण ? आपण आपली नवीन वृत्ति संपादन करावी, असें मनांत आणून आपले उपाध्याय गणेशभट चाभाडे यांच्या विचारें हिवऱ्याहून निघून तेथून गंगेच्या उत्तरतीरीं तीन कोसांवर पूर्वीच्या वडगांवची पडपांढर होती, त्या ठिकाणीं दशरथपंत आले. तेथें गवळ्यांची वस्ती होती. त्यांचा प्रमुख लखमाजी गवळी यानें दशरथपंतास ठेवून घेऊन त्यांना राहण्यासाठीं एक छपरी करून दिली. दशरथपंत व त्यांच्याबरोबर हिवऱ्याहून आलेला झाबऱ्या महार चौढालेकर हे दोघे तेथेंच राहिले. पंतांनीं हें गांव वसवून तेथील पाटीलकी लखमाजी गवळी यास दिली, आणि आपण ज्योतिष व कुळकरणीपण या दोन वृत्ति घेऊन त्या गांवाचें नांव कसबें जांब असें ठेविलें. तेथें वस्ती निश्चित झाल्यावर आणखी पुढील ११ गांवांची वसाहत दशरथपंतांनीं केली. (१) पांडे पोखरी, (२) साखळगांव, (३) आंतरवालें, (४) सुरमेगांव, (५) आरगड गव्हाण, (६) साडेगांव, (७) हातगांव, (८) निंबी, (९) आसनगांव, (१०) पाटोदें व (११) वीर गव्हाण. या सर्व गांवांची कुळकरणी व ज्योतिषपणाची वृत्ति दशरथपंताकडे होती. ही बारा गांवांची वसाहत शक ९०५ मध्यें झाली. या अवधींत दशरथपंतांचें कुटुंब हिवरें येथें होतें. शक ९०९ मध्यें कृष्णाजीपंत निवर्तल्यावर शक ९१० मधें कुटुंबासह जांबेस राहण्यास ते आले.

दशरथपंतास पुत्र सहा– (१) राम, (२) लक्ष्मण, (३) भरत, (४) शत्रुघ्न, (५) हनुमंत, (६) वासुदेव. वासुदेवपंत हे व्याकरणादि शास्त्रांचें अध्ययन केलेले म्हणून त्यांस व्यास म्हणत. या सहा मुलांस दशरथपंतांनीं वरील बारा गांव, प्रत्येकीं दोन दोन

प्रमाणें वांटून दिले आणि झाबऱ्या महारास जांबेची वतनदारी करून दिली.

ज्येष्ठ पुत्र रामाजीपंत यांचे वांटयास कसबें जांब व मौजें आसन-गांव हे दोन गांव आले. वांटणीप्रमाणें हे सर्व बंधू आपापले गांवीं राहण्यास गेले. त्यांत पुढील पिढयांत कित्येकांनीं नवीन गांवें मिळविलीं, कितीएकांचीं जुनीं गमाविलीं गेलीं, कित्येक शाखांचा वंशच खुंटला, तथापि कृष्णाजीपंतापासून चालत आलेली रामोपासना मात्र या घराण्यांत अखंड चालू होती व सांप्रत आहे.

(१) कृष्णाजीपंत, (२) दशरथपंत, (३) रामाजी (त्यांचे पासून वंशज एक एक पुरुष होत आले. एखाद्यास दुसरा पुत्र झाला तरी त्याची वंशवृद्धि झाली नाहीं.), (४) हरिपंत, (५) निराजी (यांस निरंजनपंत म्हणत, हे ब्रह्मवेत्ते होते), (६) शिवाजी, (७) विष्णु,(८) बबनाजी उर्फ बाहणाजी यास ब्रह्माजीपंतहि म्हणत, (९) आत्माराम (यांस बृहस्पतिपंत म्हणत; यांनीं शक ११८४ मध्यें (१) कुंभार पिंपळगांव,(२) भेंडाळें, (३) निंबुली, (४) कोठाळें व (५) घाणेगांव. हे पांच गांव मिळविले, हे नवीन ५ व जुने २ अशा ७ गांवांची वहिवाट सोनो बल्लाळ चाभाडे नामक उपाध्यायाकडून चालविली ), १० गणेश, ११ धोंडदेव, १२ आत्माराम ( यांस अलक्षपंत म्हणत; हे ब्रह्मवेत्ते होते. यांच्या पणजोबांनीं मिळविलेली नवीन पांच गांवांची वृत्ति यांनीं आपले उपाध्ये गणेशभट बिन केशवभट चाभाडे यांस शक १३०५ मध्यें दान दिली.),(१३) गुंडोपंत, (१४) निराजी ( यांस निरंजनपंत म्हणत), (१५) आत्माराम, (१६) शिवाजी, (१७) विष्णु, (१८) केशव, (१९) रामाजी, (२०) भानजी, (२१) सूर्योपंत, (२२) त्रिंबक, ऊर्फ नांव बाहणाजीपंत. यांच्या वेळीं वडगांवच्या पांढरीवरील जुनी वस्ती, सरकारी लष्करी हालचालींचा तेथें लोकांस फार उपद्रव होऊं लागल्यानें तेथील वस्ती उठवून सध्यांच्या जागीं शक १४९९ मध्यें आणिली. त्यावेळीं त्रिंबकपंतांचे चिरंजीव

सूर्याजी यांचें वय ९ वर्षांचें होतें. तेवढ्या लहान वयांत त्यांचा व्रतबंध होऊन लग्नही झालें होतें. या नव्या वस्तीवर आल्यानंतर सुमारें एक वर्षानें त्रिंबकपंतांचा काळ शक १५०० मध्यें झाला.

शक ८८४ पासून शक १५०० पर्यंतची ही सुमारें सवासहाशें वर्षांची इतकी संगतवार माहिती कोठून आणिली असा प्रश्न साहजिकच मनांत येईल. त्याचें उत्तर असें कीं, श्रीहनुमंतस्वामीकृत श्रीसमर्थांच्या बखरींत ही माहिती सविस्तर दिली असून, बखरींतील त्या पूर्वजवृत्तान्ताचें मूळ श्रीसमर्थवाग्देवता मंदिरांतील बाडांक १७५९ चें जुनें गुंडाळें होय. यांतील माहिती शक १७१५ मधें हनुमंत स्वामींनीं जी छोटी बखर प्रथम तयार केली तिच्यासाठीं श्रीसज्जनगड संस्थानचे त्या वेळचे कारभारी श्री. रंगो लक्ष्मण मेढे यांनीं गोळा करून ठेविली होती. पुढें चरित्रविषयक अधिक अधिक माहिती गोळा होत चालली, आणि "जुने प्रतीवर चरित्राचा विस्तार विशेष नव्हता, म्हणून शक १७३९ आषाढ वद्य पक्षीं जैतापूरचे मुक्कामीं मल्हारी रामराव चिटणीस व रंगो लक्ष्मण यांनीं प्रार्थना केली जे श्रींचें चरित्र विस्तारें करून ल्याहावयाविषयीं आज्ञा जाली पाहिजे; त्यावरून श्री (हनुमंतस्वामी)नीं स्वमुखें कांहीं सांगितलें तें आणि जुने बखरीवरील पाहून श्री समर्थांचें चरित्र लिहिलें."

हें चरित्र लिहितांना मल्हार रामराव चिटणीस यांनीं १७३९ च्या आषाढांत पुन्हा जुनी माहिती जमवून लिहिली होती. पण पुढें श्री हनुमंतस्वामी समाधिस्थ झाल्यानंतर "मठप्रकरणीं अस्ताव्यस्त जाले म्हणून श्री महारुद्रस्वामी यांनीं रंगो लक्ष्मण यांस आज्ञा केली जे पेशजी तुम्ही लिहिले प्रमाणें पुनः ल्याहावें म्हणून आज्ञा झाली. त्याजवरून...... श्री सद्गुरूची वंशावळ लिहिली. पूर्वील माहितगारी लेहून ठेविले होते ते, कांहीं संस्थान जांबेस, कांहीं संस्थान किल्ले सज्जनगडीं होते ते व भानजी यादव पाटोदेकर जोशी हे श्री (समर्थांचे) गोत्र पुरुष यांचे घरचे लिहिल्यावरून

एकंदर करून लिहिलें आहे........ शके १७५३ खरनाम संवत्सर श्रावण मास." एवढा मजकूर बाडांक १७५९ चे गुंडाळ्यांत आरंभींच आहे.

यावरून लक्षांत येईल कीं, वरील वृत्तान्त म्हणजे केवळ कल्पित कादंवरी नसून, जुन्या कागदपत्रांचा त्यास आधार आहे. या ठोसर घराण्यांतील बावीस पिढ्यांचा जो त्रोटक इतिहास वर दिला आहे, त्यावरून असें दिसून येतें कीं, कर्तबगारी व भगवन्निष्ठा या दोन गुणांची परंपराच जणूं मराठवाड्याच्या हृदयामध्यें जांबेस या घराण्याच्या रूपानें सहाशें वर्षें चालत आली.

पहिले पुरुष कृष्णाजीपंत यांना दुष्काळामुळें देशत्याग करावा लागला तरी, नव्या प्रांतांत आपल्या पांच पुत्रांकरवीं त्यांनीं बीडपासून पैठणपर्यंत ५०।६० गांवांमध्यें अवघ्या १५।२० वर्षांत चांगला जम बसविला. भगवन्निष्ठेचें तर या मंडळींस बाळकडूच होतें. पांचवे पुरुष निराजी हरी व बारावे आत्माराम धोंडदेव ऊर्फ अलक्षपंत हे दोघे ब्रह्मवेत्ते होऊन गेले. नववे पुरुष आत्माराम वाहणाजी यांनीं पांच गांवांची वृत्ति मिळवली, आणि त्यांचे पणतू आत्माराम धोंडदेव यांनीं ती उपाध्यायास दान देऊन टाकिली! समर्थांचे आजोबा त्रिंबकपंत यांनींहि जांबच्या जुन्या गांवठाणावर (सध्यांच्या गांवापासून सुमारें अर्धा पाऊण कोस) सरकारी अमलदारांच्या व शिपाई प्याद्यांच्या येण्याजाण्याचा फार कसाला पडूं लागला, म्हणून तेथील वस्ती उठवून सांप्रतच्या जागीं आणिली. असे हे सर्व पुरुष कर्तृत्ववान्, उदार व धार्मिक अशा वृत्तीचे होते.

## २ सर्ग—तपस्वी दांपत्य

श्रीरामदासस्वामींचे वडील सूर्याजीपंत हे मूळपुरुष कृष्णाजीपंत यांजपासून तेविसावे होत. अवघ्या दहाव्या वर्षी दुर्दैवानें पित्याचें छत्र नाहीसें झालें तरी कुलपरंपरेंतील पवित्र

संस्कारांमुळें त्यांचें आचरण तेवढ्या लहान वयापासूनच एखाद्या योग्यासारखें होऊं लागलें. जांब व आसनगांव या दोन गांवांची पांडे-जोसपणाची वतनवृत्ति त्यांचे घरांत रामाजी दशरथ ( मूळ पुरुष कृष्णाजी पंतापासून तिसरे ) पासूनची होती. मध्यंतरीं त्यांचे आजोबा सूर्याजी भानजी यांनीं आपली मुलगी माजलगांवकर पांडे यांस देऊन तिला आसनगांवचें पांडेपण आंदण दिलें होतें आणि तीं नवराबायको आसनगांवीं येऊन राहिलीं होतीं. पण त्रिंबकपंत असतांच ती व तिचा पति यांचा काळ जाला. त्यांस संतान नसल्यानें आसनगांवचें पांडेपण त्रिंबकपंतांनाच पुनः पहावें लागलें. त्यांचे पश्चात् जांब बरोबर आसनगांवचेंहि कुळकरणपण सूर्याजी-पंतांकडे आलें. पण त्यांचे स्वतःचे व कुलपरंपरेचेहि पारमार्थिक संस्कार फार बलवत्तर, त्यामुळें पंत वतनवृत्तीच्या पाशांत फारसे अडकले नाहींत.

मनाची स्वाभाविक ओढ भगवद्‌भक्तीकडे, त्यामुळें दोन दोन गांवांचें कामकाज पाहणें त्यांच्यानें जमेना. म्हणून आसन-गांवचें पांडेपण आपले शालक भानजीपंत बोदलापुरीकर यांचेकडे त्यांनीं सोंपविलें, आणि जांबेचें कामहि, ग्रामस्थ व अधिकारी यांस तसें स्पष्टपणें सांगून, रात्रीं करण्याचें ठरविलें. त्यांचा दिवसाचा बहुतेक सगळा वेळ बाराशें गायत्री जप, हजार बाराशें सूर्यनम-स्कार, अर्घ्यप्रदान, सूर्यावलोकनपूर्वक आदित्यहृदय-कवचादिकांचे पाठ, इत्यादि प्रकारें सूर्याराधनेंत व्यतीत होत असे.

भाग्यानें त्यांची पत्नी राणुबाई (रेणुकाबाई असेंहि नांव कोठें दिलें आहे.) ही त्यांच्या तपस्वी वृत्तीस सर्वस्वीं अनुकूल अशी त्यांस लाभली होती. संतचरित्रकार महिपति आपल्या दास-(संत) विजयग्रंथांत सूर्याजीपंतांच्या गृहस्थाश्रमाचें वर्णन करितात,

आतां ऐका देवोनि चित्त । गंगातीरीं पंचक्रोशींत । जांबक्षेत्र असें निश्चित्त । जगविख्यात जाणती ॥ १८ ॥ तेथील कुळकरणी भगवद्‌भक्त । नामाभिधानी सूर्याजीपंत । राणूबाई स्त्री निश्चित ।

भ्रतारआज्ञेंत सर्वदा ॥ १९ ॥ गृहस्थाश्रमीं असोनि जाण । परमार्थसाधनीं त्यांचें मन । वाचेसी नेम केला त्यानें । असत्य वचन न बोले ॥ २० ॥ माध्यान्ह समयास आला कोणी । तरी विष्णुसमान मानी । अधिकारपरत्वें पूजोनि । अन्नदानीं उदार ॥ २१ ॥ सर्वांभूतीं दया निश्चिती । विष्णुभक्तांची वहु प्रीति । साधुसंत घरा येती । तरी आदर करिती तयांचा ॥ २२ ॥ पुराण आणि हरिकीर्तन । दोघांसि आवडे मनापासून । काया वाचा आणि मन । सूर्य-उपासना करीतसे ॥ २३ ॥ प्रातःकाळीं करूनियां स्नान । वासरमणीसि अर्ध्यप्रदान । आरक्त सुमनें रक्तचंदन । यथाविधीनें मंत्रोक्त ॥ २४ ॥ आदित्यहृदयस्तोत्रपठण । नित्य करीत पारायण । अखंड वासरमणीचें ध्यान । निज प्रीतीं अंतरीं ॥ २५ ॥ इतुकें करूनि साचार । घाली सहस्र नमस्कार । तया तेजाची शक्ति अपार । यास्तव अंतर पडेना ॥ २६ ॥ बारा शत जप नित्य । करीत असे एकाग्रचित्तें । . . . . ॥ २७ ॥

असें निष्ठेचें सूर्याराधन शके १५२६ पर्यंत म्हणजे वयाच्या-छत्तिसावे वर्षापर्यंत त्यांनीं चालविलें. पतीबरोबर राणुबाईंचींहि सूर्यपूजादि आदित्यव्रतें, अश्वत्थप्रदक्षिणा, हनुमत्सेवा, गोपूजन इत्यादि साधनें चाललीं असतील याविषयीं शंकाच नको. भोंवतालच्या आयुर्मानाकडे पाहतां आपलें निम्में आयुष्य गेलें, संतति होण्याचें चिन्ह दिसेना, तेव्हां कोठेंतरी क्षेत्रवास करून शेष आयुष्य भगवत्सेवेंत निवांतपणें घालवावें आणि त्याकरितां चालू असलेल्या अनुष्ठानादिकांचें उद्यापन प्रथम करून घ्यावें, अशी योजना पत्नीच्या संमतीनें सूर्याजीपंतांनीं ठरविली.

## ३ सर्ग–श्रीसूर्यवरदान

सूर्याजीपंतांनीं उद्यापनाचा दिवस श. १५२५ माघ शुद्ध सप्तमी हा निश्चित केला. त्या दिवशीं विधानाचे शेवटीं पंत उत्तरपूजा करीत असतां आपल्यासमोर कोणी तेजःपुंज वृद्ध ब्राह्मण

उभा असलेला त्यांस दिसला. सूर्याजीपंतांनीं त्यांस मोठचा आदरानें नमस्कार करून बसावयास आसन दिलें. आणि 'आपण कोण? कोठून आपलें येणें झालें ? ' असा प्रश्न केला.

" ज्या देवतेची तुम्ही आराधना करितां तोच मी, तुम्हांस वर द्यावयास आलों आहे. वरं ब्रूहि " वृद्धानें म्हटलें.

सूर्याजीपंतांनीं तत्काळ साष्टांग नमस्कार घातला आणि हात जोडून विनयानें म्हटलें, 'महाराज! साक्षात् तेजोनिधि जगच्चक्षु जगदात्मा आपण! वाडवडिलांच्या पुण्याईनें श्रीचरण आज दृष्टीं पडले; नाशिवंत वर काय मागावा ?'

'पण कांहींतरी मागितलें पाहिजे, देवतादर्शन अमोघ असतें.'

' केवळ दर्शनमात्रें कृतार्थ झालों, मिळावयाचें तें मिळालें, आतां आणखी काय मागू ?

' तरी पण कांहीं मागावेंच '

'देणेंच असेल तर कांहींहि मागण्याची इच्छा राहूं नये ! श्रीची कृपा निरंतर राहून चरणीं ठाव मिळावा एवढेंच कृपा करून द्यावें' सूर्याजीपंत अत्यंत लीनतेनें म्हणाले.

'तें तर तुम्हांस मिळालेंच आहे, पण वर देण्यासाठीं आलों आहे, तुम्हांला इच्छा नसेल तर तुमच्या पत्नीस पाचारावें.'

ही आज्ञा होतांच पंतांनीं राणूबाईस बोलावून घेतलें आणि म्हटलें कीं, हे प्रत्यक्ष भगवान् सूर्यनारायण आहेत, नमस्कार करा'. त्या वृद्ध ब्राह्मणास व पतीस नमस्कार करून राणूबाई उभ्या राहतात तों सूर्यनारायण त्यांस म्हणाले ' कांहीं वर मागा.'

त्यांना राणुबाई म्हणतात, 'काय वर मागूं? आपल्या कृपेनें सर्व अनुकूलच आहे.'

'कांहीं मागा, कांहीं इच्छा अंतःकरणांत असेलच कीं ?

'महाराज, दुसरी कांहीं इच्छा नाहीं, स्त्रीस्वभावानुसार पुत्र व्हावा असें मात्र वाटतें. देणें असेल तर कृपा करून परम भगवद्भक्त असा एखादा पुत्र द्यावा.'

राणूबाईंचें हें नम्रतेचें भाषण ऐकून सूर्यनारायण संतुष्ट झाले. उभयतां पतिपत्नी हात जोडून समोरच उभीं होतीं, त्या दोघांचेहि मस्तकीं वरदहस्त ठेवून भगवान् म्हणतात,

'आमचीहि हीच इच्छा आहे; त्याकरितांच आम्हीं आलों. मदंशेंकरून एक, व मारुतीअंशेंकरून एक असे दोन पुत्र तुम्हांस होतील. ते परमभागवत व श्रीरामउपासक होऊन एक वंशधर होईल, गृहस्थाश्रम चालवीत गंगातीरीं राहील; आणि दुसरा मारुती अंशें करून होईल तो कृष्णातीरीं राहून जगदुद्धार करील. उभयतांहि लोकोद्धार करतील. पुढील संवत्सरीं श्रीरामनवमीचे उत्सवांत श्री रघुपतीचें दर्शन तुम्हांस होऊन तुमचे मनोरथ पूर्ण होतील.'

याप्रमाणें वर देऊन श्री सूर्यनारायण अदृश्य झाले. या प्रसंगानें सूर्याजीपंत व राणूबाई यांचें चित्तास अत्यंत कृतकृत्यता वाटली.

## ४ सर्ग–श्रीरामदर्शन

शके १५२५ च्या रथसप्तमीचा हा उद्यापनविधि सूर्याजी-पंतांच्या घरीं याप्रमाणें कल्पनातीत आनंदांत पार पडला. पुत्र-प्राप्तीस्तव पूर्ण निराश झालेल्या पंतांच्या मनास दोन भगवद्भक्त व जगदुद्धारक पुत्र होतील, असें वरदान मिळाल्यानें केवढा आनंद झाला असेल ! आणि त्याबरोबरच श्रीरामदर्शनाचेंहि वरदान मिळालेलें ! आतां पंतांच्या मनांत पुत्रेषणेपेक्षांहि श्रीरामदर्शनाची लालसा अधिक वाढूं लागली.

शके १५२६ ची वर्षप्रतिपदा आली. सूर्याजीपंतास गुरुपरं-परेनें श्रीरामोपासना नव्हती, तरी प्रतिवर्षी श्रीरामनवमीचा उत्सव ते मोठ्या थाटानें करीत. नऊ दिवसांतील अन्नसंतर्पणा-साठीं ३।४ खंडी गहूं लागत ! उत्सवाचे सर्व कार्यक्रम हर्षभरित अंतःकरणानें पंत पार पाडीत होते; तरी पण जसजसा उत्सवाचा

एकेक दिवस जात चालला, तसतशी श्रीरामदर्शनाविषयींची पंतांच्या मनांत तळमळ एकसारखी वाढत होती. ‘ दर्शन केव्हां होईल ? कोठें होईल ?’ कोणत्या प्रकारें होईल ?’ अशा प्रकारचे प्रश्न त्यांच्या मनापुढें सतत उभे रहात होते.

पाडवा झाला, दर्शन नाहीं; द्वितीया आली, तीहि गेली, दर्शन झालें नाहीं ; तृतीया ? कीर्तन झाल्यानंतर अंथरुणावर पडल्या पडल्या पंतांच्या अंत:करणाची अशी सारखी रात्रभर तगमग चाले. असें होतां होतां सात दिवस गेले; अष्टमी रात्रीची कथा उभी राहिली; सूर्याजीपंतांचे मेहुणे व पैठणच्या एकनाथमहाराजांचे शिष्य भानजीबुवा बोदलापुरीकर हे कीर्तन करीत होते. आपल्या नित्यक्रमाप्रमाणें सूर्याजीपंतहि मागें टाळकऱ्याशेजारीं हात जोडून उभे होते.

टाळ वाजे मंद मंद । मुखीं हरिनाम छंद ॥१॥
फडके ताळी येक वेळा । घोष नामाचा आगळा ॥२॥
रंगीं हरिदास मातले । नाम घोषें आनंदले ॥३॥

अशा नामघोषांत श्रोते वक्ते तल्लीन झाले होते; मध्यरात्रीचा समय, इतक्यांत हाक आली.

“पांडेजीबाबा हायती का?” गांवचा येसकर ओरडून म्हणाला, “हकीम आल्यातीी, तुम्हाला बेगी बेगी पारावर बोलावत्याती” पारावर म्हणजे जांवच्या उत्तरेकडील वेशीच्या बाहेर असलेल्या मारुती देवालयाचे मोठ्या चौथऱ्यावर. याच ठिकाणीं देवलयाचे मागचे बाजूस वटवृक्ष पूर्वीं होता म्हणून त्यास पार म्हणत.

‘अरे, कथा आटोपल्यावर येतों’ पंत कथेंत उभे होते तेथूनच म्हणाले. ‘जा, जाऊन सांग.’

‘फार जरूरीचं काम हाय जी’ येसकर म्हणतो. ‘अगदीं बिगिन बोलावलय. तकड चला अदुगर अन् मग आल्यावर कथा आटपा.’

कीर्तनरंगांतून निघून जाणें पंतांचे जीवावर आलें होतें. ते त्याला म्हणाले ‘अरे, तूं जाऊन तर सांग’. ‘नगा, नगा, मायबाप’!

येसकर गयावया करीत म्हणाला, 'ते मला पुनः हकड हकालतील. मला अंधारांत नका ठेंचकळायाला लावूं गरिबाला !'

'नको ही पराधीनता' असें सूर्याजीपंतास वैतागानें वाटलें. कीर्तनांतून जाणें त्यांना अगदीं कष्टप्रद वाटत होतें, पण करतात काय ? कीर्तन चालू ठेवण्यास सांगून व कलमदान रुमाल घेऊन खिन्न मनानें ते बाहेर पडले. पुढें येसकर, मागें पंत, असे दोघे मारुतीच्या पारापर्यंत आले. पाराकडे पंतांनीं पाहिलें तों तेथें खांद्यावर तिरकमठे घेतलेले दोघे पठाण दिसले; ओळखीचे दिसेनात. यांस पहातांच पठाण येसकरास विचारतात, 'क्यौं रे, पांडेजी आगये ?' 'हां जी, मायबाप' जोहार करून येसकरानें उत्तर दिलें. त्यावर पंत येसकराकडे वळून म्हणतात, 'का रे, पाटील वगैरे कोणींच आले नाहींत ? शेकदारही नवेच दिसतात, कोण आहेत रे हे ?'

'महाराज, मला काय ठावं?' येसकर उत्तर देतो. 'त्यांनीं पांडेजीला बोलाव म्हटलं, म्यां बलावलं तुम्हास्नी; आतां आपुनच इचारा कीं.'

प्रथम मारुतीरायाचें दर्शन घ्यावें आणि नंतर यांच्याशीं बोलावें अशा विचारानें पंतांनीं देवालयांत जाऊन हातांतील रुमाल कलमदान बाजूस ठेवून श्रीसमोर साष्टांग नमस्कार घातला आणि उठून पाहतात तों सगळें देवालय अद्भुत तेजानें भरून गेलेलें ! क्षणभर पंत मूर्च्छित झाले. सावध होऊन पहातात तों बंधू लक्ष्मणासह श्री रामराय हास्य वदनानें आपणाकडे पाहत जवळ उभे असून आपणास सावध करीत आहेत !! कर्णीं कुंडलें, कांसें पीतांबर, अंगावर दिव्य उत्तरीय, एक मेघश्याम कांति व दुसरे गौरवर्ण, स्मितमुखी अशा त्या दिव्य मूर्ति पाहून पंताच्या शरिरावर अष्ट सात्त्विक भाव दाटून आले. श्रीरघुपतीस अत्यंत भक्तिभावानें साष्टांग प्रणिपात करून हात जोडून ते उभे राहिले. 'सूर्यनारायणाचें वरदान खरें झालें ना ?' रामप्रभूंनीं विचारिलें. पुनः साष्टांग नमस्कार घालून पंत म्हणाले, 'तेव्हां त्या रूपानें दर्शन दिलें. आज या रूपाचें दर्शन झालें.' 'सूर्यवरदानाप्रमाणें दोन पुत्र

मराठी ... स्थळप्रत.

तुम्हांस होतील,' श्रीराम प्रभु म्हणाले, 'अधिक कांहीं मागावयाचें आहे का' ?

पंतांनीं नकार दर्शविल्यावर, श्रीरामांनींच विचारलें, 'तुम्ही श्रीरामनवमीचा वार्षिक उत्सव समारंभानें करितां, आणि कुलपरंपरेची जपादि नित्योपासना कां नाहीं करीत?' 'श्रीस सर्व विदित आहेच; ज्यांच्याकडून सांप्रदायपरंपरेचें ज्ञान व्हावयाचें ते वडील माझ्या लहानपणींच शांत झाले. नंतर मंत्र कोणाकडून घ्यावा? या प्रतिवार्षिक उत्सवाची थोडीशी माहिती होती, तो मात्र ग्रामस्थांच्या साह्यानें, आपल्या कृपेनें कांहीं होत आहे. सूर्याराधना यथाशक्ति चालली.'

'पण उपासना यथापद्धति चालविल्यावांचून पुत्रप्राप्ति व्हायची नाहीं; म्हणून सद्गुरूकडून मंत्रानुग्रह घ्यावा, म्हणजे मनोरथ पूर्ण होतील.' श्रीरामराय म्हणाले. 'आतां श्रीचरणा-परता दुसरा श्रेष्ठ सद्गुरु कोण पहावयाचा?' पंत लीनतेनें उद्गारले.

श्रीरामप्रभूंनीं हास्य करून मंत्रोपदेश केला आणि म्हणाले 'तुमच्या तपानें मी संतुष्ट झालों, आणखी वर माग.'

सद्गदित होऊन पंत म्हणतात, 'दर्शनानें कृतार्थ झालों, असेंच दर्शन वारंवार घडावें एवढी चरणीं प्रार्थना आहे.'

श्रीरामरायांनीं मंद हास्य करीत पट्टाभिषिक्त श्री राम-ध्यान, वामभागीं जानकी, आणि लक्ष्मण व मारुती अशा चार मूर्ति सूर्याजीपंतांस देऊन सांगितलें कीं, 'या मूर्तींचें अर्चन करीत चला, म्हणजे हेतु पूर्ण होतील.' त्या मूर्ति परम हर्षानें हातीं घेऊन पंत विचारतात, 'पत्नीस दर्शन व्हावयाचें आहे.'

'त्यांचा योग पुढें आहे.' असें उत्तर देऊन श्री रामप्रभु गुप्त झाले. नंतर त्या चार मूर्ति घेऊन हर्षभरित चित्तानें सूर्याजीपंत घरीं आले, आणि मूर्ति देवघरांत ठेवून कलमदानहि नमस्कार-पूर्वक श्रीपुढें ठेविलें. मनांत संकल्प कीं, इतःपर अशी परतंत्रतेची ही सेवावृत्ति नको. हें कलमदान श्रीसज्जनगडीं अद्यापि आहे.

इकडे भानजीबुवांचें कीर्तन चालूंच होतें. आरती खिरापत होऊन श्रोते सर्व निघून गेल्यानंतर पंतांनीं पत्नीस व भानजी बुवांस देवघरांत नेऊन मूर्तीचें दर्शन करविलें, आणि घडलेलें वृत्तहि सांगितलें. त्यांना अर्थात् आनंदच झाला; पण स्वतःस दर्शन न झाल्यानें राणूबाईचें चित्तास मात्र कांहींशी खिन्नता आली. त्यावर 'तुमचे दर्शनाचा योग पुढें आहे, असें श्रीनींच स्वमुखें सांगितलें आहे.' असें बोलून पंतांनीं त्यांची समजूत घातली. धन्य ते तपस्वी पतिपत्नी आणि धन्य तें जांब क्षेत्र!

कल्पना नसतांहि सूर्याजीपंतांना असे दिव्य साक्षात्कार व पुत्रप्राप्तीचीं वरदानें प्राप्त झालीं, याचें कारण काय? दास वि. धामकर्ते सांगतात, 'सत्य वाक्यवाणी शुचिर्भूत। जो मानी परललना मातृवत। भजनभाव कीर्तनीं वाढली प्रीत। तरीच सुपुत्र लाधले ।।५२।। माध्यान्हकाळीं आले कोण्ही। विष्णुसमान मानिती मनीं। पंक्तिभेदाची न करिती काहणी। तरीच सुत जाले सद्भक्त ।।५३।। ब्रह्मविदांचा घडला सांगात। भास्करतपाचा संग्रहो बहुत। अन्नोदकें पोपिती सर्व यातींतें। तरीच समर्थ उदरां आले।।५४।। उत्सवकाजीं संतोष मोठा। न धरिती आशा दुराशा ताठा। चालती स्वधर्मे अभेद वाटा। धरिल्या तरी सौख्य फळलें हें।।५५।। आपल्या वंशांत श्रेष्ठ—समर्थांसारखे कुलदीपक सुपुत्र उत्पन्न व्हावेत अशी इच्छा असेल तर शील, सदाचार, भगवन्निष्ठा आणि आहारविहाराची शुचिता यांची परंपरा अशी सतत टिकविली पाहिजे.

## ५ सर्ग—तत्कालीन जांब

श्रीरामदासस्वामींची जन्मभूमि जांव (जिल्हा औरंगाबाद, तहसील अंबड) हें गांव गोदातीरापासून उत्तरेस तीन कोस असून, मनमाड—हैद्राबाद या आगगाडीच्या लहान फांट्यावर जालन्यापासून चवथें स्थानक जें परतूड, तेथून तें दक्षिणेस सहा कोस

आहे. परतूडहून जांबला जाण्यास बैलगाड्या प्रयत्नांतीं मिळतात, पण पावसाळ्यांत फारच त्रास पडतो. सांप्रत मार्गशीर्षापासून उन्हाळा होईपर्यंत परतूडहून मोटारी चालू असतात; रस्ता मात्र कच्चा आहे.

तीच ही भूमि, कीं जिथें दशरथपंत ठोसरांनीं व त्यांच्या पुढील वंशजांनीं श्रीरामोपासना नि तत्सम पुण्यकृत्यें सतत सवा-सहाशें वर्षें परंपरेनें चालविलीं. सूर्याजीपंतांनीं जेथें २४ वर्षें सूर्याराधन केलें तें 'कुळकरण्याचें घर' येथेंच होतें, पण तें आतां दिसणार नाहीं. त्या घरांतील ज्या खोलींत महाराष्ट्राचा हा भाग्यसूर्य प्रथम प्रकटला, त्याच जागेवर शके १८५४ चे श्रीराम-नवमीपासून श्रीसमर्थ मूर्तिरूपानें प्रसन्नवदनानें विराजमान झाले असून दर्शनास येणाऱ्या निष्ठावंत सेवकांस अभयदान देत आहेत कीं,

'तुमचें मन मजवरि बहुत आहे, ते तुमच्या आवडीच्या गुणें कल्याण होईल ऐसें नेमस्त चिन्ह दिसतें.'

–श्रीसमर्थ हृदय ५७३-७४

श्रीसमर्थ मूर्तिरूपानें जेथें उभे आहेत, ती तीच कुळकरण्याच्या घरांतील बाळंतिणीची खोली, कीं जिथें बाळ नारायणाचा देह धरणीमातेनें प्रथम झेलला. बृहन्महाराष्ट्रियांच्या साहाय्यानें सुप्रसिद्ध समर्थभक्त श्री. शंकर श्रीकृष्ण उपाख्य नानासाहेब देव यांनीं त्या ठिकाणीं सुंदर मंदिर उभारिलें असून अभ्यागताश्रमादि सोयी करून ठेविल्या आहेत. तपश्चर्येस निवांत व रमणीय असें हें स्थान आहे. मुख्य गाभाऱ्यांत श्रीचे नित्यपूजकावांचून अन्य कोणी जात नाहीं. गाभारा, मंडप व सभोंवतालचें आवार स्वच्छ ठेवण्याविषयीं फार दक्षता घेतली जाते. मंडपांत उभे राहून श्रीचरणाकडे दृष्टि क्षणैक राहिल्यास बाहेरील साऱ्या जगाचा विसर पडतो नि अंतःकरण समाधानानें डोलूं लागतें, असा भाविकांचा अनुभव आहे.

बावीस तेवीस पिढ्यांच्या पुण्याईनें भारलेली तपोभूमि ही! श्रीसमर्थांच्या असंख्य बाललीला या स्थळीं झाल्या. त्यांच्या पदस्पर्शानें येथील कण न कण पवित्र झालेला आहे. ज्या आडाच्या जीवनावर नारायणाच्या बालदेहाचें पोषण झालें तो मंदिराचे वायव्येकडे बाहेरचे बाजूस आहे. या पवित्र स्थानाचें दर्शन प्रत्येक समर्थभक्तानें जन्मांत एकदां तरी घ्यावें आणि तेथील शुद्धातिशुद्ध रज:कणांत एकवेळ लोळून यावें.

श्रीसमर्थमंदिराचे पश्चिमेस जवळच ठोसर घराण्याचें पूर्वापार चालत आलेलें श्रीरामसंस्थान आहे. या स्थानाचा विशेष हा कीं येथील गाभाऱ्यांत मध्यें श्रीराम, त्यांच्या उजव्या हातास श्रीसीतामाई व डाव्या हाताला श्रीलक्ष्मण अशा क्रमानें कमरेइतक्या उंच सिंहासनावर कर्नाटकी धाटणीच्या मूर्ति ठेविल्या आहेत. नेहमींच्या क्रमाहून हा वेगळेपणा जसा येथें दिसतो, तशीच एक गमतीची चाल बोहर जाणाऱ्या नवविवाहितासाठीं आहे. नवऱ्यानें देवाचें दर्शन घेतल्यानंतर आपल्या पत्नीस नमस्कार करावयाचा! नमस्कार न करणाऱ्यास कांहीं त्रास होऊन प्रचीति येते व नमस्काराचें प्रायश्चित्त घेतांच सुटकाहि होते असें ग्रामस्थ सांगतात. शतमुखी रावणाशीं झालेल्या युद्धांत रामप्रभूंना जानकीस नमस्कार करावा लागला; त्या प्रसंगाचें ध्यान येथें असल्यानें येथें पत्नीच्या पायां पडावें लागतें अशी या नमस्काराची उपपत्ति वृद्ध सांगतात. तर कित्येक म्हणतात कीं, ज्या रामरायाच्या कृपाप्रसादानें समर्थ लग्नांतून 'सावधान' होऊन निघून गेले, त्यांचेच दर्शनास लग्नाची बेडी अडकवून गेलेल्या वरानें आपल्या चुकीचें प्रायश्चित म्हणून हा नमस्कार करावयाचा असतो!

गाभाऱ्यापुढील मंडप व भोंवतालचें आवार प्रशस्त असून त्यांतच पूर्वेस जुना आड व त्याच्याजवळ स्नानगृह आणि इतर तीन बाजूंस मठाच्या इमारती आहेत. याच आडांतून काढलेल्या घागरींतील पाण्याचें श्रीसमर्थहस्तस्पर्शानें तुपांत रूपांतर होऊन, तें दशमीच्या पारण्याचे पंगतींत तूप म्हणून वाढविलें गेलें. ती

पवित्र तुपाची घागर (आतां तांब्या पितळेच्या पत्र्यानें) मढविलेली अद्यापि मठांत आहे. जेथें श्रेष्ठ व समर्थ या दोघां बंधूस श्रीरामप्रभूंनीं मंत्रानुग्रह केला तें दक्षिणाभिमुखी मारुतीरायाचें मंदिर, आणि तें कुळकरण्याचें शेत (त्याला सांप्रत देवमळा म्हणतात) याच जांब गांवांत आहे. ती नदी जेथें नारायण पोहत असेल, ज्या डोहांत उडी टाकल्यामुळें नारायणाचे मस्तकास टेंगूळ आलें व जें पुढें जन्मभर आवाळू म्हणून राहिलें, लग्नमंडपांतून निघाल्यानंतर जेथें गर्द झाडींत नारायण कांहीं काळ दडून राहिला म्हणतात ती पंचवटी, हीं सर्व पवित्र स्थानें येथेंच दृष्टीस पडतील. नारायणाचें लग्न जेथें व्हावयाचें ठरलें होतें, तें आसनगांवहि येथून पूर्वेस सुमारें कोसा अर्ध्या कोसावर आहे.

जांबच्या रस्त्यानें आसनगांवांत शिरतांना गांवाच्या कडेलाच सुमारें ४०।४५ हात लांबीरुंदीचें मोकळ्या दगडांचा गडगडा असलेलें एक आवार दिसतें. त्या आवारांत दक्षिणेकडील भिंतीजवळ साधारण मध्यावर बारीक दगड रचून त्यावर एक शिवपिंडी ठेविली आहे; ज्या लग्नाचे बोहल्यावरून समर्थ फडकले तीच ही बोहोल्याची जागा. कोणा बाईस मूल होत नव्हतें, तिनें येथें नवस केल्यामुळें तिचा मनोरथ पूर्ण झाला म्हणून येथें सांजवात लागत असते.

श्रीसमर्थांच्या बालपणच्या लीलांशीं संबंधित असलेलीं अशीं अनेक स्थानें येथें दाखविलीं जातील. पण त्या वेळची ग्रामस्थांची परिस्थिति काय होती तें सांगणारें दृश्य आज कांहीं नाहीं. त्याकरितां श्रीसमर्थप्रतापाचा आश्रय घेतला पाहिजे. प्रतापकार गिरिधर वर्णन करितातः– जांबुवती नामें रामराजधानी। भोंवती आरामें शोभती चक्रध्वनि। उभय सरिता जेंवि जनस्थानीं। पंचवटिका विराजे ॥ १३ ॥ नगरींत श्रीमंत चारी वर्ण। अनन्य ब्राह्मणीं तिन्ही वर्ण । विद्यातपशौचादि गुणें ब्राह्मण वर्ण। ब्रह्मानंदें संतुष्ट हो ॥ १४ ॥ ग्रामवासी भले लोक। ग्रामपाळक[1] पुण्यश्लोक । यह लोकीं साधिती परलोक। नीतिन्यायें वर्तती ॥ १५ देव

१. ग्रामाधिकारी, पाटील कुळकरणी

देवालयें देवदर्शन घेणें। नित्य हरिकथापुराणश्रवणें । नित्य नैमित्य कर्में आचरणें । परमार्थबुद्धि करूनियां ।। १६ ।। देव-ब्राह्मणाची आराधना । घरोघरीं समाराधना । रंगमाळा दीपमाळ दीपाराधना । सुमन गंधमाळा वसंतपूजा ।। १७ ।। ब्राह्मणाची रक्षिती प्रतिष्ठा । संतसज्जनीं केवळ निष्ठा। परदार परद्रव्य मानिती वमन विष्ठा । स्वप्नींहि अनिष्टा नातळती ।। १८ ।। ग्रामसेवक जाति विजाति फिरती । आलयाचीं आतिथ्यें करिती । कष्टल्या भागल्यांचे श्रम हरिती । क्षुधिस्थ कोण्ही राहेना ।।१९।। ग्रामसीमेमधूनि संतमूर्ति । डावलोनि कोण्हीच न जाती । पवित्र पुरीसी पवित्र करिती । चरणस्पर्शें करूनियां ।। २० ।। देशकाळ-वर्तमानें । ग्रामस्थ वर्तती प्रसंगमानें । पिकें पिकती अतिमानें । पर्जन्य वर्षती यथाकाळीं ।। २१ ।। शुद्ध राजभाग राजयोगें देती । विवेकविचारें प्रपंच परमार्थ करिती । अंबापुरीं अधिष्ठानीं ऐक्य राहती । सत्यध्वज लाऊनियां ।। २२ ।। स. प्र. १

प्रतापकार गिरिधर हे श्रीसमर्थशिष्या वेणाबाईचे प्रशिष्य असले तरी श्रीसमर्थांच्या सहवासांत ते कांहीं काळ होते; समर्थांनींच त्यांस एकांतांत प्रबोधून आणि ग्रंथराज दासबोध व श्री कंठमेखळा यांचा प्रसाद देऊन बीड प्रांतीं महंती करण्यास पाठविलें. तेव्हां वरील जांबवर्णन हें गिरिधरांनीं स्वतः पाहिलेलें असावें. त्यांतील कवीचें लाघव बाजूस ठेविलें, तरी भावार्थानें जांबच्या त्या वेळच्या लोकस्थितीचें त्यावरून अनुमान करितां येईल. तें असें:—

चारहि वर्णांचे लोक सुखवस्तु होते. तेथील ब्राह्मण विद्या—तप—शौचादि गुणांनीं युक्त व स्वकर्तव्यांत आनंद मानणारे होते. गांवचे वतनदार पाटील पांडे ( ग्रामपाळक ) हे पुण्यकर्में करणारे होते. ते व सर्वच ग्रामवासी इहपर साधण्याकडे दृष्टि ठेवून न्याय-नीतीनें वागणारे असे भले लोक होते. अनिष्ट मार्गाचें आचरण त्यांचेकडून स्वप्नांतहि घडत नसे. परधन परस्त्री ते विष्ठेसमान मानीत. देवदर्शन, कथापुराणश्रवण, अन्नसंतर्पण इत्यादि त्यांचीं

नित्य नैमित्तिक कर्मे यथासांग चालत. कोणीहि जातीविजातीचा पांथस्थ आला तरी त्याचें आतिथ्य योग्य प्रकारें होत असे. थकल्या-भागल्यांचे श्रम परिहार होत, कोणीहि उपाशी रहात नसे. ग्राम-स्थांच्या आतिथ्यशीलतेची अशी ख्याति झाली होती कीं, कोणीही संत–साधू या गांवास डावलून ग्रामसीमेंतून परभारें जात नसत. ( गांवाच्या शिवेंत आले कीं, तेथील पुढाऱ्यांना भेटल्यावांचून त्या संतांना पुढें जाववत नसे. ) देशकाळप्रसंग पाहून सर्व वागत. चारहि वर्णांतील लोक आपापल्या वर्णाश्रमाचे निर्बंध यथापद्धति पाळीत. सरकार देणेंहि वेळचे वेळीं देत. सारांश, सन्मार्गानें वागून प्रपंच परमार्थ या दोहोंचाहि लाभ होईल अशा पद्धतीनें ते वागत.

यांत असंभवनीय असें काय आहे? श्री समर्थांनीं इहपर उत्कर्षाचें मूळ (हे सकळ गुणापासीं गति। सगुण भाग्यश्री भोगिती। अवगुणास दरिद्रप्राप्ति। यदर्थीं संदेह नाहीं ॥ दा० ९.४) सद्‌गुण आहेत असें सांगितलें आहे. उत्तरेकडील मान्यवर संत श्रीगुसां-ईजी तुळसीदास हेहि उत्कर्षाचें मूळ ‘जहाँ सुमत तहाँ संपत नाना। जहाँ कुमत तहाँ बिपतनिधाना’ (म्हणजे-सद्‌गुण, सद्‌बुद्धि असेल तेथेंच नानाप्रकारची संपत्ति धांवत येते, आणि कुविद्या-कुबुद्धीमुळें अनेक आपत्ति ओढवतात.) असेंच सांगत आहेत. सर्व साधु-संतांच्या उपदेशाचें हेंच सार आहे.

जांबच्या वरील वर्णनावरून असें अनुमान करण्यास हरकत नाहीं कीं, हा सर्व सूर्याजीपंतासारख्या सदाचारसंपन्न व तपस्वी नेत्याच्या निर्मळ वर्तनाचा प्रभाव होय. वतनदार ग्रामाधिकारी हेच त्या काळीं गांवचे पुढारी असत. श्रीमंतीपेक्षां शीलास त्या वेळीं अधिक मान दिला जात असे. आणि त्यांचे वागणुकीच्या धोरणाप्रमाणें गांवांतील सर्व लहानथोर चालत. प्राचीन ऋष्या-श्रमांतून गाई-व्याघ्र, शेळी-लांडगे, सर्प-मुंगुस, उंदीर-मांजर असे जन्मजात वैरीहि एकोप्यानें व खेळीमेळीनें वागत असल्याचें वर्णन पोथ्यापुराणांत असतें व त्याचें प्रत्यंतर कित्येक सत्पुरुषांच्या

आश्रमांत सांप्रतहि अनुभवास येतें. त्याच न्यायास अनुसरून शके १५३० च्या जांबमध्यें तपस्वी सूर्याजीपंतांच्या सदाचरणानें जांब गांवावरहि आपली छाप अशा प्रकारें ठेविली होती, असें म्हटलें तर चूक होणार नाहीं.

## ६ सर्ग–श्रेष्ठ रामीरामदास

वरदानाप्रमाणें सूर्याजीपंतांस प्रथम अपत्यलाभ श० १५२७ विश्वावसु संवत्सरीं मार्गशीर्ष शु० १३ गुरुवारीं झाला. अपत्य-प्राप्तीस्तव राणुबाईनीं प्रथम गंगेस नवस केला होता, म्हणून या पुत्राचें नांव 'गंगाधर' असें ठेविलें. मुलगा अंमळ मोठा झाल्यावर त्याला पैठणास श्रीएकनाथ महाराजांच्या दर्शनास पंतांनीं नेलें.

पंतांचे मेहुणे भानजीबुवा बोदलापुरीकर हे एकनाथ महा-राजांचे शिष्य होते. आणि नाथपत्नी गिरजाबाओ ही राणूबाई व भानजीबुवा यांची मावसबहिण असावी, असें तंजावराकडील संशोधनांत अलीकडेच दिसून आलें आहे. फाल्गुन व० ६ ही आज नाथषष्ठी म्हणून प्रसिद्ध आहे, पण त्याच मित्तीस नाथांचे सद्गुरु जनार्दन स्वामी यांचेंहि प्रयाण असल्यानें त्या दिवशीं जनार्दन-षष्ठी म्हणून नाथमहाराज पैठणास मोठा उत्सव करीत; त्या महोत्सवास जांबकडची नाथांची ही आप्तस्वकीय मंडळीहि प्रतिवर्षी अगत्यानें जात असत. श० १५२७च्या किंवा १५२८च्या फाल्गुन व० षष्ठीस मुलास व पत्नीस घेऊन सूर्याजीपंत भानजी-बुवाबरोबर प्रतिवर्षाप्रमाणें पैठणास गेले. बखरींत वर्णन आहे कीं, मुलास महाराजांचे पायावर घालण्याचे अगोदरच नाथ महारा-जांनीं पुढें होऊन त्या मुलास पोटाशीं धरलें आणि त्याचें मस्तक अवघ्राण करून म्हणाले, "हा परम भक्त, थोर श्रीरामोपासक होऊन गंगातीरीं जगदोद्धार करील. आमच्या शेष कार्याचा कांहीं भाग हा उचलील; हा श्रेष्ठ आहे." तेंच 'श्रेष्ठ' नांव त्यांस पुढें रूढ झालें. त्या वर्षी नाथांनीं या जांबकर दांपत्यास कांहीं अधिक

दिवस ठेवून घेतलें आणि पाठवणी करतांना उभयतां पतिपत्नींस व मुलास वस्त्राभरणें देऊन, त्यांचा सत्कार करून निरोप दिला.

पैठण येथील श्रीनाथसमाधिमंदिरावर जे दोन श्लोक कोरले आहेत त्यांमध्यें नाथांचा निर्याणकाल म्हणून १५२१ शकाचा स्पष्ट उल्लेख असला, तरी हे श्लोक तत्कालीन नव्हत. पूर्ववयांत कऱ्हाडप्रांतीं राहाणारे, पण पुढें श्रीनाथसेवेस्तव पैठणास जाऊन राहिलेले हरिवरदाकार कृष्णदयार्णव यांनीं ते रचिले आहेत. त्यांचा समाधिशक १६६२ आहे. अर्थात् त्यांनीं १५२१ हा शक ऐकीव माहितीच्या आधारें लिहिला, हें उघड आहे. नाथांचे जुने चरित्रकार केशव यांनीं नाथचरित्र शक १६८७त लिहिलें. अर्थात् त्यांतील निर्याणशकहि कृष्णदयार्णवांच्या त्या दोन श्लोकांच्याच आधारें दिला असणार. पण सूर्याजीपंतांच्या दोन्ही मुलांस लहानपणींच पैठणास श्रीनाथदर्शनास नेल्याचा उल्लेख शक१६०३ च्या फाल्गुन शु० ५स तयार झालेल्या वाकेनिशी टिपणांत आहे. दुसऱ्या मुलास नेलें त्या वेळच्या भेटीच्या प्रसंगीं 'आतां आम्ही अवतार समाप्त करितों' असें नाथ म्हणाल्याचेंहि त्याच टिपणांत नमूद आहे. तेव्हां या दोन्ही प्रतापी मुलांना लहानपणीं श्रीनाथ-दर्शन घडलें असें मानण्यास प्रत्यवाय दिसत नाहीं.

मुलगा दिवसामासानें वाढू लागला; वयाचे पांचवे वर्षी शके १५३२ मध्यें त्याचें उपनयन झालें व सातवे वर्षी त्यास अंबडकर देशमुखांची मुलगी सांगून आली. म्हणून शक १५३४ मध्यें पंतांनीं त्याचें लग्नहि उरकून घेतलें. शके १५३६ च्या माघांत या मुलानें आपणांस अनुग्रह द्यावा अशी वडिलांस विनंति केली. तेव्हां पंतांनीं सांगितलें कीं, 'अनुग्रह कसा द्यावयाचा किंवा घ्यावयाचा हें मला माहित नाहीं. देवघरांत श्रीरामराय आहेत, अथवा पारावरील देवळांत श्रीमारुतीराय आहेत, त्यांना अनुग्रह माग'. पित्याच्या आज्ञेप्रमाणें मारुतीच्या देवळांत मारुतीकवचाचे पाठ करीत मुलगा अकरा दिवस उपोषित राहिला. अकरावे दिवशीं मध्यरात्रीं मारुतिरायांनीं प्रकट होऊन 'काय इच्छा आहे'

म्हणून विचारिलें. तेव्हां 'अनुग्रह व्हावा एवढीच विनंति आहे; दुसरी कांहीं अपेक्षा नाहीं' असें यांनीं नम्रतापूर्वक उत्तर दिलें. मारुतीरायांनीं ध्यान करितांच श्रीरघुपति प्रकट होऊन, त्यांनीं या मुलास त्रयोदशाक्षरी मंत्राचा उपदेश देऊन 'रामीरामदास' असें नांव ठेविलें आणि उपासनाक्रम चालविण्याची आज्ञा केली. हा प्रसंग १५३६ च्या फाल्गुन शुद्ध ११स घडला.

याप्रमाणें सूर्याजीपंतांच्या ज्येष्ठ पुत्रास बालवयांत श्रीरामप्रभूकडून मंत्रोपदेश होऊन 'श्रेष्ठ' व 'रामीरामदास' अशीं दोन योग्यतादर्शक नांवें–वाटल्यास पदव्या म्हणा–प्राप्त झालीं. क्रमांक १५२७ च्या बाडांत या रामीरामदासांनीं केलेलें पंचीकरण आहे. त्यांत ते स्वतःच लिहितात :–

> रामीरामदास हें अभिधान। रामें योजिलें काय हेंच साधून।
> तेणें 'तत्' 'त्वं' पदार्थ बोधून। प्रगटित केला ॥४३॥

या वचनानें दोन गोष्टी सिद्ध झाल्या. एक 'रामीरामदास' हें नांव रामरायांनीं ठेविलें व दुसरी, 'रामीरामदास' या नांवावरून रामांत रामदास आहेच असें ध्यानीं येऊन महावाक्यांतील 'तत् त्वं' या दोन पदांच्या अर्थाचें सहजच चिंतन घडतें.

## ७ सर्ग–राणूबाईंचे डोहाळे

श्रीसमर्थप्रताप व श्रीदासविश्रामधाम या दोन ग्रंथांच्या आधारें समर्थमाता राणूबाईंचे डोहाळे या दुसऱ्या मुलाचे वेळीं काय होते तें आतां पहावयाचें आहे. यांत चिकित्सकांनीं मुळींच लक्ष घालूं नये; हा त्यांचा विषय नव्हे. मायलेकरांची दृष्टभेट होतांच परस्परांच्या अंतःकरणांत जो प्रेमानंद हेलावतो त्याचा आस्वाद शरीरांची चीरफाड करणाऱ्या शस्त्रवैद्यांस घेतां यावयाचा नाहीं. तद्वत् ऐतिहासिक घटनांच्या स्थलकालादिकांतील सत्यासत्यास्तव शब्दांचा कीस काढीत बसणाऱ्या रुक्ष विद्वानांस अशा प्रसंगांच्या वर्णनानें भाविकांच्या चित्तास होणाऱ्या आनंदाची

कल्पना येणार नाहीं. त्याबरोबरच अशा वर्णनांतून जो बोध भाविकांस सहज मिळतो, त्याकडेहि अशा विचिकित्सकांचें दुर्लक्ष प्रायः होत असतें. ऐतिहासिक सत्यासत्याच्या ज्ञानापेक्षांहि श्री समर्थचरित्रचिंतन घडून समर्थचरणीं वाचकांची दृढ निष्ठा होणें हें अधिक कल्याणप्रद आहे. असो.

श्रीदासविश्रामधामकर्ते आत्माराम महाराज म्हणतात:–
नराधमाची ते नव्हे जननी । मृण्मयादि वासना उठाया मनीं ।
होणार जे का पुढील करणी । कळे सुजाण त्या डोहळ्यांत ॥७९॥

कारण,

निःस्पृही पुरुष खेळतां पोटीं । मातोश्रियेची मुरडली दृष्टी ।
सर्वानंदचि भासे सृष्टीं । वाउग्या गोष्टी न माने ॥७०॥

गर्भवती राणादेवी काय करीत? कशा वागत असत?–

बैसे एकांतीं भजन करित । क्षणक्षणा होय तटस्थ ।
प्रपंचहव्यासीं न बैसे चित्त । आशा किंचित् न धरीच ॥७१॥
परसामाजीं जाऊन ते बाळी । पाहे ते ऊर्ध्वेसी[१] वृक्षातळीं ।
पुसतां सख्यांनीं तये वेळीं । दे उभे उत्तर निर्भय ॥७२॥
वाटतें रुखावरी[२] चढोनी । साजुक फळें खावीं वेंचूनी ।
छायेसी रहावें स्वस्थ निजोनी । ऐकोनि विस्मयें हांसती ॥७३॥
पाहोनि स्वच्छंद नभाकडे । म्हणे जाईन शून्या पैलीकडे ।
सर्वहि गमना दावीन रोकडें । निरोधूनि दुष्टां मारीन ॥८१॥
सहज उचलोनि पडिलें तृण । म्हणे तरुबना उत्पाटीन ।
पुढील खडा हातीं घेऊन । शैल्य[३] झेलिला पहा म्हणे ॥८२॥
साधु संत आमुचे गडी । त्यांचे संकटीं घालीन उडी ।
भक्तिप्रेमाच्या उभवूनि गुढी । श्रीरामदाता मानवीन[४] ॥८३॥

दा. धा. २

१ (झाडा) वरून, २ झाडावर, ३ पर्वत, ४ संतुष्ट करीन.

एकदां सूर्याजीपंतांनीं पत्नीस विचारिलें, 'तुला काय हवें तें सांग, सगळें आणून देईन. श्रीरामसमर्थकृपेंकरून आपल्यास कांहीं कमी नाहीं.' 'श्रीरामसमर्थकृपा' हे शब्द पंतांच्या मुखांतून निघतांच राणूबाई म्हणतात :–

टाळ-मृदांग उपांग[1] घ्या रे यंत्र ध्वनी। कथाकीर्तनीं मज प्रेमा ॥२६॥ गिरिकंधरें मज आवडती। घरें मंदिरें मज नावडती। हनुमानरूपें मी नरवानराकृति। नरनारायण निर्धारें ॥२७॥ मुख्य प्राणनाथ मी सर्वव्यापक। मजला प्रिय एक श्रीरघुनायक। काय रे उगेचि पाहतां विश्व[2] लोक। रघुनाथस्मरणें करा रे ॥२८॥ सर्व माया मिथ्या बाजीगरी। काय तुम्ही हे मानिली खरी। आत्माराम मी येक सत्य चराचरीं। नित्य शाश्वत निरंजन ॥२९॥

स. प्र. १

हें पत्नीचें बोलणें ऐकून पंतांस वाटलें, ही एकटी दुकटी भरतिन्हीसांजा कोठेंहि जाते येते, त्यामुळें हिला कांहीं बाहेरबाधा तर झाली नसेल? म्हणून त्यांनीं जवळच्या एका माणसास सांगितलें 'आणा वेगीं गंगोदक।' गायत्रीमंत्रानें हिच्यावर जरा प्रोक्षण करूं; त्याबरोबर

राणादेवी म्हणे मज आणणें कृष्णेच्वें उदक। गंगाधर बंधु सिंचणें गंगोदकें ॥३०॥ मज पुनीत करणें रे श्रीकृष्णातीरा। अखंड व्यापक मी चराचरा। मज नावडे संसारपसारा। आश्रम सर्वहि श्रमरूप ॥३१॥ जय जय राम म्हणा रे स्वानंदें। आत्मविचार पहा रे ब्रह्मानंदें। काय भुलला आहां रे विषयानंदें। परमानंदें गर्जा रे ॥३२॥ स. प्र. १

राणूबाईंचें हें मोठ्यानें बोलणें ऐकतांच सगळे चकित झाले. पंत म्हणाले 'अरे जा कोणी तरी रामजोशाला बोलावून आणा. तो 'आहे गुणिया देवरुषी जाणता!' जोशीबुवांनीं येऊन समर्थ–

१ भजनाचें उपसाहित्य, २ सर्व.

मातेस पाहिलें; ते म्हणाले "इसी हनुमानअंतर्दशा चालताहे। आत्माराम महर्दशा येथून लागली पाहे" पण असें बोलतां बोलतां

मातादर्शनीं जोसियासी आनंदमूर्छना आली। नेणों समर्थमाता अंतर्बाह्य भरली। श्रीरामजाणियासी समाधि लागली। गुणिया ग्रासिला महद्भूतें रामें॥

जोशीबुवांची ही अवस्था पाहतांच पंत कष्टी होऊन उद्गारले, 'आई जगदंबे, तुळजापुरवासिनी! तूच आतां हिला सांभाळ, एकदां तिला सावध होऊं दे.'

तोंच राणूबाई म्हणतात, 'मी श्रीरामवरदायिनी। माझें आत्मरामायण ऐकारे' ॥३६॥ आणि सगळें रामायण गायला लगेच प्रारंभ झाला. सूर्याजीपंत म्हणतात:– 'ही तर चांगलें रामायणच सांगत आहे. तेव्हां भूतबाधा तर नव्हेच. 'काय आहे नेणों देवासी करणें। त्रिंबकराजा पावे रे॥ त्रिंबकेश्वरा पाव रे!'

लगेच राणूबाई म्हणतात, 'मी त्रिंबकीं जनस्थानीं। पुनः बैसेन पंचवटिके अनुष्ठानीं। श्रीरामरूपें मी प्रगटेन हनुमानीं। जगदोद्धार करावया ॥४६॥

'आतां काय म्हणावें? बोलायची सीमाच झाली!' पंत उद्गारले. हा सर्व प्रकार रस्त्यावर कोठेंतरी चालला होता. अस्तमानची वेळ; ही आतां घरीं कशी जाईल अशी काळजी पंतांस उत्पन्न झाली. इकडे जमलेले लोक रामनामाचा गजर करीत आहेत; नाना प्रकारचीं सुगंधीं पुष्पें, गुलाल उधळण्यांत येत आहे; इतक्यांत सूर्यास्त झाला; राणूबाई उठून घराकडे वळल्या आणि 'नगरनागरिक लोक नाना। नमस्कार करूनि चालिले' ॥५०॥ —स. प्र. १–२५ ते ५०

## ८ सर्ग—संकल्पसामर्थ्य

सूर्याजीपंतांच्या विशुद्ध चारित्र्याचा प्रभाव जांबगांवावर कसा पडला होता हें मागील पांचव्या सर्गांत आपण पाहिलें. तथापि जांबमधील एकूणएक व्यक्ति अगदीं सूर्याजीपंतांप्रमाणें आदर्शभूत

वागत होती, असा त्याचा अर्थ नाहीं. एका हाताचीं पांच बोटें सारखीं नसतात, एकाच देहांतील दोन डोळ्यांची शक्ति सारखी नसते; मग एका गांवांतील सगळीं माणसें एकसारखीं आदर्शभूत कशीं असूं शकतील? कांहीं कमीअधिक असेलच. तेथील बहुसंख्य लोक सदाचारानें वागत होते, एवढेंच सार त्यांतून घ्यावयाचें. बाह्य सदाचरणाचें मूळ अंतःकरणाचें पावित्र्य होय. अंतःकरण दुष्ट वासना, पापबुद्धि, पापसंकल्प वगैरे विकारांनीं भरलेलें असून केवळ बाह्य आचाराचाच डामडौल असेल, तर तें ढोंग होईल. बाह्य पवित्राचरणास अंतःकरणांतील निर्मळ संकल्पाची फार आवश्यकता असते.

निर्मळ पवित्र संकल्पाचें सामर्थ्य अगाध आहे. परमेश्वरी संकल्प हें जसें विश्वाचें मूळ, तसेंच सर्व मानवी व्यवहाराचें मूळ अंतःकरणांतील संकल्प होय. 'मूळ संकल्प तो हरिसंकल्प' होय असें श्रीसमर्थहि सांगत आहेत. प्रत्येकाच्या हृदयांत हा 'हरिसंकल्प' आहेच आहे; पण देहबुद्धि—स्वार्थ—अनाचारादिकांनीं तो अपवित्र व निस्तेज होतो:आणि सदाचार—भगवच्चिंतन—तपश्चर्या—आत्मज्ञान यांच्या योगें तोच संकल्प सामर्थ्यसंपन्न होतो. निष्ठा, आचार व चिंतन यांच्या द्वारां जीव जितका मूळ संकल्पाशीं म्हणजेच विश्वाचें आदिकारण जो परमात्मा त्याच्याशीं तादाम्य पावतो, तितका त्याचा संकल्प बलिष्ठ होत जातो. 'देवा हातीं रूप धरवूं आकार।' ही श्रीतुकाराम महाराजांसारख्या परमार्थसंपन्न सिद्धांची हिंमत असते आणि दुबळ्या संकल्पाच्या जीवास पोटापुरती भीकहि मिळवितां येत नाहीं. व्यक्तीस किंवा राष्ट्रास अवनति येते, याचें मुख्य तात्त्विक कारण हा निःसत्व संकल्प होय; त्यामुळेंच दारिद्र्य येतें आणि 'पापाकरितां दरिद्र प्राप्त। दरिद्रें होय पाप संचित।' असें चक्रवाढीच्या पद्धतीनें तें वाढूं लागतें.

लोक दोष आचरती। तेणें दोषें भस्म होती॥
जनीं दोष जाले फार। तेणें होतसे संव्हार॥
जना सुबुद्धि नावडे। मन धांवें पापाकडे॥—श्रीसमर्थ

अशी सर्वत्र दुरवस्था होऊं लागते. अशा वेळीं बाह्य प्रयत्नांबरोबरच बुद्धिदात्या जगदात्म्यास शरण जाऊन, 'बुद्धि दे रघुनायका' अशी कळवळून प्रार्थना करणें हा सर्वांस सर्वकाळीं व स्थळीं योजितां येण्यासारखा उपाय प्राचीन भारतीय नेत्यांनीं योजून ठेविला आहे. 'तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत' (गीता १८–६२) हें वचन सुप्रसिद्ध आहे. गेल्या दोन महायुद्धांत सुधारलेल्या व शस्त्रास्त्रांनीं सुसज्ज अशा अर्वाचीन राष्ट्रांनाहि इतर भौतिक प्रयत्नांबरोबरच ईश्वरप्रार्थनेच्या मार्गाचा अवलंब करावा लागला होता, हें सर्वांना माहित आहे. तोच मार्ग भारतीय साधु-संतांनीं स्वतः स्वीकारिला व इतरांस उपदेशिला तर त्यांत वावगें काय आहे? जनहितासाठीं तळमळणाऱ्या तुकोबारायासारख्या सत्त्वमूर्तीलाहि, 'काय करूं देवा ऐशी नाहीं शक्ति। दंडुनी पुढती वाटे लावूं ॥ 'तुका म्हणे देवा। काय निद्रा केली धांवा ॥' असा टाहो फोडावा लागला. त्या काळच्या सर्व साधुसंतांत-सगळ्या जनतेंत असाच आकांत चालला होता. गरीब-श्रीमंत' लहान-मोठे सगळेच तात्कालिक स्वार्थावर नजर देऊन वागत होते. त्यामुळें सर्वत्र फाटाफूट वाढत चालली, आणि सामर्थ्याचा उपयोग लोककल्याणार्थ न होतां संकुचित स्वार्थापुरताच होऊं लागला. चितोडचा राणा, जयपूरचा जयसिंग व जोधपूरचा जसवंतसिंग या तीन सत्ता त्या वेळीं राजस्तानांत फार प्रबल व संपन्न अशा होत्या. त्या वेळचा एक फ्रेंच प्रवासी बर्नियर म्हणतो :--

'हे तिघे एक होऊन बादशहावर चालून जाते, तर त्यांच्यापुढें बादशहाचा टिकाव लागला नसता. कारण ..... त्यांच्यापुढें सामन्यास उभे राहण्याची हिंमत कोणांतहि नव्हती'! पण 'बुद्धिर्यस्य बलं तस्य' हेंच खरें. प्रतिकारास पुरेल इतकें शस्त्रास्त्रांचें व द्रव्याचें बल या तीन राजांच्याजवळ भरपूर होतें; वाण होती परस्परांशीं मिळतें घेणाऱ्या बुद्धीची; ती त्यांच्यामध्यें नव्हती. त्यामुळें शौर्यधैर्यादिकांनीं संपन्न अशा या तीन राजसत्तांस जें करतां आलें नाहीं, तें कार्य कर्यातमावळांतील मुठभर खेड्यांच्या

एका तरुण जहागिरदारानें करून दाखविलें ! कां ? या रजपूत राजांच्या तुलनेनें हा तरुण वयानें लहान, त्याची जहागीरहि लहान, द्रव्यबळ नाहीं, फौजाफांटा म्हणजे खांद्यावर घोंगड्या व हातांत भाले घेऊन लढणारे मुठभर मावळे ! पण त्याचा संकल्प फार सामर्थ्यवंत होता. 'हिंदुपदपादशाही व्हावी अशी श्रीची इच्छा आहे' या भगवदधिष्ठानयुक्त अशा एका दृढतम संकल्पामुळें त्याच छत्तीस खेड्यांच्या जहागिरीचें, स्वकीय व परकीय विरोधांचा बीमोड करून,

'सालेरी अहिवंतापासून चंजी, कावेरीतीरापर्यंत निष्कंटक राज्य, शतावधि किल्ले, तसेच जलदुर्ग, चाळीस हजार पागा, साठ-सत्तर हजार शिलेदार, दोन लक्ष पदाति, कोटयावधि खजिना, उत्तम जवाहीर, सकल वस्तु जात' (–अमात्यांची राजनीति) अशा प्रबल, संपन्न व विस्तीर्ण स्वराज्यांत रूपांतर झालें ! रानावनांतून वणवण हिंडणाऱ्या व दुर्लक्षित असलेल्या त्या तरुणाच्या 'छत्रपति श्रीशिवाजी महाराज की जय !' असा जयजयकार त्या काळीं दुमदुमला, आज होत आहे व पुढेंहि होत राहील.

"देव करी तरी काय येक नोहे । परी पाहे बीज शुद्ध आंगीं ।।"

बीज म्हणजेच संकल्पसामर्थ्य. अशा प्रभावी संकल्पसामर्थ्याची व्यक्ति केवळ बाह्य प्रयत्नानें बनणें कठीण, भगवत्कृपेनेंच ती उत्पन्न व्हावी लागते. आणि त्याकरितां पुण्यशील संतमहात्म्यांच्या प्रार्थनेची आवश्यकता असते. श्रीरामकृष्णादि अवतार होण्याचे पूर्वीं "दैत्यदानवांनीं चालविलेल्या पापाचा भार असह्य झाल्यानें पृथ्वी ब्रह्मदेवास शरण जाऊन आपलें दुःख सांगू लागली, तेव्हां तिला व देवऋषि यांना बरोबर घेऊन ब्रह्मदेवांनीं भगवान् विष्णूकडे जाऊन सर्व वृत्त निवेदिलें व भूभारहरणार्थ अवतार घेण्याविषयीं त्यांची प्रार्थना केली" असा वृत्तांत रामायणभागवतादि ग्रंथांत आहे. त्याचा अर्थ वरील संकल्पसामर्थ्याचें विवेचन लक्षांत घेतल्यावर आतां नीट लागेल. श्रीसमर्थांचा अवतार होण्यापूर्वीं सर्वदेशभर संतसत्पुरुषांची अशीच प्रार्थना चालली होती. ती प्रार्थना सफल होण्याची वेळ आतां जवळ आली. प्रतापकार गिरिधरस्वामी म्हणतात,–

सर्व संतांच्या शुद्ध संकल्पें । हनुमानअवतार कल्पिला सामर्थ्यरूपें । हनुमान राम आपण स्वस्वरूपें । ब्राह्मणरूपें जगद्गुरू ॥ ११ ॥ स. प्र. १.

नुसत्या पूजाप्रार्थनादिकांनींहि भागत नाहीं. श्रीसमर्थासारखा अलौकिक महात्मा उत्पन्न व्हायला घराणेंहि तसेंच सत्य-ज्ञान-निष्ठादि सद्गुणांनीं युक्त व सदाचारसंपन्न असावें लागतें. जांबचें ठोसर घराणें सदाचार व श्रीरामोपासना यांत सहाशें वर्षें भगवदिच्छेनें जणुं काय भिजत होतें. तेवढें उपासनाबल कमी होईल म्हणूनच कीं काय, सूर्याजीपंतांच्या प्रखर सूर्याराधनेची भर दोन तपेंपर्यंत त्यांत पडत राहिली आणि नंतर हा श्रीमहारुद्राचा अवतार तेथें प्रकट झाला !

## ९ सर्ग--महाराष्ट्रभूचा अभ्युदयक्षण

शालिवाहन शकाच्या सोळाव्या शतकांत श्रीशिव--समर्थ-संभवापूर्वीं अस्मानीसुलतानीनें भरडल्यामुळें जनतेची मनोभूमि त्रिविध तापांनीं परितप्त झाली होती. सर्वत्र हाहा:कार उडाला होता. या आपत्तींतून मुक्तता व्हावी म्हणून ठिकठिकाणचे संतमहात्मे यांनीं व सामान्य जनसमुदायानेंहि आपआपल्यापरी भगवत्प्रार्थना चालविली होती; बावीस तेवीस पिढ्यांच्या श्रीरामोपासनेनें विशुद्ध झालेल्या ठोसरकुलांतील सूर्याजीपंतांना दोन तपांच्या प्रखर सूर्याराधनेनें श्रीसूर्यनारायण व श्रीरामप्रभु यांचा दर्शनसाक्षात्कार झाला व पुत्रप्राप्तीचीं वरदानेंहि मिळालीं; पण उत्तम बी, सकस भूमि व अनुकूल वेळीं पर्जन्य इतके सगळे योग जमून आले, तरी त्या बीजाचें फळ हातीं यायला कांहीं काळ लागतोच. त्याप्रमाणें शक १५२६ च्या पूर्वींच पंतांस वरप्राप्ति झाली, तरी ज्या अवतारास्तव सर्व सत्पुरुष मार्गप्रतीक्षा करीत होते, तो प्रकट व्हायला पुढें चार वर्षें लागलीं.

शके १५३० चा श्रीरामनवमीचा उत्सव जांब येथील श्रीराम-मंदिरांत सुरू झाला. त्यांतील पूजा, आरत्या, अन्नसंतर्पण, कथाकीर्तन

इत्यादि कार्यें आनंदानें चाललीं होतीं. अष्टमीची रात्र जाऊन चैत्र शुद्ध नवमी उजाडली.

नवमीस मंडपीं रंग घालोन । सारूनि वेगीं विधान पूजन ।
हरिदासांनीं मांडिलें कीर्तन । मिळाला बहु समुदाय ॥८९॥
तिकडे होतसे फराळआइती[1] । इकडे सर्वहि सिद्ध असती ।
गुलाल बुका धरिले हातीं । वाद्यघोष करिती गजरेंसी ॥९०॥
त्रैलोक्य–संपदा वाटे उणीव । मानितील भणगु[2] आल्या वासव[3]
मुख्य बोळलासे श्रीरामराव । जयजयकार उठिनला ॥९१॥

दा. वि. धाम २

मंदिरांत असा आनंदीआनंद चालला असतां गर्भवती राणूबाई 'जपध्याननेमीं मग्न' होऊन आपल्या घरांतच स्वानंदांत बसल्या होत्या. त्यांचें वर्णन दा. वि. धामकार करितात :–

जठर नव्हे तो वैकुंठभुवन । ज्ञप्तिमात्राचें अधिष्ठान ।
आंत आतौता ज्ञानसंपन्न । सोहंभावाचा क्रीडतु ॥८५॥
सद्वासनेचे डोहळे तत्वता । नलगे सुइणी ना नसे व्यथा ।
बैसली सप्रेम सब्रआतौता । जैसी कौसल्या देवकी ॥८६॥

श्रीराममंडपांत गुलाल उधळला जाऊन जयजयकाराचा आनंद उसळला गेला आणि त्याच वेळेस राणूबाई सुखप्रसूत होऊन या भगवद्भक्त महापुरुषाचा जन्म झाला. बाहेर ही मंगल वार्ता कळतांच सर्वत्र आनंदीआनंद उसळला. उपाध्यायाच्या हातीं पुढील उत्सवकार्याची सुपारी देऊन पंत पुत्रमुख पहाण्यासाठीं घरीं आले. त्या बाळास पाहण्याकरितां पुष्कळच गर्दी जमली.

दा. वि. धामकर्ते सांगतात:—

तैं दास होता फार गरीब । झळंबला सकळां हि लोभ ।
तो आह्मां अनाथां घडो लाभ । भक्तिमातेनें आच्छादिला ॥९५॥

भक्तिरूप राणाई मातेनें बाळंतें पांघरून ठेवलेलें तें बाळ फार लोभस व गरीब होतें. त्याला घ्यावेंसें सर्वांना वाटे.

---

१ सामुग्री २ भणंगभिकारी ३ इंद्र

संतोष वाटला सकळिकांसी । वागती हरिखें जन दास दासी ।
उछाव करोनि बारावे दिवशीं । साहित्य केलें पाळणा ॥१०९॥

राणूबाई आणि त्यांच्या शेजारणी यांनीं बाळाचें नांव 'नारायण' (सूर्यनारायणाचा प्रसाद म्हणून) ठेवून त्यास पाळण्यांत घातलें व पाळणा म्हटला; आत्माराम महाराज म्हणतात, आपणहि त्या प्रसंगास योग्य अशी कांहीं सेवा करूं.

पाळणा— जो जो जो जो रे, जगज्जीवना । चतुरतरांचा राणा ॥ध्रु॥
निजतां निज घेईं, भवहरणा । परतर पर ध्यय ध्याना ॥१॥
सुंदर हास्यमुखा, निजलोका । सत्सुखपददायका । जो जो ॥२॥
साधुनि दास्यफळ, निज निवळ । दावी स्वरुपची निखिळ ॥३॥
अनुपमगुण गरिमा, निजधामा । सखया आत्मारामा ॥जो॥४॥

दा. वि. धाम २

सारांश,

आधींच श्रीरामनवमीचा ब्रह्मानंद। विशेष समर्थ अवतरले सच्चिदानंद।
नाना दानप्रसंगें परमानंद । जो जो विधि तो जाला स्वानंदें ॥६७॥

स. प्र. १

अगोदरच श्रीरामनवमीचा महोत्सवाचा आनंद नि त्यांत सच्चिदानंदस्वरूप सद्गुरुदेव अवतरले! मग त्या महदानंदाचें वर्णन कसें करावयाचें? दानधर्म विधि विधानें इत्यादि प्रकार सर्व आनंदानें पार पडले.

पण हें कोण जन्माला आलें? कोणाचा जन्मसोहळा अशा आनंदानें पार पडला? या मुलाच्या जन्मानें सर्वांस आनंद कां वाटला? मेरूस्वामी त्याचें कारण सांगतात:—

साच सृष्टीचा करावया उद्धार । जाला समर्थांचा अवतार । मीपण धरेचा भार । फेडिला समर्थें ॥६॥ अनादि पातकांचे संस्कार। सरले समर्थकृपेनें संसार । तरले जीव भवसागर । समर्थअनुग्रहें ॥७॥ समर्थ देवत्रयाचें हृदय । परेचें अभ्यंतर निश्चयें । स्वानंदाच्या अतिशयें । रूपासी आलें ॥१०॥ सकळ देहाची प्रवृत्ति । चुकवावया

याचि अर्थीं। सच्चिदानंद आकृति। आले समर्थ ॥११॥ स्वरूप साक्षात्कारें। करावया कर्मभूमीचा उद्धार। स्वानंदविग्रही साचार। लीला प्रगटले ॥१२॥ —रामसोहळा १–६


साधुपरित्राण व दुष्टनिर्दलन करण्यासाठीं ज्यानें वेळोवेळीं अवतार धारण केले, तोच आदिपुरुष परमात्मा लोकांची दैना पाहून अंतःकरणांत कळवळला आणि सर्व जीवांस दुःखमुक्त करण्यासाठीं धांवून आला! लक्षावधि आपत्तींनीं गांजलेल्या लोकांना धीर देऊन इहपर मुक्तीचा मार्ग दाखविणारा, धातु-काष्ठ-पाषाणादिकां-प्रमाणें केवळ जडमूढ बनलेल्या जनतेंतून लोकोद्धारक असे सहस्रशः त्यागी कार्यकर्ते निर्माण करणारा, एकंकारादि नाना मतवाद्यांचीं बंडें मोडून काढणारा 'एकंकारगजावरील पंचानन', 'आरोग्य जाह्ली काया वैभवें सांडिली सीमा', "निर्मळ जाह्लें पाणी स्नानसंध्या करावया', 'सामर्थ्यें यशकीर्तीचीं प्रतापें सांडिली सीमा' अशा प्रकारचे अनुभव लोकांस आणून देऊन 'रामकर्ता राम भोक्ता' म्हणत व लोकांस शिकवीत, 'रामराज्य भूमंडळीं' स्थापविणारा आणि अशीं असंख्य महत्कृत्यें स्वतःची निरहंकर्तृत्वाची भूमिका न ढळूं देतां करणारा व करविणारा तो सद्धर्मसंस्थापक, तो सच्चिदानंद विग्रही परमात्मा राणूबाईचें बाळ होऊन ज्या क्षणीं जांब येथें जन्मास आला, त्या श. १५३० च्या चैत्र शुद्ध ९ च्या दोन प्रहरच्या क्षणाला 'महाराष्ट्रभूच्या अभ्युदयाचा क्षण' असें कां न मानावें ?

## १० सर्ग–श्रीसमर्थांची कुंडली


पुढील कुंडली श्रीसमर्थांच्या कोणत्याहि जुन्या चरित्रग्रंथांत सांपडलेली नाहीं. ती शके १८५० सालीं श्रीसमर्थगाथा-मुद्रण चालू असतां श्री. ज. स. उपाख्य तात्यासाहेब करंदीकर, पंडित रघुनाथशास्त्री पटवर्धन आणि कै. दत्तात्रय विष्णु आपटे या तिघां ज्योतिषशास्त्रवेत्त्या समर्थभक्तांनीं करून दिली.

"मंद वासरीं दुपार वेळीं" "पुनर्वसु चतुर्थ चरणीं । कर्क-राशीस जन्मला सद्‌गुणी" । असें दासविश्रामधामांत (मान २) म्हटलें आहे. पण त्या वेळचें गणित करून पाहतां चैत्र शु. ९ ला दोन प्रहरीं पुनर्वसूच्या नक्षत्राचा तृतीय चरण येतो, चतुर्थ चरण येत नाहीं. पुनर्वसूचा चतुर्थचरण धरल्यास जें ग्रहमान होईल त्याचें फलित श्रीसमर्थचरित्राशीं मुळींच जुळतें नाहीं. श्री समर्थजन्मकालीं श. १५३० चैत्रशुद्ध नवमीला रवि मेषेंत गेलेला नव्हता, मीन राशींतच होता. मीन राशी दशमांत धरून जन्मलग्न मिथुन येतें. कर्क येत नाहीं. भावचलितांतहि मिथुन जन्मलग्न बदलत नाहीं. जंत्री पाहतां १५३० च्या चैत्र शु. ९ स शनिवार नसून सोमवार आहे. दा. वि. धामामध्यें श्रीरामप्रभूशीं समानता दाखविण्याच्या भरांत 'पुनर्वसु चतुर्थ चरण' आणि मारुतीचा अवतार म्हणून सिद्ध करण्यासाठीं जन्मदिवस शनिवार म्हटला असेल, अथवा त्या वेळीं समर्थजन्म कालाविषयीं लोकांची जी कल्पना होती ती लिहून ठेविली असेल; तथापि या दोन्ही बाबी गणितानें सिद्ध होत नाहींत. गणितानें सिद्ध होणारी समर्थांची कुंडली पुढील प्रमाणें आहे :—

जन्मलग्न कुंडली





राशि कुंडली





श्री शालिवाहन श. १५३० चैत्र शु. ९ सोमवार सूर्योदयात् गत घटि १५ पळें ७ या समयीं जांब येथें जन्म

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे स्थळप्रत.
अनुक्रम [illegible] वि [illegible]
क्रमांक [illegible] ना दि: [illegible]



जांब येथील श्रीरामाचे मंदिर



श्रीसमर्थमंदिर, जांब (श्रीसमर्थांचें जन्मस्थान)

### फलादेश

या कुंडलींत दशमांत तीन ग्रह आहेत. चार किंवा अधिक असते तर प्रव्रज्यायोग पूर्ण झाला असता. तो पूर्ण झाला नाहीं, तरी शुक्र नवमस्थानांत म्हणजे धर्मस्थानांत आहे; त्यासह चार ग्रह धर्मप्रवृत्तीस कारणीभूत झाले; त्यांत रवि बलवान् असल्यानें गायत्रीपुरश्चरण, सूर्योपासना व नैष्ठिक ब्रह्मचर्य हे योग साधले. गुरु स्वगृहींचा व बलवान् असा दशमस्थानीं आल्यानें राजगुरुत्व प्राप्त झालें. त्याचप्रमाणें रवि, बुध, गुरु, शुक्र, शनि वगैरे ग्रहांच्या कारकत्वानें व स्थानबलत्वानें महायात्रा, गंगास्नान, जीर्णोद्धार-कर्तृत्व, देवालय, कूप, वापी, तडागादि कर्तृत्व इत्यादि योग येतात. नवम स्थानाचा शुक्र देवीची भक्ति दर्शवितो. दशम-स्थानांतील गुरु हा राजकीय अधिकार व धर्म-संस्थेचें चालकत्व दर्शवितो. मिथुनेचा चंद्र, दशमस्थ बुध व नवमस्थ शुक्र हे ग्रंथकर्तृत्व व काव्यगायनादींची आवड दर्शवितात. शनि सप्तमांत असल्यानें पत्नीहीनत्व आलें, पण तो स्वगृहींचा, शुभग्रहदृष्ट व दिग्बळी असल्यानें समर्थावर कोण्याही शत्रूची मात्रा न चालतां त्यांचीच छाप सर्व शत्रूंवर पडली. गुरूपासून पंचमस्थानीं राहू असल्यानें पुत्रयोग नाहींसा झाला.

## ११ सर्ग–बाळलीला

अर्वाचीन थोर पुरुषांच्या बाळपणांतील गोष्टी जाणून घेण्याची उत्सुकता वाचकांना असते आणि ते त्या गोष्टी मोठ्या आवडीनें वाचतात, हें आपण आज पहातों. मग ज्यांच्या दिव्य चरित्रामुळें व उपदेशामुळें असंख्य लोकांस सन्मार्ग लागून त्यांचा इहपर उद्धार झाला, आणि जो साक्षात् 'हनुमानरूपें सर्वेश्वरू आत्माराम अवतारला।' अशी त्या काळच्या लोकांची श्रद्धा होती व आजहि अनेकांची आहे, त्या श्रीसमर्थ रामदास स्वामींचें बाळ-पणचें चरित्र जाणण्याची उत्कंठा पूर्वीच्या भाविक चरित्रकारांस

झाली व त्याप्रमाणें प्रयत्न करून त्यांनीं कांहीं माहिती मिळविली यांत नवल नाहीं. मिळालेल्या माहितीचा उपयोग आपापल्या श्रद्धेनुसार त्यांनीं आपल्या ग्रंथांत करून घेतला, यांत त्यांनीं जाणून बुजून लबाडी किंवा विपर्यास केला असें होत नाहीं. प्रकाशित व अप्रकाशित अशीं जीं १२।१५ समर्थ-चरित्रें उपलब्ध झालीं, त्यांतून त्यांच्या बाळपणच्या लीलांचा भाग निवडून काढून थोड-क्यांत पुढें दिला आहे. चरित्रवस्तूच्या दिव्यत्वाचा प्रभाव अंतः–करणावर पडून त्यायोगें त्या महात्म्याविषयीं वाचकांचा आदर व श्रद्धा हीं वाढावीं आणि त्या महापुरुषाचा बोध ठसवून घेण्यासाठीं अंतःकरणांत जी आदराची व प्रेमाची भावना असावी लागते, ती वाचकांच्या ठायीं उत्पन्न व्हावी याहेतूनें (१) बडांक ९५० ची प्रकर-णात्मक बखर, (२) श्रीसमर्थप्रताप, (३) श्री दासविश्रामधाम (४) श्री दास (संत) विजय, (५) श्रीदासप्रताप, (६) श्रीराम-दासगुणार्णव इत्यादि चरित्रग्रंथांच्या आधारें पुढील लीला वर्णिल्या आहेत. पूर्वचरित्रकारांच्या श्रद्धेशीं व प्रेमळ भावनेशीं समरस होऊन या लीला वाचाव्या म्हणजे वाचकांस त्यांतील गोडी कळेल.

(१) कलथणें रांगणें पाळणीं निजणें। पायावरी नाहाणें टकमकां पाहणें। रडत हासत स्तनपान करणें। दधि दूध सेवणें अन्नासह ॥२८॥ पडत उडत खेळणें मुलांसवें। खोडी गाऱ्हाणी तोंड पसरावें। अरे बागुल आला रे म्हणतां भ्यावें। पराधेन होणें सर्वस्वें ॥ २९ ॥ सांवरीत फिरणें आंगी कुंची। धुकधुकी वाहे बाळलेणींची। अवतारइच्छा लपवून मनींची। लीळा विचित्र दावणें ॥ ३० ॥ एकदां आंगणीं दिगंबर। थैथैकारी नाचतां सुंदर। जननीस आल्हाद वाटला थोर। न सुचेचि कांहीं घरधंदा ॥ ३१ ॥ करितां गृहकृत्य दासमाता। जा जा म्हणतांहि न होय परता। येकदां येकांतीं खेळू बैसतां। शोधितांहि न सांपडे ॥३४॥ आनंद भराया बापा अंतरीं। बैसोन खेळले मांडीवरी। चुकोनि नेमातें कष्टतां रात्रीं। भाऊसी दाविलें हरिरूप ॥३५॥ (बंधूस, नित्यनेम चुक-ल्यामुळें, त्रास होऊं लागला, तेव्हां त्यास वानरस्वरूप दाखविलें,

असा शेवटच्या दोन चरणांचा भावार्थ आहे. बाकी ओव्या सोप्या आहेत.)

(२) समर्थ वर्धमान दिवसेंदिवस। इंदुउपमा न साजे समर्थास।
चंद्र अपूर्ण अमावास्येस। श्रीरामचंद्र समर्थ पूर्ण पूर्णत्वें ॥२॥
मुख्य आदिनारायण नाम। कटिसूत्रादि चौलकर्म।
शिखारक्षण ब्राह्मणधर्म। मातृभोजन समागमें ॥३॥ स. प्र. २

(३) समर्थासी अन्नभोजनीं इच्छा नाहीं। वनफळ भोजनीं इच्छा कांहीं। वैराग्यचिन्हें दिसती देहीं। संतसज्जनीं जाणितलें॥४॥

(४) नाना अलंकार अंगलेणीं। लेंकुरांसीं देताती तोडोनी।
समर्थकळा दिव्य नयनीं। अनंगलेणीं सर्वांगें ॥५॥

(५) सदा सर्वदा अंतरंगें। बाह्य लीळा चरित्र प्रसंगें।
चंचळ सर्वदा सर्वांगें। येके ठायीं न बैसती ॥६॥

(६) तातभ्राताची परममर्यादा। वेगळे वेगळे असती सर्वदा।
श्री रामनामस्मरण करणें सदा। हनुमानक्रिया दिसतसे ॥७॥

(७) ब्राह्मणपुरींत अध्ययनें करिती। समर्थासी ब्रह्मविद्या अंतरीं स्फुरती। समर्थ मान्यता अंगीं न धरिती। अनावरपणें वर्तविया ॥८॥

(८) समर्थ आले उपनयनमानीं। उपाध्यायांहीं देखिलें रूप हनुमानी। कासोटीं पुच्छ दाखविलें मुंजीबंधनीं। गौप्य करविलें चराचरीं ॥९॥

भावार्थ– समर्थ चंद्रासारिखे दिवसेंदिवस वाढूं लागले; पण चंद्राची उपमा योग्य नव्हे; चंद्र अमावास्येस लुप्त होतो. आणि समर्थ तर श्री रामचंद्राप्रमाणें नित्य परिपूर्ण! कटिसूत्र बांधणें, जावळ काढणें, शेंडी ठेवणें, आईच्या सांगत जेवणें, हें सगळें यथापद्धति चाललें होतें. (३) फळफळावळीची समर्थांना मोठी आवड; अन्नाचा आहार नको असे. वैराग्याचीं चिन्हें बाळपणींच त्यांच्या अंगीं दिसत होतीं. (४) अंगावर बाळलेणीं घातलीं कीं, तीं त्यांनीं दुसऱ्या मुलांस देऊन टाकावींत. (५) त्यांची दृष्टि नेहमीं अंतर्मुख असे. वयोमानानुसार कांहीं खेळतहि. पण या मुलास एके ठिकाणीं बसणें जणूं ठाऊकच नव्हतें. मोठा चळवळ्या स्वभाव. (६) असें असलें तरी वडील व ज्येष्ठ बंधु

यांच्यांशीं फार मर्यादेनें वागत. रामनामस्मरणांत नित्य दंग असत. (७) ब्राह्मणांचें अध्ययन–अध्यापन गांवांत चालत असे. समर्थांच्याहि अंत:करणांत ब्रह्मविद्या स्फुरद्रूप असली तरी ते विद्यावैभव आंतलें आंत गुप्त ठेवून बाह्यत: हूडपणा करीत. (८) मुंजीच्या वेळीं त्यांना पुच्छ असल्याचें उपाध्यायास कळलें. मारुतीसारखेंच या मुलाचें रूप त्यांस दिसलें. दास (संत) विजय व दासविश्रामधाम यांतहि समर्थांस पुच्छ असल्याचा उल्लेख आहे. एकदां माता राणूबाई या मुलास पुढें घेऊन निजली असतां, आपल्या कुशींत कांहीं वळवळतें आहे असें तिला वाटलें; उठून पाहिलें तों या मुलाचें शेपूट ! पतिराजास तिनें हा प्रकार सांगितला, तेव्हां 'हें बाहेर कोणास सांगूं नकोस' असें त्यांनीं सुचविलें.

येक्या दिनीं ते जननीस्वभावें । निजली पलंगीं बाळासह ।।३६।।
तों पुच्छ कुशींत करी वळवळ । जागोनि पाहतां तंव नव्ह बाळ ।
देखे बळीचें स्वरूप चांगुलें । गमलें विचित्र विस्मावली ।।३७।।

दा. वि. धाम ३

'पुच्छ तें वळवळें कटीमाजीं' असें समर्थसमकालीन संत तुकाराम महाराजहि म्हणतात.

(९) एकदां एका सामुद्रिकानें ( हस्तरेषा पाहून भविष्य सांगणारानें) या मुलाचा हात पाहिला, तर तो आनंदानें नाचूं लागला. 'भूदेवा, आपण कां नाचतां ?' असें समर्थांनीं त्यास विचारलें; तेव्हां तो म्हणाला 'काय सांगूं ? बापा! स्वस्तिसाम्राज्यें वैराग्यें भोगिसी। येकीयेकछत्री रामराज्य करिसी । विश्वजनासी तूं उद्धरिसी । काय बोलों प्रताप ।।११।। विश्वाचे शमिसी त्रिविधताप । विश्वाचा तू मायबाप । आत्माराम तूं आपेआप । काय सांगों सामुद्रिकें ।।१२।। अपार भाग्य भोगिसी स्वभावें । तेव्हां मज ब्राह्मणासी आठवावें । त्यावर, श्रीसमर्थ म्हणती जी तुम्ही भूदेवें। गौप्य करावें सांप्रत हें ।।१३।। म्हणौनि श्रीसमर्थें कंठमाळा । प्रेमें घातली ब्राह्मणगळा । श्रीरामप्रसाद घेऊनि ब्राह्मण गेला । ब्रह्मानंदें स्वानंदें' ।।१४।। (स. प्र. २)

(१०) नारायणाचें वय ४।५ वर्षांचें असेल. घरांत एक दिवस खेळतां खेळतां त्याच्या हातून भरलेली दुधणी (दूध तापविण्याचें मडकें) फुटली. सगळ्या खोलीभर दूध पसरलेलें दिसतांच हातांत चिपाटी घेऊन आई त्यास मारायला धांवली. त्याबरोबर रडत रडत नारायण दूर दूर जाऊं लागला. पण आईनें त्याला पकडलें आणि चिपाटी उगारून लटक्या रागानें म्हणाली, 'सगळं दूध लवंडलंस अन् दुधाणंहि फोडून टाकलंस; तुझ्या खोडचांना आतां सीमा उरली नाहीं; थांब, तुला आतां चांगलं बांधूनच ठेवतें.' नारायण रडत रडत म्हणतो आहे, 'आई, मीं नाहीं ग, मीं नाहीं फोडलं, विचार तूं दादाला, बाबांना.' त्याचा एक हात घट्ट पकडून दुसऱ्या हातानें आई रागारागानें दोरी शोधूं लागली. इतक्यांत सूर्याजीपंत तेथें येऊन विचारतात 'काय झालें? कां मारतीस त्याला?' 'बघा चिरंजीवांचे प्रताप; सगळ दूध नाहींसं केलं; दुधाण्याचे तुकडे केले!' आईनें उत्तर केलें. त्यावर पंत म्हणाले 'जाऊं दे ग; देईल राम आपल्याला पुष्कळ; त्याला मारून का आतां तें परत मिळणार?' त्यांनीं त्याला जवळ घेतलें. बाळाच्या तोंडाकडे पाहतांच राणुबाईचाहि राग पळाला. तिनें त्याला कडेवर घेऊन चुंबून कुरवाळलें. इतक्यांत वडील मुलगा शाळेंतून घरीं आला. तो म्हणतो 'आई, त्या चुलीवरच्या दुधणींतलें दूध देना आह्मांला प्यायला.' सगळे तिकडे पाहतात, तों चुलीवर दुधणी जशीच्या तशीच भरलेली!

(११) एके दिवशीं 'आत्तां दूध प्यायला दे,' म्हणून आईजवळ हट्ट घेऊन नारायणानें रडायला सुरवात केली; नाना परींनीं आईनें समजूत घातली, पण मूल अधिकच रडूं लागलें. तेव्हां त्यास कडेवर घेऊन आई गोठ्यांत आली, आणि गाईजवळ नेऊन म्हणाली 'हें बघ, आपली गाय किनई आतां गाभण आहे, व्याल्यावर खूप दूध देईल ती, अन् मग आमच्या नारायणाला किनई पुष्कळ पुष्कळ दूध द्यायचं बरं कां! आतां रडूं नको.'

नारायण म्हणतो ‘मग नाहीं, आत्तां आत्तां दे.’ मुलाच्या समजुतीसाठीं भांडें घेऊन आई कांसेखालीं बसली नि कांसेंत हात घातला, तों काय नवल ?

पान्हा फुटोनि भरला भरणा[1] । आश्चिर्य वाटलें आईच्या मना । करऊनि संतोषें प्रेम पयपाना । चुंबुनि घे तदा कडेवरी ॥१०५॥
दा. वि. धाम ३

हें वृत्त पंतांस समजल्यावर त्यांनाहि मोठा आनंद झाला. प्रेमभरानें नारायणास त्यांनीं पोटाशीं धरून मांडीवर घेतलें, आणि त्याच्या अंगावरून प्रेमाचा हात फिरवीत भारावलेल्या अंत:करणानें म्हणाले ‘जा बाळ, खेळा आतां अं !’

(१२) पुढें लो लागला खेळाचा । कळप मेळविला पोरांचा । आल्या गेल्या डायाचा । आनंद शोक वाहे ॥ दा. बो. ३-२
मग नावडेसें जालें घर । पळपळों जाय हटें बाहेर । जैसा उपमन्यु विप्र-किशोर । लपे येकांतीं खेळत ॥४१॥ गल्लीवरोनि गल्लीस उडे । थोरचे वृक्षा वरिवरि चढे । न कळे जातो कीं कोणीकडे । विलपतां[2] सांपडे जवळींच ॥४२॥ दा. वि. धाम. ३

(१३) समर्थक्रीडेचें अद्‌भूत लक्षण। अष्ट जुत्पति[3] संवगडे-जाण । गोटया बोटें टिचिती जाण । येक येक सेर सेर संपूर्ण संभारें ॥ १५ ॥ वृक्ष सरोवरीं उडया घेती । रानीं वनीं सदा असती । यथा स्वलीला ग्रामांत येती । परम प्रतापी अनिवार ॥१६॥ स. प्र. २

(१४) एक दिवस नारायण फार खोडया करूं लागला, म्हणून हातांत चिपाड घेऊन, आई धाक दाखवूं लागली. नारायणानें रडवें तोंड करून आ पसरला तों त्या मुखांत आईस अनेक देवतांचें दर्शन झालें! लगेच नारायण पळून खोलींत जाऊन लपला; आईहि रागानें मागोमाग धांवत गेली, पण पाहते तों ‘अंतर्गृहींत रूप अद्‌भुत दाविलें’ !

---

१ धार काढण्याचें भांडें. २ (आई) विलाप करूं लागल्यावर ३ मल्ल, दणकट बांध्याचे सोबती.

तें रूप पाहतांच आई घाबरली, पण सावध होऊन पाहिलें तों समोर नारायण भ्यालेल्या चेहऱ्यानें उभा! दिसलेला अद्‌भुत देखावा आई विसरली, आणि तिनें लेंकरास प्रेमानें पोटाशीं धरिलें.

( १५ ) नारायण फार हडहड करून घेतो नि सारखा भटकत असतो, त्यामुळें तो रोडावला असें आईच्या मनानें घेतलें; म्हणून तिनें 'नरस्या' देवाला नवस केला. त्यावर नरसोबानें आईला स्वप्नांत सांगितलें कीं, 'तुझा मुलगा म्हणजे साक्षात् मारुतीराय' त्याचें नांव घेतलें कीं, सगळीं भुतेंखेतें पार पळून जातात.

'आतां न पडावें कांहींच संशयीं। काळकर्मादि भय यास नाहीं.'।

हें स्वप्न पाहून आईला समाधान वाटलें. दा. वि. धाम ३–४८ते५०

( १६ ) पण किती झालें तरी आईचें आंतडें तें! दुसरे दिवशीं नारायणास न्याहाळून पाहूं लागली, तेव्हां तिला वाटलें कीं, याला 'खडतर दृष्ट' झाली असावी. मीठमोहऱ्या हातीं घेऊन आई जों दृष्ट काढावयास येते तों 'प्रकाश पडला दैदीप्य'

दा. वि. धाम ३–५१-५२

( १७ ) खेळतां खेळतां एक दिवस दोघा भावांच्या आपसांत गोष्टी चालल्या होत्या. पंत व राणूबाई जवळच ऐकत होते.

नारायण –'माया त्यागिजे। विटप येकांतीं सौख्य भोगिजे'।
गंगाधर –'भ्याडपणा टाकिजे। संसारीं वर्तिजे अलिप्त ॥'
नारायण –'अलिप्त दशेचें हेंचि लक्षण। संसार टाकिजे मुळींहून।'
गंगाधर –अरे मूळ सांपडल्या नलगे सिणणें।मोक्ष आपसया ये हातां
नारायण–हात टेकुनी विषयावरी। ज्ञान कथितां तें न बिबे अंतरीं।
गंगाधर –अरे वेड्या मुला न कळे तरी। विचार कीजे मनांत॥
नारायण–मना पुसावें तरी बोलणें पुरे। मी-तूंपणातें झुगारा दूर।

दा. वि. धाम ३–५९ते६२

( १८ ) नारायण फार खोड्या करतो, तेव्हां त्याला शाळेंत अडकवून टाकावा असा विचार करून आईबापांनीं सुमुहूर्तावर त्यास शाळेंत घालण्याचें ठरविलें.

एकदां बाळकासी घेऊनि अंकीं । बाप हित सांगे रे नांव राखी ।
सिकोनि बहु विद्या होईं सुखी । प्रतिपाळ करी बहुतांसी ॥ ११५॥
आई म्हणे बा होसील शहाणा । तरीच नेटकी मिळेल अंगना ।
मान मिरासी करिसील पाळणा । आटोपसील संसारू ॥ ११६॥

पण मुलगा उत्तर करतो—

'नलगें चि कांहीं । विद्या मात्र मी सिकेन आई ॥
'अंगना त्रिगना नको आपल्याला' ती विद्या तेवढी सिकेन.
बाळबोध मोडी अक्षर सुंदर । केलें सिकलें सूक्तादि रुद्र ॥
जिभींत शारदा हृदईं गणेंन्द्र । वाटे वस्तीसी पातले ॥

दा. वि. धाम ३ –१५ते१८

प्रतापकार गिरिधर ( १७–२) वर्णन करतात–

समर्थें अकरा घड्यांत केलें धूळाक्षर । अकरा प्रहरांत वळिलें अक्षर ।
अक्रा दिवसें केला जमाखर्च सुंदर । ब्रह्मांड कुळकर्ण चालवावया ॥

'जमाखर्च' सुंदर करून दाखविला एवढेंच गिरिधरांनीं लिहिलें आहे·

शिरगांवकर भीमस्वामी व लक्ष्मणस्वामी यांनीं तर म्हटलें, आहे कीं, गांवींचा हिशेब हाकिमा देऊनि। पोषाख घेऊनि आले घरा।

( १९ ) शाळेंतील अभ्यास असा अल्पावधींत झाल्यावर, नारोबा त्या शाळेच्या खोड्यांत अडकून कसा रहाणार? 'पराधेनता रामदासीं घडेना' हें तर त्यांचें ब्रीद,! तो पुन्हां आपल्या 'अष्ट जुत्पतीं' ना घेऊन उड्या मारायला मोकळाच !

अवघड झाडावर शेंड्यापर्यंत भरभर चढून जावें; खालचीं मुलें 'अरे पडला, पडला' म्हणून ओरडत आहेत, तों सर्रदिशीं पटकन् खालीं यावें, अथवा पुरुष दोन पुरूष उंचीवरून एकदम खालीं उडीच टाकावी; लगेच शेजारच्या भिंतीवर चढून तिजवरून मध्यें चार पांच हातांची गल्ली टाकून पलीकडच्या माळवदावर उडी झोंकावी, असे त्याचे खेळ प्रत्यहीं चालत.

(२०) एक दिवस नारायण कांहीं केल्या शाळेंत जाईचना. आईचें घुसळण चाललें होतें, तेथें एवढेंसें तोंड करून उभा राहिला. कांहीं सांगितलें तरी ऐकेना. हातचें काम टाकून आईनें त्यास जवळ घेतलें, तोंडावरून हात फिरवून, 'लोणी देऊं कां तुला?' म्हणून विचारलें. पण मुलगा आपला गप्प. शेवटीं हातांत लोणी घेऊन त्याच्या तोंडाजवळ नेलें, मुलानें तोंड उघडतांच 'लखलखीत अंगुष्ठप्रमाण साजिरी। 'मूर्ति' देखिली रसनेवरी।' हा अद्भुत प्रकार पाहून आई-बाप चकित झाले! पण भगवन्माया ती हीच कीं, इतके दिव्य अनुभव येत असतांहि त्यांचा विसर पडून, 'हा माझा मुलगा अन् त्याची आतां मुंज करायची नि याला नवरी पहायची' या मायामोहाच्या कल्पना उभ्या राहतच.

(२१) नारायणाच्या बऱ्याचशा खोड्या कानीं आल्यानें आई रागावली होती; डाव्या हातानें नारायणास पकडलें होतें आणि उजव्या हातांतलें कडव्याचें ताट उगारून आई त्यास दटावून म्हणते 'नारायणा तुला काय करावें रे ?

घरीं राहे म्हणतां अंधारीं दडतो। ना तरीं रानीं तरुतळीं पडतो।
कीं झाडा वेंघून उड्या घेतो। नीळनळअंगदासारिखें ।।९२।।
भरल्या विहिरींत टाकितो उडी। बोल ऐकेना जाचितो घडिघडी।
सोय धरीना जाला अन्हाडी।' असें बोलून मारायला ताट तिनें वर केलें, तों पकड सुटून नारायण भयानें मागें सरकूं लागला. मागें मागें सरकतांना, त्याचा पाय तापल्या लोखंडावर पडला. पाय भाजला म्हणून नारायण ओरडला. त्याबरोबर हातांतलें ताट टाकून 'जळो ग माझा राग हा, पोरगं भाजलं माझं', असें म्हणत आई त्याच्या जवळ येत आहे, तेव्हढ्यांत नारायणानें 'सूंबाल्या' केला. कशानें पाय पोळला हें पाहण्यासाठीं आई खालीं वाकली तों जेवढ्या भागावर नारायणाचा पाय पडला होता तेवढा तो लोखंडाचा भाग सोन्याचा झालेला! दुष्काळामुळें पैशाची तंगी सूर्याजीपंतांस जाणवत होती, ती अशा प्रकारें दूर झाली.

दा. वि. धाम ४–९२ ते ९६

(२२) श्रीरामनवमी जवळ आली, यंदांचा उत्सव कसा पार पडावा, पुढें सुगीपर्यंतचे दिवस कसे निभावेत, अशा विवंचनेंत नारायणाला पुढें घेऊन पंत दुपारची वामकुक्षी करीत पडले होते नि त्यांच्या मुखांतून सहज उद्‌गार निघाला कीं, 'काय मारुतीराय करतील तें खरें, कांहीं उपाय सुचत नाहीं.' त्याबरोबर नारायण म्हणतो, बाबा,

"कां करावी चिंता। सर्व समर्थ तो श्रीरामदाता। करवील उछावो आपुला।।७०।। प्रस्तुत आजिचा मूहूर्त नीट। असे प्रारंभु करविजे वळवट। आम्हां भक्तांशी कैचें संकट।'

मुलाचें बोलणें पंतास पटलें; ते म्हणाले, 'नारोबा, तूं बळदांत उतर, काय दहा आकरा पायली गहूं असतील ते काढून दे बाहेर.' असें बोलून त्यांनीं मुलास बळदांत उतरविलें. नारायण टोपलें भरून वर देत आहे, वडील वरती रिचवीत आहेत आणि सांठवून ठेवणारे सांठवीत आहेत; गव्हाची भली मोठी रास पडली! श्रीरामनवमीचा उत्सव नि पुढील सुगीपर्यंतचे दिवस इतक्यांची बेगमी होईल एवढे गहूं त्या बळदांतून निघाले. 'पुरे पुरे पुरे आतां। देव देतां विटेचिना।'

दा. वि. धाम ४–६६ ते ७५

(२३) त्याच रामनवमींतील पंगतीचा प्रसंग, भोजनाला सर्व मंडळी बसलेली; आग्रह करकरून वाढणें चाललेलें, अर्धी जेवणें होत आलीं नि तूप संपलें! आतां काय करावें? सूर्याजी-पंत पंगतींतून निघून देवासमोर येऊन उसासे टाकीत बसले. तेथेंच अंधारांत एका बाजूस नारायण बसला होता. 'काय हो बाबा, काय झालें?' त्यानें विचारिलें. तूप कमी पडल्याचें कळतांच तुपाच्या मडक्याजवळ जाऊन नारायण म्हणतो, 'अहो बाबा, तूप तर यांत पुष्कळ आहे, दाता श्रीराम असल्यावर कमी कसें पडेल?' तें गाडग्यांतील तूप पुढील सगळ्या पंगतींस पुरलें! त्या पित्याला या लेंकराचें केवढें कौतुक वाटलें असेल! त्याला मनापासून आशीर्वाद देऊन ते म्हणाले, 'नारायणा 'उद्धार करी बा आह्मांसी.'

'बाबा उद्धार कसा असतो?' नारायणानें बाळभावानें विचारिलें. 'अन् लोक तर तुमच्याच पायां पडून आह्मांला तारा, आमचा उद्धार करा, मायबाप, असें म्हणतात!' पंत यावर काय उत्तर देणार? त्याला आनंदानें पोटाशीं धरून हांसले.

(२४) नारायणाचें उपनयन श. १५३५ मध्यें तो पांच वर्षाचा असतांना झालें, असें वांकेनिशी टिपणांत व बखरींत म्हटलें आहे. दा. वि. धामकर्त्यांनीं सातवें वर्ष सांगितलें आहे. त्या समारंभांत उपाध्यायाचा व नारायणाचा झालेला संवाद दा. वि. धामांत दिला आहे तेवढा पाहूं.

उपाध्याय–ब्रह्मकर्म नीट करीत जा.

नारायण–जी, आज्ञा प्रमाण.

उपाध्याय–आतां चांगलें वागायचें, उत्तम गुणांचा अभ्यास करावयाचा. करशील ना?

नारायण–हो, तसेंच करीन.

उपाध्याय–रानावनांत आतां पुढें भटकायचं नाहीं बरं कां! पोराठोरांची संगत आतां टाकून दे; झाडावर तर मुळींच चढायचं नाहीं; पोरांना झाडावर नेऊन अडकवायचं नाहीं.

नारायण–शास्त्रविहित असेल तसें वागेन कीं मी. पण रानांत गेल्यावांचून आपल्याला नाहीं करमायचं.

प्रपंच माझा तो वृक्ष गर खांदी । अमाय पोरांची मेळविन मांदी ।
न पडे चि मी कवणे संमंधीं । मना आलें तें करीन ॥९२॥

हें लडिवाळपणाचें उत्तर ऐकून सगळे हंसू लागले; कोणी त्याला उद्धटहि म्हटलें. दुसरे कांहीं जण म्हणाले, 'अहो, त्याच्या चेहऱ्याकडे पाहिलें म्हणजे वाटतें कीं, हें पाणी कांहीं वेगळेंच असावें.'

(२५) नारायणाचा पाय घरीं कधीं ठरायचा नाहीं, अर्थात् कोणत्याच घरकामांत त्याचा उपयोग होत नसे, हें पाहून आई

एकदां म्हणाली, 'नारायणा, कसं होईल रे तुझं पुढें? घरप्रपंचांत तू अगदींच कसा पहात नाहींस! 'बापा, पुरुषें चिंता करणें कांहीं.'

आई जवळून नारायण उठला तो गुपचीप उतरंडीच्या खोलींत जाऊन बसला. कोणालाच तें माहित नव्हतें. सगळीकडे शोध शोध शोधलें, पण कुठ्ठें पत्ता लागेना. 'पोराला बोललें नसतें तर तो कशाला असं निघून जाता?' अशा विचारांनीं खिन्न होत्साती आई कांहीं निमित्तानें त्या अंधाऱ्या खोलींत चांचपत गेली. तों तिच्या पायाला कांहीं गुळगुळीत लागलें. त्याबरोबर घाबरून ती मोठ्यानें म्हणाली 'काय आहे ग इथं?'

नारायण म्हणतो–'आई घाबरूं नकोस, मी आहे.'

आई–'बापा काय करितोसी येकांत स्थळीं?'

नारायण–'आई चिंता करितों विश्वाची ॥२२॥ स. प्र. २

बालसमर्थांनीं लहानपणापासून अशी 'विश्वचिंता' जन्मभर चित्तांत वाहिली, म्हणून महाराष्ट्रास दीडशें वर्षें स्वराज्याचा उपभोग घेतां आला.

(२६) नारायण सांपडेनासा झाला, तेव्हां त्याला शोधीत सूर्याजीपंत चोहोंकडे फिरत होते. तो घरांतच सांपडल्याची बातमी कळल्यावर ते घरीं आले. मुलाला पोटाशीं धरून ते पत्नीस म्हणाले 'हें पहा, तूं त्याला कांहीं बोलत जाऊं नको, अन् कामहि सांगत जाऊं नकोस. मोठा झाल्यावर येईल आपोआप त्याला शहाणपण.'

'आई, शहाणपण म्हणजे ग काय? सांग ना.' लडिवाळ-पणानें आईच्या पायाला विळखा घालीत नारायणानें विचारलें.

'अरे धनधान्य मिळवून आणावें, म्हणजे शहाणा म्हणतात; मग नवरी चांगली मिळते.' आई मुलाच्या अंगावरून प्रेमाचा हात फिरवीत म्हणाली, 'तू मिळवून आणलेंस म्हणजे तुलाहि शहाणा म्हणतील.'

तें बोलणें तेवढ्यावरच थांबलें. दुसरे दिवशीं आई आपल्या गृहकृत्यास लागली आणि मुलगा निघाला, तो खेळत बागडत एका

खळ्यावर जाऊन उभा राहिला. तेथील शेतकरी माणसें, मळलेल्या धान्याची रास करण्यांत व माप करून त्याचीं गांठोडीं बांधण्यांत गुंतलेलीं होतीं. शेताच्या मालकानें विनोदानें विचारलें, 'काय पांडेबाबा, कुणीकडे आलांत? बलुत बिलुत पाहिजे का? जरा बसा खिनभर त्या झाडाखालीं; या राशीचं एवढं माप करतों अन् देतों मंग तुमास्नी शेरमापटं दानं' 'गप्प बस रे, किती वटवट करतोस?' छोटे पांडेबुवा गरजले, 'तुला कुणी मागितलेत दाणे?'

असें बोलतां बोलतांच नारायणानें तेथें बांधून ठेवलेल्या गांठोड्यांपैकीं मणा सव्वा मणाचें एक मोटकुळें उचलून घेतलें पाठीवर नि ठोकली धूम! 'अरे, अरे' करीत कुणबी मागें धांपा देत पळतो आहे, आणि नारायण पुढें वेगानें चालला आहे. मोट उतरून नारायणानें आपल्या ओसरीवर ठेविली. कांहीं तरी भानगड असावी असें वाटून राणूबाई नारायणास म्हणाल्या 'काय गडबड आहे रे?'

इतक्यांत धांपा देत कुणबी मागोमाग ओरडत आला, 'पघा, पघा, या पोराग्याला राकिस म्हणूं का भूत? अव, मी एवढा मोठा बाप्या, इकल्या बिगि बिगि मागं पलत आलुया, पन् ह्यो मस्नी घावला न्हाय! काय म्हनावं?'

त्याला दटावून नारोबा म्हणतात, 'ए, काय चावटी मांडली आहेस रे? चल, उचल आपलें मोटकुळें, नाहीं तर बाबा आले कीं तुला ठोकून काढतील, उचलतोस का नाहीं?'

कुणब्यानें मोठ्या कष्टानें तें गांठोडें उचललें तों खालीं दुसरें तयार, तें उचलतो आहे तों तिसरें! आणि नारोबाचा सारखा तगादा, 'उचल आपलें गांठोडें.' अशीं पन्नास साठ गांठोडीं निघालीं! तो शेतकरी दमला, भांबावला, काय करावें हें त्याला सुचेना. तेव्हां नारायणानें दरडावून म्हटलें 'आपलें एक मोटकुळें उचल, हीं इतकीं कोणाचीं घेऊन चाललास?' त्यानें आपलें गांठोडें नेल्यावर आई तें धान्य घरांत साठवूं लागली, पण संपतां संपेना; शेवटीं नारायणाला म्हणाली 'बाबा, मी थकलें आतां, तूं तरी जरा

हात लाव.' नारायणाचा हात गांठोड्यास लागला मात्र, सगळीं गांठोडीं क्षणांत गुप्त झालीं !

(२७) मुलाच्या अशा दिव्य लीला आई नित्य पहात होती. हा अवतारी आहे अशी कल्पना तेवढ्यापुरती तिच्या मनांत चमकून जाई, पण हरिमायेची झांपड !

सवेंचि समर्थमातेसी विस्मरण पडिलें। येके दिवशीं देवघरीं[१] प्रयोजन मांडिलें। बापा तक्रशाक्रासी दुल्लभ म्हणती भले। तुज तों कार्य सांगों नये ॥ २४ ॥ स. प्र. २

आईचे हे शब्द कानीं पडतांच नारायण मुकाट्यानें तेथून उठला नि कुंभारवाड्यांत जाऊन प्रत्येक ब्राह्मणाच्या घरीं अकरा अकरा मडकीं ताबडतोब पोहोंचविण्यास सर्व कुंभारांस सांगून परत आला. लगेच रात्रींच्या रात्रींच सर्व ब्राह्मणांच्याहि घरीं ताकीद दिली कीं, उद्यां तांबडं फुटायच्या आंत ताक देवघरीं पोहोंचतें करा. त्याप्रमाणें दुसरे दिवशीं प्रहर रात्रींच सर्वांच्या घरचें घुसळण सुरूं होऊन अरुणोदयाचे आंत घरघरचें ताक पंतांचे वाड्यांत येऊं लागलें; परसदारानें नारायणानें तें सर्व ताक घरांत घेतलें; दिलेल्या मडक्यांशिवाय अधिक ताक आलें; त्याकरितां 'आठरा धान्यें रिचवूनि महीं। शुद्ध तक्रें भरिलीं भाणवसीं[२]॥ आणि हा सगळा कारभार घरांतलीं माणसें झोंपलेलीं आहेत तोंच झाला. उजेडल्यावर नारायणाच्या वहिनी झाडलोट करायला तेथें येतात तों जिकडे तिकडे पसरलेले धान्याचे ढीग, आणि ताकानें भरलेलीं गाडगीं! 'अगबाई, हें काय'? वहिनी उद्गारल्या आणि भावोजी म्हणाले, 'माय, हें मात्रआज्ञा परिपालन। (स. प्र.२–२४ ते२८)

(२८) कोण्हि येक ग्रामाधिपति म्हणे, बाहेर बैठक नाहीं। देवगृहीं अवघे अध्यात्मि[३] जालेति सर्व हि। कोण्ही गृहासी येती गृहस्थ पाही। त्यांसी मान सन्मान पाहिजे ॥ ३० ॥ स. प्र. २

---

१ कुळकरण्याचें घर किंवा राममंदिर. २ उतरंडीची खोली. ३ वेदान्ती, परमार्थी म्हणजेच प्रपंचाकडे दुर्लक्ष करणारे.

हे त्या पाहुण्याचे शब्द कानीं पडतांच आपले 'अष्टजुत्पती' गोळा करून नारायण रानांत गेला. झाडांच्या मोठाल्या फांद्या तोडल्या, तीं लांकडें घरीं आणिलीं, भिंती घातल्या, त्यांवर आणलेल्या लांकडांतलीं आडवटें घालून वरतीं दाट पाल्यापाचोळ्याचें आच्छादन टाकलें आणि 'अरुणोदयीं बैठक सिद्ध केलीं' ।। ३१ ।।

उजेडल्यावर त्या पाहुण्याची दृष्टि अवचित या बैठकीकडे जातांच त्यानें तोंडांत बोट घातलें!

अरे बा येके रात्रीं मोठी बैठक कैसी केली । अवतारपुरुषाची क्रिया देखिली । येके रात्रीं आणिला द्रोणाचळु (।। ३२ ।। स.प्र.२)

असें असतें महापुरुषाचें बालमन; आणि म्हणून मोठेपणीं त्याच्या हातून राष्ट्राचे पांग फिटण्यासारख्या प्रचंड घडामोडी होतात व ते इतरांस अधिकारवाणीनें सांगूं शकतात कीं, 'उणें कोणाचें न साहे । तया महापुरुषासी ।'

(२९) मुंजीनंतर बहुधा लगेच सोडमुंज होत असते; त्या संस्काराचे शेवटीं बटु प्रवासाच्या तयारीनें काशीयात्रेस जाण्यासाठीं उभा असतो आणि त्याचा मामा 'मी आपली मुलगी तुम्हाला देतो, नका जाऊं यात्रेला' असें म्हणून त्याची समजूत घालतो; लगेच तो बटु आपला प्रवासाचा जामानिमा उतरून ठेवून खेळायच्या उद्योगाला लागतो. असा सर्व उपनीतांचा व्यवहार सांप्रत सामान्यतः होत असतो, तसाच तो नारायणाच्या बाबतींत झाला असणार, पण एक तर मुंजीच्या वेळीं नारायण अवघ्या पांचा वर्षांचा आणि दुसरें नंतर श. १५३७ राक्षस-नाम संवत्सरीं मार्गशीर्ष शु. ९ स सूर्याजीपंतांचें देहावसान झालें. त्यामुळें नारायणाचे लग्नाचा विचार थोडा मागें पडला. तथापि अधून मधून राणुबाई व श्रेष्ठ गंगाधर या मायलेकरांमध्यें नारायणाच्या लग्नाची चर्चा होत असे.

त्या कालमानाप्रमाणें नारायण लग्नाच्या वयास आलेला, तेव्हां त्याला 'पाहण्यासाठीं' चार वधूपिते पंतांच्या घरीं वेळोवेळीं येऊन गेले. प्रत्येक वेळीं श्रेष्ठांच्या किंवा मातुःश्रींच्या देखत नारायणानें कांहीं बोलूं नये; पण तो गृहस्थ बाहेर आला कीं, त्यास म्हणावें –

आपणासी आश्रम करणें नाहीं । श्रीरामआज्ञा समर्थ कांहीं । चतुर्विध[1] कांता वरूनि गेलों पाहीं । निर्मळ निश्चळनिरंजनीं ॥१९॥ स. प्र. २

नारायणानें अशी दाबादाबी केली, तरी शेजारीपाजारी व स्नेहीसोबती यांच्या कानीं ती गोष्ट जाई आणि कोणी तरी त्यास विनोदानें म्हणे 'आतां काय नारायणाचा थाट विचारतां ? आतां त्याचें लगीन व्हायचें आहे !'

असें कांहीं कोणी बोललें कीं, नारायणानें चिडावें, रुसावें, रागवावें, रानांत निघून जावें, मारामारी सुद्धां करावी ! एकदां अशीच कोणी लग्नावरून त्याची थट्टा केली; त्याबरोबर तो जो रागावला तो पंचवटींतील एका उंच झाडावर जाऊन बसला. खालून पोरें चिडवीत होतीं. इतक्यांत उपाध्येबुवांची हांक आली, 'नारायणा, चल खालीं ये लवकर, आई बोलावते आहे; तुला पाहयाला आले'–

त्याबरोबर नारायणानें धाडकन् खालच्या डोहांत उडी घेतली! आतां वर येईल या कल्पनेनें भोंवतालचीं लहानमोठीं माणसें त्या उडीच्या जागीं उत्कंठेनें पाहत होतीं; पण मागमूस दिसेना. चार दोन पोहणारांनीं डोहांत शिरून सगळीकडे पाहिलें, पण थांग ना पत्ता! कुळकरण्याचा नारायण बुडाला म्हणून बोभाटा झाला; श्रेष्ठ धांवत आले 'नारायणा, बाहेर ये, चल लवकर.' त्यांनीं हांक मारतांच नारायण डोहाच्या बाहेर आला. त्याची समजूत घालून श्रेष्ठांनीं त्यास घरीं नेलें.

---

१ चार मुक्ति



जांब येथील श्रीसमर्थांनीं उडी टाकलेला डोह.



जांब येथील पंचवटी

पण उडी घेते वेळीं पाण्यांत खडक होता तो नारायणाचे कपाळास उजवे बाजूला लागून, तेथें टेंगूळ आलें, तें पुढें जन्मभर 'आवाळू' म्हणून प्रसिद्ध होतें.

तसेंच ज्या डोहांत नारायणाची उडी पडली त्या डोहांत आतां सर्व वाळू भरून गेली आहे. पंचवटी म्हणून जें स्थान नदीच्या पूर्वतीरीं दाखविलें जातें, तेथें त्या वेळचे घनदाट छायेचे प्रचंड वट-वृक्षहि आतां नाहींत. त्या जुन्या वृक्षांचा अवशेष म्हणून साधारण विस्ताराचीं ४–२ झाडें व पुढील कालांत निर्माण झालेल्या २-३ समाधि तेथें दिसतात.

या बाललीला सत्य कीं असत्य ? याचें उत्तर वाचणाराचे मनावर अवलंबून आहे. स्वामी विवेकानंदांनीं सत्याचे दोन प्रकार सांगितले आहेत. एक पंचज्ञानेंद्रियद्वारां आलेला अनुभव व त्यावरून शुद्ध बुद्धीनें केलेलीं अनुमानें, आणि दुसरा प्रकार तीव्र भावनेनें आलेल्या अनुभवांचा. तेव्हां वाचक नुसत्या जड इंद्रियांच्या अनुभवावरच विसंबणारा असेल, तर त्याला वरील गोष्टींपैकीं कांहीं भाग खरा वाटेल, कांहीं खोटा किंवा असंभवनीय वाटेल, अथवा कांहींच सत्य वाटणार नाहीं. भाविकाच्या श्रद्धावंत अंतःकरणास सर्वच खरें वाटत असतें. कारण, भगवंत अघटितघटनापटु आहे, भक्तरक्षणार्थ तो अनेक प्रकारच्या—तार्किक बुद्धीस अगम्य वाट-णाऱ्या लीला करीत असतो, निसर्गाचा अडथळा सामान्य माणसाला, भगवंतास दुष्कर असें कांहीं नाहीं, अशी त्याची श्रद्धा असते.

या ठिकाणीं श्रीरामकृष्ण परमहंसांच्या चरित्रांतील एक प्रसंग आठवतो.

दक्षिणेश्वर मंदिराचे एक विश्वस्त व परमहंसाचे सुशिक्षित नि निष्ठावंत भक्त माथुर बाबू यांचा एक दिवस भगवान् राम-कृष्णांशीं वाद चालला होता. श्रीरामकृष्ण म्हणत होते. 'ईश्वरी लीला अघटित असते; ईश्वर वाटेल तें करूं शकेल.'

माथुरबाबूंचें म्हणणें, 'पण निसर्गाचे नियम ईश्वरानेंच केले आहेत; स्वतःचे नियम तो स्वतःच कसा मोडील. ?

परमहंस–अरे, मोडतो रे; त्यांत कठिण काय? राजानें केलेला कायदा राजा नाहीं का मोडीत ?'

माथुरबाबू–बाबा, हें नाहीं तुमचें म्हणणें आपल्याला पटत! अहो, ज्या झाडाला पांढरीं फुलें यायचीं त्याला तांबडीं कशीं येतील?

परमहंस–येतात रे, तुला काय सांगू ? आईला (चिच्छक्ति जगदंबेला) सर्व करितां येतें.

नंतर माथुरबाबू उठून गेले. कांहीं वेळानें परमहंस बहिर्दिशेला निघाले; त्यांचें पाण्याचें भांडें घेऊन ( कारण ते धातूस स्पर्शहि करीत नसत. ) एक मनुष्य त्यांचे बरोबर चालला होता. त्यांनीं एके ठिकाणीं सहज पाहिलें, तों एका झाडाच्या एकाच फांदीला एका बाजूला तांबडें फूल आणि दुसऱ्या बाजूला पांढरें फूल! परमहंस तेथें थांबले व बरोबरच्या माणसास म्हणाले 'ठेव तें भांडें खालीं, ही फांदी अशीच त्या माथुरबाबूला नेऊन दाखीव. मघाशीं वाद घालीत होता कीं, सृष्टीचे नियम देव कसा मोडील? बघ म्हणावं हें काय आहे तें ?'

तेव्हां वरीलसारख्या गोष्टींचें श्रवण, वाचन, मनन भावनेच्या ओलाव्यानें करावयाचें असतें, तर्ककर्कश चिकित्सेनें नव्हे. भावनेचा ओलावा असेल व विश्वास बसेल तर अनुभव कांहीं वेगळाच येत असतो. मागील पिढींतील प्रसिद्ध युरोपियन मल्ल युजेन सँडो हा बाळपणीं आपल्या बापाबरोबर रोम शहरांतील प्रेक्षणीय स्थळें पाहण्यास गेला होता. कित्येक ठिकाणीं प्राचीन वीर पुरुषांचे मोठमोठे पुतळे त्याचे पाहण्यांत आले. त्यावर त्यानें बापास विचारलें, 'बाबा, त्या वेळचीं माणसें एवढालीं मोठीं होतीं का हो?' बाप म्हणाला, 'यांत काय संशय? तूं जर नियमानें पद्धतशीर व्यायाम करशील, तर तूंहि असाच धिप्पाड होशील'. त्या पुतळ्याएवढीं धिप्पाड माणसें कधीं काळीं रोम येथें अस्तित्वांत होतीं असें इतिहासावरून दिसत नाहीं. अर्थात् युजेनचा बाप खोटें बोलला. पण पित्याच्या त्या मिथ्या भाषणानें मुलाचें कोणतें नुकसान झालें? उलट बापाचे बोलण्यावर विश्वास ठेवून

त्या पुतळ्यासारखें बलशाली व धिप्पाड होण्याचा मनःपूर्वक प्रयत्न काटकुळ्या युजेननें सुरू ठेविला आणि प्रयत्नांतीं तो जगप्रसिद्ध सँडो बनला! त्या खोट्या भाषणानें जगाची तरी कोणती हानि झाली?

मग श्रीसमर्थांच्या वरीलसारख्या दिव्य बाललीलांनीं, 'दुर्जनस्तुष्यतु' न्यायानें त्या असत्य आहेत असें क्षणभर गृहीत धरिलें तरी, वाचकांचें अहित कसें होईल? उलट सश्रद्ध वाचकांस उत्तम आदर्श लाभेल व त्यांच्या भक्तिभावार्थाचा परिपोष होईल. दुसरें असें कीं, या गोष्टींतील सत्यासत्य निवडून काढण्यास आज पूर्वग्रंथांशिवाय कोणतेंहि दुसरें साधन नाहीं. स्वतःची तार्किक बुद्धि व सृष्टीचें अत्यल्प ज्ञान या भांडवलावर कल्पनेच्या उतरंडी रचायच्या आणि अमकें असंभवनीय, तमकें अशक्य व तें तिसरें निसर्गविरुद्ध, असलें तर्कटी प्रतिपादन करून स्वतःचा शहाणपणा मिरवायचा, यांत त्या लेखकास लाभ कोणता? आणि वाचकांनीं तरी अशा गोंधळी प्रतिपादनांतून काय घ्यावयाचें? म्हणून 'टाका तार्किकांचा संग। नुमगे खरें बुडाल'। हा जो श्रीतुकाराम महाराज साधकांस उपदेश करितात तो फार विचारणीय आहे. भावनेचे अनुभव शुष्क तर्कास मिळायचे नाहींत–कळायचे पण नाहींत.

## १२ सर्ग–श्रीरामप्रभूचा कृपानुग्रह

केवढें या ठोसरकुलाचें थोर भाग्य कीं, सूर्याजीपंत नि त्यांचे दोन्ही चिरंजीव या तिघांनाहि साक्षात् श्रीरामरायांनीं मंत्रोपदेश करावा! पंत व त्यांचे ज्येष्ठ पुत्र यांस अनुग्रह कसा झाला तें मागील ४ व ६ या सर्गांत आपण पाहिलें. आतां या सर्गांत त्यांच्या कनिष्ठ चिरंजीवास झालेल्या मंत्रोपदेशाची कथा सांगूं.

श्रीसमर्थचरित्रांतील हा अत्यंत महत्त्वाचा प्रसंग हनुमंतस्वामीकृत बखरींत (१७११ व १७४० मधील प्रती) पुढीलप्रमाणें

मराठी ... स्थळप्रत.

वर्णिला आहे. श. १६०३ च्या वाकेनिशीटिपणांशींहि तें वर्णन जुळत आहे.

"कोणे एके समयीं गंगाधरबाबा माडीवर सांप्रदायास अनुग्रह देत होते, तेथें नारोबा जाऊन कवाड उघडावयास लागले, तेव्हां गंगाधरबाबांनीं तुमचें येथें काम नाहीं म्हणऊन सांगितलें." आम्हांस अनुग्रह द्यावा म्हणोन समर्थांनीं विनंति केली. श्रेष्ठ बोलिले जे 'तुमचें अल्प वय आहे, एव्हां गरबड करायचें कारण नाहीं.' म्हटल्यावर श्रेष्ठांवर रुसून श्रीमारुतीचे देवालयांत जाऊन बसले. ते समयीं कांहीं अभंग केले आणि श्रमी होऊन श्रीमारुतीचे पाठीमागें निद्रा केली. तेव्हां श्रीमारुती येऊन, जागृत करून, दर्शन दिल्हें कीं, 'तूं चिंताग्रस्त कां आणि काय इच्छा आहे हें सांगणें.' असें म्हणाल्यावरून श्रीमारुतीचे चरणीं मस्तक ठेवून विनंति केली कीं, 'आम्हांस अनुग्रहाची इच्छा आहे, दुसरें कांहीं येक मागणें नाहीं.' तेव्हां श्रीमारुती बोलिले कीं, 'या गोष्टीची चिंता करूं नये, मदंशेंकरून तुम्हांस श्रीनें निर्माण केलें आहे. श्रीरघुपतीचे इच्छेकरून तुमचाहि मनोदय काळेंकरून पूर्ण होईल.' तेव्हां यांचें म्हणणें पडिले, 'काळेंकरून घडणार तें अनुकूल पडायचें नाहीं, याच समयीं अनुकूल जाल्यास प्राण ठेवणें, नाहींतर प्राण ठेवावयाचा नाहीं.' ऐसा निश्चय पाहून श्रीमारुती हास्य करून 'बहुबरें' म्हणतांच, त्या समयीं श्रीरघुपतीचेंहि दर्शन होतें जालें. श्रीरघुपतींनीं दर्शन देऊन, मस्तकीं वरद हस्त ठेवून आज्ञा करिते जाले कीं, 'तुम्हांस मारुतीचे अंशें करून निर्माण केलें आहे, तरी कलिप्रथमचरणांत म्लेंच्छमय पृथ्वी जाली, धर्म बुडाला, वेदमर्यादा राहिली नाहीं; ...... यास्तव तुम्ही कृष्णातीरास जाऊन जगदोद्धार करावा आणि ...... सिसोदे यांच्या कुळीं शिवनामें करून राजा उत्पन्न होणार आहे त्यास सहाय्य होऊन अनुग्रह देऊन धर्मस्थापना करावी. याप्रमाणें आज्ञा होऊन रामदास ऐसें नाम ठेविलें आणि अदृश्य जाले.' ......

इकडे नारायण रुसून गेला म्हणून सर्वत्र शोधूं लागले. श्रेष्ठ अकस्मात मारुतीचे देवालयांत आले, तों देवालयाचे पाठीमागें नारायण दृष्टीं पडला. त्याच्या मुखचर्येवर भगवत्प्रसाद जाल्याचें चिन्ह पाहून श्रेष्ठ बहुत संतोष पावले. हा अनुग्रह-प्रसंग जांब येथें श. १५३८ श्रावण शु. ९ माध्यान्हीं झाला. (बहुधा अष्टमीसह नवमी असावी.)

श्रीसमर्थ–शिष्य दिनकर (तिसगांव मठपति स्वानुभव-दिनकरकर्ते) यांनीं हा अनुग्रहाचा तपशील कांहीं वेगळा दिला आहे. तोहि सविस्तर पाहूं.

गौतमीच्या उत्तरतीरीं जांबेसी । ग्रामलेखनाधिकार पितयासी । पिता गोदेसी गेला स्नानासी । तंव नवल वर्तलें मागें ॥४६॥ निजगृहीं असतां नारायण । तंव दूतवेषें आला येक वानरगण । तेणें परम क्लेशी करून । बाह्यप्रदेशासी नेलें ॥४७॥ वय तरी वर्षा अकरांचें । परंतु पदरीं जन्मांतर पुण्य साचें । योगभ्रष्ट तेणें निजवृत्तीचें । चळण न घडे कदापि ॥४८॥ दूतें झोले[1] देत बाह्य प्रदेशीं । नेलें तेणें नारायण भयभीत मानसीं । होऊनि पाहे तंव दृष्टीसी । अपूर्व कौतुक देखिलें ॥४९॥ मेघश्यामरूप क्षत्रियवेषें । सिबिकेमाजीं[2] बैसलीं स्त्रीपुरुषें । संभवतें निजगण यथासंतोषें । उभे असती दोहीं भागीं ॥५०॥ तंव यासी नेऊन पुढें उभें केलें । पिता कोठें आहे म्हणौनि पुसिलें । रचपुति[3] भाषा वाक्य बोलिलें । आणि वेषहि तैसाची ॥५१॥ येणें पितृवर्तमान सांगितलें । तंव प्रभूनें जवळीं पाचारिलें । मस्तक कुरवाळूनि येक पत्र दिधलें । निजकरें नारायणासी ॥५२॥ निजमुद्रांकित पत्र करीं लाधतांचि । अवस्था पालटली नारायणाची । थरथरां कांपत तेणें सर्वांगाची । वेंगडी वळली ॥५३॥ वाचा जातसे वेंबळपणें[4] । हांसे रडे नाचे सत्राणें[5] । शब्द बोलवेना निर्बळपणें । उगाचि टकमकां पाहांतसे ॥५४॥ आंग कांपतसे थरथरां । विस्मयें दाटलासे

---

१ झोके; हिसके. २ पालखींत, मेण्यांत. ३ हिंदी ४ ढिलेपणानें. ५ वेगानें

सैरा[१]। घामेजोनि अति घाबिरा। रडे पडे आक्रंदे ॥५५॥ ...तंव मूर्ति देखिली घवघवीत। मेघःशाम प्रभा लखलखित•। वामांगीं जानकी शोभत। पाठिसीं सौमित्र भरत ॥५७॥ तया सेजीं उभा शत्रुघ्न। पुढें उभा वीर हनुमान। अकस्मात वांहाटुळी येऊन। इतुकें देखे तत्काळीं ॥५८॥ ऐसें देखेना जंव अकस्मात। तंव श्रीरामें मस्तकीं ठेऊनि कृपाहस्त। महावाक्य उपदेशूनि त्वरित। हनुमंतासी निरवीलें ॥५९॥

त्या वेळीं दिग्मंडळ दणाणून जाईल असा प्रचण्ड आवाज झाला; नारायणाचें सर्वांग थरारलें; आतां ब्रह्मांड कोसळतें कीं काय असें त्यास वाटलें, दांतखिळी वाजूं लागली, टकमकां पाहत आहे तों भुभु:कार करणारे मारुतीराय पुढें! लगेंच दिव्य हुर्मुजीवस्त्र त्याचे अंगावर शीतनिवारणार्थ आलें.

सव्य करीं पत्र राममुद्रांकित। वामकरीं अर्धचंद्र बाण राम देत। इतुकिया माजीं तत्काळ जाली गुप्त। राममूर्ति निजांगें ॥६४॥

हें होतें न होतें तोंच 'नारायणासी पडलें अंधारें।' पुढें वर्षभरपर्यंत नारायणाचें मौन व समाधीसारखी तटस्थावस्था होती. इकडे पिता व बंधु घरीं आले तों वर्तमान कानीं आलें कीं, 'एक दूत येऊनि नारायणासी नेलें। परम क्लेशी करूनी ॥६६॥' पंत गंगाधर व दुसरे कांहीं ग्रामस्थ घाबरे होऊन सगळेजण नारायणास नेलें त्या दिशेला पळत सुटले. दाट अरण्यांत येऊन पाहतात तों नारायण घाबरून गप्प उभा, भ्रमल्यासारखा कोणीकडे तरी पाहतो आहे; पुष्कळ प्रयत्न केला, पण नारायणाच्या तोंडांतून शब्द निघेना. जमलेले लोक नाना प्रकारें तर्कवितर्क करूं लागले. सगळ्यांचे प्रयत्न थकले; शेवटीं घरीं आणून श्रीरामापुढें ठेविलें. नंतर ग्रामस्थ आपापल्या घरीं गेल्यावर नारायणाच्या मुठी उघडून पाहिल्या, तों 'एका मुठींत अर्धचंद्र बाण आणि दुसरींत पत्र' मग अंगावरच्या हुरमुजी वस्त्राकडे लक्ष गेलें. तें पत्र दोघां पितापुत्रांनीं वाचतांच दोघेहि स्वानंदमग्न झाले!

---

१ अतिशय

पिता समाधिसुख लाधोनि । देह ठेऊनियां तत्क्षणीं । साम्राज्यपदसुखासनीं । निजवैकुंठीं वास्तव्य ॥७६॥

ज्येष्ठबंधु गंगाधरासहि समाधिसुखाचा लाभ झाला. त्यांनीं लेखणी श्रीरामचरणीं वाहिली. पुढें वर्षभर नारायणाची 'मौन्य-मुद्रा' होती, नंतर काव्यरचना होऊं लागली.

स्वानुभव दिनकर १६–४–४६ ते ७८

श्रीरामप्रभूंचें हें पत्र व गंगाधरांची समाधिअवस्था या विषयीं गिरिधरांच्या श्रीसमर्थप्रतापांतील २-३४,३५ या दोन ओव्या व एक अप्रकाशित पद यांत उल्लेख आहे तो पुढीलप्रमाणें: समर्थाचें भविष्यअवतारमहिम्न । ग्रामाधिपतिरूपें श्रीरघुवीरें जाण । गंगाधरपंताकरवीं लेहून । रात्रीं वटवृक्षातळीं दिधलें ॥३४॥ समर्थवटवृक्ष अद्यापि[1] आहे । हनुमान मुळीं बैसला पाहे । गंगाधर स्वामि तीन दिवस समाधिस्थ राहे । समर्थचरित्रपत्रें हस्तीं घेऊनियां ॥ ३५ ॥ स. प्र. २.३४,३५

पद–स्वामी तो हा उदास गोदातीरीं । मूळ पाहतां गुरुरूपें अवतारी ॥ ध्रु. ॥ . . . ज्याचें रूप ग्रामाधिपतिरूपें । लेहुन दिधलें राघवें सस्वरूपें ॥ चांदण्यांत वाचिलें बंधुरूपें । अदृश्य जाला राघव जो स्वरूपें ॥ ६ ॥ लिहिलें देवें तें प्रत्ययासि आलें । वडिल बंधूचें समाधान जालें ॥ ७ ॥ . . . ज्याचा हस्त मारुतीहस्तीं दिल्हा । सद्गुरुरूपें अदृश्य राम जाला ॥ परंपरा जेथूनि भूमंडळा । गिरधरें स्वामि हा अनुभविला ॥ ८ ॥

तिन्ही वृत्तांतांतील तपशिलांत कांहीं भिन्नता असली, तरी समर्थांस अनुग्रह श्रीरामाचा होता, याविषयीं तिहींचेंहि एकमत आहे. दुसरी गोष्ट,

मज तुज निरवीलें पाहिजे आठवीलें ।
सकळिक निजदासांलागिं सांभाळविलें ॥

या समर्थोक्तीस दिनकर व गिरिधर या दोघांचे वर्णनाचा दुजोरा वरील अवतरणांत मिळत आहे.

---

१ हें वर्णन श. १६५१ च्या पूर्वीचें आहे, आतां तो वटवृक्ष नाहीं.

स्वानुभवदिनकरांतील वरील उतारा ज्या ठिकाणीं आहे त्याच किरणांत मागील गुरुपरंपराहि दिली आहे.

प्रथम गुरू विष्णु आदिनारायण । त्यापासूनि ब्रह्मत्व पावला चतुरानन । पुढें ब्रह्मयानें वसिष्ठऋषीं लागुन । अनुग्रह केला॥४२॥ वशिष्ठानुग्रह श्रीरामचंद्रासी । योगवाशिष्ठ निजसंवादेंसी । पुढें श्रीरामदर्शन भूतळीं नारायणासी । जालें जन्मांतर सुकृतें ॥ ४३ ॥

समर्थांस रामदर्शन कसें होऊं शकेल अशी कोणी शंका घेतील, त्यांस दिनकरस्वामी बजावून सांगतात कीं,

त्यासहि गुरुत्व श्रीरामजीचें । दर्शनसादृश्य श्रीराममूर्तीचें । यासी असत्य म्हणतील तयाचें । नरकीं पतन यावच्चंद्रार्क ॥३१॥ श्रीराम सीता लक्ष्मण । भरत शत्रुघ्न हनुमान । या इतुकियांचें प्रत्यक्ष सगुण दर्शन । म्हणौन नाम रामदास ॥३३॥ स्वा.दि.१६-४

## १३ सर्ग–सावधान !

श्रेष्ठांनीं अनुग्रह दिला नाहीं म्हणून रुसून निघून गेलेला नारायण श्रीरामप्रभूचा कृपानुग्रह संपादून घरीं परत आल्यानें मातुःश्रीच्या चित्तास अर्थातच आनंद वाटला. पण जसें इतर आयांस वाटत असतें, तसेंच राणूबाईसहि वाटत होतें कीं, एकदां नारायणाचे दोनाचे चार हात झाले म्हणजे हा पोरगा निवळेल; मग वारें भरल्यासारखें रानावनांतून हिंडणें, खाण्यापिण्याची शुद्धि नसणें, रागावून निघून जाणें, असले त्याचे चाळे कमी होतील. पण लग्नाची गोष्ट काढली कीं हा चिडतो हेंहि ती पाहत होती. तेव्हां एके दिवशीं तिनें युक्ति योजिली.

नारायण जरा निवांतसा बसलेला पाहून, तिनें त्यास जवळ घेतलें, जरा आंजारलें गोंजारलें आणि त्याच्या पाठीवरून हात फिरवीत म्हणाली–

‘नारायणा, तुला कांहीं सांगायचं मनांत येतं; पण कसं सांगूं कांहीं कळत नाहीं; सांगूं कां नको सांगूं असं होतंय, सांगूं का रे?’

'सांग ना आई; मी कध्धीं तरी तुझं म्हणणं मोडलं आहे का?'

'मोडलं नाहींस रे, पण कांहीं भलतंच करून बसलास म्हणजे काय करूं? मला किनई तुझी भीति वाटते बघ; मी आपलं कांहीं म्हणायला जावं अन् तूं भलतंच करून ठेवावंस!'

'असं कधीं तरी केलंय का ग, आई?'

'अरे, कधीं तरी कां? रोजचंच चाललंय कीं, कुणाला दगड मार तर कुणाला बडव! नाहीं तर आपलं मुकंच होऊन बसावं; परवां तर त्या डोहांतच उडी टाकलीस! हें बघ बरं, माझ्या बाळाच्या डोक्याला केवढं टेंगूळ आलंय तें!' त्या आवाळू-वरून प्रेमाचा हात फिरवीत आई म्हणाली,

'मग लोकांनीं कां आम्हांला चिडवावं?'

'दुसऱ्यांनीं चिडवलं तरी आपण कां चिडावं रे? अन् त्यांत चिडण्यासारखें काय आहे? जगरहाटीसारखं माणसं बोलतात; बोलेनात तीं! लग्नाच्या अगोदर अशी थट्टा चालायचीच.'

खालीं मान करून नारायण अगदीं गप्प बसला. प्रेमानें हनुवटीला हात लावून त्याचें तोंड आपल्याकडे वळवीत आई म्हणाली, 'हें बघ, नारोबा, माझी म्हातारीची आतां एक इच्छा आहे, तेवढी पुरी करशील का बाबा? माझं ऐकशील का एवढं?'

'तुझ्या आज्ञेपरता काय आहे? आई! कधीं तरी तुझं म्हणणं मोडलंय का मी? "न मातुः परदैवतम्।" म्हणतातच सगळे!'

'अरे, म्हणतात सगळे, पण करतंय कोण? तूं ऐकशील कां माझं, बाबा?'

'ऐकेन, आई! सांग लवकर.'

'दुसरं कांऽऽहीं नाहीं! लग्नाची गोष्ट काढली कीं तूं रागावतोस, रुसतोस, तसं कांहीं करूं नको रे, राजा! अंतरपाट धरीपर्यंत लग्न नको असं म्हणूं नकोस; माझी शपथ आहे तुला. तुझ्या डोक्यावर एकदां मंगलाक्षता पडलेल्या मीं पाहिल्या कीं झालं काम माझं. एवढं ऐकशील ना?'

'होय, होय, आई' मुलानें तत्काळ उत्तर दिलें आणि गेला निघून पांखरासारखा भुर्रकन्–आनंदानें उड्या मारीत-टाळ्या पिटीत! नारायणानें लग्नाला रुकार दिला एकदांचा अशा कल्पनेनें मनावरचें ओझें हलकें झालेंसें वाटून आई अगदीं निश्चित झाली. पण 'इंद्र'-पदाऐवजीं आपण निद्रा-पद मागितलें हें त्या भोळ्या मातेच्या ध्यानीं त्या वेळीं आलें नाहीं. नारायणाच्या टाळ्यांचा अर्थ त्या बिचारीला कसा समजणार ? लग्नास त्याची संमति मिळाली अशा आनंदांत वधूच्या शोधास ती लागली. मुलाचा होकार जसा पटकन् मिळाला, तसेंच लग्नही चटकन उरकावें असें तिच्या मनानें घेतलें. या प्रसंगानंतर नारायणाचा अवखळपणा व चिडाचिडी मात्र बंद झाली.

नंतर नारायणाकरितां वधू पाहण्याची गोष्ट राणूबाईंनी वडील मुलाजवळ काढली, तेव्हां त्यांनीं नारायणाच्या पूर्वचरित्राचें स्मरण देऊन सांगितलें कीं, तुम्ही नारायणाच्या लग्नाचा विचारहि मनांत आणूं नका, त्या भानगडींत पडाल तर तो हातचा जाईल. पण आईची तळमळ ती! आणि नारायणानें वचन (?) दिलेलें! तिला कोठें गप्प बसवतें आहे ? तिनें आपल्या भावाची–भानजीबुवा बोदलापुरीकरांचीच मुलगी निश्चित केली. लग्न वधुगृहीं म्हणजे आसनगांवीं व्हावयाचें ठरलें. लग्नसोहळ्याच्या सामग्रीची जुळवाजुळव होऊं लागली. 'लग्नविचारणा न पुसतां मांडली । समर्थेहि मौन्य मुद्रा धरिली ॥' श्रेष्ठांनीं मधुन मधुन आईला सुचवावें कीं, अशानें नारायण हातचा निघून जाण्याचा संभव आहे. मग मागाहून दुःख व पश्चात्ताप करण्याची पाळी येईल. 'पण याला काय समजतं ? नारायणानें लग्नाचा रुकार मला दिलाय, माझी शपथ त्याला घातली आहे,' अशा कल्पनेनें माता आपल्याच नादांत गर्क होती. समारंभानें वाजत गाजत सगळें वऱ्हाड जांबहून आसनगांवीं गेलें, सीमांतपूजन, देवकप्रतिष्ठा, रुखवत, हळदी इत्यादि प्राथमिक विधि यथापद्धति होऊं लागले. ते होत असतांच

मधून मधून श्रेष्ठ व समर्थ यांची नजरानजर होतांच उभयतांचें हांसरें तोंड होई.

लग्नाचा मुहूर्त श. १५४२ च्या मार्गशीर्ष व. दशमी किंवा एकादशीचा असावा. कारण, पुढें माघ शु. स. ७ टाकळी येथें पुरश्चरणास आरंभ झाला असें वांकेनिसी टिपण व बखर यांत म्हटलें आहे. तसाच तो रात्रीचा सप्त घटीचा असावा, असें श्रीसमर्थप्रताप व तंजावरकर भीमस्वामीकृत चरित्र (दोन जुनीं चरित्रें यांतील) यांजवरून दिसतें. भीमस्वामी म्हणतात--

नवरी निधान। पाहोनिया बंधुजन। समारंभें निघोन। मुहूर्तेंसी जाऊन। केलें विधिविधान। देवदेवक स्थापन। सप्त घटिकेचें लग्न।

मुहूर्त समय आला, लग्नमंडपांत गर्दी उसळली, वरास बोहल्यावर आणिलें, वधूहि पुढें येऊन उभी राहिली, अंतःपट धरिला गेला आणि

ब्रह्मनिष्ठ ब्राह्मण। वरा वदती अनुसंधान। अंत्रपटीं असो नयन। मंगळाष्टकें निवेदन। करितां म्हणती सावधान।

'सावधान! शुभमंगल सावधान!' हे शब्द कानीं आले, मस्तकीं अक्षता पडल्या आणि नारायणानें विचारिलें 'म्हणजे काय हो'? मेहुणा अथवा उपाध्याय, कोणी तरी शेजारीं उभे होते, त्यांनीं विनोद केला "आतां सवा मणाची बेडी पडत आहे पायांत; सावध व्हा सावध!" असें म्हणताहेत हे सगळे.

नारायणानें मनांत म्हटलें 'मी तर पहिल्यापासूनच सावध आहे आणि आतां मातुःश्रीच्या शपथेंतूनहि पूर्ण मोकळा झालों!'

तेव्हां स्वामी अंतःकर्ण। उठे जावें येथून। सारासार विचारून। तेंचि संधि साधून। फडकले तेथून। विप्र म्हणती ॐ पुण्य। वरावीण विलक्षण। सर्व सभा होय म्लान दीन रे ॥ ६ ॥

दोन जुनी चरित्रें. पा. १७५

अंधारी रात्र, मंडपांत गर्दी झालेली, मंदमंद जळणारे पूर्वीचे ते पलिते आणि नारायणानें एकदम उसळी घेऊन झुकांडी दिली!

इतक्या वेगानें तो तेथून निसटला कीं, काय झालें हें बोहल्या-शेजारच्या माणसांनाहि लवकर उमजलें नाहीं ! प्रतापकार सांगतात—

समर्थांसी फावली मध्यरात्रीं । समर्थ कोण्हासी दिसतील चर्मनेत्रीं । समस्त लोक हाहाकारिती वक्त्रीं । सकळ साधुसंत म्हणती धन्य धन्य ।।४०।।समर्थांमागें लोक धांवले मध्यरात्रीं । समर्थ कोणासी न दिसती चर्मनेत्रीं । पंचक्रोशीं गोदावरीपात्रीं । शुद्ध हरिभक्ति[1] हरिद्रागात्रीं[2] प्रवेशले ।।४८।।समर्थांचें लागलें शुद्ध हरिद्राआंग । विमळ गोदावरीचें जालें दिव्यांग । आपुले हृदय-ऱ्हदीं ठेवूं म्हणे समर्थांग[3] । श्रीरामरायें कृपापांगें वोढिलें ।। ४९ ।।

तिकडे लग्नमंडपांत केवढा गोंधळ उडाला ! राणूबाई आक्रोश करूं लागल्या; श्रेष्ठ बंधु गंगाधरहि श्रमी झाले.

ज्येष्ठ वैराग्यभाग्यवाटा अनुजें घेतला । कनिष्ठ प्रपंच अग्रजा दिधला । म्हणोनि श्रेष्ठीं शोक मांडिला । स्वामी कनिष्ठ प्रपंच तुमचा नोहे ।। ४५ ।। गृहस्थाश्रमीं ऐशा मूर्ति । निर्माण होती पुण्यकीर्ति । पुत्रपौत्राभिवृद्धि सत्कीर्ति । गंगाधरस्वामि विस्तारिजे तुम्ही ।। ४६ ।। म्हणोनि समाधान केलें संतसज्जनीं । आशीर्वाद दिधले द्विजजनीं । . . . . ।। स. प्र. २

मोठ्या भावाला मोठा वांटा आणि लहानास लहान वांटा किंवा उभयतांस समान अशी वांटणी करण्याची नेहमींची रीत असतें; पण इथें धाकट्यानेंच वैराग्यभाग्याचा सगळा मोठा वांटा पळवला अन् माझ्या वांट्यास कनिष्ठ प्रपंच आला ! प्राक्तन आपलें!' असे शोकोद्गार गंगाधर विव्हलतेनें काढूं लागले; तेव्हां कांहीं सज्जन त्यांची समजूत घालूं लागले— 'तुमचा प्रपंच कनिष्ठ नाहीं, तुमच्यासारख्या पुण्यमूर्ति ज्या प्रपंचांत नांदत आहेत, त्याला

---

१ हरिभक्तीनें २ लग्नांतली हळद अंगास लागलेली असतांच गोदावरींत उतरले. ३ डोहरूपी आपल्या हृदयांत समर्थांस ठेवावें असें गंगेच्या मनांत आलें होतें, पण श्रीरामरायानीं आपल्या कृपेच्या जोरावर त्यांना बाहेर काढिलें.

कनिष्ठ कोण म्हणेल? असंच सन्मार्गानं वागा, तुमची कीर्ती होईल, उद्यां चार मुलेंबाळें तुम्हाला होतील. नारायणहि लवकरच येईल; जातो कुठें? रामराय सगळा आनंद करील बरं! असं दुःख करीत बसूं नका आतां.'

अशा प्रकारें श्रेष्ठांचें समाधान करून पाहुणे मंडळी गेली. मुलीचेंहि लग्न दुसऱ्या वराशीं लागलें. पण तें आईचें आंतडें! ऐन लग्नांतून बोहल्यावरचा मुलगा असा अचानक निघून गेल्यानें तें किती विदीर्ण झालें असेल! तिनें कसा आकांत केला असेल? जड शब्दांनीं तें वर्णन करणें शक्य नाहीं. त्या अंतःकरणांतील स्थिति वर्णन करण्यास वाणी अपुरी पडते. 'ते पोटागी वेगळीच' असें जें म्हटलें आहे तें अक्षरशः खरें आहे. 'नारायणाला मी शपथ घातली अन् तो कसा हो गेला?' कोण या प्रश्नाचें उत्तर देणार? घेतलेल्या शपथेप्रमाणें मस्तकीं अक्षता पडेपर्यंत तो गप्प बसला नि शपथेची मर्यादा संपल्यावर, अक्षरशः शपथ पाळून तो निघून गेला! हें उत्तर आहे. पण त्या शोकविव्हल मातेला हें सांगावें कोणी? 'नारायणा, कुठें असशील? कसा रे एवढा निष्ठुर झालास? कसं रे मला भोळीला फसवलंस? मला कधीं भेटशील रे? आई जगदंबे, माझं बाळ मला एकदां भेटव ग! मी नाहीं त्याला आतां लग्न कर म्हणायची.' अशा असंख्य शोकाकुल विचारांनीं तिला सारखे दुःखाचे कढ यायचे. त्यामुळें तिच्या डोळ्यांचें पाणी म्हणून कधीं खळलें नाहीं. आईचें समाधान करण्याची श्रेष्ठांनीं आपल्याकडून पराकाष्ठा केली. नारायणा-संबंधानें पूर्वीं झालेलीं वरदानें, त्याच्या अद्भुत लीला, जें जें त्यांना आठवें त्याचें त्यांनीं आईला स्मरण द्यावें आणि म्हणावें 'त्याजवर श्रीरामकृपा पूर्ण आहे; तो महत्कार्य संपादून आपल्या दर्शनास लवकरच येईल.' तेवढा वेळ आईला जरा बरें वाटावें. परंतु अशा दुःखाचा विरंगुळा कालावधीनेंच हलकें हलकें पडत असतो; तथापि रडून रडून डोळे मात्र गेले विचारीचे!

जांबेस असा प्रकार चालला होता. आणि तिकडे ......
समर्थ लागले गोदावरीच्या दक्षिण तीरीं । महावैराग्यप्रताप तीव्रतर अंतरीं । केवळ स्मशानवासी सर्वेश्वर अवतारी । गोदातीरीं प्रेत जळतां देखिलें ।।५०।। समर्थासी आधींच आंगीं बाणलें तीव्रतर वैराग्य । विशेष स्मशान देखिलें ईश्वरभाग्य । धन्य मृत प्राणी तो समर्थसंसर्गें सभाग्य । मुक्तीस गेला निःसंशय ।।५१।।
स. प्र. २.

गंगेच्या डोहांतून समर्थ श्रीकृपेनें सुखरूप दक्षिणतीरीं बाहेर पडले; तेथें स्मशानांत एक प्रेत जळत असलेलें त्यांना दिसलें. मग काय विचारतां? त्यांच्या वैराग्यवृत्तीस अधिकच बहर आला. आपलें वैराग्य प्रखर व्हावें अशी इच्छा असेल त्यानें 'मरणाचें स्मरण' राहण्यासाठीं स्मशानदर्शन नित्य घेत असावें असें कित्येक अनुभवी संत म्हणत असतात, तो योग भगवदिच्छेनें समर्थांस अनायासेंच आला! त्यांच्या वैराग्यांत आतां काय अधिक भर पडावयाची होती? तें शिगेला पोहोंचलें होतें. अवतारादिकांकडून जें पूर्वीं घडलें नाहीं तें या बारा वर्षांच्या बाळानें आचरून दाखविलें होतें!

ऐसें कोठें नाहीं हो वर्तलें । पूर्वीं अवतारादिकांसी न जालें । मायामोहिनीनें ब्रह्मादिकां भुलविलें । नाना पुराणें आम्हीं ऐकिलीं ।।४१।। समर्थदेवें ख्याति केली । सांगायासी ऐकायासी गोष्टी जाली । मूळ हनुमानमूर्ति प्रत्यया आली । समर्थमाता बोलली तें जालें ।।४२।। स. प्र. २.

श्रीसमर्थांच्या पावन संसर्गानें तो प्रेतप्राणी उद्धरून गेला. प्रतापकार गिरिधर सांगतात:— लग्नांतून फडकून निघालेले हे कलियुगांतील मारुतीराय श्रीरामदर्शनार्थ जनस्थान—पंचवटीच्या मार्गास लागले आहेत असें पाहून त्यांच्या सत्कारार्थ अष्टदिग्पाळादिक देव निरनिराळ्या रूपांनीं तेथें प्रगट झाले; सर्वांनीं समर्थांचें पूजनस्तवनादि करून म्हटलें—

तुम्ही श्रीरामसमर्थअवतार । हनुमानरूपें सर्वेश्वर । तुम्हांसी त्रेतायुगीं सामर्थ्यें लाधले वर । कलियुगीं कार्याकारण ऐका जी ॥६९॥ सीत उष्णवात पर्जन्यवन्हि । भयरोगपीडादैन्य शस्त्रपात न करी कोण्ही । नाना अमृतफळें प्राप्त विपिनविपिनीं । आमची दिग्पाळसेवा चरणीं असो ॥७०॥ स. प्र. २

इंद्रादि दिग्पाळ असतील का आणि हा सर्व प्रकार खरा असेल काय, इत्यादि प्रकारची भवति न भवति बुद्धिवादी चिकित्सकांनीं वाटेल तितकी करावी; त्यांत कांहींहि लभ्यांश व्हावयाचा नाहीं. बुद्धीच्या आटोक्याच्या बाहेर (यो बुद्धेः परतस्तु सः) जे प्रकार भगवत्कृपेच्या सामर्थ्यानें घडतात त्यांची सत्यासत्यता अनभिज्ञ बुद्धि कशी पारखणार? बंगालचे श्रीरामकृष्ण परमहंस, महाराष्ट्रांतील प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती (टेंभेस्वामी) अथवा वऱ्हाडचे श्रीगुलाबराव महाराज किंवा मद्रासकडील श्री रमणमहर्षि यांच्या चरित्रांतून असे अनेक दैवी चमत्कार घडल्याचें वर्णन आहे. त्या चमत्कारांचा अनुभव आलेलेहि कित्येक जण अद्यापि विद्यमान असतील. म्हणून माझ्या बुद्धीला पटेल तेवढेंच मी खरें मानीन हें म्हणणें माझ्या खुराड्यांतून दिसेल तेवढेंच काय तें जग खरें, बाकीचें खोटें, असें म्हणण्यासारखेंच अप्रयोजक आहे. ज्याला आपला शुद्ध भाव जतन करावयाचा असेल त्यानें अशा बहिर्मुखांच्या नादीं लागूं नये.

लग्नसोहळ्यांतून नेसत्यापांघरत्या दोन वस्त्रांनिशीं बाहेर पडलेल्या या मुलाची मार्गांत कशी व्यवस्था झाली असेल, घर सुटून रान पाठीशीं घेतल्यावर विदेशांत त्याला कोठें आसरा मिळाला असेल, त्याच्या खाण्यापिण्याची वास्तपुस्त कोणी केली असेल कीं नाहीं, त्याला किती कष्ट पडले असतील अित्यादि शंका कुशंका सामान्य माणसाच्या मनांत येतील. पण श्रीरामकृपेचा अनुभव घेतलेले समर्थ सांगतात—

राम भेटे ज्यासी तो नव्हे विदेशी । सर्व देश त्यासी आपुलेचि।। आपुलेचि देश या रामाकरितां । होय सार्थकता जेथें तेथें ।। जेथें तेथें राम देखतां विश्राम । संसारींचा श्रम आठवेना ।।

हे त्यांचे स्वानुभवाचे उद्‌गार खोटे मानण्याइतका अधम कोण असेल? आणि ज्यांचे हातीं श्रीरामप्रभूनीं नारायणास अनुग्रहप्रसंगीं निरविलें ते रामभक्तांचे 'साहाकारी' मारुतीराय त्यांचे पाठीवर होतेच ना ! अशा दृढ निष्ठेच्या भक्तवर्यासि श्रम कोठले नि अडचण कसली ? त्यांच्या स्मरणानें तुमचीं आमचीं संकटें पळून जावयाचीं.

याच प्रसंगाचें वृत्त तंजावरकर भीमस्वामींनीं पुढीलप्रमाणें सांगितलें आहे :—

कडका-स्वामी विरक्त । प्रिये न होतां सक्त। संग सोडूनि पंथ। धरियेला अद्‌भुत। ब्रह्मारण्य अद्वैत। निसंगें सेवीत । अहोरात्रीं दीस सात। अन्नपान शयन स्मरण। नाहीं कांहीं चित्तांत। पंचगंगा नदीप्रांत। पावोनियां अकस्मात। उडी घाली तीरांत । तीरवासी हा हा भूत । म्हणती बुडाला निश्चित। परी स्वामी कल्पातीत। पूर्ण ब्रह्म साक्षात। पैलपारा त्वरित । येतां भेटी सीताकांत। लक्ष्मणसंयुक्त। कोटिसूर्यप्रकाशित । ऐसा तेजें उद्दीत। सुधापाना त्वरित। देउनी केला एकांत ।स्तवन पूजन घेउनि आपण। अंतर्धामीं जाला स्वयें गुप्त रे ।।

अभंग। एकांती संवाद परस्परें जाला । घोष उमटला जय जयकारें ।।३०।। श्रीरामदासस्वामी चालिले तेथुनी। पाहिली मेदिनी सर्वत्रहि ।।३१।।


सध्यां आपण पाहतोंच कीं, एकाच घटनेचीं वेगवेगळीं—प्रसंगीं परस्परविरुद्ध सुद्धां—वर्णनें प्रसिद्ध होत असतात. आणि हें तर 'आपुली स्थिति अनुमाना। येवोंचि नेदी।' अशा प्रकारच्या सखोल वृत्तीच्या महापुरुषाचें एकाकी प्रवासांतील वर्णन! तो प्रसंग घडल्यानंतर पुढें कितीतरी वर्षांनीं चरित्रकारांनीं जें ऐकीव वृत लिहून ठेविलें, तें आज आपल्यापुढें आहे. ज्याला जें कळलें

तें त्यानें सत्य म्हणूनच लिहिलें. एकच प्रसंग भिन्न चरित्रकारांनीं भिन्न भिन्न प्रकारें लिहून ठेविला. तेवढ्यावरून स्वानुभव दिनकरकर्ते दिनकरस्वामी, बीडचे गिरिधर किंवा तंजावरचे भीमस्वामी यांसारखे चरित्रकार सत्पुरुष लबाड ठरत नाहींत किंवा त्यामुळें वाचकांनींहि बिचकण्याचें कारण नाहीं. ज्यानें त्यानें आपल्या माहितीप्रमाणें सत्य वाटलें तेंच लिहून ठेविलें. वाचकांनीं आपल्या भावानुसार त्यांतील ग्राह्यांश घ्यावा हेंच श्रेयस्कर. तीनशें वर्षांपूर्वीं घडलेल्या प्रसंगांची सत्यासत्यता आतां कशी निश्चित करतां येईल? अस्तु. आपणांस मुख्यतः बखरीच्या मागोव्यानें जावयाचें आहे.

गंगेच्या कांठाकांठानें समर्थ चालले ते पंचवटीस जाऊन पोहोंचले 'अक्रा दिवसेंची हो जाली दर्शनसिद्धी।' (२-७५) असें प्रताप-कारांनीं म्हटलें आहे. त्याचा अर्थ अकरा दिवसांत ते पंचवटीस पोहोंचले असा केला, तर पुढील २०।२५ दिवसांचा अवधि अनु-ष्ठानास योग्य अशा निवांत स्थानाचा शोध व अनुष्ठानास आव-श्यक असणाऱ्या सर्व योजना जमविण्यास त्यांस सांपडला असें मानतां येईल. पंचवटीस रात्रींच्या निवांतवेळीं समर्थ देवालयाच्या द्वाराशीं जाऊन उभे राहिले, तोंच बंद असलेलीं द्वारें आपोआप खोललीं गेलीं आणि रामाच्या या लाडक्या भक्ताचा प्रवेश गाभाऱ्यांत झाला.

.....श्रीरामस्वामी देखिले दिव्य द्विभुज। श्रीरामस्वामी करीं धनुर्बाण तेजःपुंज.....॥७६॥ आंगीं भूषणें शतसहस्र भानु। करणीं कुंडलें लक्ष लक्ष भानु। मस्तकीं मुकुट किरीटीं कोटि भानु। अनंत भानु अंगप्रभा ॥७७॥ ..... दिव्य पादुका श्रीचरणकमळीं। रमा वामांगीं जनकबाळी। भरत शत्रुघ्न शेष जवळी। श्रीहनुमानस्वामि अभिवंदिती ॥८०॥ स. प्र.२.

असें दिव्य दर्शन होतांच— 'समर्थे मिठी घातली श्रीचरण-कमळीं। एक मुहूर्त मानसपूजा संपूर्ण केली। उठोनि सप्रेमें डोळां जंव देखिली। तंव ब्रह्मगोळीं परिपूर्ण श्रीराम पूजिला॥८२॥'



(नाशिक) पंचवटींतील श्रीरामाचें देवालय.

श्रीराम पूजूनि पूजाहेतु उरला। आकल्प पूजनाचा संकल्प केला। आत्माराम अंतरसाक्षी लाभला। समर्थ कांहीं स्तवनीं प्रवर्तले ॥८३॥
स. प्र. २

समर्थांनीं श्रीरामाची काय स्तुति केली असेल बरें?

**अंकित मी तूझें दीन। नको करूं पराधेन। न पाहे माझें निर्वाण। रे रामा ॥ध्रु०॥** मी तूझें पाडस। वरी पडिले भवपाश। धीर धरवेल कैसा। रे रामा ॥१॥ ... जरि न वोळे घन। चातक न ठेवी प्राण। तेंवि तूं अंतर जाण। रे रामा ॥३॥ कूर्मी अवलोकन। न करितां बाळा मरण। तैसा तूं निश्चयें जाण। रे रामा ॥४॥ **निजब्रीद साच करीं। दीनासि अंगिकारीं। रामदास** चरण धरी। **रे रामा ॥५॥** — स. गा. १२७०

राजीवनयना रामा योगीजनमनविश्रामा। साधुजनपूर्णकामा चाल दयाळा रामा ॥ध्रु०॥ धीर उदार सुंदरा सगुणा गुणगंभीरा। चाल रे करुणाकरा वाट पाहतों दातारा ॥१॥ **देव सोडविले त्रिदश मजलागीं कां उदास।** नको कठिण मानस वाट पाहे **रामदास** ॥२॥
स. गाथा १२८३

रामा निदान पाहसी किती रे। धांव धांव गा सीतापती। तुजवेगळी न घडे गती। नाम तारक वेद बोलती रे ॥ध्रु०॥ जळीं पाषाण तारिले वाड। काय त्याहुनि तुज मी जड। माझें जिविचे पुरवी कोड। मनें घेतला विषयीं मोड रे ॥१॥ तुझे भेटीचें आरत मोठें। तुजवेगळें न गमे कोठें। **तुझें बालक दीन धाकुटें रे** ॥२॥ वृत्ति गुंतली तुजपाशीं। जैशी गुळासि जडली माशी। देहीं असोन गुप्त कां होसी। **दास** उदास देहभावासी रे ॥३॥
— स. गा. १२८४

रामा, तुझ्या स्वामीपणें। मानी ब्रह्मांड ठेंगणें। तुजविण कोण-जाणे। अंतर आमुचें रामा ॥१॥ तुजवीण मजमाया। नाहीं नाहीं रामराया। आह्मां अनाथां कासया। उपेक्षिसी ॥२॥ तुज समुदाय दासांचा। परी आह्मां स्वामी कैंचा। तुजसाठीं जिवलगांचा। संग

सोडिला देवा ।।३।। सगुण रघुनाथ मुद्दल । माझें हेंचि भांडवल। दास करुनि पैलपार । टाकि या भवाचे ।।४।। स. गाथा ३४९.

ऐसें श्रीरामस्तवन समर्थें केलें । श्रीरामसमर्थें कृपावलोकनें आलिंगन दिधलें । अवघें राममय ब्रह्मांड जालें । श्रीराम काय अनुवादती ।।९०।। आतां धर्मस्थापना करावी तुह्मी । सेव्यसेवक भावें ऐक्य तुम्ही आम्ही । सकळ साधुसंतसंकल्प कर्मभूमीं । सिद्धीस नेईन निर्धारिं ।।९२।। मज वैकुंठींहूनि जालें येणें । तुमच्या अनुग्रहा कारणें । सेव्यसेवकभावें हें बोलणें । एरव्हीं आत्माराम मी परिपूर्ण ।।९३।। स. प्र. २.

याप्रकारें सद्‌गुरू श्रीरामाचा कृपाप्रसाद संपादन करून समर्थ पुरश्चरणाच्या योजनेस लागले. घरून निघतांना प्रखर वैराग्य, निर्मल भाव, ध्येयनिष्ठा, आणि खडतर प्रसंगांतहि टिकेल असें शरीरसामर्थ्य एवढी शिदोरी समर्थांनीं या प्रवासांत बरोबर घेतली होती.

## १४ सर्ग–मेरुस्वामीकृत वर्णन

मायागोदावरीचे तीरीं । समर्थाची वास्तव्य नगरी । समर्थाच्या साक्षात्कारीं । वसती होय ।।४१।। इंद्रियें देऊनि आवरी । इंद्रियातीत सुखी करी । विख्यात नामें गोदावरी। मूळमाया ।।४२।। संभवक्षेत्र[1] अभिधान । 'भजा म्हणिजे परतोन[2] । जांभ त्याचि प्रतीतिकडून । भक्तीचें प्रमेय ।।४३।। समर्थजनकाची विख्याति । अनिर्वाच्य ब्रह्मस्थिति। सगुणसाक्षात्कार मूर्ति । सूर्यउपासना ।।४६।। खडतर तपश्चर्याआश्रम । सूर्यआराधन परम । भानु-उपासक नाम । सूरोपंत ऐसें ।।४३।। समर्थजननी अरुष[3] केवळ । सात्त्विक भक्तीची मूस निर्मळ । निर्विकार प्रेमें जन्ममूळ । प्रसवली ।।४८।। सूर्य आभारला भक्तीनें । गृहासि आला निजप्रतीतीनें । भोजनसमयीं द्विजाकृतीनें। देखिला समर्थजनकें ।।५१।। आतिथ्य

१ जन्मस्थानाचें नांव. २ उलट, ३ भाबडी, भोळी.

करावयासि सद्भावें । बैसऊनि अर्चिला निजजीवें । तेणें तोषोनि सद्भावें । प्रसाद दिधला ॥५२॥ रामसीता लक्ष्मण । दिव्य विग्रह लावण्यधन । मूर्तित्रय अधिष्ठान । म्हणे यांसि आर्जवीं ॥५३॥ सूर्यप्रतिमावांचूनि । मज पाहणेंचि नाहीं नयनीं । ब्राह्मण म्हणे सूर्यचिविद्यमानी । मूर्तित्रय ॥५४॥ स्वप्रकाशभानुप्रभा । लक्ष्मण ज्ञानघन गाभा । रामचित्सूर्य उभा । प्रत्यक्ष पहा दृष्टीसी ॥५५॥ विशेष तूं आग्रह न करी । मूर्तित्रय साक्षात्कारी । वंशपरंपरा उद्धरीं । याचि देवतार्चनें ॥५६॥ चिदादित्य विग्रह तीनी । द्विजें दिधले सन्मानूनि । पंक्तीसि भोजन करूनि । जातां अदृश्य जाला ॥५७॥ सप्रेमें अति विस्मित । सद्गदित जाले सूर्योपंत । दिन[1] अतिक्रमें देहांत । समयो आला ॥५९॥ पाचारूनियां पुत्रांसी । निरविलें देवतार्चन तयांसीं । परंपरा निश्चयेंसी । अर्जवा आराध्य हें ॥६०॥ तारकब्रह्में[2] अनुग्रहिलें । ज्येष्ठ पुत्रासि गौरविलें । समर्थासि तयेवेळे । कुर्वाळिलें सहज ॥६१॥ तें देवतार्चन श्रेष्ठापासीं । अधिष्ठान गोदातीरवासी । समर्थअग्रज-परमार्थासी । अधिष्ठान जालें ॥६२॥ त्यागूनि निजवृत्तीचें कुलकरण । श्रेष्ठें वाढविलें रामभजन । अनुग्रहें क्रमें तारिलें जन । ते श्रेष्ठ परंपरा ॥६३॥ पिता जाला ब्रह्मार्पण । अग्रज परमार्थसुलीन । प्रपंचवृत्तीस कारण । कोणीच नसे ॥६४॥ समर्थ धाकुटे परि दारुण । आंगीं विरक्तीचें पूर्ण भरण । नेणती क्षुधातृषादि भ्रमण सर्वदा वनीं ॥६५॥ सदयहृदय समर्थमायेनें । शोधूनि आणावें साक्षेपानें । महा अत्यंत प्रीतीनें । जेऊं घालावें समर्था ॥६८॥ अग्रजाची जाया निर्लोभ । विरक्तीसि कारण करी अक्षोभ । समर्थजननीस सलोभ । रक्षण सेतासी पाठवी ॥६९॥ केवळ अरुष ते म्हातारी । शेतीं असतां दिवसभरी । कोणी येके अवसरीं आश्चर्य जालें ॥७०॥ विहिरीमाजीं उदकासि गेली । हातिंची कासंडी पडिली । दुःखें आक्रंदों लागली । घरिच्या भयें ॥७१॥

---

१ कांहीं दिवसांनंतर. २ त्रयोदशाक्षरी मंत्र उपदेशिला.

रात्रि जाली भयंकर। ऐकोनियां तो करुणास्वर। धांवोनि आला रघुवीर। कृषीवलाच्या वेषें॥ ७२ ॥ म्हणे काय जालें कां आक्रंदिसी। बोले बा रे तूं कोठोनि आलासी। या आकांतीं पावलासी। माजें आयुष्य हो तुजला॥ ७३ ॥ ऐकोनि हांसला संतोषें। ह्मणे चाल गृहासी विशेषें। वृद्धा वदे जातां मंदिरासी रोषें। प्राणचि घेईल माझा॥ ७४ ॥ पात्र विहिरींत पडलें। तें जंव हातासि नाहीं आलें। तंवरि गृहासि नव जाणें घडलें। येथें अनुभवीन ॥ ७५ ॥ न उतरतां विहिरींत। पात्र आणून दिलें त्वरित। तेणें तोषली अत्यंत। परि महिमा नेणे॥ ७६ ॥ करीं धरूनि चालविलें। निमिषांत गृहासि आणिलें। आंगणामाजीं सोडिलें। नेणतांचि तियेसी॥ ७७ ॥ पात्र सांपडलें गृहासि आलें। याचि सुखीं मन राहिलें। नेणे देवें अभिनव केलें। येवढी अरुष[1]॥ ७८ ॥ या प्रकारें सगुणसाक्षात्कारीं। समर्थजननी निर्विकारी। वृत्तीसि कारण संसारीं। कोणीच नसे॥ ८१ ॥ यास्तव श्रेष्ठें आस वाढवून। प्रपंचमूळें समर्थाचें मन। अविद्या नोवरी पाहून। निश्चय केला॥ ८२ ॥ महामोहाच्या अक्षता। भ्रमें भारूनि सकामता। घालोनि नोवऱ्याच्या माथां। वश्य करिजे॥ ८९ ॥ त्या अक्षता पडों नेदितां। चुकवोनि जाय तो तत्वतां। वेद वर्णिती त्याची सत्ता। चहूं पुरुषार्थें॥९० ॥ समर्थ महापुरुषार्थी वर। अविद्येसी वेढा लाविलें दुर्धर। अज्ञानपतनकाळीं अगोचर। दीक्षा दाखविली॥ ९१ ॥ नोवरा न दिसे सर्वांपरी। अक्षता पडती भूमीवरी। चटपट जन अभ्यंतरीं। लागली चुरचुर॥ ९२॥ ह्मणती काय जाला वर। पाहाती घरोघरीं नारी नर। वरें घेतलें दुस्तर। ब्रह्मारण्य तें॥ ९६ ॥ निज शोधें धांव घालुनी। नद्या पर्वत उल्लंघूनी। पवाडला एकांत वनीं। विश्रांतीच्या॥ ९६ ॥ ब्रह्मचर्य आंगीं उत्कट। वरी अद्भुत दशा पिसाट। एकांत वनीं निकट। गांठीं हृदयस्थेसीं॥ ९७ ॥ द्वादश वरुषें अति विरक्ति। एकांत वनीं

१ भावडी

वनचर संगती । महा अद्‌भुत वेध मारुती । वानरमेळीं दर्शन ॥ ९८ ॥ अप्रांत[1] वनाचा पैसार । नसेचि जनाचा संचार । तेथें महारुद्रसाक्षात्कार । समर्थांसी ॥ ९९ ॥ कृतत्रेतद्वापारीं । जाले अद्‌भुत अवतारी । परी या समर्थाची सरी । कोणी न पवे ॥ १०५ कलियुगीं प्रथम चरण । जालें समर्थाचें अवतरण । प्रतीत-उत्सवें[2] असाधारण । वर्तविलें कृतयुग ॥ १०६ ॥ रामसोहळा १–६

श्रीसमर्थांच्या वेळींच त्यांच्या कथावार्ता निरनिराळ्या प्रकारें कशा पसरत होत्या त्याचें हें एक उदाहरणच दिलें आहे. दिनकर हे समर्थशिष्य, मेरूस्वामी हे प्रशिष्य आणि गिरिधर हे शिष्याचे प्रशिष्य; पण तिघांसही निरनिराळ्या काळीं व स्थळीं समर्थांचा प्रत्यक्ष सहवास घडला होता; तिघांना समर्थ-समकालीन म्हणण्यास हरकत नाहीं. असें असतां, एकाच प्रसंगाची माहिती तिघेजण वेगवेगळ्या तीन प्रकारें सांगतात. हे तिघे लेखक आजच्या सुधारलेल्या ( ? ) युगाच्या दृष्टीनें २५० वर्षांपूर्वींच्या मागासलेल्या काळांतले; ज्याला जें कळलें तें त्यानें भावार्थानें फारशी चिकित्सा न करतां सत्य मानून लिहिलें. अशा लेखकांच्या कथनांत फरक पडणें स्वाभाविक आहे. परंतु सांप्रतचे वृत्तपत्रांचे बातमीदार व इतिहासलेखक हे सगळे चिकित्सक सत्यान्वेषी असतां, त्यांच्या वर्णनांत भिन्नत्व, प्रसंगीं परस्परविरुद्धत्व आढळतें, तेव्हां खरें काय व कसें समजावें? आणि हें तर ‘ आपली स्थिती अनुमाना येवोंच नेदी ’ अशा सखोल वृत्तीनें व एकाकी वावरणाऱ्या योगीश्वरांच्या चरित्रांतील प्रसंग; ते स्वत: सांगायचे नाहींत व त्यांना विचारण्याचें धैर्य कोणास व्हायचें नाहीं. अशा परिस्थितींत ज्याला जें कळलें तें त्यानें स्वत:पुरतें खरें खोटें अजमावून खरें वाटलें तेंच लिहिलें. त्यांतील सत्यासत्याचा निर्णय आज कसा लागणार ?

---

१ अमर्याद २ प्रत्ययाच्या आनंदानें

श्रीराम समर्थ

# पुरश्चरण काण्ड

## ( शके १५४२ ते १५५४ )

## १ सर्ग–तपश्चर्येस आरंभ

तपोमूलमिदं सर्वं दैवमानुषकं सुखम् ।। २३४ ।।
यद्दुस्तरं यद्दुरापं यद्दुर्गं यच्च दुष्करम्
सर्वं तु तपसा साध्यं तपो हि दुरतिक्रमम् ।।२३८।।मनु.११

भावार्थ–देवांचें व मनुष्यांचें जें जें सुख त्या सगळ्यांचें मूळ तप आहे. २३४. जें तरून जाण्यास कठीण, जें मिळण्यास कठीण जें जाणण्यास किंवा जाण्यास कठीण, आणि जें करण्यास कठीण तें सगळें तपानें साध्य होतें. अशक्य वाटणाऱ्या गोष्टीहि तपानें सुगम होतात. म्हणूनच तपाला दुरतिक्रम 'दुर्लंघन शक्ति' असें म्हटलें आहे. २३८

या मनुवचनांस शिरोधार्य मानणाऱ्या संस्कृतींतील श्रीसमर्थांची कुलपरंपरा होय. त्यांच्या पूर्वींच्या तेवीस पिढ्यांत सगळे सदाचार-संपन्न व निष्ठावंत श्रीरामोपासक झाले. त्यांचे वडील सूर्याजीपंत यांनीं सूर्याराधनरूप तपांत चोवीस वर्षें घालविलीं आणि त्यांना स्वत:स श्रीरामप्रभूकडून मंत्रानुग्रह झालेला, अशा स्थितींत लहान-पणापासून त्यांच्या स्वत:च्या अंत:करणांत निशिदिनीं घर करून राहिलेल्या जनचिंतेच्या निरसनास्तव घर सुटल्यानंतर त्यांनीं पुरश्चरणाचा मार्ग धरावा हें स्वाभाविकच होय.

श्रीसमर्थ गृहत्याग करून व जिवलगांचा संग सोडून लग्नांतून जांबहून जे निघाले, ते सरळ (नाशिक) पंचवटीस आले आणि श्रीरामप्रभूपुढें एकान्तांत उभें राहून त्यांनीं आपली सर्व हृदयव्यथा श्रीचरणीं निवेदन केली, येथपर्यंतचा कथाभाग मागील काण्डांत झाला. यावेळीं त्यांचे वयास तेरा वर्षें पूर्ण झालीं नव्हतीं. सांप्रतचीं या

वयांतलीं मुलें साधारणतः हमरस्त्यानेंसुद्धां रात्रीं अंधारांत एकटेंदुकटें जाण्यास भीत असतात; परठिकाणीं राहण्याची पाळी आली तर लोक-वस्तीपासून दूर, जेथें मधुकरीचीहि सोय जवळपास नाहीं, अशा ठिकाणीं तीं राहणार नाहींत. पण या मुलाचें सगळेंच लोकविलक्षण! ऐन लग्नसमारंभांतून हा निसटला आणि एकाकी प्रवास करून पंचवटी गांठली; तेथेंहि लोकवस्तीच्या गलबल्यांत न राहतां पंच-वटीपासून १॥ कोस दूर असलेलें टाकळीसारखें लहानसें खेडें त्यानें गांठलें; त्या खेड्यांतहि कोणाच्या घरीं न राहतां वस्तीपासून अलग अशा एकान्तस्थळीं नदीकांठच्या गुंफेंत त्यानें आपलें आसन जमविलें आणि टाकळीची ती नंदिनी ऊर्फ नासुर्डी नदी जेथें गोदा-वरीस मिळते त्या संगमावर शके १५४२ च्या माघ शु. ७ पासून म्हणजे घर सुटल्यापासून दोन महिन्यांच्या आंत पुरश्चरणास आरंभ केला. माघ शु. ७ म्हणजे रथसप्तमी हा श्रीसमर्थचरित्रांतील मह-त्त्वाचा दिवस होय. सूर्याजीपंतास सूर्यदर्शन व वरप्रदान रथसप्तमीस झालें आणि समर्थांनीं तपश्चर्येस आरंभहि याच मितीस केला.

## २ सर्ग-पुरश्चरण कोणत्या मंत्राचें ?

श्रीसमर्थांनीं पुरश्चरण कोणत्या मंत्राचें केलें ? गायत्री मंत्राचें पुरश्चरण २४ लक्षांचें असतें. तें बारा वर्षांत संपवावयाचें, तर रोजच्या सहासातशें जपसंख्येनें कार्यभाग होतो आणि एवढ्याशा अल्पसंख्य जपासाठीं रोज ५।६ घंटे घालविण्याची आवश्यकता नाहीं. तेव्हां गायत्रीपुरश्चरणाबरोबर श्रीराममंत्राचेंहि पुरश्चरण श्रीसमर्थांनीं केलें असावें, मात्र तें तेरा कोटींचें नसावें; कारण तेरा कोटींची मर्यादा ही

नलगे आसनीं बैसावें । नलगे अन्नहि त्यागावें ।
येतां जातां धंदा करितां । जप संख्या मात्र होता ॥

अशा सवलतीनें जप करणारांसाठीं–केवळ संख्यानुसंधान ठेवणारां साठीं घातलेली आहे. 'एकांतवनीं हृदयस्थाशीं' अनुसंधान

मराठी [illegible] स्थळप्रत.

ठेवून जप करणारास तेरा कोटींचें कारण नाहीं. गायत्रीपुरश्चरण जितकें ब्राह्मणास आवश्यक, तितकेंच गुरूपदिष्ट मंत्राचेंहि अनुष्ठान शिष्यसाधकास आवश्यक आहे. म्हणून असें वाटतें कीं, गायत्री व त्रयोदशाक्षर तारकमंत्र या दोहींचेंहि पुरश्चरण श्री समर्थांनीं केलें असावें; मग त्या प्रत्येकाची संख्या कितीहि असो.

## ३ सर्ग–दिनचर्या

या बारा वर्षांतील त्यांची दिनचर्या त्यांच्या पूर्वपरंपरेस साजेशी, पण बालवयाच्या मानानें कौतुकास्पद होती. अवघें तेरा वर्षांचें वय आणि जवळ जिव्हाळ्याचें मार्गदर्शक असें कोणी वडीलधारें नाहीं; असें असतांही, या बालब्रह्मचाऱ्याचा दिनक्रम असा रेखीव होता कीं, मोठमोठ्या तपस्व्यांनींहि अनुकरण करावें. पंच पंचउषःकालीं म्हणजे पंचावन्न घटिका रात्रीस (सूर्योदयापूर्वी दोन घंटे) उठून शौचमुखमार्जनादि उरकून नंदिनी गोदावरीच्या संगमावर स्नानसंध्या उरकावी आणि सूर्योदयापासून तेथेंच कंबरे-इतक्या पाण्यांत उभें राहून गायत्रीमंत्राचा नित्य नियमित जप प्रथम करून नंतर मस्तकीं सूर्य येईपर्यंत गुरूपदिष्ट मंत्र जपावा. त्यानंतर पुनः मध्यान्ह स्नानसंध्या व ब्रह्मयज्ञ करून पंचवटीस जाऊन मधुकरी मागावी. ती भिक्षा श्रीराम प्रभूस निवेदन केल्यावर तिचे तीन भाग करून एक गाईस गोग्रास व दुसरा गंगेंतील माशांस अर्पून शेष राहिलेला तिसरा भाग, झोळी गंगेंत बुचकळून, आपण सेवन करावा. रोज ५–६ घंटे पाण्यांत उभें राहिल्यानें कंबरे-खालचें त्यांचें अंग पांढरें दिसत असे आणि मासे डसल्यानें झालेल्या कित्येक जखमांचे वण तर त्यांचे पायावर जन्मभर होते. पुरश्चर-णाच्या आरंभापासूनच त्यांचें आचरण असें पवित्रतम नि धगधगीत वैराग्याचें होतें !

तपस्वी लोकांच्या बाह्य स्वरूपाकडे पाहून शीतोष्णादि द्वंद्वें सोसण्याची परकाष्ठा करणें, उपवास किंवा अत्यल्प आहार यांनीं शरीर सुकविणें, शरीररक्षणाकडे सर्वस्वीं दुर्लक्ष, वैराग्याचा बाह्य

वेष, इत्यादि प्रकार म्हणजेच तपश्चर्या होय, अशी सामान्य लोकांची कल्पना असते आणि दिनचर्येच्या वरील वर्णनावरून तिलाच पुष्टि मिळावयाचा संभव आहे; म्हणून श्रीसमर्थांच्या तपश्चर्येचें अंतरंग पाहण्याचा थोडासा प्रयत्न करूं.

तपस्व्यासारखा नुसता बाह्यवेष किंवा शारीरिक व्यापार करून तपश्चर्या होत नाहीं.

कर्मेंद्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन् ।
इंद्रियार्थान् विमूढात्मा मिथ्याचारः स उच्यते ।। भ.गी.३-६

बाह्यतः इंद्रियांचा खूप निग्रह केला, पण मनांत विषयचिंतन चालूं असलें, तर तो इंद्रियनिग्रह म्हणजे नुसतें ढोंग – आपली व लोकांची फसवणूक होय ! तपस्व्याचें मन 'उपासना मूर्तिध्यान' अथवा 'आत्मानुसंधान' यांत गुंगलें पाहिजे; इतकें गुंगलें पाहिजे कीं अन्य सर्व गोष्टींचा विसर पडावा. विसर पडलासें दाखवावयाचें नसतें किंवा देह–गेहाच्या विस्मृतीस्तव वेगळा प्रयत्नहि करावयाचा नसतो. तन्मय झाल्यानें जी विस्मृति आपोआप होते ती हवी.

माझा राम अवघाचि आपण । हें सत्यचि त्याचीच आण ।।

हें स्वानुभवास येण्यासाठीं ध्येयानुसंधानपूर्वक काया वाचा मन झिजविणें याचें नांव तप–"स्वस्वरूपाचिये प्रसरा-। लागीं प्राणेंद्रिय-शरीरां । आटणी करणें जे वीरा । तेंचि तप ।।१०८।। ज्ञा. १६ या वचनांत श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं तपश्चर्येचें अंतरंग स्पष्ट केलें आहे. अनुग्रहप्रसंगीं श्रीसमर्थांना राममंत्राबरोबरच 'अहं ब्रह्मास्मि' महावाक्याचाहि उपदेश झाला होता. अर्थात् त्या आत्मारामाच्या अनुसंधानांत मन अधिकांश गुंतलें असतां 'प्रारब्धीं पडिला देहो । बोधें फिटला संदेहो । आतांचि पडो अथवा राहो । मिथ्या कलिवर' । या स्ववचनानुसार त्यांचा सहज व्यवहार चाले. त्यांत मनाला मारण्याचा किंवा इंद्रियांना कोंडण्याचा प्रश्नच नव्हता. 'मन रामीं रंगलें' असल्यानें देहाच्या सुखदुःखादिकांचा विसर पडणें साहजिक आहे.

## ४ सर्ग–ग्रंथलेखन-अध्ययन

पण आत्मानुसंधान म्हणजे स्वकर्तव्याकडे दुर्लक्ष करणें नव्हे. तें अनुसंधान असतांहि प्राप्तकर्तव्यास समर्थ सदैव दक्ष असत. 'पुढें भोजन जालियावरी। कांहीं वाची चर्चा करी। एकान्तीं जाऊन दिवरी। नाना ग्रंथ' (२२ दा. ११–३) या त्यांच्या स्वतःच्या वचनाप्रमाणें ग्रंथावलोकन, ग्रंथलेखन, कीर्तनपुराणादि श्रवण, इत्यादिकांमध्यें त्यांचा सायंकाळपर्यंत कालक्षेप होई. ज्यांचा उल्लेख ग्रंथराज-दासबोधांत झाला आहे, ते (१२ गीता, भागवत, वेदवेदान्त, उपनिषदें इत्यादि) नानाग्रंथ याच पुरश्चरणकालांत अवलोकनांत आले. त्यांची धारणा अद्‌भुत असल्यानें एकदां ऐकिलें किंवा अवलोकन केलें कीं, तें स्मरणांत पक्कें राहत असे; नुसता वरवर ग्रंथ चाळला तरी त्याचा सारांश ते ग्रहण करूं शकत असत. असे अनेक ग्रंथ त्यांनीं अवलोकिले–विवरून त्यांचें सूक्ष्म अध्ययन केलें.


'दिसामाजि कांहीं तरी तें लिहावें। प्रसंगें अखंडीत वाचीत जावें ॥
'एक सदेवपणाचें लक्षण। रिकामा जाऊं नेदी एक क्षण।'
'आधीं कष्ट मग फळ। कष्टचि नाहीं तें निर्फळ।'
'उद्योगरहित कामा नये। पशु जैसें।'

इत्यादि प्रकारची अखंड अभ्यासाची व उद्योगाची शिकवण 'आधीं केलें मग सांगितलें।' असें खणखणीतपणें बजावून ज्यांनीं आपल्या अनुयायांस दिली (आणि ज्या शिकवणीची छाप भावी कालांत १३५ वर्षें तरी टिकल्याचें 'सद्‌गुरु घरिचा ऐसा कायदा। आळसास न टेकिती कोणी कदा। सर्वकाळ शिष्यांनि करिती कामधंदा। सद्‌गुरुपदाकडे लक्षित ॥' या दासविश्रामधामांतील वचनावरून दिसतें.) त्यांनीं आपल्या पूर्ववयांत किती क्लेश सोसले असतील व किती घोर परिश्रम केले असतील याची यथार्थ कल्पना कोणास करतां येईल? अशी तीव्र तपश्चर्या या विभूतीची सतत १२ वर्षें चालली होती! केवळ ग्रंथावलोकनच नव्हे, तर ग्रंथ-लेखनहि त्यांनीं या अवधींत केलें असल्याचें स्पष्ट प्रमाणच



टाकळी येथील संगम

सांपडलें आहे. बीड येथील गिरिधरांच्या मठांत श्रीसमर्थलिखित वाल्मीकिरामायणाची पोथी श्रीसमर्थभक्त नानासाहेब देव यांस उपलब्ध झाली असून ती सांप्रत धुळें येथें श्रीसमर्थवाग्देवता-मंदिरांत विराजमान आहे. त्या पोथींत प्रत्येक कांडाचे शेवटीं जे समाप्तिदर्शक उल्लेख आहेत, त्यांवरून समजून येतें कीं, श. १५४४ च्या माघापासून श. १५४६ च्या वैशाखापर्यंत आदिकाण्ड, अरण्यकाण्ड, किष्किंधाकाण्ड, सुंदरकाण्ड व युद्धकाण्ड अशीं पांच काण्डें लिहून काढण्यांत आलीं. 'रामेण' किंवा 'रामेण रामदासेन' लिखितम् असा लेखकाच्या नांवाचा तेथें स्पष्ट उल्लेख आहे. अरण्यकाण्डाच्या अखेरीस मात्र 'रामेण रामदासेन सह गोपिनाथेन' असें म्हटलें आहे. त्यांतील गोपिनाथ कोण असावा याचा शोध लागत नाहीं. वाकीचीं दोन काण्डें तीर्थयात्रा आटोपून



पुनरागत्य कुंजरेण रथेन वा ॥ राजमार्गेपि हस्त्वानः स्थित्वा पृच्छत्य नामयौ ॥ ३४ ॥ अग्निहो
त्रेषु दारेषु शिष्यप्रेष्यजनेषु चा ॥ सानुकंप्यः सदा रामः पृच्छत्यस्मान नामयौ ॥ ३५ ॥ अभ्यंतरे
व राज्येषु पौरजानपदे तथा ॥ स्त्रियो [illegible] देवान् राजगृहे गृहे ॥ ३६ ॥ रामस्यै
वाभियाचंतेयौवराज्याभिषेचनं ॥ तासां न यो चित राजन्वत्सस्तात्म्यसिद्धतो ॥ ३७ ॥ रामाभिरी
वरूपया प्रजानामनुकंपकं ॥ पश्येम युवराजं तमभिषिक्तं [illegible] त्वदाज्ञया ॥ ३८ ॥ सराजव
यात्मजमात्मवंतं गुणाभिरामं नरलोककांतं ॥ रामं हृदेवाहं त्रिलोकनाथं अभिषेकुं
युवराजमुख्यं ॥ ३९ ॥ ॥ इत्यार्षे रामायणे [illegible] वाल्मीकीये बालचरिते आदिकां
डे समाप्तमिति ॥ ॥ समाप्तमादिकांडं ॥ ॥ श्रीराम ॥ ॥ श्रीराम ॥ ॥ रामार्पणमस्तु ॥
॥ ॥ शकसंवत् [illegible] ॥ उद्वोधिनाम संवत्सरे माघ शुद्ध [illegible] रविवासरे [illegible] दिने रामेण
रामदासेन लिखितमिदं पुस्तकं ॥ ॥ श्रीरघुनाथार्पणमस्तु ॥ ॥ रमाकांतः प्रीतो भवतु ॥
॥ ॥ श्रीरामराघवरमेश्वर रामचंद्र राजीवनेत्र रघुवर्य रमावरेश ॥ श्रीजानकीरमण भुवनेश्वर
त्वत्पादके ठकरोमि सततं तव नाममालां ॥ १ ॥

समर्थांचें हस्ताक्षर

श्रीसमर्थ कृष्णातीरीं आल्यावर, उत्तरकाण्ड १५६७ व अयोध्याकाण्ड १५७१ त 'राघवनाम्ना कश्चित् सत्पुरुषचरणानुचरा' कडून लिहिलीं जाऊन श्रीसमर्थांकडे आलीं. वयाच्या पंधराव्या वर्षी लिहिलेल्या या पोथीच्या वळणदार अक्षरांवरून लहानपणीं अक्षर घटविण्यासाठीं त्यांनीं केलेल्या परिश्रमांची कल्पना येईल. या वाल्मीकि रामायणाखेरीज आणखी कांहीं लेखन झालें असेलहि; पण तें कळण्यास आज तरी कांहीं साधन नाहीं.

## ५ सर्ग–मायामोहिनी

यावरून हा पुरश्चरणकाल अगदीं सुखानें व सहजगतीनें चालला होता असें कोणीं समजूं नये. परमार्थच मुळीं 'रात्रंदिस आम्हां युद्धाचा प्रसंग। अंतर्बाह्य जग आणि मन।' असा युद्धाच्या खणाखणीचा मार्ग आहे. या कालांत समर्थांवर कोणकोणते प्रसंग बेतले ते सविस्तर सांगतां येण्याइतकी सामग्री उपलब्ध नाहीं. स्वतः समर्थ व पूर्वचरित्रकार यांच्या वचनांच्या आधारानें कांहीं अनुमान करतां आलें तर पहावयाचें.

उद्धवसुत, महिपति, इत्यादि चरित्रकारांनीं पुढील प्रसंग वर्णिला असून त्यास श्रीसमर्थांच्या दोन पद्यांचा आधार घेतला आहे. श्रीतुकाराम महाराजांवरहि असाच एक प्रसंग गुदरल्याचें त्यांचे चरित्रांत नमूद आहे. तद्दर्शक त्यांचीं वचनेंहि (जाई वो तूं माये होई वो परती।) आहेत.

'इंद्रासी उद्वेग सर्वकाळ मनीं। माझें राज्य कोणी घेईना कीं ॥१॥
घेईना कीं कोणी बळिया दानव। घालिना कीं देव कारागृहीं ॥२॥
– समर्थगाथा २९०

या अभंगाचे आधारें चरित्रकार सांगत आहेत कीं, हा जांबचा बालयोगी टाकळीस तपश्चर्या करीत असतां, त्याच्या सत्त्वपरीक्षेसाठीं इंद्रानें वसंतादिकांसह मायामोहिनीस पाठविलें. वसंताच्या लीलेनें अरण्याचें स्थित्यंतर झालेलें पाहून समर्थांना वरील अभंग स्फुरला. इतक्यांत मायामोहिनीनें प्रकट होऊन हावभाव विलास

मांडिले. पण या योगिराजांनीं शांति अवलंबून पुढील पद म्हटलें आणि मायामोहिनी लज्जित होऊन परत गेली.

### सौरी

उगी राहे रांडे शब्दचाळ भांडे ।।ध्रु०।। काजळ कुंकू लेवुनि रांडे किती करिसी नखरा । भिल्लिण होऊनि रुद्र नेला ठकविलें शंकरा ।।१।। साही त्रिकूट अठरा रांडे तेंहि वेडावलीं। चौघी जणीं वाद केला तेंहि धुडकावलीं ।।२।। दुर्वासासी गर्व केला तेथें जालिस घोडी । कोठें म्हणतां लाज नाहीं डागवी बांदोडी ।।३।। शुकापाशीं जाऊनि तुवां काय उजेड केला । मारुनियां बाण तूझा मोहरा फिरविला ।।४।। रामदासें पर्णुनि तुला लग्नीं टाकुनि दिल्हें । साधुसंतीं जाणुनियां फार फजित केलें ।।५।।

हा मायामोहिनीचा प्रसंग कविकल्पनेनेंहि निर्माण झाला असेल. त्यांत ऐतिहासिक सत्य असेल वा नसेल. पण संतचरित्र हें कोरड्या इतिहासाच्या घडामोडीसाठीं नसतें. त्यापासून वाचकांस सद्‌बोध मिळून त्यांची भावनाहि वाढली पाहिजे. पंचतंत्रांतील पशुपक्ष्यांच्या काल्पनिक गोष्टींपासून जर बोध घेतां येतो, तर श्रीसमर्थांसारख्या प्रखर वैराग्यसंपन्न अवतारी महापुरुषासहि मनोभव[1] नाडीत असतो, याकरितां सावधान! 'सावधान बुद्धि इंद्रियदमनीं ।' असा सावधानतेचा इषारा साधकास मिळाला आणि चरित्रनायका-विषयींचा त्याचा आदर दुणावला, तर असले उपदेशपर प्रसंग —मग ते काल्पनिक का असेनात—वर्णन करण्यानें वाचकांचें काय नुकसान आहे? अशा कथांचें मोलतोल रुक्ष चिकित्सेच्या धारवाडी कांट्यानें न करितां भावनेच्या सहृदयतेनें व बोध घेण्याच्या दृष्टीनें करावें म्हणजे झालें.

## ६ सर्ग–लोकचर्चा

ही झाली एकान्तांतील कसोटी. लोकांतहि 'विषयांचीं सोयरीं प्रपंचाचीं सखीं । मिळोनि एकमेकीं करिती मात ।।१।। यासी काय

१ काम, मदन

झालें धडचि बिघडलें । वयेंवीण लागलें देवपिसें ॥२॥ देव काय आम्हां सकळांगासीं नसे । जनावेगळें कैसें भजन याचें ॥३॥ हें आधींच विषयसंसारा उबगलें । पुरुषार्थें सांडवलें अहंतेच्या ॥४॥ यासी कोण्ही मोहाचें वडिलधारें नाहीं । म्हणुनियां पाहीं छंद करी ॥५॥ न करवे म्हणउनि तजिला विषयधंदा । जल्पतसे सदा रामनाम ॥६॥ रामीरामदास पिसाळलें माय । म्हणुनि मोकली धाय विषय जनु ॥७॥

अशा प्रकारची लोकचर्चा पहिल्या १।२ वर्षांत विशेष चालू होती. चांगले, धडधाकट, गोरेंगोमटें, देखणें, बारातेरा वर्षांचें पोर भिक्षा मागत हिंडतांना पाहून प्रापंचिकांनीं त्याची चर्चा, चौकशी करावी हें साहजिकच आहे. त्यांतून या मुलाची अबोल वृत्ति आणि वागणें कांहींसें पिसाटासारखें; 'पुर्ते कोणाकडे पाहेना। पुर्ते कोणासी बोलेना। .....आपुली स्थिति अनुमाना। येवोंच नेदी।' (११–१०) अशा प्रकारची त्याची चर्या. त्यामुळें लोकांच्या जिभा वरील अभंगांत वर्णिल्याप्रमाणें बरळूं लागल्या, तर त्यांत नवल तें काय? तथापि मुलाच्या चर्येवरील पावित्र्याचें तेज, तुटक बोलणें, त्याचा रेखीव दिनक्रम, त्याची सहिष्णुता, सखोल व अभ्यासू वृत्ति, विद्वत्समागमाची ओढ इत्यादिकांमुळें ही स्वैर लोकचर्चा हळूहळू मागें पडत चालली.

## ७ सर्ग–अलौकिक घटना

त्यांतच भगवदिच्छेनें एक अलौकिक घटना घडून येऊन या बालस्वामीचें तप:सामर्थ्य लोकांच्या निदर्शनास आलें आणि लोकांचे तर्कवितर्क पार लयास गेले. श्रीमद्दासबोधांत म्हटलेंच आहे कीं

जेथें भ्रष्टाकार घडेना। तो परमार्थ दडेना।

त्याप्रमाणें स्वामी विवेकानंदांनींहि 'माझे सद्गुरु' या प्रबंधांत सांगितलें आहे कीं, 'खरें म्हणजे अनुभवाचें अध्यात्म पाहिजे असेल, तर पावित्र्य हें अत्यंत आवश्यक आहे' आणि हा योगिराज तर जणूं मूर्तिमंत पावित्र्यच होता. कंबरेइतक्या पाण्यांत उभे राहून

रोज सहा सहा घंटे आत्मानुसंधानपूर्वक जप, पवित्र भिक्षान्न गंगोदकांत भिजवून मग त्याचें सेवन, भगवच्चर्चेविना एक क्षणहि वांया जावयाचा नाहीं, 'उपासनामूर्तिध्यानीं। अथवा आत्मानुसंधानीं। नाहीं तरी श्रवण मननीं। निरंतर॥' अशी ज्याची अहर्निश कालक्रमणा, त्याच्या तेजस्वी तपश्चर्येचें फल सवादोन वर्षांतच लोकनिदर्शनास आलें यांत आश्चर्य काय? वाकेनिशी टिपण व बखर आदिकरून चरित्रग्रंथ यांत हा प्रसंग वर्णिला आहे, तो असा––

शके १५४५ च्या वैशाख शु. १० चा दिवस. पुरश्चरणाचा नित्य जप व माध्यान्ह स्नानसंध्या आटोपल्यावर हे तपस्वी संगमावर रोजच्याप्रमाणें ब्रह्मयज्ञ करीत बसले होते, इतक्यांत एका तरुण सुवासिनीनें येऊन त्यांस वंदन केलें. कपाळीं कुंकवाचा मळवट व हातांतील कांकणें हीं सौभाग्यचिन्हें दिसल्यानें, 'अष्टपुत्रा सौभाग्यवती भव' असा आशीर्वाद तपस्वी महाराजांच्या मुखांतून स्वाभाविकपणें बाहेर पडला. त्याबरोबर त्या तरुणीनें सद्‌गदित वाणीनें विचारिलें, "महाराज हा आशीर्वाद या जन्माकरितां कीं पुढच्या?" तेव्हां महाराजांनीं 'हा काय प्रकार आहे?' असें त्या स्त्रीसमवेत आलेल्या मंडळींस हस्तसंकेतानें विचारिलें. मंडळींनीं खुलासा केला कीं, जवळच "दसकपंचक नांवाचें खेडेगांव आहे, तेथील कुळकरणी गिरिधरपंत हे तरुण वयांतच क्षयानें आज निधन पावले. ही अन्नपूर्णाबाई त्यांची पत्नी सहगमनास्तव येथें आली आहे. आपण तपस्वी महापुरुष येथें सहज दिसला म्हणून नमस्कारास इकडे आली." त्याबरोबर 'दासानें रामास हा काय बोल लाविला?' असे उद्‌गार समर्थांच्या मुखांतून निघाले. त्यांनीं तें शव जवळ आणवून त्याजवर गंगोदक सिंचन केलें; त्याबरोबर तो तरुण जिवंत होऊन राम राम म्हणत उठून बसला! उभयता पतिपत्नींनीं समर्थमहाराजांस अत्यंतानंदानें नमस्कार केला. तेव्हां ते म्हणाले 'श्रीरामरायानें आठ पुत्र तुम्हांस पूर्वींच दिले आहेत, त्याच्याच कृपेनें आणखी दोन होतील; आतां उभयतांनीं गंगास्नान करून व ब्राह्मणांस

वंदन करून घरीं जावें.' तेव्हांपासून त्या घराण्यास 'दशपुत्रे' असें नांव पडलें. कांहीं चरित्रग्रंथांत या दशपुत्रे घराण्याचें गोत्र 'अत्रि' असल्याचें म्हटलें आहे. याप्रमाणें त्या दसकपंचकच्या ग्रामस्थांस आनंदीआनंद झाला, पण या आशीर्वादामुळें श्रीरामप्रभूवर भार पडला, म्हणून समर्थांच्या अंतःकरणास मात्र फार कष्ट झाले. त्यांनीं पुढें आशीर्वादादाखल 'जय राम' किंवा 'जय रघुवीर' म्हणण्याचा प्रघात ठेविला.

## ८ सर्ग–उद्धवाचा जन्म

संगमाहून निघतांना गिरिधरपंत व त्यांची पत्नी अन्नपूर्णाबाई यांनीं मनाशीं संकल्प करून तो श्रीसद्‌गुरुचरणीं लगेच निवेदनहि केला कीं, 'प्रथम जो मुलगा होईल तो श्रीचरणीं अर्पण करू. त्याप्रमाणें पहिला मुलगा होतांच त्यास श्रीसद्‌गुरूकडे आणिलें; तेव्हां श्रीसमर्थ म्हणाले 'आम्ही अरण्यवासी; या मुलास घेऊन आम्ही काय कर-णार?' त्या दांपत्याचा फारच आग्रह पाहून समर्थांनीं सांगितलें, सध्यां घेऊन जा, पुढें मोठा झाल्यावर पाहूं'; मुलास घेऊन त्या पतिपत्नींनीं श्रीसमर्थदर्शनास प्रत्यहीं यावें. समर्थांनीं त्या लेंकरास पायावर घेऊन खेळवावें. 'प्रपंची होशी कीं परमार्थी?' 'प्रपंचांत टाकूं कां परमार्थांत?' असें विचारावें; या दैववान् मुलाची मुंजहि यथाकाल श्रीसमर्थांचे मांडीवर झाली; आणि नित्यकर्मास तो पुढें श्रीसमर्थांच्या अनुज्ञेनें त्यांच्याच टाकळीच्या गुंफेंत बसूं लागला. हळुहळु त्याचें घरीं जाणें सुटलें आणि भिक्षान्नावर निर्वाह करीत श्रीसमर्थसद्‌गुरूंनीं आज्ञापिलेलें पुरश्चरण व अभ्यास करीत तो टाकळीच्या गुंफेंत राहूं लागला. या मुलाचें पाळण्यांतलें नांव 'शिवराम' होतें व समर्थ त्यास 'उद्धव' म्हणूं लागले असें कोठें म्हटलें आहे, तर त्याचें मूळचें नांव उद्धव, पण पुढें चाफळ प्रांतीं गेल्यावर कांहीं विशेष प्रसंगानें समर्थांनीच त्याला 'शिवराम' असें नांव ठेविलें असेंहि वर्णन आहे. स. वाग्देवता मंदिरांतील बाडांक ४५५ (हें बाड उद्धवांच्या इंदूर मठांतील आहे.) च्या शेवटच्या पानावर "सीवरामाचें नक्षत्र

धनिष्ठा, कुंभ, नांव गुंडोजी, अंश ७" अशी नोंद आहे. उद्धवांच जन्म बहुधा शके १५४६ सालीं झाला असावा.

## ९ सर्ग–पुरश्चरणाचा हेतु

असो. या अघटित घटनेनें त्या बाल तपस्व्याची ख्याति नाशिक पंचवटीच्या भागांत सर्वत्र झाली आणि त्याच्या तपस्तेजानें अनेक लोक त्याचेकडे आकर्षिले गेले. तथापि कोणत्याहि प्रकारच्या लोकेषणेंत तो गुंतणारा नव्हता. ऐन लग्नांतून जो निसटला, तो कांहीं कोठें तरी मठ करून शिष्यशाखा जमवून चैनीनें महंती उपभोगण्यासाठीं खास नव्हे. त्याचें ध्येय फार वेगळें होतें. खेळण्या. बागडण्याच्या वयांतच, 'बापा काय करितोसी येकांत स्थळीं ?' या मातेच्या प्रश्नास ज्यानें

'आई, चिंता करितों विश्वाची !' स.–प्र. २–२२

हें उत्तर दिलें.

दुसऱ्याच्या दुःखें दुखवे । दुसऱ्याच्या सुखें सुखावे ।
अवघेचि सुखी असावे । ऐसी वासना ॥ २३ ॥
उदंड मुलें नानापरी । वडिलांचें मन अवघ्यांवरी ।
तैसी अवघ्यांची चिंता करी । महा पुरुष. . . . दा.बो. १९–४

असा उपदेश करून परहितनिरत असे सहस्रावधि महापुरुष निर्माण करण्याचें ज्या महाभागाच्या वाणीचें सामर्थ्य पुढें सर्वांच्या प्रत्ययास आलें, त्याचा या तपाचरणांत तरी कोणता स्वार्थ असेल? प्रपंच–वैभव त्यांनीं आपण होऊन लाथाडलें होतें आणि प्रत्यक्ष श्रीरामप्रभूंकडून ज्यास मंत्रानुग्रह झाला, त्याला स्वतःच्या ऐहिक वा पारलौकिक उद्धारासाठीं वेगळें काय करावयाचें उरलें होतें ? मग ही एवढी घोर तपश्चर्या कशासाठीं ? स्वतः समर्थच आपलें मनोगत सांगतात :

निपट कपट नाहीं अंतरामाजिं कांहीं ।
परि मज जन देखों कां सकेना कदा ही ॥
निवळ निवळ माझें चित्त हें देवराया ।
बहुतचि नर मातें इच्छिती कां अपाया ॥ १ ॥

बहुतचि पिळ पेंचें प्राण जातो दयाळा।
मजवरि करुणेचा बोध लोटी कृपाळा ॥
कचकच न करीतां तो तिढा प्राप्त होतो।
बहुतचि शिण होतो अंतरीं शोक येतो ॥ २ ॥

कठिण वचन लोकां आपणा बोलवेना।
कठिण वचन कोण्ही बोलती फार नाना।
क्षणभरि सुख नाहीं जन्मदारभ्य कोठें।
कठिणचि बहु वाटे लोटतें दुःख मोठें ॥ ३ ॥

हुजुर ! दम निघेना अंतरीं कोंड नाना।
तिळभरि स्थळ कोठें पाहतां ही दिसेना ॥
बहुत विषम काळें दाटणी थोर जाली।
म्हणउनि चरणाब्जीं वृत्ति गुंतोन ठेली ॥ ४ ॥

बहुतचि सकुमारा ! स्वस्त नाहीं शरीरा।
निशिदिनिं जनचिंता लागलीसे उदारा ॥
सकळ जन सुखावे तो कसा काळ फावे ।
भजन जन उकावे सर्व आनंद पावे ॥ ५ ॥

विदित सकळ आहे, त्यांत कांहीं न राहे।
मतिहिण राहेवना हेत तो धांवता हे ॥
पिसुण सळचि वाटे आप्त नाहींच कोण्ही ।
म्हणउनि करुणा हे बोलतो मोक्षपाणी ॥६॥

त्यांच्या अंतःकरणांतील तळमळीचें आणि त्याबरोबरच निर्मल व निःस्वार्थी विचारांचें कसें स्पष्ट प्रतिबिंब या श्लोकांत उमटलें आहे! अशांतच प्रांतांत अवर्षण पडलें; लोकांच्या दैन्याला व हालअपेष्टांना पारावार राहिला नाहीं. ती स्थिति पाहून समर्थांच्या कोमल हृदयास किती यातना झाल्या असतील! त्यांच्या मनोव्यथेची कांहींशी कल्पना पुढील पद्यपंक्तीवरील श्लोक व आदिकांडाच्या शेवटच्या प्रकरणांतील प्रार्थना यांवरून करतां येईल.

संसारींचें दुःख दाटलें मानसीं । तें मी तुजपासीं सांगईन ॥१॥
उतावीळ चित्त उभारूनि बाहे । **रामदास** पाहे वाट तूझी ॥२॥
स. गा. ४७०

पहावी कोणाची रे आस, जालों उदास । रामा!
पावेरे आम्हांस विनवी **दास** ॥ स. गा. १३१५ ॥

अशा प्रकारें तळमळणाऱ्या अंतःकरणानें केलेली प्रार्थना आणि निष्ठेचें नामस्मरण हें कदापि वायां जात नाहीं. त्यांच्या योगानें संकटमुक्त होण्याचा मार्ग दिसूं लागतो, असा सर्व प्राचीन अर्वाचीन भारतीय व परदेशस्थ महात्म्यांचा अनुभव आहे. मग हे टाकळीचे तरुण तपस्वीच त्यास अपवाद कसे ठरतील? त्यांच्या मनोगतास अनुकूल असा एक प्रसंग घडून आला आणि त्यांत त्यांच्या भावी कार्याचें बीजारोपण झालें. तो प्रसंग असा.

## १० सर्ग–शहाजीमहाराज व बालशिवाजी यांची भेट

शके १५५० पासून १५५३–५४ पर्यंत जुन्नरसंगमनेरपासून नाशिकत्र्यंबकपर्यंतचा प्रांत शहाजी महाराजांचे हातीं होता. या अवधींत दोन तीन वर्षें त्यांच्या सैन्याचा तळ पावसाळ्यांत नाशिक येथेंच असे. त्यांचे वडील मालोजी राजे यांना 'तुझ्या कुलांत शककर्ता निर्माण होणार आहे' असा जगदंबेचा दृष्टांत झाला होता. स्वतः शहाजी महाराजही मातब्बर सरदार होते. हिंदवी स्वराज्य व्हावें ही त्यांची अंतरींची तळमळ; काळाची अनुकूलता दिसत नसल्यानें अहमदनगरच्या निजामशाही वंशांतील एका लहान मुलास पुढें करून त्यांनीं ती निजामशाहीची गादी टिकविण्याचा एवढा धडाडीचा प्रयत्न चालविला कीं, शहाजी राजांस आवरण्यासाठीं शेवटीं दिल्लीची मोगलाई व विजापूरची आदिलशाही या दोन्ही पादशाह्यांना एकत्र यावें लागलें. याच कालांत शके १५५१ च्या फाल्गुन वद्य ३स महाराष्ट्राचा स्वातंत्र्यसूर्य श्रीशिवछत्रपतींच्या रूपानें श्रीमंत सौभाग्यवती जिजाईमातेच्या उदरीं शिवनेरीवर उदय पावला. श्रीसमर्थांची तपश्चर्या सुरूं होऊन या वेळीं नऊ वर्षें

पूर्ण झालीं होतीं आणि त्यांच्या हृदयस्थ प्रेरणेस साहाय्यभूत होईल असा पुरुष श्रीरामकृपेनें उत्पन्न झाला! शहाजी महाराजांनाही या पुत्रजन्मानें मोठाच आनंद झाला. कारण, त्या मुलाच्या पत्रिकेंतील ग्रहमान व त्याच्या शरीरावरील सामुद्रिक चिन्हें हीं मालोजी राजांना झालेल्या स्वप्नास व त्यांच्या स्वतःच्या अंतःकरणांतील हेतूस पोषक होतीं. गिरिधरपंतांच्या जीवदानामुळें विख्यात झालेल्या तपस्वी ब्रह्मचारी महाराजांची कीर्ति त्यांच्या कानीं अगोदरच गेली होती. पत्नीस व मुलास घेऊन शहाजी महाराज समर्थांच्या दर्शनास (वहुधा शके १५५२ मध्यें) आले. आपल्या बालसूर्यासारख्या प्रतापी बालकास पुढें ठेवून उभयतां पतिपत्नींनीं त्या तपस्वी महापुरुषास वंदन केलें. त्या तेजस्वी बालकास पाहतांच हा 'धर्माचा कैवारी' आला असें समर्थांच्या अंतःकरणास वांटून फार आनंद झाला. वार्केनिशी टिपणांत व बखरींत "शिवनामा उत्पन्न झाला, कृष्णातीरास जावें" अशी श्रीरामप्रभूंनीं समर्थांस आज्ञा केल्याचें म्हटलें आहे, तें कोणा चिकित्सकास न पटलें तरी या विधानाची सत्यता वरील संभवनीय भेटीच्या कल्पनेनें मान्य होण्यासारखी आहे.

बहिर्मुख चिकित्सक कांहींहि म्हणोत, पण श्रीसमर्थांसारखे तपोनिधि महात्मे स्वानुभव सांगतात कीं, तरी हा लोकांचा भावार्थ। भाविकां देव यथार्थ । अन्यत्र कल्पना वेर्थ । कुतर्कांची ॥ दा. बो.॥

स्वामी विवेकानंद म्हणून पुढें विश्वविख्यात झालेल्या नरेंद्रनाथ दत्ताचा जन्म होण्याचे अगोदर कितीतरी वर्षांपासून श्रीरामकृष्ण परमहंसांची जगदंबेस नित्य प्रार्थना असे कीं, "आई, तुझ्या कृपेनें मला मिळालेले आध्यात्मिक अनुभव ह्या जडवादी जगास पटवून देईल असा कोणी तुझा भक्त माझ्याकडे पाठीव ना!" आणि नरेंद्राचा जन्म होण्याच्या सुमारास त्यांस भावसमाधींत दिसलें कीं, काशीहून एक मोठा तेजोगोल निघून कलकत्त्यास येऊन पोहोंचला! या बाबतींत एक लक्षांत ठेवावें कीं, व्यावहारिक विद्येनें एखादा मनुष्य संपन्न झाला कीं, तो आध्यात्मिक गोष्टींतहि

अभिप्राय देण्याइतका तज्ज्ञ होतो असें नव्हे. व्यावहारिक सत्यासत्य निवडतां येऊं लागलें म्हणजे तेवढ्या विद्वत्तेच्या पुंजीवर भाव-समाधीनें व आध्यात्मिक शक्तीनें येणारे दिव्य अनुभव पारखतां येत नाहींत. तेव्हां "शिवनामा उत्पन्न जाला, कृष्णातीरास जावें" अशी श्रीरामाची आज्ञा झाल्याचें जें जुन्या टिपणांत व ग्रंथांत नमूद आहे, त्यांत अशक्य वा असत्य कांहींहि नाहीं.

## ११ सर्ग–पुष्पाचें चरित्र

ती श्रीरामाची आज्ञा झाली हें जर सत्य मानावयाचें तर त्याच टिपणांत व ग्रंथांत पुढील प्रसंग वर्णिला आहे, तो मिथ्या किंवा असंभवनीय कसा मानतां येईल? तो प्रसंग असा. शके १५५४ श्रीरामनवमीच्या पंचवटी येथील महोत्सवांत दुपारचे पुराणाचे वेळीं श्रीमारुतिरायांच्या आग्रहास्तव एक दिवस हे बाल-योगी पुराण सांगण्यास बसले. बटुरूपानें मारुतीरायहि जवळच श्रोत्यांत होते. अशोकवनशोधनाच्या प्रसंगाचें वर्णन चाललें होतें. 'अशोकवाटिकेंत कोणत्या रंगाचीं फुलें होतीं?' बटूनें पुराणिक महाराजांस हटकलें. 'पांढऱ्या रंगाचीं अर्थात्' पुराणिकांच्या मुखां-तून तत्काळ उत्तर निघालें. बटु म्हणतो, "नाहीं, तांबड्या रंगा-चींच होतीं." पुराणाचा ओघ थांबून या प्रश्नोत्तरांची सरबत्तीच थोडीशी चालू झाली. इतर श्रोते त्या बटूस दापूं लागले, "ए पोरा, अगदीं स्वतः पाहिल्यासारखें जोरानें बोलतोस! तुला कांहीं कळतें कां? आपण केवढेसे, ब्रह्मचारी महाराजांचा अधिकार केवढा मोठा! उगीच कां त्यांना अडवतोस? 'गप्प बैस' पुराणिकांनीं श्रोत्यांसच गप्प बसायला सांगितलें. ते म्हणाले, "त्यांचें आमचें बोलणें चाललें आहे. तुम्ही मध्यें बोलूं नका." आणि बटूस निक्षून सांगितलें कीं, 'निश्चयें करून पुष्पें पांढरींच होतीं.'

पुढें पुराण होऊन एकान्तांत आल्यावर मारुतीराय समर्थांस म्हणाले 'तुम्ही पुष्पें पांढरीं म्हणतां, तर चला एकदां लंकेस,

समक्षच पाहून येऊं.' समर्थांनीं उत्तर केलें 'जशी आज्ञा; पण पुरश्चरणाचे नियम व येथील नित्य नियम जे आपण लाविले आहेत त्यांची व्यवस्था कशी करावयाची ?' 'बरें तर,' मारुतीराय म्हणाले ' मीच तुमच्या पूजेसाठीं फुलें घेऊन येतों.'

थोड्याच वेळांत कण्हेरीचीं पांढरीं फुलें घेऊन मुख्य प्राणाची स्वारी आली. येतांच श्रीरामदासांस प्रश्न केला कीं, सीता शुद्धीचे वेळीं गेलों तेव्हां मीं तांबडीं फुलें पाहिलीं होतीं आणि आतां पांढरीं कशीं झालीं ? समर्थ विनयानें म्हणाले, ' आपण तांबडीं फुलें पाहिलीं हें खरेंच आहे. कारण त्या वेळीं आपले नेत्र क्रोधानें इतके आरक्त झाले होते कीं, सगळे चराचर आपल्यांस लाली लाल दिसूं लागलें आणि शिवभक्त रावण आपल्या उपास्यासाठीं श्वेतपुष्पांचाच संग्रह करणार हें लक्षांत येऊन मीं पांढरीं पुष्पें म्हटलें; तेव्हां दोन्ही गोष्टी खऱ्या ! ' बुद्धिमतां वरिष्ठः ' महावीर मारुतीराय उद्गारले ' वाः ! समुचित उत्तर ! धन्य आहे तुमची !'

## १२ सर्ग—काव्यसरितेचा उगम

श्रीसमर्थांच्या २५।३० हजार काव्यांत अमुक प्रकरण अमक्या वर्षीं लिहिलें गेलें असें निश्चित करण्यास कालदर्शक उद्गार ( केवळ दा. बो. ६–४ हा एकच अपवाद खेरीज ) कोठें नसले, तरी रचनाकालाचें अनुमान करण्याइतपत कांहीं उल्लेख आढळतात. त्यांच्या आधारें या पुरश्चरणकालांत कोणकोणतीं प्रकरणें वा पद्यें लिहिलीं गेलीं असावींत तें पाहूं.

मागील कांडांत पंचवटीस आल्यानंतर केलेली प्रार्थना— विशेषतः पदांतील ' तुजसाठीं जिवलगांचा । संग सोडिला ।। ' त्याचप्रमाणें या कांडांतील "विषयांची सोयरीं प्रपंचाचीं सखीं ।। व ' इंद्रासी उद्वेग सर्वकाळ मनीं । ' हे दोन अभंग, सौरी, अंतःकरणाच्या वेदनेचे ते सहा श्लोक, 'निदान पाहसीं किती ?', हें पद हीं सर्व त्यांतील लहान वय किंवा त्या कालीं घडलेले

प्रसंग यांच्या उल्लेखांवरून पुरश्चरणकालांतील असावींत असें वाटतें. तसेंच 'जनकजापतिचा लघुसा कवी ।' 'जनस्थान गोदातटीं वास केला । प्रभू देखिला दास संतुष्ट झाला ।'

० ० ० ०

श्रोते ऐकती आदरें । तरी बोलेन बोबडीं उत्तरें । ए.स.३
'घरें सुंदरें सौख्य नाना परीचें । परी कोण जाणेल तें अंतरींचें ।'
'मनीं आठवीतांचि तो कंठ दाटे । उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥'
'बळें लावितां चित्त कोठें जडेना । समाधान तें कांहिं केल्या घडेना ।' 'नव्हे धीर नैनीं सदानीर लोटें । . . उदासीन हा. ॥'

'भजनरहित रामा सर्वही जन्म गेला । स्वजनजनधनाचा वेर्थ म्यां स्वार्थ केला ।।'

० ० ० ०

'उदास वाटतें जीवीं । आतां जावें कुणीकडे ।' 'अन्न नाहीं वस्त्र नाहीं सौख्य नाहीं जनांमधें । आश्रयो पाहतां नाहीं । बुद्धी दे रघुनायका ॥' 'देईना पुर्वीना कोण्ही । उगेचि जन हांसती ।' 'पीसुणें वाटती सर्वं । कोण्हीहि मजला नसे ।'

नुकतेंच घर सुटून पंचवटीस येऊन पोहोंचल्या वेळच्या मन:स्थितीचें चित्र वरील उद्‌गारांत दिसतें. त्यांवरून वाटतें कीं, अशा आशयाचे उद्‌गार ज्या कवितेंत आढळतील, ती पुरश्चरण कालांतील असावी असें सामान्यपणें म्हणण्यास हरकत नाहीं.

## १३ सर्ग–टाकळीस श्रीमारुतीची स्थापना

श. १५५४ फाल्गुन शुक्ल पक्षांत श्रीसमर्थ तीर्थयात्रेस गेले; अर्थात् दोन्ही पुरश्चरणांची सांगता तत्पूर्वींच झाली असली पाहिजे. तीर्थयात्रेस निघण्याचा दिवस जसजसा जवळ येत चालला, तसतसा बरोबर येण्याविषयीं उद्धव बाळाचा हट्ट वाढू लागला; अवघें ८।९ वर्षांचें त्याचें वय; एवढ्याशा लहान मुलास त्या काळच्या पायीं प्रवासांत बरोबर न्यायचें तरी कसें ? तो तर कांहीं केल्या राहीना.

आईबापांपेक्षांहि त्यास श्रीसद्गुरुरायाचा लळा अधिक लागला होता. तेव्हां त्या बालकाची समजूत काढण्यासाठीं समर्थांनीं गुंफेच्या वरच्या बाजूस श्रीमारुतीरायाची एक गोमयाची मूर्ति निर्माण करून विधिपूर्वक प्राणप्रतिष्ठा केली आणि उद्धवास आज्ञापिलें कीं 'ह्या मारुतीरायाची रोजची पूजा-अर्चानैवेद्य इत्यादि करणें आतां तुझ्याकडे आहे. रोज भिक्षान्नाचा नैवेद्य त्यांस समर्पण करीत जा. घरीं जाऊं नकोस. मनाला कांहीं जडभारी वाटलें तर मारुतीरायास निवेदन करीत जा. त्यांना विसरूं नकोस आतां माझ्या बदलीं तूच त्यांची सगळी व्यवस्था करायची बर का! ते सर्व प्रकारें तुला साह्य देतील. अगदीं शंका ठेवूं नकोस. ते चिरंजीव राहिले आहेत तेच मुळीं तुजसारख्या रामसेवकांचें रक्षण करण्यासाठीं!'


गोमयाचा मारुती टाकळी

स्वधामासि जातां प्रभू रामराजा। हनूमंत तो ठेविला याचि काजा। सदा सर्वदा रामदासासि पावे। खळें गांजितां ध्यान सोडोनि धांवे॥ 'काळजी करूं नकोस. मी आत्तां परत येतों!' पण हें समर्थांचें 'आतां' ठरलें बारा वर्षांचें!' श्रीसमर्थांनीं स्थापिलेल्या अनेक मारुतींपैकीं हे पहिले होत.

## १४ सर्ग–मूर्ति शेणाची कीं सोन्याची?

सर्वांचा निरोप घेऊन समर्थ निघणार, इतक्यांत त्यांच्या पुढें दोन गुराखी भांडत आले; त्यांतला एकजण रडत होता. त्याच्या पाठीवरून हात फिरवीत समर्थांनीं त्यास विचारलें, 'तूं कां रे रडतोस, बाळ?'

उत्तर– 'माझ्या समद्या गाई ह्यानं घेतल्या' समर्थांनीं दुसऱ्या मुलास विचारलें 'का रे, याच्या गाई तूं कां घेतल्यास?'

दुसरा उत्तरतो– 'म्यां न्हायी. म्यां कवा घेतल्या? त्यानंच तर दिल्या.'

समर्थ– 'होय रे? तूं कां दिल्यास आपल्या गाई त्याला?'

पहिला गुराखी– 'मंग का करावं? तुम्ही न्हाई बाबा, माझ्या बाला श्येन आनायला सांगितलं? अन् त्येनं धा बारा पाटच्या श्येन न्हवतं आनून दिलं?'

समर्थ– 'बरं, मग?'

प. गुराखी– तवा मीं म्हंगालों, मारुती गाईच्या श्येनाचा हाय अन् हा म्हनतो सोन्याचा हाय. तवा आमची व्हंड लागली; मारुती सोन्याचा असला तर माझ्या गाई ह्यानं घ्यायच्या अन् श्येनाचा असला तर त्याच्या गाई म्यां घ्यायच्या.

'मग रे?' समर्थांना अधिकच कुतूहल उत्पन्न झालें.

प. गुराखी– मंघा आम्ही इथं आलों अन् ह्यानं त्या शेपटाच्या तिथं खरवाडलं, तर तिथं सोन्यावानी पिवळं धमक चमकलं अन् बाबा, खरंच सांगा, माझ्या घरचं श्येन आनलं व्हतंना मारुती करायला? अन् आतां हें सोन्याचं कसं झालंव? माझ्या समद्या गाई यानं घेतल्या, आतां माझा बा मला मारील!

असें म्हणून तो पोरगा ओक्साबुक्शीं रडूं लागला. समर्थ त्याला जवळ घेऊन त्याची समजूत घालणार, इतक्यांत दुसरा म्हणतो–

'आतां रडून काय व्हतंय? अदुगर व्हड कशापाई लावावी? बाबाला काय इचारायचंय? पघ, पघ, सोन्याचा हाय का न्हाय त्यो.' मारुतीरायाकडे हात करीत दुसरा गुराखी उद्गारला.

त्याबरोबर समर्थांची दृष्टि मारुतीरायाच्या मस्तकाकडे गेली, तों खरेंच मुगुटाच्या वरच्या बाजूस शेंपटावर सुवर्ण चमकत आहे! दोघांनाहि त्यांनीं जवळ घेऊन प्रेमानें कुरवाळलें आणि हंसत हंसत म्हटलें,

'बाळ, तुम्ही दोघेंहि खरेच आहांत; याच्या घरून शेण आणून मूर्ति बनविली हें खरें आहे अन् तेथें आतां सोनें दिसत आहे, तेव्हां तुझंहि म्हणणं खरं आहे.'

' जा, बाबा, हें तुम्ही आपलं कांहीं तरीच सांगतां? श्येनाचं सोनं कसं व्हईल व? सोनंच व्हतं तें पहिलं.' दुसरा जरा तावातावानें उद्गारला.

'त्याचं असं आहे, बाळांनो,' समजुतीच्या स्वरांत समर्थ सांगू लागले. 'गोमये वसते लक्ष्मी:' म्हणजे गाईच्या शेणांत साक्षात् लक्ष्मी वास करते असें आपली पोथी पुराणं सांगतात, तें खरं आहे. शेण जमिनींत भरपूर पडलं तर धान्य चांगलं पिकतं, तुम्हांला ठाऊक आहेना? अन् पीक चांगलं भरारून आलं म्हणजे तुम्ही काय म्हणता रे?'

'सोनं पिकलं सोनं!' दोघेहि एकदम उद्गारले! 'झालें तर मग,' समर्थ पुढें सांगूं लागले, 'शेण म्हणजेच सोनं, त्याला पाय लावूं नाहीं; गायीला मारूं नाहीं; तीच आपल्याला अन्न देणारी आई आहे. तिच्या शेणांत सोनं असतं हें तुम्हांला मारुतीरायांनींच दाखवलं. आतां भांडूं नका आँ. जा, खेळायला जा.' दोघेहि हरखून निघून गेले. एकटच्या टाकळीसच नव्हे, तर आवश्यक तेथें अनेक ठिकाणीं गोमयाच्या हनुमन्मूर्ति समर्थांनीं स्थापिल्या.

## १५ सर्ग–फलश्रुति

अशी उग्र तपश्चर्या बारा वर्षेंपर्यंत करून समर्थांनीं काय मिळविलें, हें आतां थोडक्यांत पाहूं. 'सर्वं तु तपसा साध्यम्'। (सगळें कांहीं तपानें साध्य होतें) हा मनुस्मृतीचा सिद्धांत

भारतीयांच्या हाडीं मांशीं खिळलेला आहे. सगळ्या प्राचीन पोथ्यापुराणांत त्याच एका सिद्धांताचें प्रतिपादन आढळेल. श्रीसमर्थांच्या पूर्वीचे त्यांचे तेवीस पूर्वज त्याच विचारपरंपरेंत वागलेले आणि स्वतः श्रीसमर्थहि त्याच परंपरेंत वाढलेले; त्या सिद्धांतावर त्यांचा अढळ विश्वास. तपश्चर्येनें मनुष्यास किती प्रकारचें सामर्थ्य प्राप्त होऊं शकतें याचें थोडेसें विवेचन स्वतः त्यांनीं नरदेहस्तवनांत (दा. बो. १–१०) केलें आहे. तपाचरण न केलेल्या किंवा त्या शास्त्राचा यथापद्धति अभ्यास न झालेल्या, पण स्वतःस सर्वज्ञ समजणाऱ्या अशा कित्येक जडवादी अर्वाचीनांनीं त्यावर विश्वास ठेविला नाहीं, म्हणून थोर महापुरुषांचे स्वानुभव थोडेच खोटे ठरणार ?

करी दुर्जनांचा संहार। भक्तजनांसि आधार। ऐसा हा तो चमत्कार। रोकडा चाले ॥२९॥ मनीं धरावें तें होतें। विघ्न अवघेंचि नासोन जातें। कृपा केलियां रघुनाथें। प्रचीत येते ॥३०॥ रघुनाथ-भजनें ज्ञान जालें। रघुनाथभजनें महत्त्व वाढलें। म्हणोनियां तुवां केलें। पाहिजे आधीं ॥३१॥ हें तों आहे सप्रचीत। आणि तुज वाटेना प्रचीत। तरी साक्षात्कारें नेमस्त। प्रत्ययो करावा ॥३२॥ (दा. ६-७) हें त्यांनीं आपल्या अनुयायांस जें इतक्या छातीठोकपणें–एक नव्हे अनेक ठिकाणीं–सांगितलें तें काय स्वतः अनुभव न घेतां, केवळ ग्रंथाधारेंच ? शब्दांच्या पाठीशीं स्वानुभव नसेल तर त्या पोकळ शब्दांस कोण विचारील ? या तपश्चर्येनें आलेला स्वानुभव श्रीसमर्थ स्पष्टपणें पुढील शब्दांत सांगत आहेत :–

सप्रचीत वल्ली मिथ्या कोण करी। धन्य तो विवरी विवेकानें ॥१॥
समाधान जालें प्रत्ययासी आलें। धन्य तें पाउलें राघवाचीं ॥८॥
राघवाचीं पदें मानसीं धरीन। विश्व उद्धरीन हेळामात्रें ॥९॥
हेळामात्रें मुक्त करीन या जना। तरीच पावना राघवाचा ॥१०॥
राघवाचा दास मी जालों पावन। पतित तो कोण उरों शके ॥११॥
पावनाचें ब्रीद आम्हां प्राप्त जालें। प्रचीतीस आलें कितीयेक ॥१५॥
राघवाचा वर पावलों सत्वर। जनाचा उद्धार करावया ॥१९॥

ज्या वयांत सांप्रतचा भारतीय तरुण 'कसें करूं, काय करूं' या अष्टाक्षरीचा जप करीत झुरत असतो आणि कोठें उद्योगास लागलाच तर स्वतःच्या कुटुंबपोषणापलीकडे पाहण्याची त्यास हिंमत नसते—दृष्टीहि पण नसते—त्या वयांतला, जांबसारख्या आडवळणी खेड्यांतील एका कुळकरण्याचा पंचविशीच्या आंतला तरुण सगळ्या विश्वाच्या उद्धारार्थ कमर कसतो आहे, तें कोणाच्या जिवावर? हें बळ त्याला कोठून मिळालें? ज्या तपश्चर्येची टवाळी करण्यांत सांप्रत कित्येक विद्वान् भूषण मानितात, त्या तपश्चर्येचें हें रोकडें फळ आहे! सर्वांनींच संसार सोडून तपश्चर्या करावी असा याचा अर्थ नाहीं; पण केवळ तपश्चर्याच नव्हे तर मनुष्यमात्राच्या ऐहिक व पारलौकिक उत्कर्षास आवश्यक असणारे जे दोन सद्गुण-भगवन्निष्ठा व सदाचार त्यांचीहि हेटाळणी तपाबरोबर होऊं नये आणि तेवढे दोन गुण तरी अंगीं बाणवून घेण्याची वाचकांस प्रेरणा व्हावी यासाठीं हें विवेचन केलें; असो. यानंतर श्रीसमर्थ तीर्थटनास निघाले, तेव्हां त्यांच्या मागोमाग वाचकांसहि चलावयाचें आहे.

मराठी ... ठा... स्थळप्रत.
अनुक्रमांक ...
क्रमांक ... दि: ...

# तीर्थाटन काण्ड

## (शके १५५४ ते १५६५)

नाना तीर्थें थोर थोरें। सृष्टीमध्यें अपारें।
सुगमें दुर्गमें दुष्करें। पुण्यदायकें ॥३॥ दा. बो. ८–१
नाना तीर्थां क्षेत्रांसि जावें। तेथें त्या देवाचें पूजन करावें।
नाना उपचारीं अर्चावें। परमेश्वरासी॥ ५॥ दा. बो १७.४
जयंत्यादिकें नाना पर्वें। तीर्थें क्षेत्रें जें अपूर्वें।
जेथें वसिजे देवाधिदेवें। सामर्थ्यरूपें॥७॥
तया तीर्थातें जे न मानिती। शब्दज्ञानें मिथ्या म्हणती।
तयां पामरां श्रीपती। जोडेल कैंचा॥८॥ दा. बो. १४.५

### १ सर्ग–तीर्थयात्रेंतील हेतु व सामग्री

श्रीसमर्थांच्या तीर्थाटनाचा हेतु सामान्य माणसांपेक्षां अगदीं वेगळा होता हें उघड आहे. पुण्यप्राप्ति व प्रेक्षणीय स्थळें पाहणें एवढयाच हेतूंस्तव आपण यात्रेस जातों आणि ती आपली यात्रा 'चक्री' असते – आतां चक्रीचा पुढचा वर्ग ' यात्रा स्पेशल' निघाला आहे. द्रव्य, पोटपूजेचें साहित्य, बाडबिछाना हें आपलें प्रवास-साहित्य असतें; चांगली सोबत पाहून आपण प्रवासास निघतों. समर्थांची तीर्थयात्रा वेगळ्या प्रकारची होती. समर्थांचें सर्व परिभ्रमण पायींच झालें; तीर्थक्षेत्रांत जाऊन ते नुसत्या मूर्ति पाहणारे नव्हते, तर मूर्तीच्या ठायीं सामर्थ्यरूपानें वसणाऱ्या देवाधिदेवाचें दर्शन त्यांना घ्यावयाचें होतें! आमच्या पुण्यप्राप्तीची गरज त्यांस नव्हती; कारण पापपुण्याच्या अतीत ते होते; 'प्राणी मात्र बोलवावा। आप्तपणें।' 'धुंडावे भक्त प्रेमळ'। 'सर्वत्र लोक शोधावे । बोधावे

भक्तिच्या गुणें ।' 'वोळखी कराव्या दाटा' । 'सद्गुणसार ते घ्यावे । न घ्यावे अवगुण ते ।' 'भक्तीस लोक लावावे । पावावे परपार ते ।' 'हिंडतां पारखी लोका । कार्यकर्ता जिवीं धरी ।' '—परिस्थिति नीट पारखून लोकोद्धाराचे मार्ग शोधावयाचे—योजावयाचे हा त्यांच्या तीर्थाटनाचा मुख्य हेतु होता आणि या हेतूस अनुरूप अशी प्रवाससामग्री त्यांच्याबरोबर होती.

लक्ष्मीपति नारायण हृदयस्थ असल्यानें त्यांना जवळ कपर्दिकहि ठेवण्याचें कारण नव्हतें. 'सुषुप्ति अवस्थेसि भूमी निजावें । उसें रामपाद स्मरोनी धरावें । दिशाचा महापट्ट तो पांघरावा । सिताकारणें साह्य वन्ही करावा ।।' असा त्यांच्या शय्येचा थाट होता. क्षुधा-निवारणार्थ 'क्षुधेल्या न वंचीत जे वृक्ष कांहीं । जया याचकाचेनि संकोच नाहीं । रामें सेविलीं तेंचि आपण खावीं । तयाचीं चरित्रें विचित्रें स्मरावीं ।।' ही निसर्गसिद्ध आहारसामग्री त्यांस हवी तेथें भरपूर मिळे. संगतीसोबतीला धनुर्धारी रामलक्ष्मण आणि मारुतीराय सदैव पाठीशीं असतच; शिवाय 'रामा तूं सिते तूं कपोतासि बोले । तेणें तापलें चित्त नीवांत जालें । शुकसारिका कुंजती मृद बोली । अशोकीं जिहीं जानकी रंजवीली ।।' हीं जानकीमातेच्या संगतीचीं पांखरें आपल्या गोड गायनानें त्यांच्या तप्तमनाचें रंजन करीत.

## २ सर्ग—खडतर प्रवास

मेरुस्वामींनीं समर्थांच्या तीर्थपरिभ्रमणांतील प्रवासाचें वर्णन पुढीलप्रमाणें केलें आहे :—

प्रारब्धयोगें वनांतर । विरक्तिदशेनें दुर्धर । नाना स्थळांतरें दुस्तर । संचरती तेथें ।।६।। विरक्तीचें आंगीं वारें । उदास वृत्तीनें वावरे । वस्तीनें गिरिकंदरें । वसविलीं बहू ।।८।। नाहीं क्षुधेतृषेचें देहीं भान । नाहीं विश्रांति निद्रा जाण । वायूसारिखें संचरण । होत असे स्वइच्छा ।।२१।। शरीरउपजीविकाजीवन । सदोदित रघुनंदन । निजप्राणाचाहि प्राण । नित्य तृप्तीनें असे ।।२२।। प्रल्हादासि त्या

सेवकजनीं। लोटिले कडेलोटणीं। स्वइच्छाचि[1] समर्थांनीं। तेहि प्रतीति पाहिली॥२५॥ वनदाहो[2] अग्नींत रिघाले। व्याघ्रसिंह सहवासें राहिले। सर्प स्वइच्छा खेळविले। आंगावरी॥२६॥

धगधगीत वैराग्याची कसोटी पाहणारे एकाहून एक असे बिकट प्रसंग किती सांगावे? एकदां तर भयंकर उन्हाळ्याचे दिवस, जमीन चोहोंकडून इतकी कडकडलेली कीं जणूं ज्वाळा निघताहेत, निर्वृक्ष निर्जल अशा काळ्या पाषाणांच्या डोंगराचा माथा, भर दोनप्रहरची वेळा, वरून सूर्यकिरणांचा अग्निवर्षाव होत आहे, क्षुधेतृषेनें पंचप्राण व्याकुळ झालेले, अशा अवस्थेंत त्या पर्वतशिखरावर–

करूनियां निजनिर्धार। स्वामी स्थिरावले अतिस्थिर। तंव तो पर्वत हरहर। शब्दें गडाडिला॥३८॥ जय जय जय जय रघुवीर। घोष प्रगटती भयंकर। घुमों लागलीसे गंभीर। आकाशवाणी॥३९॥ क्षुधा तृषा बाधा झळंबली। प्राणांत दशा जाणवली। संपूर्ण ममतेनें आठवली। मूर्ति रघूत्तमाची॥४१॥ **जंव जंव देहाचें निदान। तंव तंव प्रगटे आत्मनिधान।** देहभाव प्राणविसर्जन। अवघाचि विसरे॥४३॥ त्या निर्वाण दशेमाझारीं। आला समर्थांचा साहाकारी। काळनिवर्तक निर्धारीं। धनुर्धारी रघुवीर॥४४॥ स्वकरें समर्थांसि कुर्वाळिलें। मंत्रसंजीवनीं संधान केलें। श्रवणावाटें पाजिलें। परमामृत॥४५॥

समर्थांच्या नेत्रांवरून रामप्रभूंनीं आपला कृपाहस्त फिरविला, त्याबरोबर समर्थांनीं दृष्टि उघडून पाहिलें. समोर प्रभूची ती दिव्य मूर्ति पाहतांच हर्षित होऊन श्रीचरणांस अभिवंदन केलें; श्रीरामरायांनीं कृपावात्सल्यानें समर्थांस पोटाशीं धरून 'अपेक्षित काय आहे' म्हणून विचारिलें. समर्थ म्हणाले, 'आतां कृपा करूनि निर्वाणगति देई।' त्यावर बोधसमुद्र श्रीरघुनाथजींनीं 'ब्रह्मोपदेशें सावधान। समर्थांसि केलें॥५५॥' आणि 'निर्विकल्प समाधिघन। अनुग्रहो

१ आपण होऊन. २ वणवा

केला ॥५७॥ महासमाधिसुखसेजेसी। विसांवले योगविशेषीं। तुर्या परिपक्वदशेशी मुराली सहजें॥५८॥ महासमाधि संवत्सर[1]। वसविलें तें पर्वतशिखर। समीप सद्‌गुरु धनुर्धर। संरक्षण होता ॥६१॥ रामसोहळा १–७

वरील एकसष्टाव्या ओवींतील विधानास श्रीसमर्थप्रतापांतील पुढील वचनानें दुजोरा मिळतो.

समर्थासि रक्षित दोनि धनुर्धारी। समागमें गुप्त असती विपिनविहारीं। कोठें न विसंबिती येक क्षणभरीं। आत्माराम समर्थस्वामी ॥२६॥

अशा भयंकर हालअपेष्टा सोशीत समर्थांच्या बरोबरच्या खडतर प्रवासांत कोणी मनुष्य क्षणभर तरी टिकेल काय? हें वर्णन वस्तुस्थितिदर्शक आहे कीं यांत कविकल्पनेची भरारी आहे अशी ज्यांस शंका येईल,त्यांनीं श्रीतुकाराममहाराजांचे पुढील उद्‌गार आणि श्रीरामकृष्ण परमहंस व स्वामी रामतीर्थ यांचीं साधनावस्थेंतील चरित्रें यांचें मनन करावें, म्हणजे शंका निरसन होईल.

ब्रह्मज्ञान नोहे लेंकुराच्या गोष्टी। तेथें व्हावा पोटीं अनुताप ॥१॥
दगडाहूनि जीव करावा कठीण। अंतरींचा शीण तेव्हां जाय ॥२॥
मेल्या मनुष्याची न धरिती आस। तैसा हो उदास देहावरी ॥३॥
तुका म्हणे येथें कराराचें काम। मग आहे राम जवळिच ॥४॥
जाला प्रेतरूप शरिराचा भाव। लक्षियेला ठाव स्मशानींचा ॥१॥
वैराग्याच्या शेणी लागल्या शरीरा। ज्ञानाग्नि भरभरा जिवित्वेंसी।३।
फिरविला घट फोडिला चरणीं। महावाक्यध्वनी बोंब जाली ॥ ४ ॥
दिली तिळांजुळी कुळनामरूपासी। शरीर ज्याचें त्यासी समर्पिलें ॥५॥
तुका म्हणे रक्षा जाली आपींआप। उजळला दीप गुरुकृपा ॥६॥

दिव्य आत्मसाक्षात्काराचा मार्ग म्हणजे सतीचें वाण किंवा सुळावरची पोळी आहे, अशी सर्वच स्वात्मानुभवी महात्म्यांची प्रचीति आहे, मग ते भारतीय असोत अथवा परदेशस्थ असोत.

---

१ एक वर्षपर्यंत.

परंतु सध्यांच्या युगांतील भौतिक ज्ञान हीच काय ती अखिल विश्वाच्या ज्ञानाची परिसीमा अशी ज्यांची समजूत असेल, त्यांना मात्र वरील वर्णनांत केवळ कविकल्पनाच दिसेल.

श्रीसमर्थांसारख्या वैराग्यमूर्तीस जर इतके कष्ट सोसावे लागले, तर सामान्य माणसानें या नादाला लागूं नये हें बरें असें कोणी म्हणेल, तर त्याचें समाधान 'करील प्रेत्न जितुका। तयास लाभ तितुका' या समर्थवचनानें होईल. लहान भांडवलावर थोडा व्यापार नि बेताबाताचा नफा; लक्षावधि नफा पाहिजे तर क्रोडों रुपयांचें भांडवल हवें आणि व्यापहि प्रचण्ड हवा. 'जितुका व्याप तितुकें वैभव' थोर व्यापार ठाकेना जनीं। म्हणोनि केली रखतवानी [1]। राज्यसंपदा तयाचेनी। प्राप्त कैंची ॥

समर्थांच्या सारखा परमार्थाचा दिव्य अनुभव पाहिजे असेल तर निर्मल भाव, कडकडीत वैराग्य, तीव्र तपश्चर्या, असीम निष्ठा इत्यादींचें भांडवलहि तसेंच भरपूर पाहिजे. इतरांनींहि निराश होण्याचें कारण नाहीं. भाव तसा देव !

भाव चि दृढ जाला। हरि सन्निध त्याला ॥ध्रु०॥ वर्णावर्ण स्त्रीशूद्रादिक। धरितां नामरतीला ॥ १ ॥ प्रेमभरें हरिकीर्तनिं नाचत। लाजविलें लाजेला ॥२॥ रामीं दासपणाचा आठव। सहजीं सहज विराला ॥३॥ कोणीहि निराश होण्याचें कारण नाहीं. सदाचारयुक्त शुद्ध भावपूर्वक नामस्मरण हा सर्वांना सुगम असा मार्ग आहे. त्या मार्गानें गेलें असतां कोणालाहि भगवत्प्राप्ति निःसंशय होते, अशी सर्व संतमहात्म्यांनीं ग्वाही दिली आहे.

## ३ सर्ग–कोणकोणतीं तीर्थें पाहिलीं ?

समर्थांनीं पाहिलेल्या सर्व तीर्थांची क्रमवार यादी मिळणें शक्य नाहीं. त्यांचीं उपलब्ध पद्यें आणि त्यांच्या पूर्वचरित्रकारांनीं दिलेली माहिती यांच्यावरच आपली जिज्ञासा भागविली पाहिजे.

---

१ शाईचा वापर

कारण, येक्या ग्रामीं सारूनि स्नान । येक्या गांवीं भिक्षा भोजन । येक्या खेड्यांत करिती शयन । अनुसंधानीं जागत ॥४८॥ शय्या भूमितटे दिशोपि वसने । विरक्त वाक्य दिधलें मान्य । सर्वांगामाजीं येक कौपीन । पात्र उपपात्र हस्तांजळी ॥४९॥ भू पर्यटतां वैराग्य-भरें । भूकताहनाचा पडतसे विसर । नामामृत वसे हृदयीं सार । कायाक्लेश न वाटे ॥५१॥ देहीं असोन पूर्ण विदेही । धनमान-ईषणीं चाड नाहीं । वृत्ति जडलीसे श्रीरामपायीं । वदले पणवाक्य[1] ऐका तें ॥५२॥ –दा. वि. धाम.

जठरीं लागो क्षुधा । होत नाना आपदा । भक्तिप्रेम सदा न सोडी सत्य ॥१॥ शब्द न फुटे जरी । चिंतीन अंतरीं । भक्तिप्रेम परी न सोडी सत्य ॥३॥ दाहूं वडवानळ अथवा दंशू काळ भक्तिप्रेमबळ न सोडी सत्य ॥३॥ नानापरी आघात चिरकाळ होवोत । रामीं प्रेमामृत न सोडी सत्य ॥४॥ आतांचि हा देहो राहो अथवा जावो । रामीं प्रेमभावो न सोडी सत्य ॥५॥ म्हणे रामीरामदास वरी पडो आकाश । राघवाची कांस न सोडी सत्य ॥६॥

मागील सर्गांतील मेरूस्वामींनीं केलेल्या वर्णनाचें प्रत्यंतर या समर्थांच्या स्वतःच्या पदांत पूर्णपणें मिळत आहे ! तेव्हां अशा निर्वाणवृत्तीनें यात्रा करणाऱ्या महापुरुषाच्या प्रवासाचें सविस्तर वर्णन कोणाला सांपडेल ? शिवाय, अनोळखी प्रदेशांत व माणसांत हिंडण्याची समर्थांना फार आवड.

कोण कैंचा रे भिकारी । भीक मागे दारोदारीं ॥१॥ ऐसें म्हणती तेथें जावें । सुखें वैराग्य करावें ॥२॥ लोक पुसती कोण काय । पुसों जातां सांगों नये ॥३॥ आहे ब्राह्मण विदेशी । नाहीं ठाऊक आह्मांसी ॥४॥ रामीरामदास म्हणे । कोण आहे कोण जाणे ॥५॥

अशा अज्ञातवासांत हिंडणाऱ्या महापुरुषांच्या तीर्थयात्रेची माहिती आपणास घ्यावयाची आहे. प्रथम ती त्यांच्या स्वतःच्या पद्यांतून पाहूं.

---

१ प्रतिज्ञा.

## १ डफगाणें

विश्वेश्वर घुष्मेश्वर । रामेश्वर सोमेश्वर । माणकेश्वर कुणकेश्वर काळेश्वर ।।१।। धारेश्वर पारेश्वर। मलकार्जुन भीमाशंकर । नाटेश्वर वटेश्वर । पिंपळेश्वर ।।२।। बकेश्वर वांकेश्वर गुप्तेश्वर बेलेश्वर । सिद्धेश्वर संकेश्वर हरेश्वर ।।३।। कडकेश्वर खडकेश्वर घाटेश्वर पाटेश्वर । कोपेश्वर धोपेश्वर सिद्धेश्वर ।।४।। संगमेश्वर कनकेश्वर तारकेश्वर कोटेश्वर। मोरेश्वर भुलेश्वर पांडवेश्वर ।।५।। समुद्रेश्वर रुद्रेश्वर चापेश्वर कपाळेश्वर। मुक्तेश्वर सर्वेश्वर नागेश्वर ।।६।। मातापुर तुळजापुर जोगेश्वरी पंढरपूर । नर्सींपुर कोल्हापुर सप्तशृंग ।।७।। त्रिंबक शंभुचें शिखर वैजनाथ कपिलेश्वर। स्वामी कार्तिक केदार व्यंकटेश ।।८।। रघुनाथ कृष्णनाथ वैजनाथ जगन्नाथ । दिगंबर लोकनाथ ज्वाळामुखी ।।९।। सुब्रह्मणी रंगनाथ बनशंकरी सोमनाथ । अष्टभैरव नवनाथ सोळा सिद्ध ।।१०।। हिंगळाज हरिद्वार नाना लिंगांचा विस्तार। भूमंडळीं नाहीं पार कोण जाणे ।।११।। खंडेराव भवनेश्वरी क्षेत्रपाळ जोगेश्वरी । खंडेश्वरी भुवनेश्वरी जाखमाता ।।१२।। देव देवता देवतें भूमंडळीं भुतेंकेतें । येक आत्माचि समस्तें चालवितो ।।१३।। दास म्हणे रे वावडा आधीं त्यासी ठाईं पाडा । पापपुण्याचा निवाडा तेथें होतो ।।१४।।

## २ अभंग

सकळ तीर्थांसी आधार । तो विचार सारासार ।।ध्रु०।। अयोध्या मथुरा माया । काशी कांती द्वारावती ।।१।। तुळजापुर पंढरपुर । नर्सींपुर कोल्हापुर ।।२।। नागनाथ वैजनाथ । जगन्नाथ त्रिमलनाथ ।।३।। मोरेश्वर भुलेश्वर । औन्द संभुचें शिखर ।।४।। नासीक त्रिंबक भीमाशंकर । माभळेश्वर हरेश्वर ।।५।। पाहिलें पेंबर जेजुरी । सोनारी ते जोगेश्वरी ।।६।। रंगनाथ रामेश्वर । नाना स्थळींचे ईश्वर ।।७।। परमेश्वरी परमेश्वर। भूमंडळीं हरिहर ।।८।। उत्तर मानस दक्षिणमानस । करितां होती कासाविस ।।९।। रामीरामदास म्हणे । अधिक महिमा कोटीगुणें ।।१०।।

## ३ पद

कावेरी गिरिजासमा । निरुपमा ॥धृ०॥ वाहतसे जळ खळबळ खळखळ खळाळ खंडकिं कांठीं हो । उकळ्या उसळे तरंग लाटा सुरवर येती भेटी हो ॥१॥ रंगमंदिर वैकुंठविळास वासुदेव तो रंगेश । प्रत्यक्ष परमेश्वर तो पद माथां धाता वंदी महेश ॥२॥ करी आटण ऐकोनि पट्टण आलों श्रीरंगधामा । भोंवतीं कावेरी अघवारी स्नानें तारी बहु महिमा ॥३॥ किती कालवे पाट जाती नाना बीजें बहु पिकती । जन[1] जयवंत[2] भक्ति मुक्ति देवराज नांदती ॥४॥

## ४ तीर्थावळी दंडीगाण

स्वर्ग मृत्यु आणि पाताळीं । देव राहती तिन्ही ताळीं । येक राहाती अंतराळीं रे रे रे रे । स्थळें निराळीं निराळीं रे ॥१॥ माझा राम तो जेथें तेथें । आत्मारामेविणें रितें रे रे रे रे ॥ ध्रु ॥ सर्व तीर्थांमध्यें कासी । गति होते पूर्वजांसी । धन्य धन्य ते पंचक्रोसी रे रे रे रे ॥ अमर इछिती मरणासी रे ॥ २ ॥ रामेश्वरा कावडी नेती । पुण्य उदंड सांगती । देवदर्शनें होते गति रे रे रे रे। लोक उदंड बोलती रे ॥ ३ ॥ उडपेचा कृष्णनाथ । कावेरी रंगनाथ । वडिया जगन्नाथ रे रे रे रे । देव नांदतो समर्थ रे ॥४॥ इच्छा धरूनि रामअवतारीं । उभी राहिली कन्याकुमारी । तीर्थ चालतें अद्यापिवरी रे रे रे रे। काय सांगावी तेथील थोरी रे ॥ ५ ॥ वेंकटेशा यात्रे जाती । लोक उदंड कानग्या वाहाती । आणि नैवेद्य उभ्या खाती रे रे रे रे । रचना उदंड सांगती रे ॥ ६ ॥ श्रीशैलीं महिमा आहे । साठीं वरुषें वाट पाहे । लोक बहुतेक न राहे रे रे रे रे। तेथ पाताळगंगा वाहे रे ॥७॥ आंवढ्याचा नागनाथ । परळीचा वैजनाथ । सोरटीचा सोमनाथ रे रे रे रे। देव नांदतो समर्थ रे ॥ ८ ॥

---

१ दास, सेवक. २ समर्थांच्या अनेक नामांत 'जयवंत' हेंहि एक आहे. हें पद बाडांक ९७९ मध्यें आहे.

सेवाळें घुष्मेश्वर। पश्चिमेचा भीमाशंकर। हिमाचळींचा हिमकेदार रे रे रे रे। तीर्थें महिमा तो अपार रे ॥ ९ ॥ बारा वरुषा सिंहस्थासी। मिळे यात्रा ते गंगेसी। जाती नासिका त्रिंबकासी रे रे रे रे। पुण्य मोठें प्रदक्षणेसी रे ॥ १० ॥ लोक हरेश्वरा जाती। घरींचीं घुमोंचि लागती। आंगा ब्राह्मणसंमंध येती रे रे रे रे। जन्मांतरींचे निवडिती रे ॥ ११ ॥ माणदेशीं महादेव। तेथें उदंड मोहोत्साव। मिळे यात्रा समुदाव रे रे रे रे। साखरीचा संभया देव रे ॥ १२॥ कृष्णाउशमीं महादेव। तळ कोंकणींचा भार्गव। गोकर्ण तें अपूर्व रे रे रे रे। धन्य होताती मानव रे ॥१३॥ शक्तीचें माणकेश्वर। लक्ष्मीचें कोल्हापुर। सुब्रह्मणी फणीवर रे रे रे रे। पक्षतीर्थीचें खेचर रे ॥ १४ ॥ शिवकंची विष्णुकंची। महिमा अरुणाचळाची। ठाईं ठाईं नरहरीची रे रे रे रे। थोर महिमा अयोध्येची रे ॥ १५ ॥ ज्वाळामुखीं ते अंबिका। सप्तशृंगींची चंडिका। हिंगळाज ते काळिका रे रे रे रे। भद्रगिरीचा राम ऐका रे। ॥ १६ ॥ कामाक्षी बनशंकरी। मीनाक्षी जोगेश्वरी। आदिशक्ति भुवनेश्वरी रे रे रे रे। किती येक ते जळांतरीं रे ॥ १७ ॥ लोक उदंड द्वारके जाती। माया मात्रा कावे[1] नेती। कृष्णातें पाहोनि येती रे रे रे रे। तीर्थमहिमा सांगती रे ॥१८॥ मातापुर तुळजापुर। पोहा चालतो अपार। भक्त मिळती थोर थोर रे रे रे रे। तेणें दाटले देवद्वार रे ॥ १९ ॥ लिंगाकार पृथ्वी आहे। लिंगमहिमा पाहे। त्यासी उपमा न साहे रे रे रे रे। लिंगरूप हें सकळ आहे रे ॥ २० ॥ भीमातीरीं पंढरपुर। तेथें किर्तनाचा गजर। नामघोष वारंवार रे रे रे रे। भक्त मिळती अपार रे ॥ २१ ॥ ठाईं ठाईं खंडेराव। बहुजनांसी उपाव। भरे यात्रा मोहोछाव रे रे रे रे। रोकडाचि तो पावे देव रे ॥ २२ ॥ क्षेत्रपाळ सांगों किती। देव ठाईं ठाईं असती। दुरीदुरीचे लोक येती रे रे रे रे। तेथें रोकडी सप्रचीती रे ॥ २३ ॥ महीमंडळीं चिंतामणी। ठाईं ठाईं

---

१ कोवळा नारळ.

घातलीं ठाणीं। न बोलवे महिमा कोणी रे रे रे रे। लोक बोलती पुराणीं रे ॥ २४ ॥ आदिशक्ति ठाईं ठाईं। स्थळें सांगों किती काईं। तेथें होईजेना उतराई रे रे रे रे। भक्त दाटले ठाईंच्या ठाईं रे ॥२५॥ ठाईं ठाईं विष्णुमूर्ति। पुण्यक्षेत्रा नाहीं मिती। कीर्ति पुराणें बोलती रे रे रे रे। नाममात्रें होते गती रे ॥२६॥ देव नांदती अपार। येकाहूनि येक थोर। किती सांगावा विचार रे रे रे रे। भक्त पावती पैलपार रे ॥२७॥ देवस्थानें उदंड होती। आतां जाले म्लेंछ नृपती। ठाईं ठाईं उरूस भरती रे रे रे रे। कीर्ति उदंड सांगती रे ॥२८॥ आत्माराम तो ठाईं ठाईं। नांदे म्लेंछाचें हृदईं। तेथें फोडुनी पाहाती काई रे रे रे रे। तेणें करितां चाले सर्वंहि रे ॥२९॥ दास म्हणे देव हा येक। येर सकळहि माईक। पाहाणें तो अंतर्विवेक रे रे रे रे। तेणें होतसे सार्थक रे ॥३०॥

या चारीहि[1] पद्यांत वर्णनें भिन्न भिन्न प्रकारचीं असलीं तरी त्यांचें मुख्य सूत्र एक– 'स्वर्ग, मृत्यु, पाताळ, अंतराळ या सर्व ठिकाणीं अनेक देव देवता आहेत, तथापि माझा राम तो जेथें तेथें। आत्मारामेंवीण सर्व रितें॥ देव देवता देवतें। भूमंडळीं भुतें-केतें। येक आत्माचि समस्तें। चालवितो॥' या सर्व तीर्थक्षेत्रांचें जो अधिष्ठान – आत्माराम 'आधीं त्यासी ठाईं पाडा' कोठेंहि आणि केव्हांहि गेलात तरी 'अंतर्विवेक' करून सर्व तीर्थक्षेत्रांस आधारभूत असा जो आत्मदेव त्याचें दर्शन सारासार विचारानें घ्यावें; तें मुख्य आहे.

आत्मा वर्तवितो शरीर। तोचि देव उत्तरोत्तर। जाणीव-रूपें कळिवर। विवेकें वर्तवी ॥१०॥ तो अंतर्देव चुकती। धांवा घेऊन तीर्था जाती। प्राणी बापुडे कष्टती। देवास नेणतां ॥११॥ दा. १८–८

सांप्रतच्या यात्रेकरूंस यात्रेला निघाल्यानंतर मागें घराचें कसें होईल व प्रवासांतून सुखरूप परत कसें येऊं ही चिंता, हमाल,

१ वरील एक, दोन व चार पद्यें हीं बाडांक ४६९ व ६१८ मधील आहेत.

तांगे, मोटर-ड्रायव्हर, गाडींतील सहप्रवासी, तसेंच तीर्थोपाध्याय इत्यादिकांशीं भांडाभांडी आणि खर्चिलेला पैसा व झालेले परिश्रम यांचा मोबदला म्हणून शेवटीं पदरांत असमाधान. प्रवासाचा शिणवठा न बाधला म्हणजे भाग्य! याचें कारण 'तो अंतर्देव चुकती' हें आहे–ज्याच्यासाठीं तीर्थक्षेत्रांस जावयाचें त्या मुख्य देवास विसरल्यामुळें या सर्व यात्रेकरूंस घरीं दारीं कष्टच भोगावे लागतात! यास्तव श्रीसमर्थ म्हणतात–

**दास म्हणे रे बावडा[1] । आधीं त्यासी ठाईं पाडा ।** म्हणजे तीर्थयात्रेचें खरें पुण्य कोणतें तें ज्याचें त्यालाच कळेल. 'पाप पुण्याचा निवाडा। तेथें होतो।' तीर्थयात्रेस जाऊन जें मुख्य पुण्य–महत्त्वाचें ध्येय प्राप्त करून घ्यावयाचें तें हें.

श्रीसमर्थांनीं हें ध्येय गांठलें होतें–नव्हे ते ध्येयरूप झाले होते. त्या निश्चल ध्येयाशीं तन्मय होण्यासाठींच तर त्यांनीं हे सारे कष्ट करून 'देहाचें निदान' मांडिलें होतें. त्याबरोबरच लोकस्थिती-कडेही त्यांचें दुर्लक्ष नव्हतें. हें वरील पद्यांतील 'देवस्थानें उदंड होती। आतां जाले म्लेंच्छ नृपति। ठाईं ठाईं उरूस भरती रे। कीर्ति उदंड सांगती रे ॥२८॥ आत्माराम तो ठाईं ठाईं। नांदे म्लेंच्छाचे हृदयीं। तेथें फोडुनी पाहती काई रे। तेणें करितां चाले सर्वहि रे ॥२९॥' या दोन कडव्यांवरून ध्यानीं येईल.

## ४ सर्ग–तीर्थयात्राक्रम

हनुमंतस्वामीकृत बखरींत व दासविश्रामधामांत या तीर्थयात्रेचा कांहीं क्रम दिला आहे तो असा :–

टाकळीहून गोदातीरानें समर्थ प्रथम नाशिक, त्र्यंबकेश्वरला जाऊन नंतर त्रिस्थळीसाठीं काशीकडे निघाले. प्रयाग, काशी व गया या तिन्हींच्या यात्रेस 'त्रिस्थळी' म्हणतात. तिकडे जातांना नाशिक-माहूर-कारंजा-अकोला-भैरवगड-वाडीचा हनुमान-एलिच-पूर-बैतूल-छिंदवाडा-बालाघाट-भंडारा या गांवांवरून अंभोरा येथें

१ बावडा = भटक्या, प्रवासी.

जाऊन विवेकसिंधुकर्ते मुकुंदराज यांचे परमगुरु हरिनाथ यांच्या समाधीचें दर्शन त्यांनीं घेतलें; तेथून रामटेकवरील श्रीरामचंद्रजींच्या स्थानाचें दर्शन घेऊन छत्तीसगड विभागांतील राजीम आदिकरून रामक्षेत्रांचें दर्शन करीत ते चित्रकूटावरून प्रयागास गेले असावेत असा संशोधकांचा तर्क आहे व त्या तर्कास थोडासा दुजोरा देणारा पुरावाहि सांपडतो.

माहूर हें समर्थकालीं अध्यात्म विद्यापीठ व तपस्वी साधकांचें आश्रयस्थान होतें. गोसावी, बैरागी, महानुभाव, देवीभक्त, दत्तभक्त असे अनेक पंथांचे संतमहंत व त्यांचे अनुयायी यांचा रहिवास वर्षांतून अनेक दिवस या क्षेत्रांत होत असे. सातपुड्यांतील प्रवासाला येथून आरंभ होतो. या नित्यप्रवासी साधुसंतांच्या सहवासाचा लाभ व्हावा व पुढील मार्गाची योजना करितां यावी या हेतूनें श्रीसमर्थ कांहीं काळ येथें राहिले असावेत. समर्थशिष्य उद्धव यांच्या परंपरेंतील रुद्रराम-नागनाथ-लक्ष्मण-नारायण हंसादि पुरुषांनीं पुढें माहुरास तपश्चर्या केल्याचा हंसपद्धतींत उल्लेख आहे. माहुरच्या उत्तरेस असलेलें कारंजें आज सामान्य प्रतींतलें गांव असलें तरी समर्थकालीं तें चांगलें संपन्न व व्यापारी महत्त्वाचें शहर होतें. श्रीशिवछत्रपतींच्या प्रतापराव गुजरांनीं या शहरावर एकदां स्वारी केली होती. अर्थात् ती समर्थ तेथून गेल्यानंतर बरेच वर्षांनीं झाली. श्रीदत्तावतार श्रीनृसिंहसरस्वती (गुरुचरित्रांत ज्यांचें वर्णन आहे) यांचा जन्म येथेंच झाला. समर्थांच्या दोन शिष्यांचे– एक बालकराम ऊर्फ रामठेंगा व दुसरे प्रल्हाद यांचे मठ या गांवीं आज विद्यमान आहेत. हे मठ यात्राकालींच स्थापिले गेले अथवा नंतर, हा प्रश्न अद्यापि अनिर्णीत आहे.

कारंजाहून समर्थ अकोल्याकडे वळले. अकोल्यास रामदासी मठ असून तो अकोल्याच्या बाहेर नदीच्या पलीकडे त्यावेळीं निर्जन असलेल्या भागांत बांधिलेला आहे. हा मठ समर्थांनीं स्थापिला नसून त्यांचे शिष्य माधव यांनीं प्रस्थापिला असला तरी रामदासस्वामी अकोल्यास येऊन गेले असल्याची परंपरागत माहिती

मठांतील मंडळी सांगतात. या मठाच्या भोंवतीं कालांतरानें जी लोकवस्ती झाली तिला सांप्रत हनुमान वस्ती म्हणतात. अकोल्याहून पुढें समर्थ सातपुडा पर्वताच्या परिसरांत शिरले. त्या भागांत भिल्ल गोंड कोरकू हळब वगैरे वन्य जमातींची वस्ती पूर्वकालापासून असून त्यांचें आराध्यदैवत श्रीराम आजही आहे. या लोकांत रामोपासना पेरून त्यांच्याकरितां वाणनदीच्या कांठीं डोंगरांतील एका रमणीय कड्यावर समर्थांनीं मारुतीरायाची स्थापना केली. मूर्ति भव्य सहा फूट उंच आहे. त्यास वारीचा किंवा वाडीचा हनुमान म्हणतात. तेल्हारा येथून हें स्थान जवळ आहे. ( गोंड भिल्ल वगैरे लोक 'ड'चा उच्चार 'र' करितात. ) अकोला जिल्हा गझेटिअर मध्यें (पा. ३९५) या स्थानासंबंधीं पुढील माहिती दिली आहे.

Wari Bhairavgarh is a deserted village on the Wan river in the extreme north-west of Akot taluq. Though remote, it is of considerable religious interest .... An image of Hanuman, over six feet in height and with a striking face is said to have been set up by Ramdas Swami.

भावार्थ– "अकोट तालुक्याच्या वायव्य कोंपऱ्यास वाण नदीच्या कांठावर 'वाडी भैरवगड' नामक एक पडीक गांवठाण आहे. हें स्थान अगदीं एका अंगास असलें तरी त्याचें धार्मिक महत्त्व विशेष आहे. येथील वनश्री फार सुंदर आहे. सहा फूट उंचीची मारुतीची भव्य मूर्ति येथें असून तिची स्थापना रामदासस्वामींनीं केल्याचें सांगतात. या वन्य प्रदेशांत संचार करीत असतां हातीं शस्त्र असावें असें समर्थांच्या मनांत आलें; तेव्हां एका सिद्ध पुरुषानें त्यांस एक जंगली लाकूड ( टोणपा ) दिलें आणि गोरक्षनाथांनीं येऊन तीरकमटा दिला. तो तीरकमटा कोठें गेला समजत नाहीं; पण श्रीसज्जनगडीं श्रीपादुकांजवळ एक वांकडी तिकडी कांठी मात्र आहे. तीच बहुधा तो सिद्धपुरुषाचा 'टोणपा' असावा.

तेथून समर्थ पुढें एलिचपुरला गेले. एलिचपूर त्या वेळीं इमादशाहीच्या राजधानीच्या वैभवांत होतें. तोंडाच्या खलबत्त्यांत

कुटलेला विडा सद्‌गुरूंना खलबत्त्यासह अर्पण करणारे भोळाराम येथलेच अशी कित्येकांची कल्पना आहे. भोळारामाचा मठ येथें होता; त्या मठांतील मारुतीची मूर्ति (मुख वगळून) समर्थांच्या सारखी आहे असें सांगतात. बैतूलच्या जवळ कोसा दीड कोसावर डोंगरकठडीस असेंच एक श्रीसमर्थस्थापित मारुतीचें स्थान आहे. अद्यापि तेथें प्रतिवर्षी रामनवमीस यात्रा भरत असते. विवेकसिंधु-कर्ते यांची समाधि म्हणून बैतुलाजवळ एक स्थान दाखविलें जातें. विवेकसिंधु–परमामृतादि मकुंदराजांच्या ग्रंथांचें अवलोकन करीत समर्थ कांहीं काळ तेथें राहिले असावेत.

बैतुलहून छिंदवाडा - बालाघाट - भंडारा या गांवांहून समर्थ वैनगंगेच्या कांठीं असलेल्या आंभोऱ्यास गेले. जयत्पाळ राजा आंभोऱ्याचाच असावा असा संशोधकांचा तर्क आहे. तेथें मुकुंद-राजांचे आजेगुरु हरिनाथ यांच्या समाधीचें दर्शन घेऊन रामटेक व छत्तिसगडाकडील राजीम आदिकरून रघुनाथक्षेत्रें पहात समर्थ अमरकंटकावरून चित्रकूटास गेले.[१] चित्रकूट हें श्रीरामप्रभूच्या वनवासांतील निवासाचें एक स्थान. श्रीतुलसीदासजींना दर्शन-साक्षात्कार याच क्षेत्रीं झाला व नंतर त्यानीं आपल्या सुप्रसिद्ध श्रीरामचरितमानसाच्या रचनेस आरंभ केला. समर्थांच्या पुरश्चरण-कालांत शके १५४५ च्या श्रावणमासीं त्यांनीं काशीक्षेत्रीं देह विसर्जन केला. श्रीरामाच्या व रामभक्तांच्या लीलांनीं प्रसिद्ध असलेल्या या क्षेत्रीं समर्थहि कांही काळ रमले.

तेथून पुढें ते काशीस कांहीं दिवस राहिले. तेथील पितृश्राद्धादि तीर्थविधि करावयाचा तो केला, पण त्या विधींतील रहस्य जाणून केला. पुढील अभंग पहा–

---

१ नाशिक ते चित्रकूटपर्यंतच्या प्रवासाचें हें वर्णन अकोल्याचे श्री. त्रिंबक रामकृष्ण गद्रे वकील यांच्या लेखांचे आधारें दिलें आहे. भोळाराम औरंगाबादेकडील होते असें बखरीवरून दिसतें

अंतरीं गुरुवचन । बाह्य नापिकवपन ॥ १ ॥ अंतरबाह्य शुद्ध जालों । रामदर्शनें निवालों ॥ २ ॥ मन मुंडिल्या उन्मन जालें । शिर मुंडिल्या काय केलें ॥ ३ ॥ दासें तीर्थविधि केला । रामीं पिंड समर्पिला ॥ ४ ॥ स. गाथा. १८४

मनकर्णिकेमाझारीं । स्नानसंकल्प निवारी ॥ १ ॥ स्नान केलें अंतरंगा । तेणें पावन जाली गंगा ॥ २ ॥ रामकृपेचें वाहे जळ । रामदासीं कैंचा मळ ॥ ४ ॥ स. गा. १७७

फळ जालें तर्पणीं । संसारासी पडलें पाणी ॥२॥ देवराया तृप्त केलें । भावें आत्म निवेदिलें ॥३॥ रामदासाचें तर्पण । सर्व केलें रामार्पण ॥ ४ ॥ स. गा. १८५

विश्वेशं माधवं धुंडि दंडपाणिं च भैरवम् ।
वन्दे काशीं गुहां गंगां भवानीं मणिकर्णिकाम् ॥

हीं काशी क्षेत्रांतील पवित्र स्थानें त्यांनीं अवलोकिलीं. आज जेथें मोठी मशीद आहे तेथेंच त्यावेळीं श्रीविश्वनाथाचें देवालय होतें. त्यास मशिदीचें रूप पुढें श. १५९१ त औरंगजेबानें दिलें. काशीस गंगातीरीं हनुमान घाट आहे. त्या वेळींहि होताच; पण तेथें मारुतीराय नव्हते, ती स्थापना समर्थांनीं केली. आजहि ती मूर्ति तेथें विराजमान आहे. त्या प्रतिष्ठापनेस्तव व इतर कार्यास्तव त्यांना काशीस सुमारें ६ महिने रहावें लागलें.

तेथून प्रयागास त्रिवेणी संगमाचें स्नान व श्राद्धादि विधि करून गयेस जाऊन त्यांनीं गयावर्जन केलें. याप्रमाणें त्रिस्थळी यात्रा संपादून समर्थ अयोध्येस गेले. मुक्तिपुरी अयोध्या, श्री रामप्रभूची राजधानी! तें पवित्र शरयूतीर! त्या सर्वांच्या दर्शनानें समर्थांचा भक्तिप्रेमसागर कसा हेलावला असेल!! दशरथरायाच्या राजभुवनांत जेथें श्रीरामजन्म झाला त्या स्थानीं समर्थांच्या वेळीं वैभवसंपन्न असें सुंदर मंदिर होतें. त्याचें दर्शन दुर्दैवानें आपणांस आज होत नाहीं; आतां तेथें मशीद झाली आहे! पण मेरुस्वामीसारख्या प्रेमळ रामभक्तांचा भक्तिभाव ज्यांच्या ठिकाणीं उत्कटत्वानें असेल, त्यांस शके १५५५–६० च्या सुमाराचेंच

काय, पण त्याहूनहि अत्यंत प्राचीन–श्रीरामकालीन म्हणाना–अशा अयोध्येचें अद्‌भुत दिव्य दर्शन घडेल.

श्रीसमर्थ केवळ एकदांच अयोध्येस गेले असतील असें नाहीं; अनेक वेळां जाऊन आले असतील. त्यांपैकीं एक वेळचे प्रवासांत अनंत मौनी व मेरुस्वामी ही शिष्य-प्रशिष्य जोडी त्यांचे बरोबर होती. त्या प्रवासाचें मनोहर वर्णन मेरुस्वामींनीं रामसोहळ्यांत (९–२) जें केलें आहे त्यांतील थोडेसें पुढें दिलें आहे:–

निजवेधक स्वभावस्थिति । भक्तिसमारंभें गर्जना करिती । कीर्तनाच्या गजरें अयोध्येप्रति । चालिले समर्थ स्वसुखें ।। ४४।। समर्थसहवासी अनंत संत । सप्रेमें नाचति आनंदभरित । रामकीर्तनें मार्ग क्रमित । आरोळ्या देती नामगजरें ।। ४५ ।। राम अवतरला सर्वांप्रति । जाहला रामवेध महास्थिति । ठसावली राममूर्ति । श्रीरामपिसें अनिवार ।। ४६ ।। स्वानंदाश्रूंनीं पाझरती नयन । सप्रेमयुक्त प्रतीतीनें पूर्ण । थरकती रोमांच चमत्कारोन । कांपती गदगदा ।। ४९ ।। स्तब्ध अंतःकरण स्तंभीभूत । पराकाष्ठा निचेष्टित । लोटांगणीं दंडवत । पडती भूमीवरी ।।५०।। स्वानंदगारेचें जीवन । विघरोन तटस्थता संप्रज्ञान । सगुणनिर्गुणवेध कीर्तन करिती प्रभुपुढें ।। ५१ ।। सुनीळ तेज गाळीव चोखडें । मनोहर रामाचें रूपडें । ठाणठकारें चहुंकडे । उभें ठाकलें सुंदर ।। ५३ ।। प्रत्यक्ष पिसें केलें दर्शनीं । ईक्षणें अवलोकित मजलागूनि । तेणें अंतर्भाव वोसरोनि । दाटे रघुवीर ।। ५६ ।। नेणो येतो अवचट कैसा । आंगीं भरे विस्मयासरिसा ।। अनिवार प्रेमाचा वळसा । आलोट लोट न सांवरे ।। ५७ ।। भरीव सुखवेधें उत्कट । निज हृदयींचाचि होय प्रकट । निघोट[1] सुखें पिसेंचि अवचट । लाऊनि सोडी ।। ५८ ।। नुमजे चि उमजवी पष्ट । त्याचेनि मी जालों पिसाट । काय करूं प्रेमें हृदयस्फोट । सुखेंचि प्राण घेतो ।। ५९ ।। हे श्रीरामाची झडपण । जाली न दिसे गुणागुण । अयोध्येच्या मार्गी स्वानंदघन । समर्थसहवासें ।। ६० ।। रामस्मरणें आकाश फुटे । निरवकाश अनुसंधान प्रगटे । अमरवृन्द

१ पूर्ण.

पाहों लोटे । सुमनवृष्टि तोषें ॥ ६२ ॥ रामस्मरणसंकीर्तन होय । तेणें पडसादें नभहृदय । दाटोनि तैसेंचि गाय । पूर्ण प्रतिध्वनीनें ॥ ६३ ॥ पाहा रामनिवास मनोहर । ज्ञानपताकांनीं अर्चिलें अंबर । चित्तचि चित्तरत्नसार । कळस हारी शोभती ॥ ७४ ॥ रामचित्सूर्याचें मंदिर । प्रकाशघन चिदंबर । खेचरदृष्टीनें अगोचर । हृदयासि आलें ॥ ७६ ॥ नगरदृष्टीनें पाहतां । राम भेटों आला तत्त्वता । स्वानंद मिठी वस्तुता । त्रिपुटी मावळली ॥ ७७ ॥ ऐसें स्वच्छंदें अनुवादत । मार्ग विक्रमिला समस्त । विश्रांतीचा शरयूप्रांत । अवचट देखिला ॥ ८० ॥ निर्मळ वाळवंट शरयूचें । प्रकाशवज्रकिरणपांसूचें । पाहातां पाहातां दृष्टीचें । तेज तटस्थ होय ॥ ८२ ॥ मनें देखोनि शरयूचें तीर । लोळण घातलें स्वसुखें निर्भर । शरयूदर्शनें चि रघुवीर । हृदयासि आला ॥ ८३ ॥

अशा या भक्तिप्रेमाच्या मुक्तिपुरींत संतमहात्म्यांच्या भेटी घेत समर्थ अकरा महिने विसांवले; त्या अवधींत अयोध्यामाहात्म्य श्रवण करून तेथून निघतांना त्यांनीं श्रींची आज्ञा घेतली आणि पुढें गोकुळ, मथुरा, वृंदावन हीं तीर्थें केलीं. ज्या ज्या तीर्थीं जावें, तेथील देवदेवतांचीं साक्षात्कारपूर्वक दर्शनें घेऊन कांहीं दिवस राहून, शिष्यसांप्रदाय करून, त्या क्षेत्राठाईं मठ करून देऊन, शिष्यास पूजा सांगून ठेविते जाले. फिरत फिरत द्वारकेस गेले, तेथें श्रीनाथजींचें दर्शन घेऊन, तेथील संप्रदाययुक्त तीर्थविधि करून तेथें श्रींच्या मूर्ति स्थापून, शिष्यसंप्रदाय जाले ते तेथें ठेविले. गोकुळवृंदावनासी समर्थ गेले । कृष्णकान्हयासी परमप्रीति भेटले । कृष्णें घोंगडी कांठी कुवडी प्रसाद दिधले । कृष्ण जाडी आवडे समर्था । स. प्र. ३–१९. नंतर समर्थ उत्तर हिमालयाकडे वळले. बद्रिनारायणाच्या अलीकडे श्रीनगर येथें त्यांना एक नानकपंथी महंत भेटले. 'त्यांणीं स्वामीस नमस्कार करून बहुत पृच्छा केली. यांनींहि समाधानयुक्त उत्तरें केलीं. अनुभवास आलीं. जितके जितके प्रश्न केले तितक्यांचीं उत्तरें अनुभवसिद्ध प्रत्ययास आलीं.' त्यावरून 'अनुग्रह व्हावा' अशी विनंति त्या महंतांनीं केली.

तेव्हां समर्थांनीं समजूत घातली कीं 'एक वेळ अनुग्रह जाला असतां दुसरियानें घेऊं नये. तुमची मर्जी असेल तर श्रीरामउपासना–पूजा करावी ' असें सांगून हुर्मुजी वस्त्रें व जपाची माळ त्यास दिली. पुढें समर्थ हिमालयाच्या अंतर्भागांत शिरले. पंचप्रयाग व्यास–वसिष्ठाश्रमादि पवित्र स्थानें त्यांनीं पाहिलीं. बदरीकेदार व बदरीनारायण यांचें प्रत्यक्ष दर्शन घेऊन हनुमंताश्रमांत श्रीश्वेतमारुतीच्या स्थानीं गेले. निद्रिस्त ध्यान तेथें आहे; तेथें मनुष्याचें गमन नाहीं, त्या स्थानीं स्वामी गेले. तेथें कांहीं दिवस वास केला. त्या स्थानीं शीतोपद्रव बहुत जाला, म्हणून मारुतीरायाचें स्तवन केलें. मारुतीरायांनीं प्रकट होऊन 'स्वआंगींची काढूनि मेखळा । लेववून स्वकरें सावध केला ।' आणि त्या हुर्मुजी मेखळेचा पूर्ववृत्तांत सांगितला, तो असा–वना निघाले जंव चापपाणी । श्रीगुरु वसिष्ठें कृपा करूनि । स्वांगींचें हुर्मुजी वस्त्र काढोनि । लेववुनि 'विजय हो ' म्हणे ॥११४॥......अवनिजावरें सिंहासनीं आरूढतां ॥११७॥ प्रसादमेखळा स्वकरें करूनि । मज लेववीला कोदंडपाणी । ते तुज वोपिली तरी येथूनि । विजय सर्वार्थीं पावावें ॥११८॥ या रंगवस्त्रानें भ्रमभ्रांति उडे । तप साधि त्यासी सिद्धि घडे । दास स्वानंदीं सद्वृत्ति जडे । विसरचि पडे देहबुद्धि ॥११९॥दा.वि.धाम९.

अशा प्रकारें हिमालयांतील परिभ्रमण चाललें असतां (कदाचित् मानससरोवर-कैलासपर्वत या भागांत असेल) एका अत्यंत निवांत व रमणीय स्थानीं स. प्रतापकार सांगतात, समर्थांच्या अंत:करणांत एक विचारतरंग असा उद्भवला कीं, प्रपंचमाया मिथ्या आहे। वैराग्यभाग्य अचळ[1] पाहे। ज्ञानविज्ञान सिद्धचि राहे। परब्रह्म स्वयें निजवस्तु ॥६॥ आतां 'काय प्रयोजन या देहाचें?' म्हणोनि हिमाळयकुंडीं समर्थ बुडी देती । रघुनाथजी समर्थासी वरिच्या वरि धरिती ॥७॥ 'कशाला हा देह ठेवावयाचा?' समर्थ म्हणाले 'काय याचा उपयोग?'

---

१ शाश्वत

श्रीरामरायांनीं सांगितलें– तुम्हासी जगोद्धार करणें आहे । तुमची तनु ते आमुची तनु पाहे । दोनि तपें तुमची रक्षिली काया हे । धर्मस्थापनेकारणें ॥८॥ केवळ वैराग्य तीव्रतर केलें । अन्न-वस्त्रविवर्जित भलें । आतां लोक पीडा पावतील दुष्काळें । कां जे तुम्ही ईश्वरतनु म्हणोनियां ॥५॥ 'अग्निहोत्री, राजा, संन्यासी, देवद्विज मुनि संत साधु' हे उपवासी राहतील तर 'राष्ट्र भंग होईल निश्चयेसीं ।' तुम्ही उपवासी राहूं लागला तर देवांना उपांशीं रहावें लागेल, भूदेव वस्त्रहीन होतील आणि सगळे लोक दरिद्री होतील, म्हणून 'तुम्ही अन्नवस्त्र भूषणें धरावीं ॥११॥ येक वेष तुम्ही न धरावा । येक वेष तुम्ही न करावा । भोग त्याग विवेकें विवरावा । त्यागात्याग सर्वज्ञपणें ॥१२॥ तदनंतर श्रीराम-आज्ञा दयाळें न मोडिलीं । समर्थें वस्त्रभूषणें अन्नें आंगिकारिली । विश्व आनंदविलें सुकाळीं । सुरनरपन्नगत्रिभुवन हें ॥१३॥ स.प्र.३

एक दिवस हिमालयांतच एका भयंकर ठिकाणीं समर्थ जाऊन पोहोंचले. पुढें मार्ग दिसेना, मागील वाट सांपडेना, तहानेनें घसा सोकलेला, बसायला छाया नाहीं. समर्थ तेथेंच उभे राहिले; तोंच कमंडलुभर उदक घेऊन श्रीगुरुदेवदत्त तेथें प्रकट झाले आणि 'करवूनियां उदक प्राशन । नेलें अवचटा शिखरावरी॥११२॥ तेथें श्रीदत्तांनीं समर्थास 'निर्छायादि सांगूनि योग समस्त । मणका अमोल्य ईश्वरदत्त । पायां स्वहस्तें बांधिला ॥११५॥ दा.वि. धाम १० बदरीनारायणाहून समर्थ काश्मीरकडे गेले.श्रीबद्रीनारायणाचे जवळ हनुमानचट्टी आहे. तेथील मारुतीस्थापना समर्थांनीं केली असावी असा कित्येक समर्थभक्तांचा विश्वास आहे. तेथून ते पुढें पूर्वेकडे वळले. कामरूप ( आसाम ) प्रांतांतील क्षेत्रें पाहून पूर्व समुद्रतीरीं जगन्नाथ क्षेत्रास गेले. तेथें कांहीं काळ वास्तव्य करून मठस्थापना व मूर्तिप्रतिष्ठा केली; आणि तेथील पूजाअर्चादि व्यवस्था पद्मनाभ नामक एका तत्रस्थ शिष्यास सांगून पुढें पूर्वसमुद्रतीरानें दक्षिणेकडे निघाले. मार्गांत कोणी शरण येतील त्यांस कृपानुग्रह करावा, मठ चालविण्याइतकी योग्यता ज्याची दिसेल त्यास मठ करून द्यावा,

असें करीत करीत कन्याकुमारीपर्यंत जाऊन पोहोंचले. श्रीरामेश्वराचें दर्शन पूजन भाषण करून सेतुबंधस्थानीं श्रीमारुतीराय आहेत त्यांचें दर्शन घेतलें. देवाभक्तांच्या गुजगोष्टी झाल्या. तेथून निघावें तों मारुतीरायांनीं लंकेस जाण्याची गोष्ट काढली. 'पंचवटीस तुमचे पुराणप्रसंगीं अशोक वाटिकेंतील पुष्पें तांबडीं कीं पांढरीं याचा निर्णय करून घेण्यास्तव मी लंकेस गेलों, त्या वेळीं बिभीषणांनीं तुम्हांस एक वेळ लंकेंत आणावें असें मला सुचविलें व मीं तें मान्य केलें आहे. तेव्हां तुम्हीं लंकेस आलें पाहिजे.' असें मारुतिरायांनीं म्हणतांच, समर्थ म्हणाले 'जशी आपली आज्ञा.' लगेच दोघेहि लंकेस अंतरिक्षमार्गं गेले. तेथें कांहीं दिवस बिभीषणाच्या आग्रहावरून राहून कथाकीर्तनादि करून बिभीषण व मारुतिराय यांचा संतोष केला आणि त्यांची आज्ञा घेऊन परत सेतुबंधास आले.

सध्यांच्या भूगोलाच्या नकाशांत लंका दिसत नाहीं आणि अर्वाचीन संशोधकांस ती अद्यापि सांपडली नाहीं. तेव्हां बिभीषण चिरंजीव असून लंकेस त्याचें राज्य आहे ही रामायणी कथा काल्पनिक, अर्थात् समर्थांचें हें लंकागमनहि काल्पनिकच असें कित्येकांस वाटेल; म्हणून या प्रसंगाचा थोडासा अधिक विचार करूं. श्रीरामकृष्णपरमहंसांच्या चरित्रांत एक प्रसंग असा वर्णिला आहे कीं "परमहंस एकदां समाधिअवस्थेंत बालभावानें चैतन्यसागराच्या तीरीं खेळत असतां त्यांस तेजोमय देहाचे सात ध्यानमग्न तपस्वी दिसले; त्या प्रत्येकाच्या गळ्यास मिठी मारून हलवून त्यास सावध करण्याचा प्रयत्न परमहंसांनीं केला. त्यांत फक्त एकानें तेवढे डोळे उघडून रामकृष्णांकडे हास्यमुखानें पाहिलें व लगेच तो ध्यानस्थ झाला. बाकीचे तसेच ध्यानावस्थेंत राहिले; परमहंस सांगत, ज्यानें डोळे उघडून पाहिलें तोच पुढें नरेन्द्रनाथ दत्त म्हणून जन्मला" आणि हा नरेंद्रनाथ दत्त पुढें परमहंसांचा पट्टशिष्य स्वामी विवेकानंद म्हणून विख्यात झाला. आतां "तो चैतन्य सागर व त्याच्या तीरावरील सप्तर्षि खरे कशावरून? स्थूल दृष्टीला तर ते दिसत

नाहींत! व बुद्धीसहि त्यांचें अस्तित्व आकलन होत नाहीं!" असें कोणी विचारील तर त्याचें समाधान असें कीं, पंच ज्ञानेंद्रियें हीं जड असून त्यांच्या द्वारां होणारें विश्वाचें ज्ञान हें अल्प, खंडीत पाव रती सुद्धां म्हणतां येणार नाहीं, इतकें अत्यल्प, सध्यांच्या संशोधकांस व शास्त्रज्ञांस झालें आहे. विश्वाचें व्यक्त स्वरूपच इतकें अनंत व अपार आहे कीं, जन्मच्या जन्म व पिढयान पिढया संशोधनांत घालविलेल्या शास्त्रज्ञांसहि त्याचा पुरा पत्ता अद्यापि लागत नाहीं विश्वाचा हा जो दृश्य पसारा दिसतो व अनुभवास येतो, त्याच्या अनंत पट त्याचें अव्यक्त रूप आहे. म्हणून पाश्चिमात्य शास्त्रज्ञांनीं केलेलें संशोधन परिपूर्ण समजून त्याच्या आधारें अमुक गोष्ट नैसर्गिक व अमुक निसर्गविरुद्ध असा सिद्धान्त ठोकणें चुकीचें होईल. पाश्चिमात्य विद्वानच आतां असें मान्य करूं लागले आहेत कीं, "जडसृष्टीस आधारभूत असलेली अशी एक दिव्य विश्वव्यापी व सूक्ष्मतर अध्यात्म व मानससृष्टि असून ती स्थूल इंद्रियांच्या पलीकडे आहे. भौतिक जडसृष्टीच्या व्यतिरिक्त असलेल्या या सूक्ष्म अध्यात्म व मानस सृष्टीला हीं पदार्थविज्ञानाचीं मोजमापें लागूंच शकत नाहींत.[१]" ज्यांच्या संशोधनाच्या जिवावर आमच्या भौतिकवाद्यांचें निसर्गज्ञान उसळ्या मारून साधुसंत व ऋषिमुनि यांच्या विधानांचें व घडलेल्या चमत्कारांचें खंडण करूं पहाणार, ते पाश्चिमात्य शास्त्रज्ञ संशोधक या मानस व अध्यात्मशास्त्रांचे बाबतींत अद्यापि बाल्यावस्थेंतच आहेत. भारतीय आत्मवेत्ते त्या दोन्ही शास्त्रांत आज युगानुयुगें पोहत आले आहेत. त्यांच्यावर अविश्वास करणें युक्त नव्हें. आध्यात्मिक प्रश्न आध्यात्मिक साधनांनींच खुलासेवार सुटतात. म्हणून श्रीरामकृष्ण परमहंसांनीं पाहिलेले ते चैतन्य सागरीचे सप्तमर्हषि, श्रीसमर्थांचें लंकागमन, स्वामी रामतीर्थांचा सगुण साक्षात्कार अथवा अशाच प्रकारचे इतर संतचरित्रांतील चमत्कार यांजविषयीं अनादर न करितां त्यांचें

---

१ पहा–डॉ. वि. म. भटकृत योगसिद्धि व ईश्वरसाक्षात्कार पृ. ७७ व २७१

चिंतन सद्भावपूर्वक मनांत चालू ठेवावें. भगवत्कृपेनें त्याविषयींचा संशयनिरास ज्याच्या त्याच्या पात्रतेप्रमाणें पुढें मागें केव्हां तरी होऊन जातो. पण प्रथमपासूनच अनादर व अविश्वास ठेविला, तर शंकानिरसन करणाऱ्या अनुभवाचें द्वारच बंद होतें. अस्तु.

श्रीमारुतीरायाची आज्ञा घेऊन श्रीरामेश्वराहून समर्थ निघाले ते हाटकेश्वर–आदिरंग–मध्यरंग–शेषाचलादि व्यंकटेशक्षेत्रें, विरूपाक्ष–सुब्रह्मण्य–अरुणाचलादि शिवस्थानें, श्री शंकराचार्य–रामानुजाचार्य–मध्वाचार्यादिकांचीं आचार्यपीठें, ऋष्यमूक–पंपा-सरोवर–शबरी–जटायू–अगस्त्याश्रम वगैरे श्रीरामचरित्राशीं संबधित असलेलीं पवित्र स्थानें, शिव–विष्णुकांची, पक्षीतीर्थ, श्री शैल्य पर्वत, गोकर्ण महाबळेश्वर इत्यादि तीर्थक्षेत्रें पहात पहात परशुरामक्षेत्रीं (चिपळूण) आले. प्रत्येक ठिकाणीं समर्थांस क्षेत्रदेवतेचें सगुण दर्शन होत असे; अर्थात् त्या त्या स्थानीं कांहीं प्रार्थना–संभाषणादि प्रकार होत असतीलच. ते सर्व कळण्याइतकें आपलें भाग्य नाहीं. परशुरामक्षेत्रीं केलेल्या प्रार्थनेचे पांच श्लोक तेवढे आज उपलब्ध आहेत. पण तेवढ्यावरून श्रीसमर्थांचे अंतरंगांत कोणते विचारतरंग नित्य उठत असतील, याची थोडीशी कल्पना करितां येईल.

महाकोप अग्नी रुषी जामदग्नी । समर्था तया जाणिजे सर्व सूज्ञीं ॥ सदा सर्वदा घेतसे नाम तूझें । वरिष्ठा स्वभावेंचि हें गोत्र माझें ॥१॥ वसे सागराचे तिरीं सूत तूझा । समाचार तो घेत नाहींच माझा ॥ तयाला बहूतां परी शीकवावें । स्वभावेंचि वोढेल ऐसें करावें ॥२॥ कितीयेक मागें बहु युद्ध केलें । किती वेळ या ब्राम्हणां राज्य दिल्हें ॥ अकस्मात सामर्थ्य तें काय जालें । युगासारिखें काय नेणों विझालें ॥३॥ चिरंजीव आहेसि ऐसी वदंती । समर्था तुझें चित्त काठिण्य कीती ॥ तुझे नामधारी तुला हें कळेना । कृपाळूपणें चित्त कैसें वळेना ॥४॥ नको रे उदासीन हें वाक्य मानी । समर्था असावें बहू साभिमानी ॥ करावी दिनानाथ हे सत्य वाचा । तुला चिंतितों दास मी राघवाचा ॥५॥ – करुणाष्टकें २०

वाचकांचे लक्षांत असेलच कीं समर्थांचें गोत्र जमदग्नि होतें. जमदग्नीचा पुत्र परशुराम. वरील श्लोकपंचकांतील दुसरा श्लोक जमदग्नि महर्षीस उद्देशून असून बाकीच्यांत परशुरामाची प्रार्थना आहे. जमदग्नीस समर्थ विनंति करितात, "आपला पुत्र येथें समुद्र-तीरीं (चिपळुणास) असतो. आपल्याच गोत्रांतला मी असून आपला मुलगा माझी वास्तपुस्त कांहींच करीत नाहीं. तेव्हां त्याला असें कांहीं शिकवा कीं, जेणेंकरून त्याचें लक्ष मजकडे वेधेल. परशुरामांनीं पूर्वीं ब्राह्मणांच्या कैवारास्तव किती तरी युद्धें केलीं! आणि त्यांचें तें सगळें सामर्थ्य आज गेलें कोठें? कां कलियुगांत सगळ्या चांगल्या गोष्टी लुप्तप्राय झाल्या, त्याबरोबर भार्गव-सामर्थ्यहि संपलें? देवा परशुरामा, तुम्ही चिरंजीव आहांत; अर्थात् सध्यांची धर्मग्लानि व लोकांच्या हालअपेष्टा तुम्हांस दिसत आहेत पण त्यावर तुम्हीं कांहींच उपाय योजीत नाहीं! केवढा हा तुमचा कठोरपणा! आतां उदासीन राहूं नका; स्वधर्माचा अभिमान धरून 'दिनानाथ' हें आपलें ब्रीद सार्थ करा!"

स्वधर्मानुकूल राजसत्तेविना जनतेचें दैन्य दूर होत नाहीं; म्हणून धर्मराज्य मिळवून द्या असें या श्लोकांत समर्थ परशुरामास विनवीत आहेत. 'किती वेळ या ब्राह्मणां राज्य दिल्हें ।' या चरणा-कडे इंग्रजांनीं उत्पन्न केलेल्या कलुषित मनाच्या विकृत दृष्टीनें पाहून त्यांतील समर्थमनोगताचें आकलन नीट होणार नाहीं. त्या साठीं श्रीदासबोध, श्रीसमर्थांची कविता इत्यादि समर्थकाव्यांतून ब्राह्मणांचीं कर्तव्यें, ब्राह्मण शब्दाची व्याख्या, ब्राह्मणांची आचार-पद्धति आणि त्याबरोबरच शिवरायासाठीं जगदंबेजवळ समर्थांनीं मागितलेलें 'एकचि मागणें," दा. १८–६ व शंभु छत्रपतीस पत्र यांत त्यांनीं वर्णिलेले शिवरायांचे दैवी गुण, शिवराज्यास दिलेली राम-राज्याची उपमा, या सर्व समर्थोक्तींचा समुच्चयानें विचार करावा, म्हणज 'ब्राह्मणां राज्य दिल्हें' या उद्‌गारांचा ध्वन्यर्थ लक्षांत येईल. असो. चिपळूणहून समर्थ कृष्णेच्या उगमस्थानीं क्षेत्र महाबळे-श्वरीं गेले. त्यांच्या भावी लोकोद्धाराचा प्रारंभ पुढें याच स्थानीं

झाला. त्या दृष्टीनें महाबळेश्वर क्षेत्राची विशेष पाहणी त्यांनीं या वेळींच करून ठेविली असणें शक्य आहे.

महाबळेश्वराहून भीमाशंकर, शिखरशिंगणापूर, पंढरपूर इत्यादि क्षेत्रीं जाऊन समर्थ त्र्यंबकेश्वरावरून पंचवटीस (बहुधा श. १५६४ चे शेवटीं किंवा १५६५ चे प्रारंभीं) पोहोंचले. तेथें श्रीरामप्रभूचें दर्शन घेऊन 'बारा वर्षेंपर्यंत झालेल्या तीर्थयात्रेचें पुण्य श्रीचरणीं अर्पण असो' असें साष्टांग प्रणिपातपूर्वक समर्थांनीं म्हणतांच श्रीरामरायांनीं संतुष्ट होऊन मस्तकीं वरदहस्त ठेविला आणि 'आतां तुम्हीं श्रीकृष्णातीरीं जाऊन जगदोद्धार करणें' म्हणोन आज्ञा केली. त्यावर समर्थांनीं विनंति केली कीं, 'सांप्रत (श. १५६५) सिंहस्थ आहे, तेव्हां श्रीगंगाप्रदक्षिणा करून व त्याबरोबरच मातुःश्री व ज्येष्ठ बंधु यांचें दर्शन घेऊन श्रीचरणदर्शनास पुनः येतो आणि नंतर आज्ञेप्रमाणें कृष्णातीरीं जातों.'

याप्रमाणें श्रींची आज्ञा घेऊन समर्थ टाकळीस आले. तेथें उद्धवास भेटून 'गंगाप्रदक्षिणा झाल्यावर कृष्णातीरीं राहणेस जाऊं, तेव्हां तुम्हांस बोलावून घेऊं,' असें त्यास समजावून सांगून त्र्यंबकेश्वरापासून श्रीगंगाप्रदक्षिणेस त्यांनीं आरंभ केला.

## ५ सर्ग–पैठणची घार

गंगाप्रदक्षिणा करीत समर्थ पैठणास आले ते तेथें कांहीं दिवस थांबले; रोज श्रीनाथांचे वृन्दावनापाशीं अथवा वाळवंटांत कीर्तन करीत. त्या कीर्तनांनीं लोकांना वेध लाविला. 'पायांत पादुका, हातीं माळ, गळ्यांत मेखळा, मस्तकीं जटाभारटोप, काखेंत कुबडी, अंगावर हुर्मुजी वस्त्र नि पाठीशीं गलोल' अशा वेषानें कधीं कधीं गांवांतून हिंडत. अशाच वेषानें एक दिवस घाटावरून चालले होते. तेथें स्नानसंध्या करणाऱ्या ब्राह्मणांनीं त्यांना विचारलें 'महाराज, आपला आश्रम कोणता ? आणि हा पाठीशीं गलोल बाळगतां तो कशास्तव ?'

'ब्रह्मचर्याश्रम!' समर्थांनीं उत्तर केलें. 'श्रीरघुपतीचे दास आह्मी, स्वेच्छाविहारी; अन् हा गलोल खेळण्यासाठीं आहे'.

'अस्सं?' पृच्छक म्हणाले, 'निशाणबाजीचा कांहीं अभ्यास आहे कीं नाहीं?'

'हो, हो' समर्थ उत्तर देतात.

'ती पहा वर घार घिरट्या घेत आहे; धरा पाहूं तिच्यावर नेम' पृच्छक ब्राह्मणांनीं विनोद केला. तत्काळ समर्थांनीं गलोलानें एक खडा वर फेकला आणि घार खालीं मरून पडली! सगळे क्षेत्रस्थ त्या ठिकाणीं जमले आणि समर्थांस म्हणूं लागले "तुम्ही ब्राह्मण, ब्रह्मचारी दिसतां, हा तुमचा साधुवेष, कथाकीर्तनें करतां तुम्ही, अन् घार मारतां! काय म्हणावें याला? केवढा हा अधर्म!"

"महाराज, मला काय? आपण भूदेव, आपली आज्ञा मी मानिली!" भोळी मुद्रा करून समर्थांनीं प्रत्युत्तर केलें.

"वाः, कोणी कांहीं म्हटलें तरी, करणारानें थोडा विचार करायला नको का? हकनाक त्या पांखराला मारलें! पैठण-सारख्या पुण्यपावन क्षेत्रांत प्रत्यक्ष गंगातीरीं इतक्या सगळ्या क्षेत्रस्थांच्या देखत ही अकारण हिंसा तुम्हीं केली! केवढें पाप हें! आतां तुम्ही प्रायश्चित्त घेतलें पाहिजे." सगळे प्रेक्षक कलकलाट करूं लागले.

'बरं आहे; आपली आज्ञा होईल तसं करतों.' समर्थ लीनतेनें म्हणाले. तत्काळ सर्व योजना होऊन समर्थांस विधिपूर्वक सक्षौर प्रायश्चित्त देण्यांत आलें.

'झालांत तुम्ही आतां शुद्ध!' प्रायश्चित्तविधीच्या शेवटीं सगळे एकदम गरजले.

'अहो, पण ही घार तशीच पडली आहे ना अजून! मग मी शुद्ध झालों कसा?' घारीकडे पाहात समर्थ उद्गारले.

"सदोष कर्म घडलें असतां प्रायश्चित्त द्यावें-घ्यावें एवढी शास्त्राज्ञा आहे; त्याप्रमाणें प्रायश्चित्तविधि होऊन तुम्ही दोषमुक्त झाला असें शास्त्र सांगतें. ती घार राहीना तशीच. मृत जीव कोठें

पुन: जिवंत होत असतो का ? कांहीं तरी बोलावें म्हणजे काय?" क्षेत्रस्थांनीं भडिमार केला.

'प्रायश्चित्त घेण्यास शास्त्राज्ञा आहे आणि मृत जीव उठविण्याला नाहीं ! आश्चर्य वाटतें." त्या घारीकडे पहात समर्थ म्हणाले. 'पाहूं बरें शास्त्राज्ञा काय आहे ती.' असें म्हणत समर्थांनीं घारीच्या अंगावरून हात फिरविला आणि तिला म्हणाले 'जा बाई, तुझीं पिलें वाट पाहत असतील; जा आपल्या घरट्याकडे.'

त्याबरोबर घार गेली भुर्रकन वर उडून; पाहणारे सगळे चकित होऊन समर्थांस शरण आले; समर्थांनीं गलोल खालीं टाकून त्यांना साष्टांग नमस्कारपूर्वक विनंति केली, 'महाराज, आपण साक्षात् भूदेव–मूर्तिमंत वेदशास्त्र! आपल्याच आशीर्वादाचें हें फळ. श्रीरामकृपेनें आपण काय न कराल? घार जिवंत झाली हें सामर्थ्य आपलेंच होय !'

## ६ सर्ग–मातृदर्शन आणि गंगाप्रदक्षिणा

या चमत्कारानंतर समर्थांच्या कीर्तनास अलोट गर्दी जमूं लागली. त्या गर्दींत एक दिवस जांबेकडचा एक ब्राह्मण कीर्तनश्रवणास आला होता. कीर्तनकाराकडे टक लावून पाहत असतां त्याच्या मनांत आलें, २०।२२ वर्षांपूर्वीं लग्नांतून निघून गेलेला सूर्याजीपंतांचा धाकटा मुलगा तर हा नव्हे ? चेहऱ्याची ठेवण आणि ते मस्तकींचें आवाळू यांकडे पुरतें लक्ष जातांच त्याचा संशय गेला. कीर्तन संपतें न संपतें तोंच तो समर्थांजवळ येऊन उभा राहिला आणि नमस्कार करून विचारूं लागला, 'आपण आमच्या जांबेच्या सूर्याजीपंतांच्या धाकट्या मुलासारखे दिसतां; आपलें नांव नारायण ना ?'

'होय' उत्तर मिळालें 'महाराज, आपण आपल्या देहाचें सार्थक केलेंत, फार उत्तम झालें; पण तिकडे ज्येष्ठ बंधु व आई यांची काय अवस्था झाली आहे? दोघेहि नित्य शोक करीत असतात. आईची तर

रडून रडून दृष्टि गेली ! आतां अगोदर त्यांची भेट घेऊन सांत्वन करा. आपणासारख्या साधुपुरुषाला हें काय मी सांगायला पाहिजे?'

'अगदीं योग्य सांगितलंत; मी हा निघालोंच तिकडे' असें म्हणत म्हणत समर्थ त्या ब्राह्मणास दिसेनासे झाले आणि दुसरे दिवशीं सूर्योदयीं जांबेच्या मारुतीपुढें त्यांनीं साष्टांग नमस्कार घातला! समर्थांना जांब सोडून तेवीस वर्षें होऊन गेलीं होतीं. या अवधींत त्यांच्या स्थितींत अंतर्बाह्य केवढा पालट पडला होता हें आपण येथवर पाहिलें. पण घरीं काय अवस्था होती ?

काय असणार? श्रेष्ठांनीं आपलीं नित्यनैमित्तिक कर्में संभाळून मातोश्रीचें समाधान करण्याचा प्रयत्न करावा आणि ' नारायणा कुठें असशील रे ? मला एकदां भेट ना, बाळ ! आतां नाहीं रे मीं तुला लग्नाची भीड घालायची ! तुझा शब्द माझ्या कानीं कधीं पडेल का रे ? या जन्मांत मला भेटशील का ? नारायणा ऽऽ –' असें आक्रंदत त्या शोकविव्हल मातेनें डोळ्यांतून पाणी गाळीत असावें, हा नित्याचा क्रम होऊन बसला होता ! तिचें समाधान करतां करतां श्रेष्ठहि थकले. पुढें काय करावें असा विचार त्यांस पडला.

एक दिवस सूर्याजीपंतांच्या अनुष्ठानापासून मागचा सगळा इतिहास आईपुढें त्यांनीं सविस्तर मांडला. अनुष्ठानाच्या उद्यापनाचे दिवशीं झालेलें सूर्यदर्शन व वरदान, नंतर दोन महिन्यांनीं झालेलें श्रीराम–दर्शन व श्रीराममूर्तीची प्राप्ति, दोघांहि मुलांस दर्शनास पैठणला नेल्यावेळीं श्रीनाथांनीं काढिलेले भविष्योद्गार या सर्व गोष्टींचें स्मरण विस्तारपूर्वक आईस देऊन श्रेष्ठ तिला विचारतात–यांपैकीं पुष्कळशा गोष्टी आमच्या नेणतेपणांतील अथवा आमच्या जन्मापूर्वीच्या तुम्हींच तर आम्हांस सांगितल्या. आमच्यापेक्षां तुमचा अनुभव यांत विशेष आहे. तुम्हीच सामान्य माणसांसारखे नित्य शोक करूं लागलांत, तर आम्हीं लेंकरांनीं आपलें समाधान कसें करावें ?

त्या गतगोष्टींच्या स्मरणानें राणुबाईस थोडें समाधान वाटलें; त्या म्हणाल्या, "बाबा, तूं ही सगळी आठवण करून दिलीस, फार बरें झालें, नारायण एकदम निघून गेल्यानें माझ्या मनाला जो धक्का बसला, त्यांत हें सगळें मी पार विसरून गेलें होतें बघ. आतां मनाला थोडा धीर आला; समाधान वाटलें.' त्यानंतर श्रेष्ठांनीं आत्मानात्म विचारहि आईला मधून मधून सांगावा. इतकें सगळें झालें तरी आईच्या अंत:करणांतील नारायणाची आठवण बुजणार कशी? 'नारायण कधीं भेटेल बरें? त्याच्या भेटीची फार इच्छा आहे रे' असें रोज एकदां तरी राणुबाईंनीं म्हणावेंच. पुत्रशोकानें खंगून जाऊन म्हातारी एका कोंपऱ्यांत टिपें गाळीत गुडघ्यांत डोकें घालून बसलेली असे. तिचे असे दिवसामागून दिवस चालले होते आणि एक दिवस सकाळींच अंगणांत 'जयजय रघुवीर समर्थ' चा घोष तिच्या कानीं आला. नंतर 'नसे मानसीं नष्ट आशा दुराशा। वसे अंतरीं प्रेमपाशा पिपाशा।। ऋणी देव हा भक्तिभावें जयाचा। जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।१।। खणखणीत आवाजांत म्हटलेला हा श्लोक व पुन: 'जयजय रघुवीर'चा गजर! तो ऐकून म्हातारीस वाटलें, कोणीतरी भिक्षेकरी आला असावा; म्हणून त्या सुनेस (श्रेष्ठपत्नी) म्हणाल्या 'मुली! बाहेर गोसावी आला आहे कुणी, त्याला भिक्षा घाल बरं' त्याबरोबर ओसरीवर चढत चढत समर्थ उद्गारले 'हा कांहीं भिक्षा घेऊन जाणारा गोसावी नव्हे!' हे शब्द आईच्या कानावर गेले मात्र, लगेच तिचें अंत:करण आनंदानें भरून गेलें; चेहरा प्रफुल्लित झाला; हर्षभरानें कंठ दाटून येऊन तोंडांतून शब्द फुटेना, इतक्यांत नारायणाचें मस्तक मातोश्रीच्या' चरणांवर टेंकलें गेलें. 'कोण! माझा नारोबा? नारोबा माझा? करीत त्या वत्सल मातेनें नारायणाला घट्ट पोटाशीं धरिलें. 'होय, आई, तुझाच नारायण.' समर्थांच्या मुखांतून कसेबसे अस्फुट शब्द बाहेर पडले. त्या मूर्तिमंत वात्सल्याच्या दर्शनानें त्यांनाहि गहिं- वरून आलें होतें. परस्परांच्या नेत्रोदकानें परस्परांस न्हाऊं घालीत होतीं तीं दोघे मायलेंकरें! 'नारायण आला? खरंच माझा

नारायण आला ? तूं माझा नारायणच का रे ?' गाय जशी वांसराच्या सर्वांगास प्रेमानें चाटीत असते, तसा राणुबाईच्या प्रेमाचा हात नारायणाच्या आपादमस्तक सर्वांगावरून फिरत होता. तिला वाटलें, मला भ्रम तर झाला नाहीं? का हें सगळें स्वप्नच? ध्यानीं मनीं कांहीं नसतांना एकदम येऊन हा पायांवर डोकं ठेवतो, हें आहे तरी काय? खरें कीं खोटें हें?' अशा संभ्रमानें तिचें मन बावरलें असतां तिचे हात मात्र नारायणाचें सर्वांग चाचपीत होते. मस्तकींचा जटाभार हातास लागला; 'लग्नांतून गेला तेव्हां असा नव्हता जटाभार,' आईच्या मनांत आलें. ते अर्गळेसारखे जाड दंड, ती भरदार छाती, त्या पुष्ट मांड्या, ती दाढी नि त्या जटा हें सगळें तिनें सावकाशपणीं चाचपून पाहिलें. आणि हें आपल्या लेंकराचें भव्य शरीर पाहण्याचें नाहीं आपल्या भाग्यांत असें वाटून तिनें मोठा सुस्कारा टाकला. तिला राहवेना; ती रडत रडत उद्गारली ‘ बाळा नारायणा, तुझें हें रूप आतां कोणत्या डोळ्यांनीं मी पाहूं रे?' मातेचे हे दुःखोद्गार ऐकतांच नारायणानें तिच्या डोळ्यांवरून आपला हात फिरविला आणि काय चमत्कार? आईला चक्क दिसूं लागलें! प्रेमानंदातिशयानें हृदय भरून येऊन आई आपल्या मुलास वत्सलतेनें न्याहाळूं लागली. १५।२० वर्षांत सगळें जग तिच्या दृष्टीला पारखें झालें होतें. आणि नारायणाच्या हस्तस्पर्शानें एका क्षणांत तिला सगळें पूर्ववत् दिसूं लागलें! ! प्रेमानें कुरवाळीत आई मुलास विचारते 'बाबा! या भूतचेष्टा तूं कुठें शिकलास?' मुलानें उत्तर दिलें——

होतें वैकुंठींचे कोनीं। शिरलें अयोध्याभुवनीं। लागे कौसल्येचे स्तनीं। तेंचि भूत गे माय ॥१॥ जातां कौशिक राउळीं। अवलोकिली भयंकाळी। ताटिका ते छळूनि मेली ॥ तेंचि भूत ॥ध्रु०॥ मार्गीं जातां वनांतरीं। पाय पडला दगडावरी। पाषाणाची जाली नारी ॥ तेंचि० ॥२॥ जनकाचे रंगणीं गेलें। शिवाचें धनु भंगिलें। वैदेहीअंगीं संचरलें। तेंचि० ॥ ३ ॥ जेणें सहस्रार्जुन वधिला। तोही तत्काळाचि भ्याला। धनु देउनि देह रक्षिला। तेंचि० ॥४॥

पितयाचे भाकेसी । कैकयीचे वचनासी । मानुनी गेलें अरण्यासी ।। तेंचि०।।५।। चौदा संवत्सर तापसी । अखंड हिंडें वनवासी । सांगाती भुजंग पोसी । तेंचि०।।६।। सुग्रीवाचें पालन । वालीचें निर्दाळण । तारी पाण्यावरी पाषाण । तेंचि० ।।७।। रक्षी भक्त बिभीषण । मारी रावण कुंभकर्ण । तोडी अमरांचें बंधन । तेंचि ०।।८।। वामांगीं स्त्रियेसीं धरिलें । धावूनि शरयूतीरा आलें । तेथें भरतासी भेटलें । तेंचि०।।९।। सर्व भूतांचें हृदय । नाम त्याचें रामराय । रामदास नित्य गाय । तेंचि भूत गे माय ।।१०।। स. गाथा १७३९.

"या भूतचेष्टा नव्हत, आई! 'सर्व भूतांचें हृदय । नांव त्याचें रामराय।' त्या महद्‌भूताची ही लीला आहे लीला!" आपल्या नारायणाचें हें अद्‌भुत कर्तृत्व आणि तें भव्य नि दिव्य शरीर पाहून या लेंकरास किती पाहूं नि कोठें ठेवूं असें त्या आईस झालें ! तेवीस वर्षांच्या वियोगानें सांचलेलें तें मातृप्रेम! त्या प्रेमामृताचा जणुं वर्षाव चालला होता मुलावर !

ओसरीवर मायलेंकरांच्या भेटीचा हा प्रसंग चालला असतां देवघरांत श्रेष्ठ स्नानसंध्या करीत होते. त्यांच्या कानीं नारायणाच्या आगमनाची वार्ता गेली. त्याबरोबर ते तसेच हातीं यज्ञोपवीत घेऊन आईजवळ आले. त्यांना पहातांच नारायणांनीं साष्टांग नमस्कार घालून त्यांच्या चरणीं मस्तक ठेविलें. तेव्हां श्रेष्ठांनीं त्यांस वरचेवर उचलून मोठ्या प्रेमानें पोटाशीं धरिलें; उभयतांचे नेत्र प्रेमाश्रूंनीं पाझरूं लागले. त्या भेटीस उपमा केवळ भरत-भेटीचीच. तो आनंद काय वर्णावा ? ज्याचा त्याला ठाऊक. नंतर श्रेष्ठांचे हातीं यज्ञोपवीत पाहून 'हें काय ?' असें समर्थांनीं विचारिलें तेव्हां श्रेष्ठांनीं सांगितलें कीं बारा वर्षांनंतर भेट व्हावयाची तर ती देवतासन्निध व्हावी असें शास्त्र आहे आणि यज्ञोपवीतांत सूर्य नि गायत्री अशा दोन देवता आहेत, त्यांच्या सान्निध्यांत तुमची भेट घेतली. नंतर श्रेष्ठांनीं समर्थांस म्हटलें —

लावण्यसंपन्न तारुण्य नारी। कौशल्यता वैभव चित्त हारी॥
एकांत काळीं पडता समंधू। अभिलाष न धरी तो धन्य साधू॥

त्यावर लगेच समर्थांनीं उत्तर केलें––

स्वर्गांगना ते सन्मूख आली। लावण्यरूपीं दृष्टी न घाली॥
मुक्ताफळीं शूक उगाचि राहे। परंतु आरण्यमिरासि पाहे॥

आपल्या कृपेनें ब्राह्मण्यरक्षण होऊन परमार्थसाधन यथाशक्ति घडलें. असे अनेक प्रकारचे प्रेमसंवाद करीत सर्वांचीं भोजनें मोठ्या आनंदानें झालीं. असा प्रेमानंदाचा क्षण त्या घरास २२।२३ वर्षांत लाभला नव्हता!

प्रत्यहीं आईसह उभय बंधूचीं भोजनें झाल्यावर आईच्या जवळ बसून उभयतांची अध्यात्मचर्चा चालत असे. महिना दोन महिने तेथें राहून सर्व कपिल गीता मातेस समर्थांनीं समजावून सांगितली, श्रीरामदर्शन करविलें आणि नंतर त्या दोघांची अनुज्ञा घेऊन ते गंगाप्रदक्षिणेच्या पुढील मार्गास लागले. मुखाजवळ सप्तगोदावरीस प्रदक्षिणा करून व त्र्यंबकेश्वरास सव्य घालून ही गंगा प्रदक्षिणा त्यांनीं पूर्ण केली; पंचवटीस श्रीरामचरणीं सर्व वृत्त निवेदिलें. तेथून टाकळीस उद्धवाजवळ महिना पंधरा दिवस राहिले, तरी पंचवटीस दर्शनासाठीं प्रत्यहीं येत असत.

## ७ सर्ग–"हिमकुंडांत देह झोंकला!" याचा अन्वयार्थ

टाकळी येथील महिन्याभराच्या एकांतवासांत बारा वर्षांच्या प्रवासाचा शिणवठा घालविण्यासाठीं निरुद्योगीपणें समर्थ स्वस्थ पडून राहिले असतील असें मानणें चुकीचें होईल. 'चाळणेवीण एक क्षण जाऊंच नेदी॥' 'कष्ट करितां त्रासों नये। निरंतर॥' 'आधीं कष्ट मग फळ। कष्टचि नाहीं तें निर्फळ।' 'येके ठायीं बैसोन राहिला। तरी तो व्यापचि बुडाला' इत्यादि प्रकारें सततोद्योगाची शिकवण जगास स्वतःच्या आचरणानें देणारे सद्‌गुरु समर्थ केवळ विश्रांतीस्तव महिनाभर एकाद्या खेड्यांत स्वस्थ बसून राहणें शक्यच नाहीं. पाहिलेल्या परिस्थितीची चाळणा आणि

त्यावर योजावयाच्या उपायांची विवंचना ते जन्मभर करीत राहिले, तशीच ती या वेळींहि टाकळीस चालली होती. ' त्यांनीं पाहिलेल्या लोकस्थितीचें वर्णन टाकळी मठांतील एका परचक्रनिरूपणांत पुढीलप्रमाणें केलें आहे ––

(१) पदार्थमात्र तितुका गेला । नुसता देशचि उरला । येणें करितां बहुतांला । संकट जालें ॥२८॥ लोकें स्थानभ्रष्ट जालीं । कितेक तेथेंच मेलीं । उरलीं तें मराया आलीं । गांवावरी ॥२९॥ माणसा खावया धान्य नाहीं । आंथरूण पांघरूण तेंहि नाहीं । घर कराया सामग्री नाहीं । काय करिती ॥३१॥ कितेक अनाचारीं पडिलीं । कितेक याती भ्रष्ट जालीं । कितेक तें आक्रंदलीं । मुलें बाळें ॥३३॥ कितेकीं विषें घेतलीं । कितेक जळीं बुडालीं । जाळिलीं ना पुरलीं । किती येक ॥३४॥ ऐसें जालें वर्तमान । पुढेंहि अवघा अनमान । सदा दुश्चित अवघे जन । उद्वेगरूपी ॥३५॥ अद्यापि दुश्चिन्हें दिसतीं । दुष्टग्रह आडळतीं । पुढेंहि वाईट सांगती । किती येक ॥३६॥ कांहींच पाहतां धड नाहीं । विचार सुचेना कांहीं । अखंड चिंतेच्या प्रवाहीं । पडिले लोक ॥३७॥ येक म्हणती कोठें जावें । येक म्हणती काय करावें । विदेशा जाउनी काय खावें । वेंच नाहीं ॥३८॥ तथापि मार्गचि चालेना । भिक्षा मागतां मिळेना । अवघे भिकारीच जना । काय म्हणावें ॥३९॥ प्राणीमात्र जाले दुःखी । पाहतां कोण्ही नाहीं सुखी । कठिण काळें वोळखी । धरीनात कोण्ही ॥४०॥ लोक बहुत प्रस्तावले । कितीयेक जाजावले । कितीयेक ते कावले । उद्वेगरूपी ॥४१॥

हें परचक्र केवळ परकी राजसत्तेचेंच नव्हे, तर धार्मिक, सामाजिक–सांस्कृतिक– जें जें म्हणून स्वकीय असेल त्यांचा विनाश करणारें, राष्ट्रास सर्व बाजूंनीं धुळीस मिळविणारें हें परचक्र होतें, तत्कालीन देशस्थितिदर्शक असे किती तरी उतारे समर्थ-काव्यांतून देतां येतील. पुढील उद्‌गार वाचा :– (२) अकस्मात मागें भूमीकंप जाला । नभामाजि तारेंसि सेंडा निघाला ॥ तदारभ्य भूमंडळीं धुंदि जाली । नसे न्याय ना नीति सर्वें बुडाली ॥

(३) विसां लोकांत लोकांत येकचि राहिले । तेणें उदंड उदंड दु:खचि साहिलें ॥ हौस कैंची रे कैंची रे कैंची गायाला । कोठें जावें रे जावें रे जावें मागायला ॥ दास म्हणे रे भगवंता किती पाहसी सत्त्व । काय वांचोनी वांचोनी ने परतें जीवित्व ॥ किती धरावें धरावें धरावें तें सत्व । जाली शरीरें शरीरें शरीरें नि:सत्व ॥

याशिवाय दासबोध द. ३–५, ३–७, १४–७, व १५–२ हीं सर्व स्थळें नीट पहावीं, म्हणजे असल्या देखाव्यांनीं त्या महापुरुषाचें अंत:करण कसें शतधा विदीर्ण झालें असेल याची थोडीशी कल्पना येईल! 'काय वांचोनि वांचोनि न परतें जीवित्व ।' अशासारखे उद्‌गार हे सुखासीनतेंत बसलेल्या कवीचें काव्य नव्हे, सर्व देशभर पेटलेल्या दु:खदारिद्र्याच्या' वणव्यानें अहर्निश तप्त झालेल्या अंत:करणाचा हा भडका आहे! उगीच नाहीं समर्थांनीं हिमकुंडांत देह फेंकला! या भयंकर प्रसंगांतून सुटण्याचा मार्ग दिसेनासा झाला, तेव्हां ते आपल्या जिवलग रामप्रभूवर रागावून वैतागून म्हणाले, 'काय प्रयोजन या देहाचें? विश्वात्मा–नारायणाची प्रसंगानुरूप कांहीं सेवा या देहाकडून घडत नसेल, तर याला ठेवून काय करायचें आहे? घे हा तुझा तूं' 'हिमकुंडाच्या बुडींत' केवळ आध्यात्मिक आत्मनिवेदनच नसून त्या प्रसगीं श्रीसमर्थांसारख्या 'यत्न तो देव' म्हणणाऱ्या तपस्वी महात्म्यालाहि एकंदर लोक-स्थिति कशी बिकट व निराशाजनक झाली होती, याचें दर्शक म्हणजे 'ती हिमकुंडांतील बुडी' होय!

## ८ सर्ग–परसत्तेचें आक्रमण

भारतावर इस्लामी राजसत्तेचें आक्रमण होण्यास श. ६३४ मधील महंमद कासीमच्या स्वारीपासून आरंभ झाला, महंमद गिझनीच्या स्वारीनंतर त्याला विशेष जोर आला आणि महंमद घोरीच्या वेळीं त्याचे पाय भारतांत पक्के रोंवले गेले, एवढी कल्पना इतिहासाच्या सामान्य विद्यार्थ्यांस असूं शकते. पण या राजकीय आक्रमणाचा भारतीय लोकस्थितीवर किती दूरवर

परिणाम झाला तें शालेय इतिहासांत सांगितलें नाहीं व इतिहासहि सविस्तर दिला नाहीं. त्यामुळें वाचकाची समजूत होते कीं, एक राजा जाऊन त्याच्या जागीं भल्याबुऱ्या मार्गांनीं दुसरा आला यांत विशेष तें काय ? लोकांच्या नित्य व्यवहारांत फारसा फरक त्यामुळें पडावयाचा नाहीं. विधर्मी राजसत्तेचा दुष्परिणाम जनतेच्या जीवनावर कसा तीव्र व खोल होत गेला याची पूर्ण कल्पना शाळेंतल्या त्या तुटपुंज्या इतिहासावरून येत नाहीं. त्यासाठीं श्रीसमर्थभक्त नानासाहेब देव यांनीं आपल्या 'श्रीसमर्थावतार' या ग्रंथांत सुमारें ७५ पृष्ठें (११९-१९२) देशस्थितीचें जें साधार व सविस्तर हृदयविदारक असें वर्णन केलें आहे तें वाचकांनीं मुळांतूनच वाचावें, म्हणजे लोकांच्या जीवनाचे देशभर कसे धिडवडे चालले होते आणि लहानापासून थोरापर्यंत सगळे कसे हताश बनले होते--"मुकीं बिचारीं कुणी हांका"--अशा चतुष्पाद मेंढरांच्या अवस्थेस ते कसे पोहोंचले होते याची यथार्थ कल्पना येईल. त्या वर्णनाचा थोडासा भाग श्रीदासायनाच्या विषयपूर्तीस्तव येथें घेतला आहे.

या परकी सत्ताधाऱ्यांचे मुख्य दुर्गुण पुढीलप्रमाणें होते.

१. स्त्रिया व मुलें यांचा अपहार व विटंबना, २. मूर्तिभंग, देवालयांचा विध्वंस व त्यांची विटंबना, ३. लूट, जाळपोळ, धर्मांतर, कत्तल; ४. क्रौर्य, ५. धर्मवेडेपणा, ६. बेइमानी, ७ न्यायाचा फार्स आणि ८ विलास, ऐषआराम व लंपटपणा.

आरंभच कसा झाला पाहा ? शके ६३४ ( सन ७१२ ) चे सुमारास महंमद कासीमची सिंध प्रांतावर स्वारी झाली. ही भारतावर इस्लामची पहिली राजकीय चढाई होय. हजारों पुरुषांची कत्तल व धर्मांतर, हजारों कुलीन स्त्रियांची दासी म्हणून परदेशीं रवानगी, अनेक भव्य नि सुंदर देवालयांचा विध्वंस आणि अगणित संपत्तीची लूट या महमद कासीमनें केली आणि सिंध प्रांताचा उच्छेद केला. हा ज्या आक्रमणाचा 'श्रीगणेशा' त्याचे पुढील राक्षसी थैमान काय वर्णन करावें ?

गिझनीचा सबक्तगीन सिंधु नदीपर्यंतच कत्तल व लूटमार करीत आला, पण त्याचा मुलगा महमूद यानें तर शके ९२३ (सन १००१) पासून २७ वर्षांत १७ स्वाऱ्या केल्या व सौराष्ट्रांतील सोमनाथपर्यंत देशाच्या अंतर्भागांत प्रवेश केला. या सतरा स्वाऱ्यांची फलनिष्पत्ति थोडक्यांत अशी : अनेकांस गुलाम केलें, मूर्ति फोडल्या, देवळें उद्ध्वस्त केलीं, गांवें घरें जाळलीं, असंख्य हिंदु स्त्रीपुरुषांना कैद करून नेलें, नगरकोट, ठाणेश्वर, मथुरा, सोमनाथ यांसारखीं प्रसिद्ध क्षेत्रें लुटून भ्रष्ट करून अगणित संपत्ति नेली. तथापि हाही आघात उपरी होता, महंमूद गझनीनें भरतखंडांत आपली सत्ता कोठेंहि स्थिर अशी स्थापिली नाहीं. तुफान वाऱ्याची वावटळ येऊन मालमत्तेची नासधूस व्हावी, मनुष्य हानिहि व्हावी, पण थोड्या वेळानें तें तुफान निघून जावें, तसा प्रकार या महमूदच्या सतरा स्वाऱ्यांचा झाला.

त्यानंतर दोनशें वर्षांचे आंतच महंमूद ऊर्फ शहाबुद्दीन घोरीनें अजमीरच्या पृथ्वीराज चव्हाणास मारून त्याचें राज्य घेतलें. आणि भारतभूवर इस्लामी सत्तेचा पाया घातला. या इस्लामी सत्तेच्या प्रस्थापनेंत मुसलमान साधु फकिरांचाही हात होता, नव्हे त्यांच्याच कारवायांनीं अजमीरचें हिंदुराज्य नष्ट होऊन इस्लामचा हिरवा झेंडा तेथें रोंवला गेला; या गोष्टीकडे आमच्या विद्वानांचें अद्यापि लक्ष गेलें नाहीं. त्या विषयाचा विशेष विचार पुढील सर्गांत करावयाचा आहे.

या परकी सत्ताधाऱ्यांनीं आपल्या सातआठशें वर्षांच्या राजवटींत जे अनन्वित जुलूम व अत्याचार स्वत:च्या रयतेवर व शेजारच्या देशी राज्यांवर पिढ्यानुपिढ्या चालविले आणि देशाला सर्वतोपरी पिळून काढिलें त्याचें सविस्तर वर्णन करण्याइतकी जागा या ग्रंथांत नाहीं. नमुन्यादाखल चार दोन उदाहरणें द्यावयाचीं म्हटलें, तरी 'उडदामाजीं काळें गोरें काय निवडावें निवडणारें'? अशी लेखकाला अडचण पडते. कारण सगळेच सारखे क्रूर, जुलमी, अत्याचारी, बेइमानी, विषयी, दुराचारी, व्यसनी !

त्यांच्यांत निवड तरी कशी करावी ? म्हणून त्यांची तपशीलवार उदाहरणें न देतां, फक्त परकी प्रवाशांनीं व इतिहासकारांनीं जे तत्कालीन स्थितीविषयीं अभिप्राय दिलेले प्रसिद्ध आहेत, त्यांपैकीं थोडेसे येथें देतों.

"मुसलमानी आचार म्हणजे शस्त्रांच्या साह्यानें स्थापिलेला आणि अद्यापिहि त्याच पाशवी शक्तीच्या बळावर मानवजातीवर लादलेला एक अनिष्ट व अपायकारक प्रचार आहे."
–बर्निअर पृ. २९१

मौंट स्टुअर्ट एलफिन्स्टननें आपल्या 'हिंदुस्थानचा इतिहास' या ग्रंथांत (आवृत्ति ६ पृ. ३०२) याहूनहि कठोर अभिप्राय व्यक्त केला आहे.

"सर्व जगाला ठाऊक आहे कीं, मुसलमान फार विषयलोलुप असतात आणि म्हणून सर्वांचेंच, विशेषतः सरदार व राजे यांचें थोड्या बायकांवर भागत नाहीं, यासाठीं आपली वासना तृप्त करण्याचे ते इतर मार्ग शोधीत असतात. शहाजहान. . . स्वतःच्या जनान्यांतील स्त्रिया त्याच्या वासनेला पुऱ्या न पडून, दरबारांतील सरदारांच्या बायकांशीं संधान बांधीत असे. आणि या वर्तनापायींच त्यास मृत्यु आला." –मनुची, भाग १ पृ. १९२–९३.

"जे लढाईंत मेले ते तुलनेनें भाग्यवान् म्हणावयाचे! . . . ज्या स्त्रिया जिवंत राहिल्या व पकडल्या गेल्या त्यांच्या दुर्दैवाला पारावार नव्हता. त्या सामान्य नव्हत्या, राजांच्या आया व मुली होत्या ! त्यांना भ्रष्ट करून जनानखान्यांत कोंबण्यांत आलें. तेथें एखादा दिवस धन्याची वासना तृप्त करण्याचें हृदयशून्य व प्रेमरहित साधन व्हायचें आणि बाकी सारा जन्म, गृहिणीच्या वैभवाचा किंवा मातेच्या आनंदाचा अनुभव न घेतां कैदखान्यांतल्या प्रमाणें दुःखांत कंठावयाचा !"–जदुनाथ सरकारकृत औरंगजेबाचा इतिहास भाग १, पृ. २७.

विजापुरावर श. १५५३ मध्यें स्वारी करणाऱ्या मोगल फौजेच्या प्रवासाचें वर्णन करतांना इलियट अँड डाऊसन यांच्या

इतिहासांत (भा. ७. पा. ३०) म्हटलें आहे– "ज्या मार्गानें सैन्य जाई त्या मार्गांत जे लोक आढळत, त्यांची कत्तल होई किंवा त्यांना कैद केलें जाई. दुतर्फा रस्त्यांवरील घरें लुटलीं जात आणि मुलुख बेचिराख केला जाई. याप्रमाणें सर्व मुलुखभर येतांना आणि जातांना लूट-नासधूस-कत्तल सारखी चाले."

"भरभराटींत असलेलीं गांवें कायमचीं बुडालीं आणि लोक-संख्या कमी झाली." यदुनाथ सरकारकृत औरंगजेबाचा इतिहास भाग १, पा. ३७

"न्यायाधीशांना मीं ताकीद दिली कीं, आरोपींचा गुन्हा कशाही प्रकारचा असो, त्यांचीं नाकें, कान कापण्याची शिक्षा देऊं नये व मी स्वतः ईश्वराला स्मरून शपथ घेतली कीं असली शिक्षा मी कोणास करणार नाहीं" ( इलियट अँड डाऊसन, खंड ६–परिशिष्ट ) असा स्वतःच्या न्यायनीतीचा व भूतदयेचा डंका वाजविणाऱ्या जहांगिराचें वर्णन त्याच्या दरबारांतील इंग्रज वकील सर थॉमस रोनें केलें आहे कीं, "अजमीरच्या लष्करला त्यानें आग लावली तेव्हां मला दुसरीकडे जाणें भागच झालें. सबंध शहर जळालें.... जेथें याचा तळ पडे तेथील जवळपासचीं गांवें जाळून टाकण्याचा हुकूम हा ( जहांगीर ) फर्मावीत असे." ( केर्स कलेक्शन ऑफ व्हॉयेजेस अँड ट्रॅव्हेल्स, खंड ९ पृ. ३१७–३३५ )

मोगलांत दोन विशिष्ट गुण परंपरेनें आलेले आढळतात : "एक, भावानें भावाचा खून करणें आणि दुसरा–जो बहुतेक त्यांच्या सर्व मोठ्या लोकांत दिसतो– प्रसंग पडला म्हणजे कुराणाची शपथ घेऊन व गोड बोलून वचन देणें आणि प्रसंग निभावला म्हणजे दिलेलें वचन साफ नाकारणें." मनुची, खंड १, पृ. १०७.

"औरंगजेबाचें जीवन म्हणजे केवळ ढोंग; दिसायला सच्छील व धार्मिक प्रवृत्तीचें पण खरोखर घातकी व पापी !" "त्याच्या सर्वच लबाड्या व ढोंगें मी सांगूं लागलों तर तीं केव्हांच संपणार नाहींत." ( मनुची,–खंड ३, पृ. २५३, २५६ )

मोगल दरबारांत मनुचीनें सुमारें ५० वर्षे काढलीं. त्या बद्दलचा त्याचा अभिप्राय थोडक्यांत पहा –

"ऐहिक व पारलौकिक या दोन्ही दृष्टींनीं पाहतां, हा देश राहण्यास योग्य नाहीं ! ऐहिक दृष्टीनें पाहिलें तर कोणावर विश्वास म्हणून टाकण्याची सोय नाहीं .... बोलतात त्याच्या उलट खरें असेल असेंच मानून चालावें लागतें. ... मैत्रीचा त्यांनीं फारच बहाणा केला तर मग अतिच जपलें पाहिजे. याप्रमाणें जेथें न्यायबुद्धि नाहीं, वचनाची चाड नाहीं अशा देशांत आत्मोन्नति कोठली?" मनुची–खंड २, पृ. ३२४.

या नरपिशाच्चांच्या असंख्य राक्षसी लीलांपैकीं एकच उदाहरण देतों. गुलबर्ग्याच्या बहामनी गादीवरचा अकरावा सुलतान याला मुसलमान इतिहासकार फेरिस्ता यानेंच (Hoomayoon the Cruel) 'क्रूरकर्मा हुमायून' अशी पदवी दिली आहे. "या क्रूरकर्म्यानें स्वतःच्या भावाला वाघाकडून फाडविलें! कडकडलेल्या तेलांत व आधणाच्या पाण्यांत जिवंत माणसांना टाकून मारलें !! आणि निरपराधी अबलांना त्यांच्या घरातून ओढून आणून भर चौकांत मांगहृदयी गुंडांकडून त्यांची इतकी विटंबना करविली कीं त्या विटंबनेचें वर्णन करण्याची फेरिस्तालाहि लाज वाटली !!! या हुमायूननें स्वतः कित्येकदां लग्नांच्या मिरवणुकींतून वधूंना नेऊन भ्रष्ट करावें आणि नंतर त्यांना वरांच्या घरीं पावतें करावें."–फेरिस्ता खं. २,पृ.४६१-४६४.

उत्तरेचे मोगल व दक्षिणेंतील बहामनी राज्याच्या झालेल्या विजापूर, गोवळकोंडें वगैरे पांच शाह्या यांचें आपसांत नेहमीं युद्ध चाले; तथापि विजयानगरचें राज्य बुडविण्याकरितां त्या पांचांपैकीं तीन शाह्यांनीं आपली एकजूट करून विजयानगर बुडविलें आणि त्यांत विशेष दुर्दैवाची गोष्ट ही कीं, दक्षिणेंतील विजयानगर काय किंवा उत्तरेंतील चितोड काय, हिंदु राजसत्तेविरुद्ध लढणाऱ्या मुस्लिम फौजांत रजपूत, मराठे, जाट वगैरे हिंदु भरपूर असत ! बाप एका पक्षांत तर मुलगा विरुद्ध पक्षांत,

एक भाऊ एक बाजूला तर त्याचा सख्खा दुसरा भाऊ त्याच्या शत्रूकडे असेहि चमत्कार सर्वत्र दिसत !!

पश्चिम किनाऱ्यावर शके १४२० पासून फिरंग्यांनीं जो धुमाकूळ माजविला होता त्याचाहि थोडकासा नमुना पहा !

" सार्वत्रिक समजूत अशी कीं, तत्कालीन पोर्तुगीज समाज हा विश्वासघातकी, भरंवसा ठेवण्यास सर्वथैव अपात्र, निर्दय, क्रूर, वचन देऊन गळा कापणारा असा होता . . . वास्को-ड-गामा यानें केलेल्या क्रूर कृत्यांचा विसर केव्हांच पडला नव्हता." " मंदिरें आणि तीर्थक्षेत्रें लुटणें, त्यांचा विध्वंस करणें आणि तें करतांना अमानुष क्रूरतेचीं कृत्यें करण्यास मागेंपुढें न पाहणें हा जणुं पोर्तुगीजांचा स्वभाव बनला होता."—पणिक्करकृत मलबार व पोर्तुगीज.

एका बाजूनें सुलतानीचा अशा प्रकारचा सर्व देशभर धिंगाणा माजलेला, तर दुसऱ्या बाजूनें अस्मानीचाहि कहर मधून मधून उसळावयाचा. गुजरात, खानदेश, दौलताबाद, बालाघाट हा भाग एरव्हीं संपन्न; पण श. १५५२–५३ सालीं तेथील लोकांवर " पिठांत कुत्र्याचें मांस व हाडांची भुकटी मिसळून तें खाण्याचा प्रसंग आला होता ! दुर्भिक्ष इतक्या शिगेला पोहोंचलें होतें कीं, माणसें माणसांस खाऊं लागलीं—पोराचें मांस मिळालें तरी बरें असें म्हणण्याची पाळी बापावर आली !!"— (लाहोरीचा बादशहानामा ).

पर्जन्याचा अभाव हें तर असल्या दुष्काळांचें मुख्य कारण असतेंच, पण दुसरेंहि एक तितकेंच प्रमुख कारण म्हणजे "प्रजेला दास्यांत व दावांत ठेवण्यासाठीं बादशहांना जें अवाढव्य लष्कर पोसावें लागे त्यासाठीं आणि स्वतःच्या वैभवानें जगाला दिपवावें म्हणून जो खर्च करावा लागे तो रयतेला पिळूनच भागवावा लागे" बर्निअर पृ. २३०.

"लज्जारक्षणापुरताच खेड्यांतील लोकांजवळ कपडा असतो. त्यांच्याजवळ अधिक कांहीं असल्याचें कळलें कीं, अधिकारी तें

सक्तीनें घेतो–त्याचा जणुं तो हक्कच! अधिकाऱ्यांच्या असल्या या त्रासामुळें लोक गांवें सोडून जातात आणि प्रांतच्या प्रांत उजाड होतात!" अशी साक्ष वर्निअरचा देशबंधु टॅव्हर्निअर यानें दिली आहे.

'राजा कालस्य कारणम्' या न्यायानें लोकांच्या या भयंकर दैन्यावस्थेला मुख्यतः परकी व जुलमी अशी राजसत्ता कारण होती हें तर उघडच आहे. परंतु लोकांकडेहि दोष आहेच. विलासी, विषयांध, दुराचारी, घातकी, व्यसनी, क्रूर अशा परकी राजवटींचा जुलूम–त्या आंतून आपल्या अंगच्या दुर्गुणांनींच पोखरल्या गेल्या आहेत असें दिसत असतांहि–ज्यांनीं शतकानुशतकें आपल्यावर चालूं दिला, ते लोक अत्यंत स्वार्थांध, परधार्जिणे, दीनदुबळे, स्वाभिमानशून्य इत्यादि प्रकारें दुर्गुणांचें आगर बनले होते हें उघड आहे. दोन नमुने पहा––

शके १४८६ मध्यें तालिकोट ऊर्फ राक्षसतागडीच्या लढाईंत तीन मुसलमान शाह्यांनीं एक होऊन विजयानगरच्या हिंदु राज्याचा जो धुव्वा उडविला, प्रचंड देवालयें व टोलेजंग वाडे जाळून त्यांची राखरांगोळी केली, रामराजाला पकडून त्याचा शिरच्छेद केला आणि तें शिर पुढें सालोसाल मुसलमान समाजास दिसावें म्हणून अहमदनगर येथें तेलांत (स. १८१८ पर्यंत) ठेवण्यांत आलें, त्या सगळ्या विध्वंसाच्या कर्तृत्वांत शाही सैन्यास हिंदु सामील होतेच. आणि या प्रसंगाचें वर्णन एका हिंदु इतिहासकारानें मोठ्या कौतुकानें व अभिमानानें केलें आहे! . . . . . सकाळच्या प्रहरीं बादशहा वाड्याच्या खिडकींत येऊन बसल्यावर त्याचें दर्शन घेतल्यावांचून अन्नग्रहण करावयाचें नाहीं असा कित्येक हिंदूंचा नियम होता! अशांना 'दर्शनी' म्हणत. (इलियट आणि डाऊसन भाग ७ पान २८४) ही काय राजनिष्ठा कीं स्वाभिमानशून्यता, कां बावळटपणा? काय नांव द्यावें याला?

दुसरें उदाहरण, बेदरच्या दरबारांत जानोजी पिसाळ नांवाचा मराठा सरदार होता; त्याला दुसऱ्या मुसलमान सरदारा-

बरोबर बादशहानें शिक्यांवर पाठविलें. पण ते दोघेहि आपसांत भांडत रडतोंडीच्या घाटापासून परत बेदरला आले. भरदरबारांत दोघांची खडाजंगी होऊन बादशहाचे देखत जानोजीनें मुसलमान सरदारास उभा चिरला. पुढचा भयंकर परिणाम लक्षांत येऊन पिसाळानें बादशहास विनंति केली कीं, मी मुसलमान होतों, माझ्यावर शिक्यांच्या स्वारीचें काम सोपवावें. मी काम फत्ते करून आलों तर ठीकच. आणि लढाईंत मी पडलों तर माझे प्रेतावर कबर करून तिला पीर जलालुद्दीन हें नांव द्यावें; तिची पूजा उजव्या बाजूस मराठ्यांनीं व डाव्या बाजूस मुसलमानांनीं करावी! त्या जलालुद्दीन पीराची कबर मसूर येथें अद्यापि असून तिचा उरूस प्रतिवर्षी होत असतो. (महाराष्ट्र धर्म, पृ.५९--६०) असले जानोजी पिसाळ प्रत्येक प्रान्तांत आणि प्रत्येक पिढीला सहस्रशः होत आले आहेत! केवढें दुर्दैव भारताचें हें !!

## ९ सर्ग--परधर्मसंसर्गानें झालेला बुद्धिभ्रंश

विधर्मीयांच्या राजकीय वर्चस्वाचा भारतीय जीवनावर केवढा घोर परिणाम झाला तें मागील प्रकरणांत आपण पाहिलें. या प्रकरणांत त्यांच्या धार्मिक वर्चस्वानें भारतीयांची संस्कृति व सामाजिक जीवन यांत कोणती उलथापालथ केली तें थोडक्यांत पहावयाचें आहे.

अरब व्यापाऱ्यांचें भारताशीं दळणवळण इस्लामच्या उदयापूर्वीपासूनच होतें. त्यानंतर इसवी सनाच्या सातव्या शतकांत अरबस्थानांतील सरदारांच्या छळामुळें देशत्याग करून कित्येक अरब कुटुंबें मलबार व कोंकणपट्टींत स्थायिक झालीं; त्यांच्या वंशजांस 'नवायत मुसलमान' म्हणतात. हे नवायत मुसलमान, कांहीं अरबी प्रवासी व कांहीं इस्लाम धर्मप्रचारक हे इ. सनाच्या आठव्या शतकांतच दक्षिणेंत वावरूं लागले होते. त्यांतील कांहीं जणांचे दर्गे आढळून येतात. अशाच पैकीं नवव्या शतकांत आलेल्या नुरुद्दीन

नामक एका अवलियाची[1] कबर जांबपासून जवळच डोणगांव (त. अंबड) येथें असून तिच्या दर्शनासाठीं बोहरी समाज हमेशा येत असतो.

हिंदु, बुद्ध किंवा खिरस्त या धर्माप्रमाणेंच मुस्लिम धर्मांतही शिया, सुनी, सुफी वगैरे पंथ व त्यांचे पुनः उपपंथ अनेक आहेत; त्यांपैकीं एकटया सुफी पंथाकडूनच मुसलमान धर्माचा हिंदुस्थानांतील प्रसार किती शतकांपूर्वींपासून चालू झाला व तो किती व्यापक प्रमाणांत झाला याची कल्पना पुढें दिलेल्या माहिती-वरून येईल. ही माहिती हैद्राबादचे एक विद्वान गृहस्थ श्री. सेतुमाधवराव पगडी ( एम्. ए., आय. ए. एस् ) यांनीं चार वर्षांपूर्वीं लिहिलेल्या 'सूफी संप्रदाय' या पुस्तकांतून घेतली आहे. स्थलसंकोचास्तव उदाहरणांचा तपशील दिला नाहीं. प्रसार कसा होत होता एवढें दाखविण्यापुरतींच अवतरणें घेतलीं आहेत.

"मुस्लिम कट्टर धर्माचरणाविरुद्ध ठाकणारे बौद्धिक बंड-खोर म्हणजे सुफी होत असें कोणाकोणाचें मत आहे; पण वस्तु-स्थिति अगदीं उलट आहे. नमाज, कुराणपठण व विशेष प्रार्थना या तीन गोष्टी प्रत्येक सुफीनें नियमितपणें केल्याच पाहिजेत. या तिहींच्या बरोबरच मुजाहिदा (मनोनिग्रह), जिकर (प्राणायामपूर्वक नामस्मरण, आणि मराकवा (ध्यान) याहि तीन बाबी त्यास आवश्यक आहेत. समा (गायनयुक्त परमे-श्वरभजन) व सिजदा (गुरूंच्या पायांवर डोकें ठेवून वंदन) हे दोन सुफी पंथाचे विशेष आचार कित्येक मौलवींना मान्य नसतात," (पा. १४) परन्तु 'शरीयत' = मुसलमानांचा आचार-धर्म व 'तसव्वूफ' = सूफींची शिकवण या गोष्टी परस्परांना पूरक

---

१ अवलिया म्हणजे देहभाव गलित झालेला थोर अधिकाराचा साधु अशी मराठी वाचकांची कल्पना असते. पण त्या शब्दाचा मूळचा अर्थ एक 'साधा संत' एवढाच आहे. नकीब, नजीब, अम्ह, अबदाल, अवताद, गौस व कुतुब अशा अवलियापेक्षां श्रेष्ठ अशा साधूंच्या चढत्या श्रेणी आहेत.

असून विरोधी तर खास नाहींत. (सूफी पंथाच्या सगळ्या पोट पंथांत मुस्लीम शरीयत (आचारधर्म) चें पालन करण्यास निक्षून बजावण्यांत आलें आहे." (पा. १६)

सुफी पंथांत अनेक पोटभेद असले तरी त्यांपैकीं चिश्ती, कादरी, सुहरावर्दी व नक्शबंदी या चार संप्रदायांच्या द्वारें मुख्यतः हिंदुस्थानांत इस्लामचा प्रसार अधिक झाला. (पा. १९)

हिंदुस्थानांतील पहिला सूफी संत अली-उल्-हुजवेरी हा (स. १००० ते १०६३ च्या दरम्यान) लाहोर येथें येऊन स्थायिक झाला. त्याच्यानंतर शंसवाशें वर्षांनीं खाजा मोइनोद्दीन चिश्ती हा पृथ्वीराज चव्हाणाच्या कारकीर्दींत हिंदुस्थानांत आला. त्यानेंच अली हुजबेरीच्या दर्ग्याजवळ चाळीस दिवस अनुष्ठान करून हुजबेरीची फार प्रसिद्धि केली. तेथून त्यानें मुलतान येथें जाऊन पांच वर्षें हिंदी भाषेचा अभ्यास केला. नंतर दिल्लीवरून अजमीरला जातांना मार्गांत ७०० हिंदूंना त्यानें इस्लामची दीक्षा दिली. हा अजमीरला गेला तेव्हां तेथें मुसलमान मुळींच नव्हते; पण याच्या तेथील वास्तव्यांत इतके लोक मुसलमान झाले कीं, त्याला मर्यादाच नव्हती. या त्याच्या धर्मांतराच्या चळवळीमुळेंच पृथ्वीराजाशीं त्याचें वितुष्ट आलें. पृथ्वीराजाच्या विरोधामुळें चिडून जाऊन मोइनोद्दिन म्हणाला कीं, 'मी पृथ्वीराजाला जिवंत धरून मुसलमानांच्या हातीं देईन.' पुढें महंमद ऊर्फ शहाबुद्दिन घोरीनें सन ११९३ मध्यें पृथ्वीराजाचा पराभव करून दिल्ली–अजमीरचें राज्य हस्तगत केलें. असें म्हणतात कीं, मोइनोद्दिननें शहाबुद्दिनला या स्वारीच्या पूर्वी स्वप्नांत सांगितलें कीं, परमेश्वर तुला हिंदुस्थानचें राज्य देणार आहे; म्हणून तूं आपली दृष्टि तिकडे वळव. पृथ्वीराजाच्या पराभवानंतर शहाबुद्दिननें अजमीर येथें जाऊन मोईनोद्दिनचें दर्शन घेतलें; तेथें अडीच दिवसांत एक देऊळ पाडून त्याची मशीद केली, तिला 'अढाई दिनका झोंपडा' म्हणतात. यानंतर मोइनोद्दिनच्या धर्मप्रसारक चळवळीस चांगलाच उठाव मिळाला. यावरून पृथ्वीराज काय, किंवा इतर हिंदू राजे काय,

यांच्या पराजयामागें केवळ लष्करी हालचाली नसून मुस्लिम धर्म प्रचारकांच्या गुप्त चळवळीहि होत्या हें सिद्ध होतें. यानें एका हिंदू सरदाराच्या मुलीला इस्लामी दीक्षा देऊन तिच्याशीं निका लाविला. हिंदुस्थानच्या सुफींना मोईनोद्दिन हा अग्रगण्य वाटतो. याच्या दर्ग्याला अकबर–जहांगीर–शहाजहान यांसारख्या बादशहांनीं पुढें भेटी दिल्या. यानें अनेक शिष्यांना धर्मप्रसारार्थ देशभर पाठविलें. याचा मृत्यु सन १२३६ मध्यें झाला.

मोईनोद्दिनचा पट्टशिष्य कुतुबुद्दिन वखत्यार काकी. कुतुबुद्दिन दिल्लीस रहावा असा सुलतान अल्तमशनें आग्रह केल्यामुळें गुरूच्या आज्ञेनें हा दिल्लीसच राहिला. मुस्लीम आचारधर्माच्या पालनावर याचा कटाक्ष असे. यानेंहि आपले २५।३० प्रमुख शिष्य निरनिराळ्या प्रांतांत धर्मप्रसारार्थ पाठविले. याची कबर दिल्लीस आहे.

फरीदोद्दीन गंज शक्कर हा कुतुबुद्दिनचा पट्टशिष्य. गुरूच्या आज्ञेनें तो अजोधन या गांवीं जाऊन राहिला. त्याच गांवाला आज पाकपट्टण म्हणतात. यानें आपल्या धर्माचा प्रसारहि पुष्कळ केला. ९३ वर्षांचा होऊन हा सन १२६५ मध्यें मेला.

फरीदोद्दीनचा शिष्य निजामोद्दीन अवलिया. यानें ५०–६० वर्षे दिल्लीस राहून शेंकडों प्रचारक सर्वत्र पाठविले. त्यांतील एक शेख मुंतजबोद्दीन अुर्फ जर्जरीबक्ष हा सन १३०० मध्यें ७०० धर्मप्रचारक बरोबर घेऊन दौलताबादेजवळ खुल्दाबाद येथें राहिला. तो १३०९ मध्यें मेल्यावर त्याचा वडील भाऊ बुऱ्हाणोद्दीन गरीबशहा नवीन ७०० प्रचारक घेऊन खुल्दाबादेस गेला व भावाचें अपुरें कार्य पुढें चालवूं लागला. अवघ्या दहा वर्षांत, केवळ महाराष्ट्रांत १४०० शिष्य ज्या निजामोद्दीननें पाठविले त्याचा धर्मप्रसार इतर प्रांतांतून कसा चालला असेल याची कल्पना करावी. गुलाम, खिलजी व तुघलख या तीन घराण्यांतील आठ सुलतानांची कारकीर्द निजामोद्दीननें पाहिली. सुलतान बल्बननें तर आपली मुलगीच त्याला दिली होती. निजामोद्दीन

व सुलतान मुबारक खिलजी यांचा कांहीं निमित्तानें खटका उडाला; त्यानंतर थोड्या दिवसांतच मुबारक मारला गेला. त्याला मारणारा खुसरोखान निजामोद्दीनला विरुद्ध होताच. त्याचाहि १–१॥ महिन्याच्या आंत निकाल लागला! त्यानंतर गयासुद्दीन तघलख हा गादीवर आला; पण पुढें तोहि निजामोद्दीनचा विरोध करूं लागल्यावर आकस्मिक रीतीनें दिल्लीस मृत्यु पावला. या सर्व गोष्टींवरून सुफी साधूंचा तत्कालीन राज्यव्यवस्थेंत केवढा वरचष्मा होता तें दिसून येईल.

पृथ्वीराजाच्या कारकीर्दींत जसा मोईनोद्दीन चिस्ती अजमेरास येऊन राहिला होता, तसेंच यादवांच्या कारकीर्दींत देवगिरी जवळच खुल्दाबाद येथें मोमिन आरिफ व जलालुद्दीन ऊर्फ गंज रं वां हे दोन साधू येऊन राहिले होते. ह्या दोघांना काय किंवा वर सांगितलेले जर्जरीबक्ष व गरीबशहा यांना काय देवगिरी व खुल्दाबाद हींच गांवें रहाण्यास सोईचीं कां वाटावींत? ही विचार करण्यासारखी बाब आहे. शेंकडों फकीरांची सोय हे साधू लोक करीत असत. त्यामुळें लोकांची कल्पना अशी होई कीं, परमेश्वर त्यांना अमूप द्रव्य देतो व त्याचा ते दानधर्मांत उपयोग करितात. या दानधर्मामुळेंच मुंत्तजबोद्दीनला 'जर्जरी बक्ष' असें टोपण नांव मिळालें होतें. या वेळीं देवगिरीचें दौलताबाद होऊन यादव घराणें दिल्लीचे मांडलीक बनलें होते. ही गोष्ट लक्षांत घेतां जर्जरीबक्षाचें प्रस्थ लोकांत वाढावें म्हणून त्याला रोज धनाचा पुरवठा गुप्तपणें करण्याची जबाबदारी मांडलिक झालेल्या देवगिरीच्या राज्यावर पडली असावी हें न सांगतां कोणाच्याहि लक्षांत येईल.

किती वर्णन करावें? बऱ्हाणपूर, अहमदनगर, कंधार, औरंगाबाद, एरंडोल, गंगापूर, हैदराबाद, मातूर (माहूर?) गुलबर्गा, बेदर, विजापूर, मंगरूळपीर, तालीकोट, शहापूर, एलिचपूर, खंगसमार, नाशिक, पैठण, वैजापूर, पुणें, अहमदाबाद, कवठाळ अशा शेकडों ठिकाणीं या लोकांचें धर्मप्रसाराचें काम चाललेलें असे. आणि त्यांत दुवा देण्यापासून दंडेलीमारामारी-

पर्यंतचे सगळे प्रकार नित्य घडत. अनेक राजे व सुलतान या फकीर लोकांविषयीं आदरभाव ठेवून असत. सिराजुद्दीन जुवेदी या गुलबर्ग्याच्या साधूनें बहामनी सुलतानाच्या तीन पिढ्या पाहिल्या. प्रत्येक राज्यारोहणप्रसंगीं हजर राहून राजाच्या कमरेला तरवार तो बांधीत असे. हसन गंगू बहामनीनें आपल्या राज्यारोहण समयीं बुऱ्हाणोद्दीनच्या समाधीसाठीं पांच मण सोनें व दहा मण चांदी भेट पाठविली होती!

पंजाबचा राहणारा शाहाबाबू वऱ्हाडांत मातूर (माहूर?) येथें स्थायिक झाला; तो व त्याचे साथीदार यांनीं तेथील मंदिरें तोडून व हिंदु जमीनदारांस बाटवून तेथें आपला जम बसविला.

कवठाळ (खानदेश)च्या शाहवारीचा हाच प्रकार! सतत उभा राहून कुराणाचें पठण करणारा निजामुद्दीन यानें पैठणास जाऊन तेथील एका योगिनीच्या सुप्रसिद्ध काली मंदिरावर हल्ला चढवून ती योगिनी, तिचें तें मंदिर व तेथील भक्तगण या सगळ्यांचा निःपात केला आणि तेथें आपला मठ थाटला! दुसरे एक मौलानासाहेब–जजरीबक्षाचे सहकारी–यांनीं पैठणच्या रेणुकादेवीचें मंदिर पाडून तेथें आपली वसाहत केली; तेथेंच त्यांचा दर्गा आहे!

अवदुल लतीफ दावर उल्मुल्क हा मूळचा गुजराथेंतला एक सरदार. गुरु शाहअलम याच्या उपदेशानें तो परमेश्वराच्या भक्तीकडे वळला. पुढें स. १४८८ चे सुमारास सौराष्ट्रांत आमरण येथें तो मारला गेला, तेथेंच त्याची कबर आहे. यालाच दावलमलिक असें नांव रूढ झालें. त्याचे छल्ले महाराष्ट्रांत अनेक ठिकाणीं असून त्यांचे उरूस प्रतिवर्षी होत असतात.

शहाजहान, मलिकंबर यांचा गुरू सादिकअल्ली ऊर्फ सरमस्त यानें नाशिक येथें एका मठांतील गोसाव्यास काढून देऊन तेथें आपला मठ जमविला. त्याचा दर्गा त्या मठाच्या जागेवरच आहे. प्रथम दौलताबादेस बरींच वर्षें राहून नंतर तो नाशिकला आला होता.

इलियट आणि डाऊसनचा इतिहास भाग ७, पृ २८४ यांत म्हटलें आहे कीं, "फकीर म्हटला म्हणजे त्यानें तत्त्वत: सर्वस्वाचा त्याग करून निवळ भिक्षेवर राहिलें पाहिजे. पण वस्तुत: हे फकीर अति डांबरट असतात. असे फकीर या देशांत आठ लाख असल्याचें सांगतात."

काजीस दिलेल्या सनदांतून काजीनें करावयाच्या कामांपैकीं हिंदूंच्या देवालयांतील मूर्ति फोडणें हें एक काजीचें काम असे. ( महाराष्ट्र धर्म पा. ५७ ) या विधानास वाड-पारसनिसकृत सनदापत्रें या ग्रंथाचा (पृष्ठ ७७, ८२) आधार आहे.

## १० सर्ग–दुहेरी आपत्तींचा परिणाम

संसारत्याग करून, एकांतांत राहून देहदंडनाच्या द्वारें ईश्वराची आराधना करणें हा या सुफी पंथाचा मूळचा उद्देश. नामस्मरण, मनोनिग्रह, उत्कट भक्ति, ध्यानधारणा यमनियम इत्यादि त्यांच्या गोष्टी पाहिल्या म्हणजे ते हिंदु आचारविचारांस जवळ आहेतसे वाटतात, हें खरें; परंतु मुस्लिम आचारधर्माचें पालन हें त्यांचें आवश्यक कर्तव्य असल्यानें प्रसंगीं आक्रमण करूनही इतर मुस्लिम पंथांप्रमाणेंच, मुस्लिमेतरांस बाटवून त्यांच्या मठमंदिराचा ताबा जबरदस्तीनें घेणें, मूर्ति फोडून टाकणें, मंदिरांच्या जागीं मशिदी उभारणें, मंदिरांचे दगड किंवा मूर्ति मशिदीच्या बांधकामांत टाकणें, हे सगळे जुलुम जबरदस्तीचे प्रकार त्यांनीं केले. मुस्लिम राजसत्तेचें पाठबळ त्यांना चांगलेंच मिळालें होतें. त्यांच्या भक्तवर्गांत सुलतान, बादशहा, अमीरउमराव, लेखक, तत्त्वज्ञानी इत्यादि व श्रेष्ठ वर्गांचे लोक जसे होते, तसेंच गुंड, गरीब वगैरे खालच्या दर्जाचेहि होते. औरंगजेबासारख्यांचा धार्मिक कट्टरपणा वाढविण्यास व त्याच्याकरवीं जिझिया कर मुस्लिमेतरांवर लादण्यास सुफी पंथांतील कय्यूमचें नक्शबंदी घराणेंच कारणीभूत झालें. अकबराच्या धार्मिक धोरणाला विरोध करणारांमध्यें सुफी साधु प्रमुख होते. सुफींचा व भागवतधर्मीयांचा संबंध येऊन परस्परांत

देवघेव झाली असें कोणी कोणी मानतात, पण त्याला काडीचाही ऐतिहासिक आधार नाहीं. मुस्लिम राजसत्तांचें राजकीय वर्चस्व आणि मुस्लिम धर्मप्रचारकांचा हा धूमधडाक्याचा प्रचार ( त्यांत फिरंगी वगैरे ख्रिस्ती राजसत्ता व धर्मोपदेशक यांचाहि समावेश आहेच. ) यांमुळें मंदिरादिकांच्या जागीं मशिदी, दर्गे, छल्ले, खानके पीर, चर्चेस, क्रूस वगैरे विधर्मी संस्कृतीचीं चिन्हें सर्वत्र दिसूं लागलीं. न्यायदानाच्या कामाकरितां काजींच्या नेमणुकी होऊन मूर्ति फोडणें हें त्यांचें कर्तव्य ठरलें. तसेंच बकरईद, रमजान, शॅबेबरात इत्यादि मुस्लिम सणावारांच्या उत्सवांस सरकारचें पाठवळ मिळूं लागलें. त्यांबरोबरच मुस्लिमेतरांचीं मंदिरें व आचारधर्म यांचा उच्छेद होऊन त्यांची परंपरा पुढें टिकविण्यास अडथळे येऊं लागले किंवा प्रतिबंध होऊं लागला. या सगळ्या गोष्टींचा परिणाम भारतीय समाजावर होणें अपरिहार्य होतें. अशा प्रकारें मुस्लिम रीतिरिवाजांचा प्रसार बहुजनसमाजामध्यें मोठ्या प्रमाणांत होऊं लागल्यानें फकीर, पीर, दर्गे, कबरी, तुरबुती, पंज्यांच्या सवाऱ्या यांच्या भजनीं असंख्य मुस्लिमेतर लागत चालले. या सगळ्या गोष्टींचा परिणाम होऊन हिंदुधर्मीयांच्या आचारविचारास शैथिल्य आलें. स्वधर्माभिमानाचा ऱ्हास होऊन लोकसंख्येवरहि परिणाम दिसूं लागला. फकिरांची भक्ति करण्यांत आणि दर्ग्यांना नवस करून तेथील प्रसाद भक्षण करण्यांत अथवा ताजे किंवा पंजे यांच्या उरूसांत फकिर होऊन भीक मागण्यांत व मिरवणुकींत नाचण्यांत कांहीं स्वधर्मविरोधी आहे असें हिंदूंना वाटेनासें झालें. "तजकरे अवलिया ए कराम" च्या ग्रंथकर्त्यानें म्हटल्याप्रमाणें मुसलमानांची "हिंदुस्थानांतील सत्ता दोन प्रकारची होती. एक बादशहा, सुलतान, व अमीरउमराव यांची व दुसरी या सुफी साधुसंतांची. पहिलीनें देशावर राज्य केलें तर सुफी फकिरांनीं व साधुसंतांनीं लोकांच्या मनावर प्रभाव गाजविला. हें मुस्लिम वर्चस्व अठराव्या शतकाच्या शेवटापर्यंत, पोकळ सांपडेल तेथें चांगलेंच गाजत राहिलें, आणि नंतरहि त्यांत थोडासा सौम्यपणा आलेला दिसत असला तरी तें अजून पूर्णपणें नाहीसें झालें आहे असें नाहीं.

मागील दोन प्रकरणांत लिहिल्याप्रमाणें परसत्ता व परधर्म यांच्यामुळें स्वधर्मीयांवर गुदरलेल्या असंख्य आपत्तींकडे श्रीसमर्थांचें लक्ष या परिभ्रमणांत पूर्ण वेधलें गेलें. लहानपणीं 'आई, चिंता करितों विश्वाची' हें उत्तर मातेला देण्याच्या वेळीं त्यांच्या त्या वेळच्या वयोमानाकडे पाहतां लोकांच्या सर्वसामान्य प्रापंचिक दुःखांपलीकडे त्यांची दृष्टि फारशी गेली नसावी. पुरश्चरण संपण्याचे वेळीं ते पंचविशींत आले होते; त्या मानानें बुद्धि प्रगल्भ झाली होती.

शके १५४२ ते १५५४च्या अवधींत नाशिक–जुन्नर प्रांतांत झालेली लष्करी धामधूम आणि त्यामुळें रयेतला भोगावा लागलेला त्रास, तसेंच श. १५५१ ते १५५३ च्या दरम्यान पडलेल्या दुष्काळानें लोकांचे झालेले हाल हें सर्व त्यांच्या डोळ्यासमोर घडलें होतें. त्यायोगें लोकदुःखविमोचनाच्या लहानपणच्या कल्पनेस श. १५५४ मध्यें बरेंच व्यक्त स्वरूप आलें. पुरश्चरणाच्या नियमान्वयें त्यांना स्थलत्याग करितां येत नव्हता आणि अतःकरणांतील तळमळहि स्वस्थ बसूं देत नव्हती. ती भगवत्प्रार्थनेच्या रूपानें बाहेर पडली. पुरश्चरणकांडाच्या नवव्या सर्गांतील प्रार्थनेच्या सहा श्लोकांपैकीं 'बहुतचि सुकुमारा स्वस्त नाहीं शरीरा। निशिदिनि जनचिंता लागलीसे उदारा ॥ सकल जन सुखावे तो कसा काळ फावे। भजन जन उकावें सर्व आनंद पावे ॥ हा पांचवा श्लोक वाचकांच्या लक्षांत असेलच. त्यानंतर ते पर्यटनास निघाले. या १२ वर्षांत जिकडे तिकडे "कितीयेक ग्रामेंचि ते वोस जालीं। पिकें सर्व धान्येंचि नाना बुडालीं॥ कितीयेक धाडीवरी धाडि येती। द्वया सैनिकांचेनि संहार होती ॥१॥ कितीयेक ते मेघही मंद जाले अनावृष्टि स्थळोस्थळीं लोक मेले ॥ कितीयेक अन्नाविसी भ्रष्ट जाले। कितीयेक लोकीं जळीं प्राण दीले ॥२॥ कितीयेक ते धान्य लुटोनि नेती। कितीयेक ते पेव खाणोनि नेती ॥ कितीयेक ते पूरिले अर्थ नेती। किती पूरिलीं सर्व पात्रेंचि नेती ॥३॥ किती पोट फाडूनि ते मारितातीं। वृथा चोर अर्था विसीं प्राण घेती ॥ कितीयेक

सौदागरा बूडवीती । किती येक ते काफले लूटताती ।।४।। किती गुज्रिणी ब्राह्मणी भ्रष्टवील्या । शांमुखी जाहजी फांकवील्या ।। कितीयेक देशांतरीं त्या विकील्या । किती सुंदरा हाल होऊनि मेल्या ।।५।। कितीयेक ते घ्राण कर्णेचि नेती । किती उत्तमा त्या स्त्रिया भ्रष्टवीती ।। किती मोट बांधूनि ते बूडवीती । पिछोडेचि बांधोनि हीरोनि नेती ।।६।।" हे देखावे त्यांनीं कांहीं पाहिले व कांहीं प्रसंग ऐकले. तसेंच ". प्राणी बंदी सांपडला । यातने वरपडा जाला । नाना दुःखें दुःखवला । या नांव आदिभूतिक ।। ६२।। प्राणी राजदंड पावत । जेर बंद चाबूक वेत । दरेमार तळवेमार होत । या नांव आदिभूतिक ।।६३।। मोघरी मार बुधले मार । चौखरून डंगारणे मार । बुक्कया गचांडया गुढगे मार । या नांव आदिभूतिक ।।६५।। नाकवणी चुनवणी मीठवणी रायवणी । गुळवण्याची जाचणी । या नांव आदिभूतिक ।।६८।। तीर मार सुळीं देती । नेत्र वृषण काढिती । नखोनखीं सुया मारिती । या नांव आदिभूतिक ।।७१।। कानीं खुंटया आदळिती । अपानी मेखा मारिती । खाल काढूनि टाकिती । या नांव आदिभूतिक ।।७३।। सिसें पाजणें वीष देणें । अथवा सिरछेद करणें । कां पायातळीं घालणें । या नांव आदिभूतिक ।।७५।। सीरा वोढून घेती । टेंभे लाऊन भाजिती । ऐशा नाना विपत्ति । या नांव आदिभूतिक ।।७८।। मनुष्यहानी वित्तहानी । वैभवहानी महत्वहानी । पशुहानी पदार्थहानी । या नांव आदिभूतिक ।।७९।। ७–३ दा. बो.

देव हारपला घरीं । येक देव नेला चोरी । येक देव दुराचारीं फोडिला बळें ।।३४।। येक देव जापाणिला । येक देव उदकीं टाकिला । येक देव नेऊन घातला । पायातळी ।।३५।। काय सांगों तीर्थ महिमा । मोडुनि गेला दुरात्मा । थोर सत्व होतें तें मा । काय जालें कळेना ।।३६।। दा. बो. ६–६.

श्रीसमर्थशिष्य दिनकरांच्या स्वानुभव दिनकर या ग्रंथांत (९–१) त्या वेळच्या लोकस्थितीचें पुढीलप्रमाणें वर्णन आहे :–
राजा देशद्रोही जाला । देवस्थळांचा उच्छेद केला । तीर्थमहिमा

मोडला । ठाईंठाईंचा ।। ७४ ।। राज्यांचीं अनेक बंडें जालीं । गो-ब्राह्मणावरी पालाणें पडिलीं । पृथ्वी हलकालोळ जाली । कोण्ही नव्हे कोणाचें ।। ७५ ।। पर्जन्याचें अवर्षण अखंड । राजा प्रजालोक दुखंड । पृथ्वी जाली शत सहस्र खंड । सौख्यवार्ता न दिसे ।।७६।। कुळस्त्रिया भ्रष्टविल्या यवनीं । ब्राह्मण जाले दासीगमनी । अत्यंजाचे गृहीं उत्तम वर्णी । बळात्कारें भ्रष्टिजे ।। ७७ ।। तेणें जाला वर्णसंकर । वृद्धि पावला अनाचार । परस्त्री परद्रव्यापहार । घरन्यून स्वेच्छा बोलती ।। ७८ ।। कुळवधु निर्लज्जा जाल्या । त्या हीनयातीसी रतल्या । लोकापवादें भ्रष्टल्या । देशोदेशीं फिरती ।। ७९ ।। तीर्थें क्षेत्रें व्रतें उद्यापनें । सकळहि उच्छेदिलीं यवनें । धर्मचर्चा पुराणश्रवणें । कथाकीर्तन राहिलें ।। ८१ ।।

या सर्व लोकस्थितीचा आढावा श्रीसमर्थांनीं श्लोकार्धांत घेतला आहे:

दु:खदारिद्र्यउद्वेगें । लोक सर्वत्र पीडिले ।। स्फु. प्र.

## ११ सर्ग–उपाययोजना

ही स्वधर्मावरील आपत्ति जशी सहस्रमुखी होती, तशीच तिजवरील उपाययोजनाहि तितकी–किंबहुना अधिकच व्यापक नि बलवान असावयास पाहिजे होती आणि तशी ती समर्थांनीं केलीहि. परमेश्वरी आराधना हा सर्व आपद्ग्रस्तांस सर्व काळीं सर्वस्थळीं करतां येण्यासारखा सोपा उपाय; तो समर्थांनीं, त्याची तीव्रता अत्यंत वाढवून स्वत: केला आणि इतरांकडून ' उपासकांसि सूचना । उपासना ! उपासना ! ' अशी स्पष्ट सूचना देऊन करविला; अशा तळमळीनें प्रार्थना करणारे उपासक असंख्य वाढविले. त्यांना व सामान्य जनतेला ' धीर धरा ! धीर धरा तकवा । हडबडू गडबडू नका ।। ' असा धीराचा संदेश दिला आणि यश:प्राप्तीचें वर्म उघड करून उपदेशिलें कीं, ' मी कर्ता ऐसें म्हणसी । तरी तूं कष्टी होसी । राम कर्ता म्हणतां पावसी । यश कीर्ति प्रताप ।। ' राजकारणी क्षत्रियांसहि 'देव मस्तकीं धरावा । मग हलकालोळ करावा । ' अशा शब्दांनीं प्रथम भगवत्कृपेचा पाठिंबा मिळविण्यास सांगितलें.

"हें सकळ गुणापासी गती । सगुण भाग्यश्री भोगिती । अवगुणास दरिद्रप्राप्ती । येदर्थीं संदेह नाहीं ॥ सकळ अवगुणांमध्यें अवगुण । आपुले अवगुण वाटती गुण । मोठें पाप करंटपण । चुकेना कीं ।" करंटेपणाच्या आपदा नको असतील तर दोष–दुर्गुणांचा त्याग करून सद्गुणी व्हा, न्यायनीति व सदाचार यांची कास सोडूं नका. आणि हें खुलासेवार पटवून देण्यासाठीं श्रीग्रंथराजाच्या सबंध दुसऱ्या दशकांत गुणावगुणांची यादीच दिली. राजकीय स्थित्यंतराकडेहि त्यांचें पूर्ण लक्ष होतें. श्रीशिवरायांस लिहिलेल्या पहिल्याच लिखितांत:–

तीर्थें क्षेत्रें तें मोडलीं । ब्राह्मणें स्थानभ्रष्ट जालीं । सकळ पृथ्वी आंदोळली । धर्म गेला ॥ ७ ॥ या भूमंडळाचे ठाईं । धर्म रक्षी ऐसा नाहीं । मऱ्हाष्ट्रधर्म राहिला कांहीं । तुम्हां करितां ॥ १० असें तीर्थयात्रेंत पाहिलेल्या राजकीय परिस्थितीचें चित्र स्पष्टपणें रेखाटलें. "कुलधर्म, जातिधर्म वगैरे संभाळणारे पुष्कळ आहेत; पण महाराष्ट्र-धर्म रक्षण करणारे तुम्हीच तेवढे दिसता' असें म्हणण्यांत तत्कालीन सर्व लहानमोठ्या सत्ताधीशांचें अवलोकन समर्थांनीं फार बारकाईनें केलें होतें असें स्पष्ट दिसतें. 'मऱ्हाष्ट्र-धर्म'-रक्षकांनींहि काय काय सावधगिरी ठेवावयास हवी याचीहि किती सूक्ष्म विवंचना या महापुरुषानें केली होती, तें त्यांच्या कांहीं वचनांवरून ध्यानीं येईल.

१ फितव्यानें बुडती राज्यें । खबर्दारी असेचिना ॥ युक्ति ना शक्ति ना बेगी । लोक राजी असेचि ना ॥ अमर्याद फितवेखोर । त्यांचा करावा संव्हार ॥

२ शक्तीनें मिळती राज्यें । युक्तीनें यत्न होतसे ॥ शक्ती युक्ती जये ठाईं । तेथें श्रीमंत धांवती ॥ युक्तीनें चालते सेना । युक्तीनें युक्ति वाढवी ॥ संकटीं आपणा रक्षी । रक्षी सेना परोपरी ॥ युक्तीला पाहिजे शक्ति । तस्मात् शक्ति प्रमाण हे ॥

३ उदंड खस्तीचीं कामें । मर्द मारूनि जातसे ॥ नामर्द काय ते लंडी । सदा दुश्चित्त लालची ॥ मर्दें तकवा सोडूं नये । म्हणिजे प्राप्त होतो जय । काबू प्रसंग समये । वोळखावा ॥

४ मऱ्हाटा तितुका मेळवावा । आपला मऱ्हाष्ट्रधर्म राखावा । फड नासोंच नेदावा । पडिला प्रसंग सांवरावा । अति वाद न करावा । कोणी येकविषीं ॥

५ लोकांसी राखणें राजी । तें राज्य प्रबळे वळें । बंद बेबंद जाणावे । ताबे ताबे परोपरी ॥ मनुष्य राजी राखणें । हींच भाग्याचीं लक्षणें । कठिणपणें दुरी धरणें । कांहीं येक ॥

श्रीसमर्थांच्या २६।२७ हजार काव्यांतील जीं चार दोन वचनें दृष्टीसमोर यदृच्छया आलीं, तीं येथें दिलीं आहेत. त्यांच्या भांडारांत अशीं असंख्य रत्नें आहेत. मानवी जीवनास आवश्यक अशी कोणतीच महत्त्वाची बाब त्यांच्या उपदेशांतून सुटली नाहीं. दांत घांसणें, तोंड धुणें, वहिर्दिशेस जाणें असल्या दिसायला क्षुल्लक पण आरोग्यदृष्टचा महत्त्वाच्या वैयक्तिक बाबींपासून ‘भले कुलवंत म्हणावे । तेहि वेगीं हाजिर व्हावें। हाजिर न होतां भ्रष्टावें। लागेल पुढें ॥’ चोर भांडारी करावा। घसरतांच सांभाळावा’ अशा राजकारणाच्या मर्मापर्यंत, स्वयंपाक करण्यापासून किल्ल्यासारख्या इमारती बांधण्यापर्यंत, भोळाभाव-रामनाम यांजपासून तों अजातवादापर्यंत त्यांची सूक्ष्म नि व्यापक दृष्टि कशी चौफेर असने हें निरखून पाहिलें आणि त्या बरोबरच ब्रह्मांडाला गवसणी घालणारी त्यांची अचाट कर्तबगारी पाहिली म्हणजे मन व बुद्धि स्तिमित होऊन जातात आणि त्यांच्या चरणीं मस्तक सहजच नम्र होतें. ज्याचे दृष्टीखालून गेलें । ऐसें कांहींच नाहीं उरलें । पदार्थमात्रांसी लक्षिलें । मनें जयांच्या ॥ १–९–१० अशी ज्यांची गरुडदृष्टि आणि लोकोद्धारार्थ वाटेल ते श्रम-साहस करण्याची कायावाचामनेंकरून ज्यांची सदैव सिद्धता, त्या महापुरुषांनीं या भारतभूच्या उद्धारार्थ योजिलेल्या असंख्य साधनांचे मोजमाप कोणास कसें करितां येईल? त्यांच्या चरित्राच्या चिंतनानें जेवढें त्यांच्या साधनांचें अवलोकन करतां येईल तेवढें करण्याचा प्रयत्न करूं.

---

अनुक्रम
क्रमांक
वि.
नों: दि: ..............

# सुंदरकांड

## ( श. १५६६ ते १५७६ )

सुंदर मूर्ती सुंदर गुण । सुंदर कीर्ति सुंदर लक्षण ।
सुंदर मठीं देवें आपण । वास केला ॥१२॥
गिरीं कंदरीं सुंदरें वनें । सुंदरें वाहती जीवनें ।
त्यामध्यें सुंदरें भुवनें । रघुनाथाचीं ॥१३॥
सुंदर पाहोन वास केला । दास संन्निध ठेविला ।
अवघा प्रांतचि पावन केला । कृपाळूपणें ॥१४॥
—श्रीफुट ग्रंथ, समास प्रथम ( बाडांक ८६, ३०४, ३८४ )

### १ सर्ग— 'सुंदरकांड' संज्ञेचा अर्थ.

श्रीसमर्थांच्या अंतःकरणांत बालपणापासून उद्भवलेला लोककल्याणाचा हेतु १५६६–१५७६ या कालांत यशःसिद्धीच्या वाटचालीस लागला. यामुळें त्यांच्या मनांतील वैताग व नैराश्य जाऊन त्या जागीं आनंदाच्या व कर्तृत्वाच्या लाटा उसळूं लागल्या आणि अंतःकरणाच्या प्रसन्नतेमुळें त्यांना जिकडे तिकडे 'सुंदर' 'सुंदर' दिसूं लागलें. सृष्टिसौन्दर्यानें नित्य बहरलेलीं स्थानें हिमालयांत का थोडीं होतीं? चंद्रगिरी किंवा शिवथर येथील वनश्रीचें वैभव नगाधिराजाच्या परिसरापेक्षां काय अधिक रमणीय आहे? पण त्या पवित्र हिमाचलाच्या दिव्य वनश्रीनें श्रीसमर्थांच्या परितप्त चित्तास जें समाधान लाभलें नाहीं, तें सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांनीं परिवेष्टित अशा चाफळांत आणि चंद्रगिरी—शिवथर येथील घळींत मिळालें! कारण 'निशिदिनीं लागलेली जनचिंता' दूर होण्याचें चिन्ह दिसूं लागलें. धर्मोद्धारास आरंभ झाला! दिवाकर—अंबाजी

दत्तात्रय—भिमाजी—दिनकर-आक्का-वेणाबाई अशांसारख्या वैराग्य-संपन्न व कर्तृत्ववान् अनन्य शिष्यांचें मंडळ भोंवतालीं जमूं लागलें; आपल्या हृदयस्थाच्या प्रेरणेशीं एकरूप असणारा, स्वधर्मासाठीं फकिरी घेणारा, न्यायनीतीचा संरक्षक आणि गोब्राह्मण-प्रतिपालक – तो महाराष्ट्रभूमीचा सौभाग्यतिलक राजा शिवाजी व समर्थ—क्षात्रतेज व ब्राह्मतेज यांची युति झाली आणि धर्मोद्धाराचे कार्यास जोराची चालना मिळाली. त्यामुळें समर्थांचें अंतःकरण उल्हासानें अगदीं भरून गेलें! सुंदर मठ बांधले गेले; स्मशानांत मूर्तिमंत मंगल उभें राहिलें, सुंदर घळींत रहिवास झाला, स्वतःच्या सुंदर निष्ठावंत कर्तृत्वानें वैराग्याच्या राजास – समर्थांसहि याचनेचा मोह उत्पन्न करणारा कल्याण लाभला, सुंदर भुवनें निर्माण झालीं, सुंदर गिरिकंदरांतील सुंदर वनांत, जेथें सुंदर जीवनप्रवाह वहात आहेत, अशा स्थळींच्या सुंदर मठांत मूर्ति-गुण कीर्ति-लक्षण असें सर्वच ज्याचें सुंदर, त्या त्रिभुवनसुंदर रघुनाथ-जीनें आपण होऊन वास केला! जिकडे तिकडे सौंदर्यच सौंदर्य! ! श्रीसमर्थांच्या अनुभवास आलेले असे अनेक सुंदर प्रसंग या कांडांत असल्यानें त्याला श्रीसमर्थांनींच योजिलेलें 'सुंदरकांड' हें नांव दिलें आहे.

## २ सर्ग—महाबळेश्वरचें ब्रह्मारण्य

श. १५६६ चा श्रीरामनवमीचा उत्सव पंचवटीस झाल्यावर श्रीरामप्रभूची आज्ञा घेऊन आणि टाकळीस राहिलेल्या उद्धवास पुढील कार्याच्या सूचना देऊन समर्थ वैशाखांत कृष्णेच्या उगम-स्थानीं श्रीक्षेत्र महाबळेश्वरला एकटेच पोहोंचले. उन्हाळ्यांत हवा खाण्याचें ठिकाण म्हणून आज प्रसिद्ध असलेलें महाबळेश्वर हें गेल्या १२५–१५० वर्षांत इंग्रजांनीं निर्माण केलें असून तेथून उत्तरेस सुमारें दीड कोसावर जुनें महाबळेश्वर आहे. इंग्रजी अमलापूर्वीं महाबळेश्वर म्हणून हेंच स्थान प्रसिद्ध होतें. आतां त्याला क्षेत्र महाबळेश्वर आणि नव्या वस्तीला शहर किंवा महा-

बळेश्वर म्हणतात. तेथून क्षेत्राकडे जाणारा हल्लींचा गाडीरस्ता दुतर्फा अरण्यामधून आहे. पूर्वीचें ब्रह्मारण्य व त्यांतील भस्माचें टेंकाड हीं तेथें आहेत; पण त्यावेळच्या वनश्रीचा घनदाटपणा गेला. इंग्रजी अमलांत हिरावून नेलेलीं सुंदर हरित वस्त्रें अजून सगळीं न मिळाल्यानें सभोंवारची पर्वतराजी उघडी वाघडीच वावरत आहे. तथापि आजहि तेथील वनश्रीचा थाट नि निर्मळ व पवित्र एकांत मनोहर आहे. १५६६ च्या सुमाराचें त्या स्थळाचें सौंदर्य आपण श्रीसमर्थांच्या खडचा बोलींतून ऐकूं.

माहांबळी अतीबळी । भीम भैरी पराक्रमी ।। सुंदरा पंचगंगा त्या । कृष्णा वेण्या सरस्वती ।।१।। गाइत्री सावित्री ब्रह्मा । विष्णु रुद्र गरुडध्वजु ।। उमा महेश्वरा नंदी । सर्पमूषक पंचाननु ।।२।। उगमू पूर्वभागीं तो । गायमुखें मनोहरें ।। त्या तळीं सुंदरा बागा । नाना तरु परोपरीं ।।३।। नारळी पोफळी केळी । बाफळी बकुळी तुती ।। केतकी मालती धात्री । काळोत्री तुळसी बहु ।।४।। शतपत्री सेंदरी नाना । आरगुंदी जास्विनी बहु ।। पाडळी ढवळी दवनी । निंबोणी रायआंवळी ।।५।। आनसी फणसी पेरी । खीरणी कविठी बहु ।। नारंगी बदरी सेंबी । कवंदी तोरणी गुणी ।।६।। खर्बुजी तर्बुजी सेंदा । सेंदण्या रायसेंदण्या ।। वाळकें काकड्या तौसीं । चिबडें तुरंजें बहु ।।७।। खजुरी द्राक्ष अंजीरी । बादामें आक्रुटें झटें ।। कलांगडीं तारवटी केळें । नारेळे बहुजीनसी ।।८।। हुर्डा वोंब्या उळा[1] ढाळे । वाटाणे फोळाणे चणे ।। राताळें गाजरें वांगीं । दहीं दुध तक्र नेटकें ।।९।। मोहोळ कांदे मुळे सेंगा । मुग चौळे परोपरी ।। उंस काळे काठे पुंडें । वेळा वाळाच शर्करा ।।१०।।

श्रीसमर्थांनीं वर्णिलेलें हें इतकें सृष्टिवैभव आज तेथें दिसणार नाहीं. तथापि शरद, हेमंत व वसंत या तीन ऋतूंत तेथील वनश्री अद्यापिहि फार रमणीय असते.

---

१ हुळा, भाजलेल्या टहाळांतील हरभरे.

येथें कृष्णेच्या उगमस्थानच्या मागील बाजूस समर्थांनीं स्थापिलेल्या मारुतिरायाचें स्थान आहे; तें दिवाकरभट, अनंतभट वगैरे जे शिष्य झाले त्यांचेसाठीं निर्माण झालें. श्री सांप्र. का. शके १६०२च्या लेखांक ४० मध्यें "श्री (हनुमंत) देव वास्तव्य श्रीक्षेत्र माभलेश्वर यांचें देऊल पंचगंगे सन्निध राजश्री दिवाकर गोसावी यांणीं बांधोन प्रतिष्ठा केली" असें म्हटलें आहे. ही बहुधा जुन्या देवळाची कांहीं मोडतोड झाल्यानें कराव्या लागलेल्या जीर्णोद्धाराच्या वेळची प्रतिष्ठा असावी; अथवा ले. २० प्रमाणें १५९९ व १६०२ चे दरम्यान भगगाऊ प्र॥ कारवी येथील नूतनप्रतिष्ठा असावी. याच दिवाकरांचें बुद्धिवैभव व कर्तृत्व यांविषयीं "दिवाकरगोसावी म्हणजे दुराखी मोहरा, हा महाबळेश्वरकर आहे, त्याची बुद्धिहि महाबळ आहे, राजद्वारीं कित्येक प्रसंगीं पाठवावयास योग्य; त्याचे हातीं राजगृहींचा कार्यभाग संपादून घेणें उचित." असा अभिप्राय सद्गुरु समर्थांनीं प्रकट केला आहे. दिवाकर म्हणजे सद्गुरुमहाराजांच्या दरबारांतील सर्व पारिपत्याधिकारी–राजकारण मंत्री होत. दुसरे शिष्य, दिवाकरांचे बंधु अनंत कवि यांनीं केलेलें श्रीसमर्थस्तोत्र पुढीलप्रमाणें आहे–



महाबळेश्वर येथील मारुती.

निर्वाणस्थळ गौतमी परि महाकृष्णातिरीं जो वसे । कांता संग नसे प्रपंचहि नसे आशा दुराशा नसे । ज्याला उत्तम रामदास म्हणती त्रैलोक्य वंदीतसे । ऐसा सद्गुरु हा अनंतकविचा बद्धांसि तारीतसे ॥ १ ॥ वस्त्रें हुर्मुजि भर्जरी पटकुळें माथां चिराही असे । काया सुंदर गौरवर्ण विलसे भाळीं अवाळू असे । स्वामींचा कविता-समुद्र अवघा कल्याण लीहीतसे । ऐसा सद्गुरु० ॥ २ ॥ जेणें राघवमूर्ति मांडवसुतेचीये तिरीं स्थापिली । जे ध्यानीं विधि-शंकरादिहृदयीं हृत्पंकजीं भाविली । तीचें ध्यान धरूनियां गिरिवरी जो गुप्त राहातसे । ऐसा० ॥३॥ उत्साहस्थळ चाफळीं परि महा-घळयेंत जो कीं वसे । शाहाजीसुत भोंसला गडपती शब्दासि पाळीतसे । बुद्धीचा उदधी[1] महाबळनिधी कार्यासि केला असे । ऐसा सद्गुरु० ॥४॥ जेणें रुद्र दहा मनोहर जगीं येकागळे स्थापिले । प्रत्येकीं अकरा बिघे नृपतिच्या मुद्रांकितीं अर्पिले । त्या त्या नाग-रिकां जनां नवविधा भक्तीस लावीतसे । ऐसा सद्गुरु० ॥ ५ ॥ जेणें सात्त्विकराजसादिक तिन्ही आत्मस्थितीं आटले । ॐकारादि करूनि अष्टविध हे देहे[2] निराकर्णिले । विज्ञानें भवसिंधु पार तरला जिंकोन साही धुरा । ऐसा सद्गुरु रामदास विलसे जो निस्पृहाचा[3] तुरा ॥६॥ ज्याची गाढ उपासना जरि असे जाणे अयो-ध्यापती । नेणे त्याहुनि अन्य दैवत असे ऐसी जयाची स्थिती । ज्याचा गुप्त विचारही परि असे नारीनरां लेंकुरां । ऐसा सद्गुरु रामदास० ॥ ७ ॥ सह्याद्री गिरिचा विभाग विलसे मंदारश्रृंगा-परीं । नामें सज्जन जो नृपें वसविला श्रीउर्वशीचे तिरीं । साकेता[4]-धिपती कपि भगवती[5] हे देव ज्याचे शिरीं । तेथें जागृत रामदास विलसे जो या जनां उद्धरी ॥ ८ ॥ सोळाशेंवरि तीन

---

१ दिवाकर २ वेदान्तांम्बुधिचे प्रवाह अवघे जेणें निराकर्णिले. ।–पाठभेद.

३ ऐसा सद्गुरु तो अनंत कविचा जो योगियांचा तुरा ।–पाठभेद

४ साकेत = अयोध्या. ५ सज्जनगडावरील आंग्लाई

दुर्मति पहा संवत्सरा अंतरीं । माध्यान्हीं शुभ माघ वद्य नवमी त्या मंदवारांतरीं । रामीं आत्मनिवेदनी करि वपू सत्कीर्तिची हे ध्वजा । स्वानंदें सुसमाधि सज्जनगडीं श्रीरामदासा भजा ॥९॥"

वरील वर्णनावरून महाबळेश्वरीं अवघे दोनच शिष्य समर्थांस मिळाले असा अर्थ करणें योग्य नव्हे. 'संकेतें लोक वेधावा । एकुण एक बोधावा' हा ज्यांचा दंडक, 'मनुष्य वेधींच लावणें । कांहीं येक', 'उदंड समुदाय करावा । परी गुप्त रूपें ।' या ज्यांच्या मठपति महंतांस आज्ञा, 'भक्तमंडळी भूमंडळीं कोणें मोजिली ?' असें सदा सर्वदा सन्निध राहणारे कल्याण जेथें म्हणत आहेत, या कल्याणाच्या म्हणण्यास 'समर्थें कित्येक गुप्त शिष्य केले । ते ते समर्थासी विदित भले ।' (स. प्र. १०–१०) या गिरिधरांच्या वचनानें दुजोरा मिळत आहे; त्यांचें साद्यंत चरित्र मिळण्याइतकें आपलें भाग्य आहे कोठें ? तशांत देशांतील महत्त्वाचीं असंख्य कागदपत्रें इंग्रजांनीं लांबविलीं, कित्येक जळून, भिजून, कुजून व नदीप्रवाह होऊन नाहींशीं झालीं आणि मूळ श्रीसमर्थ व त्यांचे कार्यकर्ते यांचें बोलणें चालणें गूढ किंवा सांकेतिक! आज जीं कांहीं प्रकाशित वा अप्रकाशित चरित्रें उपलब्ध आहेत, त्यांत वाकेनिशी टिपण व श्रीसमर्थप्रताप यांखेरीज एकहि समकालीन नाहीं. सध्यांचें ३९ कलमी वाकेनिशी टिपण हें सद्‌गुरुसमर्थ विद्यमान असतांना त्यांचा दिनक्रम लिहिणाऱ्या वाकनिसानें जें कांहीं सविस्तर लिहून ठेविलें होतें, त्याची केवळ सूची आहे. तो मूळचा मोठा दिनचर्यावृत्तांत अद्यापि अनुपलब्ध आहे. आणि श्रीसमर्थप्रतापहि गिरिधरांनीं जीं 'अनंत समर्थप्रतापचरित्रें देखिलीं ऐकिलीं' त्यांचें स्मरणार्थ टिपण दिसत असून तेंहि कांहींसें सांकेतिक भाषेंत लिहिलेलें आहे. इतर सगळीं चरित्रें शेसवाशें वर्षांनंतर लिहिलीं आहेत. त्या चरित्रकारांनीं लिहिलेल्या ग्रथांत जुन्या कागदपत्रांच्या आधारें मिळालेली माहिती कोणती व ऐकीव कोणती याचा निर्णय करण्यास आतां कांहींच साधन नाहीं. अशा एकंदर परिस्थितींत सांपडलेला श. १८७७ मधील लेखक तरी

निश्चित माहिती कशी देऊं शकेल ? श्रीसमर्थांच्या व त्यांच्या शिष्यांच्या उद्गारांच्या आधारानें पूर्वग्रंथांतील जेवढा भाग स्वतःस समजेल–उमजेल तेवढा सद्यःकालास शोभेल असा नीटनेटका करून समर्थभक्तांपुढें ठेवावयाचा, एवढेंच त्याच्या स्वाधीन आहे.

## ३ सर्ग–श्रीरोकडोबा व धनगराची त्रिपदा गायत्री

महाबळेश्वराहून श्रीसमर्थ वाईस गेले. वाई हें पूर्वीपासून क्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे. तेथील थिटे, पिटके व चित्राव या घराण्यांतील लोक समर्थांचे शिष्य झाले. कृष्णेच्या दक्षिणतीरीं श्रीसिद्धेश्वराच्या स्वयंभू स्थानालगत समर्थांनीं मारुतिरायाची स्थापना करून तेथील पूजा पिटके यांजकडे दिली. त्या स्थानास 'रोकडोबा' असें नांव आहे. 'रोकडोबा' म्हणण्याचें कारण कळत नाहीं; तथापि परंपरागत ऐकीव कथा पुढीलप्रमाणें आहे : ज्या सिद्धनाथ किंवा सिन्नसवाडीला लागून हें स्थान आहे तेथील एक धनगर श्रीसमर्थांकडे 'पोटभर' उपदेश मागण्यासाठीं आला. उपदेश म्हणजे धान्य वगैरे सारखी कांहीं खाण्याची वस्तु असावी अशी त्याची कल्पना ! पण तो भाबडा अडाणी म्हणून समर्थांनीं त्याची हेळणा केली नाहीं. 'खटनट या रे । उद्धरूनि जा रे ।' हाच खऱ्या संतांचा दंडक असतो. श्रीसमर्थांनीं त्याचें भाबडें परंतु विकल्परहित अंतःकरण जाणलें. ते म्हणाले, 'गड्या, माझें एक काम करशील तर तुला अगदीं पोटभर उपदेश देतों'. 'अदुगर तुझं काम न मंग मला दे उपदेश ! पोटभर दे बर का ! पोरबाळं लई जेर झाल्यात भुकनं.' त्या सरळवृत्तीला आदरार्थी बहुवचनी भाषा माहीतच नव्हती. मनांत येईल तें बोलून मोकळें व्हायचें एवढेंच त्याला ठाऊक. 'मनाचें ऐकूं नकोस' ही त्रिपदा गायत्री त्याला उपदेशून समर्थ निघून गेले. या पदत्रयाचें चिंतन करीत व त्या तीन पदांचा जेवढा अर्थ त्याला उमगला, तदनुरूप आचरण दृढनिश्चयानें करीत तो तेथेंच उभा राहिला. आंत उद्भवणारी एकेक कल्पना 'मनाचं ऐकूं नकोस'

या सद्‌गुरुवाक्यानें तो दाबूं लागला आणि आस्ते आस्ते मनांतील कल्पनाकल्लोळ सगळा संपला; देहभान हरपलें; सात दिवस अन्न पाण्यावांचून तो तेथेंच उभा होता. सातवे दिवशीं प्रत्यक्ष रामप्रभू त्याच्या अंतश्चक्षूसमोर प्रकट झाले, पण त्यांजकडे तो पाहीना; कारण तसें रामदासस्वामींनीं त्याला सांगितलें नव्हतें ! 'भलतैसें गुरुवचन । परी वरिष्ठ वेदांहून ।' हें गुरुवचन त्याला माहित नव्हतें; पण तदनुरूप त्याची कृति मात्र निःशंकमनानें घडत होती. हें त्याचें स्थित्यंतर समर्थांस अज्ञात थोडेंच होतें ? त्यांनीं स्वतः येऊन जेव्हां त्याच्या मस्तकीं हात ठेविला, तेव्हां तो भानावर आला; पण त्या वेळीं त्याची देहगेहाची किंवा बायका पोरें पोसण्याची कल्पना पार मावळली होती. तथापि 'पोटभर देतों' असा शब्द दिलेला, म्हणून समर्थांनीं शिवरायास सांगून सिन्नसवाडीची पाटिलकी त्या धनगरास देवविली, ती अद्यापि वाडीच्या धनगर घराण्यांत चालत आहे. रोकडोबाची स्थापना त्या धनगरासाठीच झाली असें ऐकण्यांत आहे. त्या खेड्यांतील जुनीं केंवळीं घरें आतांपर्यंत अनेकदां आगींत सांपडलीं, त्यामुळें पूर्वींचा कागदपत्रांचा कांहीं पुरावा असलाच तर तो नष्ट झाला. पण असले प्रकार शक्य आहेत का ? अशी शंका कित्येकांच्या मनांत डोकावेल, तिच्या निरसनार्थ–१



रोकडोबा

'गुरोस्तु मौनं व्याख्यानं शिष्या विच्छिन्नसंशयाः । हें दक्षिणामूर्ति-स्तोत्रांतील श्रीमच्छंकराचार्यांचें वचन, २ ' ज्याचेजवळ कांहीं देण्यासारखें असेल तोच शिकवितो, उपदेश देतो ; कारण शिकविणें म्हणजे बडबड करणें नव्हे, उपदेश देणें म्हणजे मतप्रतिपादन नव्हे, तर (आत्म्याशीं) संबंध जुळविणें याचें नांव उपदेश– माझे सद्गुरु (He alone teaches who has something to give; for, teaching is not talking, teaching is not imparting doctrines; it is communicating— My Master)

हें स्वामी विवेकानंदांचें स्पष्टीकरण आणि लंडन फोरमचा बातमीदार व भारतीय गूढ विद्येचा शोध (A Search in Secret India) या सुप्रसिद्ध ग्रंथाचा कर्ता श्री. पॉल ब्रंटन यास श्री. रमण-महर्षि व त्यांचे योगी रामय्यादि शिष्य यांच्या सहवासांत आलेले व स्वतः ब्रंटननींच प्रसिद्ध केलेले देहातीत अवस्थेचे दिव्य अनुभव एवढीं तीन प्रमाणें पुरेशीं आहेत. अस्तु.

## ४ सर्ग–श्रीजरंडेश्वरीं रहिवास

वाईहून पुढें माहुली व जरंडेश्वर या भागांत समर्थ पावसाळ्यापुरते स्थिरावले. कृष्णेच्या पश्चिम तीरीं सध्यां असलेली संगम माहुली ही शाहूमहाराजांचे वेळीं वसली; समर्थकालीं ती नव्हती; तेव्हां फक्त पूर्व तीरावरील क्षेत्र माहुलीच होती. विष्णु-तनु कृष्णा व महेश्वरमूर्ति वेण्या या सह्याद्रीच्या पोटीं एकेच स्थळीं-महाबळेश्वरीं उत्पन्न झालेल्या दोघी भगिनींचा संगम तेथें आहे. त्या संगमाच्या पवित्र वाळवंटांत बालवृत्तीनें कधीं मुलांबरोबर समर्थांनीं खेळत असावें, केव्हां पिसाटासारखें कोठें तरी हिंडत रहावें,[1] कधीं मनांत आलें तर माधुकरी किंवा कोरान्न

१ लावी चटक पळे । पाठीं कटक मिळे । धरुनि नेती वळें । पूजिती देति फळें । न भक्षितां जातो सळें । येकायेकीं त्याचि काळें । कृष्णेच्या तीरा आले । पिसें जसें तसें बोले । परीक्षितां मना मिळे । ग्रामवासी बाळें मुलें । त्यांत ब्रह्मानंद खेळे ।।– दोन जुनीं चरित्रें पृ. १८१

भिक्षा आणावी आणि इच्छेस येईल तेव्हां गिरिराज जरंडेश्वराच्या कुशींत विश्रांति घ्यावी. श्रीसमर्थांच्या वास्तव्याची म्हणून दोन ठिकाणें जरंडेश्वरीं दाखविलीं जातात. एक, पर्वतमाथ्यावर श्रीराम-मंदिराचे मागें असलेली एक पाषाणाच्छादित कपार व दुसरें, अर्ध्या डोंगरांतील मोठी गुहा. (त्या गुहेंत एकटया दुकटयानें जाण्याचें साहस सांप्रतच्या कालीं करूं नये.) सभोंवतालच्या अरण्यांतहि केव्हां केव्हां स्वेच्छाविहार करावा; एखादे दिवशीं वाघाला बरोबर घेऊन वस्तींत यावें, तर दुसऱ्या वेळीं वानरचेष्टा करीत झाडावरच उडया मारीत रहावें. संगमावर स्नानसंध्या करीत बसलेलेहि कधीं दिसत. यांपैकीं कांहीं लीला लोकोद्धार काण्डांत यावयाच्या आहेत.



जरंडेश्वर

या वेळची कालक्रमणा जरंडाडोंगर येथें अनादिसिद्ध श्रीमारुतीचें स्थान आहे, तेथें नेहमीं रहावें आणि कृष्णातीरीं येऊन स्नानसंध्या करावी, क्षेत्रांत माधुकरी मागावी आणि वाळवंटीं पोरांशीं खेळावें (बखर) अशी चतुर्विध प्रकारची होती. तुकाराम महाराज, जयराम स्वामी, रंगनाथ स्वामी, आनंदमूर्ति, धरणीधर देव, केशव स्वामी, वामनस्वामी इत्यादि साधुसंतांच्या गांठीभेटी याच वेळीं झाल्या, (तें सर्व चरित्र उत्तरार्धांत येईल). असें बखर व वाकेनिशी टिपण यावरून

दिसतें. हें सगळें चरित्र शहापूरचे बाजीपंत ऊर्फ कमळाजीपंत यांनीं अलाहिदा लिहून ठेवल्याचेंहि टिपणांत नमूद आहे; पण तें अलाहिदा चरित्र मात्र अद्याप मिळालें नाहीं.

## ५ सर्ग—नांदत्या घरांत 'हें' म्हणतात का ?

शके १५६६ चा पावसाळा संपल्यावर कृष्णेच्या कांठाकांठानें समर्थ पुढें मसूर-शहापूर भागांत आले. शहापूरच्या आग्नेयेस सुमारें अर्ध्या कोसावर रांजणखिड आहे. पुरातन कालचे दोन दगडी रांजण त्या खिडीच्या तोंडाशीं आहेत, म्हणून तिला रांजणखिड म्हणतात. त्या खिडीच्या ओळींतच पश्चिमेला एक टेंकडी आहे, तिच्या माथ्यावर समर्थांनीं आपला मुक्काम ठेविला. अद्यापिहि तेथें पश्चिम व उत्तर बाजूस आडोसा असलेली व ४–५ माणसें कोणास न दिसतां बसण्यापुरती जागा आहे. या जागेंत समर्थ केव्हां केव्हां बसत म्हणून तिला 'दासटेंकडी' असें नांव पडलें आहे. मसूरशहापूर रिसवडे वगैरे आसपासच्या गांवांतून कोरडी भिक्षा आणून चार पानगे भाजावे, तो नैवेद्य श्रीरामप्रभूस अर्पण करून नंतर आपण सेवन करावा, बाकीचा काळ लोकनिरीक्षण, आत्मचिंतन वा नामस्मरण यांत घालवावा, असा तेथें श्रीसमर्थांचा क्रम होता. एक दिवस सकाळींच शहापुरास भिक्षेस आले. त्यांचें नेहमीचें चालणें भरभर असे. "समर्थ हनुमानस्वरूप वायोरूप निर्धारें। जातां तीर धरिती मागिल्या करें। समुद्रीं जहाज चाले जेंवीं त्वरें। तेंवी सत्वरें श्रीसमर्थगमन ॥ २२ ॥" स. प्र. १९ भिक्षेस निघाले तरी हाच प्रकार. जागृतीचा श्लोक आळीच्या एका टोंकास म्हणावयास सुरवात केली तर तो दुसऱ्या टोंकास संपावयाचा ही त्यांची नेहमींची पद्धति; पण आज तेथील कुळकर्ण्याचें भाग्य उदयास आलें. त्याच्या दाराशीं सकाळच्या रामप्रहरी,

नव्हे सार संसार हा घोर आहे। मना सज्जना सत्य शोधूनि पाहे। जनीं वीष खातां पुढें सूख कैंचें। करीं रे मना ध्यान या राघवाचें ॥ जय जय रघुवीर समर्थ ! अशी श्लोकाची गर्जना नि पाठोपाठ 'रघुपति राघव राजाराम। पतितपावन सीताराम।'

असें भजन एक दिवस सुरू झालेलें घरांतील माणसांच्या कानीं आलें. घरचीं व शेजारचीं मुलेंबाळें गंमत पहावयास भोंवतालीं जमलीं. त्यांच्या गर्दींतून वाट काढीत एक सवाष्ण मनगटापर्यंत सारवणानें भरलेल्या हातांत पोतेऱ्याचा बोळा घेतलेली अशी पुढें येऊन उभी राहिली आणि तावातावानें समर्थांस म्हणाली:–

'अहो गोसावी बुवा, काय चालविलंय तुम्हीं हें ? दिसत नाहीं का तुम्हांला हें भरलेलं घर ? लेंकराबाळांच्या नांदत्या घरांत हें म्हणतात का ?

'आई, काय बोलतोंय मी?' समर्थ विचारतात. 'मी तर रामाचें भजन करतोय नुसतें !'

'अहो तें तेंच तें–' हातवारे करीत बाई उसळून उद्गारली. 'तें आमच्यासारख्या घरबाऱ्यांच्या इथं म्हणायचं नसतं ?'

'मग कुठं म्हणायचं ?' समर्थांनीं चकित होऊन विचारलें.

'अहो शेवटच्या पालखीच्या वेळीं म्हणत असतात.' उत्तर मिळालें. 'तुम्हांला माहीत नाहीं ? आमच्या इथें असलें कांहीं बडबडूं नका !'

बाई घरांत निघून गेली. आणि समर्थ विचारांत पडले. 'रामा, ही तर मुदलावरच धाड आली ! आतां पुढं कसं करायचं ?' असा विचार करीत स्वारी तिथूनच परतली. दुसरे दिवसापासून त्या कुळकरण्याच्या दाराशीं रोज जावें, एक श्लोक म्हणावा, थोडें भजन करावें आणि बाईकडून शिव्यांची भिक्षा घेऊन परतावें असा नित्यनेमच जणूं समर्थांनीं धरला. असे १०–१५ दिवस गेले. एक दिवस समर्थ भिक्षेस गेले असतां घरांत जिकडे तिकडे सामसूम दिसलें. रोजची शिव्यांची भिक्षा येईना. समर्थांनीं ओसरीवर डोकावून पाहिलें, तों सगळ्या बाया व मुलेंबाळें खिन्न असलेलीं दिसलीं. शिव्या देणाऱ्या बाईच्या डोळ्यांतून तर अश्रूच वहात होते. समर्थांनीं कनवाळूपणानें दुःखाचें कारण विचारलें. बायांपैकीं कोणीतरी रागानें उत्तर दिलें,–

" बाबा, हा सगळा तुमचा प्रसाद भोंवला ! तुमच्या पायगुणानं हें संकट आमच्यावर कोसळलें. कोणाच्या नांदत्या घरांत भलतं सलतं कांहीं बोलूं नये हें आम्ही तुम्हांला कितीदां हात जोडून सांगितलं बरं ? अहो, जें मसणवटींत म्हणायचं तें तुम्हीं या लेंकरां-बाळांच्या घरांत म्हणतां ! अन् त्याचीं फळं आम्हाला हीं अशीं भोगावीं लागतात ! "

हे उद्गार कानावर येतांच समर्थ मोठ्यानें हंसले; त्याबरोबर तेथील दुःखाची छाया निमी कमी झाली; पण एकीनें रागावून हटकलेंच कीं, ' आम्ही दुःखानें रडतों आहों अन् तुम्हीं हंसतां ?

'हसूं नको तर काय करूं ? ज्या रामनामानें त्रिभुवनव्यापी संकटें दूर झालीं, त्यानें तुमच्यावर संकट आणलें असें तुम्हीं म्हणतां ! काय म्हणावें या समजुतीला ? तुम्हीं रामनाम घेण्याचा निश्चय तर करा आणि बघा संकट दूर होतंय कीं नाहीं तें !'

' आम्हांला काय कळतं बाबा ? वडील माणसं सांगतात तसं आम्हीं बोलतों. त्यांतलं खरं खोटं आम्हांला काय कळणार ? आमच्या घरमालकांना आज सरकारनं पकडून नेलंय; आतां काय होतंय कुणास ठाऊक !'

' तुम्हीं रामनाम घेण्याचा निश्चय करा; बघा, अकरा दिवसांत तुमचे मालक सुटून येतील ! '

' तसं झालं तर कुणाला नको आहे ? पण हें व्हावं कसं ?'

' तुम्ही काळजीच सोडा. रामनाम घेण्याचा तुम्ही निश्चय केलात तर अकरा दिवसांत तुमचे मालक सुटून आलेच पाहिजेत.'

' बरं बाबा तुम्ही म्हणतां तसं करूं. कांहीं गांवकीच्या भानगडींत आमच्या मालकांना कऱ्हाडीं मोगलाई आहे तिथें धरून नेलं आहे आणि तिथून विजापुरास नेलंय असं कळतं. ते सुटून आले तर तुमचं म्हणणं मान्य करूं.'

' ठीक आहे, आजपासून अकरावे दिवशीं तुमचे मालक सुटून आले, तर तुम्ही रामनाम घ्यायला पाहिजे. '

'उत्तम' असें बाया बोलल्या. पुढील वृत्त बखरीच्या आधारें थोडक्यांत निवेदन करूं.

शहापूरचें कुळकरणपण मूळचें अंबाजीपंतांचें; पण त्यांचे जांवई बाजीपंत ऊर्फ कमळाजीपंत हेच गांवकीचें काम पहात असत. त्या कामांत कांहीं घोंटाळा दिसल्यामुळें त्यांस कऱ्हाडच्या ठाणेदारानें पकडून विजापुरास पाठवून दिलें. त्यामुळें त्यांची स्त्री सतीबाई व कुटंबांतील इतर मंडळी चिंताग्रस्त असतां वर लिहिल्या-प्रमाणें त्यांचें सांत्वन करून समर्थांनीं विजापुरास जाऊन पातशहास हिशेब देऊन कुळकरणी यांचे जांवई बाजीपंत यास सोडवून घेतलें. शहराबाहेर आल्यावर बाजीपंतांनीं कोण, कोठून आलांत इत्यादि प्रश्न समर्थांना विचारलें. त्यावर 'नांव दासोपंत, तुमची स्त्री सतीबाई व श्वशुर अंबाजीपंत यांनीं पाठविलें म्हणून आलों' असें समर्थांनीं सांगितलें. शहापुरचे शिवारापर्यंत बरोबर आले. बाजीपंत घराच्या ओढीनें पुढें चालले होते, सहज मागें वळून पाहिलें तों 'दासोपंत' नाहींत ! मागें पुढें पहात पंत देव-दर्शन करून घरीं आले. सर्वांच्या भेटी गांठी झाल्यावर बाजीपंत म्हणाले 'तुम्ही कारकून पाठविला, त्यानें दरबारच्या म्हणण्या-प्रमाणें सगळा हिशेब पटवून देऊन मला सोडवून आणिलें, रिसवड-पर्यंत तो बरोबर होता. पण पुढें कोठें गेला कळत नाहीं. कोठले ते दासोपंत ?' घरच्या माणसांनीं सांगितलें 'आम्हीं कोणी कारकून पाठविला नाहीं. पण एक गोसावी भिक्षेस येत असे. तो म्हणाला होता कीं, तुमचे पुरुष आजपासून अकरावे दिवशीं सुटून येतील; ते आल्यावर तुम्ही रामनाम घ्यायला पाहिजे. आम्ही त्यांचें म्हणणें कबूल केलें. आजचाच तो अकरावा दिवस !'

'ते राहतात कोठें ? बाजीपंतांनीं चौकशी केली. 'आम्हांस माहीत नाहीं; रानावनांत कोठें रहात असतील.' असें उत्तर मिळालें. बाजीपंतांनीं चोहोंकडे माणसें पाठवून शोध घेतला पण पत्ता लागला नाहीं. तेव्हां दर्शन झाल्याखेरीज अन्न घ्यायचें नाहीं असा निश्चय करून बाजीपंत तीन दिवस उपोषित

राहिले. चवथे दिवशीं त्यांच्या अंगणांत 'जयजय रघुवीर समर्थ'ची गर्जना करीत समर्थ येऊन उभे ठाकले. त्यांस पाहतांच वांसरूं जसें गाईला पाहतांच मोठ्यानें हंबरतें, त्याप्रमाणें हंबरडा फोडीत सतीबाई धांवली आणि चरणीं मस्तक ठेवून नेत्रोदकानें समर्थ-चरणांस स्नान घालूं लागली.

'महाराज,' सतीबाई म्हणते 'मजला चुडेदान दिलें, आपल्या शब्दाप्रमाणें अकरावे दिवशीं ते आले; पण आतां आपल्या दर्शना-साठीं ते आज तीन दिवस उपाशी आहेत! त्यांच्यावर कृपा करा.'

इतक्यांत बाजीपंतांनीं येऊन साष्टांग नमस्कार घातला. त्यांचे सासरे अंबाजी मुऱ्हार, चुलत सासरे दत्ताजी अनंत व घरां-तील मुलेंबाळें या सर्वांनीं येऊन समर्थांस वंदन केलें आणि अनुग्रहप्रसादार्थ प्रार्थना केली. तिला समर्थांची अनुमति मिळाल्या-वर सगळ्यांनीं विधिपूर्वक अनुग्रह घेतला.

यानंतर मात्र सतीबाईंची कसोटी समर्थांनीं फार घेतली. प्रतापकार म्हणतात– समर्थउदरीं परत्र कन्या। बाई नामें परम मान्या। वैराग्यदीक्षेंत तडवली[१] धन्या। लेंकुरें समर्थें पुरलीं उकर्डीं[२] ॥ १७ ॥ भरलीं घरें समर्थें लुटविलीं। सर्पवेटाळें घरीं सोडिलीं। हेमभूषणें पाषाणें करीं तोडिलीं। कर्मपात्रें फोडिलीं किती वेळे ॥ १८ ॥ (स. प्र. ११) या सर्व प्रकारच्या परीक्षेंत सतीबाई श्रीकृपें उत्तमप्रकारें उत्तीर्ण होऊन सद्गुरुकृपाप्रसादास पात्र झाल्या. पुढें चाफळास उत्सव सुरू झाल्यावर पाडव्याचे दिवशींचा उत्सवांतील नैवेद्य–कीर्तनादि करण्याचा मान सतीबाईंना

---

१ टिकली. २ समर्थप्रतापांतील या वर्णनाशीं भीमस्वामी तंजावरकरांनीं केलेलें पुढील वर्णन किती जुळतें आहे तें पहा–आणुनी स्वामीस। पूजिती दिसेंदिस। सोसुनी सर्व घीस। पाडी फोडी करणें नास। बहुतांपरी दिल्हा त्रास। नाणुनी सुमनास। धरियेली दृढकास। घेऊनी अभयास। सर्व बंधु सुहृदास। अंबाजी मुरारीबास। अनुग्रहो पूर्ण त्यास। केला शहापुरीं वास। भजनलाभ सर्वांस। तेव्हां धरी भीम चरणास रे ॥ ११ ॥ दो. जु. चरित्रें पृ. १८२

मिळाला. रामनामाला अशुभ मानणाऱ्या बाईमध्यें एवढी क्रांति सुखासुखी झाली नाहीं. तिला तसेंच तीव्रतेनें साधन करावें लागलें.

सद्‌गुरुदर्शन झाल्याविना अन्नग्रहण करावयाचें नाहीं असा नियम त्यांनीं कांहीं दिवस केला होता. पण समर्थ चार चार आठ आठ दिवस कोठें असत त्याचा पत्ताच लागत नसे; अर्थात् सतीबाईस तितकीं उपोषणें पडत. एकदां तर भर पावसाळ्यांत १० दिवसपर्यंत समर्थांचा ठावठिकाणा कळेना. अकरावे दिवशीं चांदोबाच्या ( चंद्रगिरीच्या ) डोंगरांत समर्थ असल्याचें समजलें. भरलेली कृष्णानदी मधें; ती ओलांडून, वसंतगडचा डोंगर चढून, अरण्यांतून वाट शोधीत शोधीत त्या डोंगरांत असलेल्या घळीच्या तोंडाजवळ सतीबाई पोहोंचली. चालून चालून पाय थकलेले, वरून पाऊस पडत आहे आणि आंत जावें तर वाटेंतच दोन्ही बाजूस दोन वाघ गुरगुरत बसलेले! पण जरा न्याहाळून पाहतांच पलीकडे सद्‌गुरुराय ध्यानस्थ बसलेले दिसले. दर्शन होतांच तेथूनच सतीबाईनें नमस्कार केला. नंतर मनांत विचार आला कीं, गुरुरायाच्या दरबारांतील पहारेकरी दिसतात हे वाघ, अन् मी तर गुरुरायाचें लेंकरू, मला कसा अपाय करतील ? दर्शनासाठीं उतावीळ झालेला तो जीव, हा विचार सुचतांच बाईनें धैर्यानें पाऊल पुढें टाकिलें आणि शिरली त्या घळींत, त्याबरोबर वाघ दूर झाले; श्रीचरणदर्शनाबरोबर सतीबाईचा सर्व शीणभाग गेला. समर्थांनीं नेत्रपातीं उघडून तिच्याकडे पाहिलें आणि तिला म्हणाले 'मला भूक लागली आहे, कांहीं खायला दे.'

'महाराज, थोडेंसें भाजणीचें पीठ एका पुरचुंडींत आणलं आहे. त्याचं थालिपीट लावायचं म्हटलं तरी काय करूं ? इथं तर कांहींच सोय दिसत नाहीं.'

'तें बघ' सद्‌गुरुरायांनीं हस्तसंकेत केला. 'त्या जाळीआड सगळं आहे.'

बाईनें जाळींत जाऊन पाहिलें तों आंत कोरडी प्रशस्त जागा, उजेड भरपूर आणि साहित्याची सर्व सिद्धता ! बाईनें स्नान करून

झटपट पाकनिष्पत्ति केली व नैवद्य वाढण्यास आरंभ केला. 'भरपूर वाढ. एक वाढ करायची बरं का' समर्थांची आज्ञा झाली. त्याप्रमाणें बाईनें सर्व पदार्थ भरपूर घालून समर्थांपुढें ताट आणून ठेविलें. 'आतां इकडे अगदीं पाहूं नकोस, डोळे लावून तिकडे बैस' समर्थांनीं सांगितलें. आज्ञेप्रमाणें डोळे मिटून बाई पाठमोरी चुलीजवळ बसली. जरा वेळानें कल्पना आली कीं 'गुरुरायांना एखादा पदार्थ कमी तर नाहीं पडला ?' आणि डोळे उघडून मागें वळून पाहिलें तों–

अद्भुत प्रकाश पडलेला आणि मारुतीराय व समर्थ यांचें एकत्र भोजन चाललेलें !! त्या दर्शनानें बाईच्या डोळ्यांस झांपड पडली; अष्टसात्त्विक भाव दाटून आले, कांहीं वेळ मूर्च्छाहि आली. समर्थांचें भोजन उरकल्यावर त्यांनीं तीर्थ सिंचन करून बाईस सावध केलें. परमानंदांत बाईचें भोजन झाल्यावर समर्थ तिला म्हणतात– 'मोठ्या भाग्यानें तुला हें दर्शन घडलें. आतां यापुढें असला निग्रहाचा नेम ठेवूं नकोस ?'

'म्हणजे श्रीचरणदर्शन आतां मला वरचेवर होणार नाहीं असाच ना याचा अर्थ ? मग मी जगणार कशी ? वरचेवर मनांत शंका येतात त्यांचं समाधान कोण करील ? मनांत जड भारी वाटलं तर सांगूं कोणाला ?' बाईच्या सद्गदित कंठांतून कसे तरी शब्द बाहेर पडले.

'ती सगळी तजवीज होत आहे, कांहीं काळजी करूं नकोस. चल आतां घरीं' सद्गुरू समर्थांनीं आश्वासन दिलें.

नंतर सतीबाईबरोबर समर्थ शहापुरला आले. तेथें स्वत:साठीं संध्यामठी बांधून घेतली. आणि बाईच्या घरांतच प्रतापमारुतीचें ध्यान स्थापून स्वहस्तें अर्चा करून बाईस आज्ञापिलें कीं, 'अत:पर उपोषणें करूं नयेत, श्रीमूर्तीची पूजा करून तीर्थ घेऊन भोजन करीत जावें, मनाला येणाऱ्या शंका त्यांनाच निवेदन केल्यास दूर होतील.' याप्रमाणें सतीबाईचें समाधान करून समर्थ तेथून निघाले. रामनामाला अशुभ मानणारी बाई समर्थकृपेनें एवढ्या साक्षात्काराच्या अधिकारास पात्र झाली !

'नांदत्या घरांत हें म्हणतात का? या सतीबाईच्या प्रश्नावरून त्या काळीं विधर्मी संस्कृतीचे दुष्परिणाम खेड्यापाड्यापर्यंत किती खोल रुजले होते तें स्पष्ट होतें. हेटाळणी करून रामनामाविषयीं अश्रद्धा उत्पन्न करणें सोपें आहे, पण सर्व संतांनीं स्वानुभवानें श्रेष्ठ ठरविलेल्या त्या भगवन्नामावर श्रद्धा बसून त्याचा अनुभव घेणें किती कठीण आहे हें या उदाहरणावरून ध्यानीं येईल.

## ६ सर्ग–चमत्कारमीमांसा

सिद्धिसामर्थ्य व देवतादर्शन यांविषयींचे असे अनेक प्रसंग श्रीसमर्थचरित्रांत घडले आहेत. आणि ते सर्व मिथ्या मानण्याकडे बहिर्मुख व भौतिकवादी मनाची प्रवृत्ति असते. दुबळ्या व भित्र्या माणसाला भीममूर्ति नरवीर तानाजीच्या शक्तीचें व आहाराचें बखरींतील वर्णन मिथ्या वा अतिशयोक्त वाटणें साहजिक आहे. लवंगेच्या वासानें उष्णता वाढायची व वेलदोड्याच्या स्पर्शानें शिंका यायच्या अशा सुदामजीला भीमपराक्रमांत अशक्यता दिसावी यांत नवल नाहीं. सांप्रत अनेक वर्षांच्या पारतंत्र्याचा परिणाम म्हणून शरीरें दुबळीं व मनें संशयखोर पेबळीं झालीं असल्याचें भारतांत सर्वत्र दिसून येतें. शारीरिक दुर्बलतेचें विशेष विवरण करावयास नको, कारण ती उघडपणें सगळीकडे दिसत आहे. पण मानसिक पेबळेपणा अथवा प्रज्ञाहतत्व, संशयखोरपणा, नैराश्य यांची वाढ इतकी बेसुमार झाली आहे कीं, सत्यासत्याची परीक्षा करण्याची शक्तिच जणू गेली–संपली! एक ढोबळ कल्पना सामान्यत: फैलावली आहे कीं, पाश्चात्य शास्त्रज्ञ व संशोधक यांचे शोध प्रयोगसिद्ध असतात म्हणून तेच खरे आणि भारतीय तत्त्वज्ञ व संतसाधु हे भोळे भाबडे, अर्थात् त्यांचे अनुयायीहि तसेच. अशांनीं जे चमत्कार वर्णिले ते पाश्चात्यांच्या प्रयोगपद्धतीनें सिद्ध होऊं शकत नाहींत, म्हणून साधुसंतांच्या चमत्कारांवर विश्वास ठेवूं नये; तें सर्व थोतांड आहे. या भ्रामक गृहीत कृत्यामुळें

युरोप-अमेरिकेंतून येईल तेवढें विश्वसनीय आणि भारतीय असेल तें अविश्वसनीय असा समज शिक्षित म्हणविणारांत फैलावला आहे. वास्तविक स्थिति अशी आहे कीं पाश्चिमात्यांचें बहुतेक सगळें संशोधन भौतिक म्हणजेच जडसृष्टीविषयींच झालें आहे. तें सुद्धां संपूर्ण नाहीं, अपसिद्धांतही त्यांत पुष्कळ आहेत. मानवी तनमनाचेच केवळ नव्हेत तर सगळ्या चराचर सृष्टीचे व्यवहार ज्याच्या सत्तेनें नियंत्रित आहेत, त्या आत्म्याविषयींचें संशोधन पाश्चात्यांना फारच अल्प प्रमाणांत करतां आलें आहे; आणि जें थोडें त्यांनीं शोधून प्रसिद्ध केलें त्यांत त्यांचे दूषित पूर्वग्रह, संशय, अपसिद्धांत, चुकलेली प्रयोगपद्धति इत्यादि दोषांचें मिश्रण भरपूर भरलें आहे. म्हणून भारतीय संतसाधूंचे ग्रंथ भारतीय दृष्टीनेंच त्या त्या ग्रंथकारांच्या भूमिकेशीं समरस होऊन वाचले पाहिजेत; मग ते ग्रंथ चरित्रपर असोत अथवा तत्त्वज्ञानविषयक असोत.

श्रीसमर्थांचे ग्रंथराज दासबोधादि ग्रंथ अथवा त्यांचीं चरित्रें हें वाङ्मयहि त्यांच्याशीं समरस होऊनच वाचलें, तरच त्यांतील रहस्याचें आकलन होतें; अन्यथा गैरसमज पसरतात. जन्मापासून समाधीपर्यंत समर्थांचें सर्वच चरित्र असंख्य अलौकिक चमत्कारांनीं भरलें आहे. समकालीन थोर सत्पुरुषांनीं सांगितलेले प्रकारहि प्रक्षिप्त मानून खोटे ठरवावयाचे; कां? तर ते निसर्गाच्या विरुद्ध दिसतात म्हणून! पण असें मानण्यानें आपल्या तुटपुंज्या निसर्गज्ञानास नसतें महत्त्व दिल्यासारखें होतें हें ध्यानांत येत नाहीं. ज्याचे कार्यकारणभाव समजत नाहींत तो चमत्कार अशी सामान्य माणसांची कल्पना असते; ती त्यांच्या मानानें ठीक आहे. परंतु स्वतःस सुशिक्षित समजणाऱ्यांनीं, संतांनींच करून ठेविलेलें चमत्काराचें तात्त्विक स्पष्टीकरण न पाहतांच पारखून त्यांजवर मिथ्यात्वाचा आरोप करणें हें त्यांच्या शिक्षणास व संशोधक बुद्धीस लांछन आहे.

संतचरित्रांतील चमत्कारांची उपपत्ति श्रीसमर्थांनीं दोन प्रकारें सांगितली आहे. एक, 'तरी हा लोकांचा भावार्थ। भाविकां देव यथार्थ। अन्यत्र कल्पना व्यर्थ। कुतर्काची ॥ ७ ॥ (१०–७) दृढभावार्थी लोकांस त्यांच्या त्यांच्या भावनेनुरूप भगवत्कृपेचे अनुभव येत असतात; ते यथार्थ असतात; त्या बाबतींत इतर कांहीं कल्पना करणें कुतर्काचें आहे. दुसरी उपपत्ति समर्थांनीं दिली आहे ती अशी– "सकळां वडिल देव। तयासी होतां अनन्य भाव। मग हे प्रकृतीचा स्वभाव। पालटों लागे ॥ २० ॥ १५–९ अनुभविता जसा भावार्थी म्हणजे विशेष अधिकाराचा पाहिजे, तसाच अनुभाव्य म्हणजे ज्याचा अनुभव घ्यावयाचा तोहि उच्च-कोटीचा अधिकारी हवा. तो जितका वरिष्ठ श्रेणीचा असेल, तितका अनुभवहि उच्च श्रेणीचा असतो. व्यक्त चराचर विश्वा-पेक्षां आत्माराम श्रेष्ठ. तोच सगळ्या विश्वांचा वडील. त्याच्या-हून वडील कोणीहि सांपडला नाहीं, सांपडणार नाहीं. दृश्यादृश्य किंवा व्यक्ताव्यक्त याचा उगम त्याच्यापासून आहे; म्हणून तो सकळांचा वडील; त्याच्याशीं अनन्यभाव म्हणजे एकरूपता आली–देव पहायासी गेलों। तेथें देवचि होऊनि ठेलों ॥ – असा अनुभव ज्याच्या रोमरोमीं भिनला, अनुभवरूप जो झाला त्याच्या इच्छामात्रें करून वाटेल तें घडू शकतें. 'अशक्य तों तुम्हां नाहीं नारायणा। निर्जिवा चेतना आणावया।' हें वाक्य तुका-राम महाराजांनीं उच्चारिलें तें काय कांहीं अनुभव नसतां भोळे-पणानें वा अतिशयोक्तीनें उच्चारिलें ? केवळ अनभिज्ञतेमुळें शक्याशक्यतेची कल्पना ज्यांना सतावीत असते, त्यांनीं असा विचार करावा कीं, एकादा इसम भिक्षेकरी म्हणून जोंपर्यंत राजद्वारीं येतो, तोंपर्यंत त्याला एकट्या चोपदाराचेंच काय, तेथील सर्व लहानमोठ्या अधिकाऱ्यांचें भय वाटत असतें, तो तेथील सेवक होऊन व पुढें त्याचा दर्जा वाढत चालल्यावर, त्या त्या दर्जाच्या मानानें तें भय कमी होत जातें, आणि दैवयोगानें त्याला राजपद मिळालें म्हणजे

त्याचें सर्व भय पळतें. मग सर्वजण त्याला भीत असतात. त्याच प्रमाणें प्राणी जोंपर्यंत 'विषयदारींचा बराडी' आहे तोंपर्यंत त्याला हानि, लाभ, सुखदुःखादि द्वंद्वें, विधिनिषेध इत्यादींचें बंधन, चुकल्यास शासन होईल या भयामुळें, पाळावें लागतें. देहबुद्धि व तज्जन्य विषयासक्ति यांच्या म्हणजेच प्रकृतीच्या बंधनांतून तो ज्या मानानें मोकळा होऊं लागतो त्या मानानें त्याची सत्ता प्रकृतीवर चालू लागते. प्रकृतीवर ज्या आत्मारामाची सत्ता त्यांच्याशीं तो तद्रूप झाल्यावर त्याच्या इशाऱ्याप्रमाणें प्रकृति चालत असते. जसा चोपदार राजाच्या हुकमतींत वागतो तद्वत्. 'वश झाला राजा। मग आपुली ते प्रजा ॥' आत्मानुसंधान, वैराग्य, तपस्या, गुरुकृपा संतसेवा, दानधर्म, ध्यानधारणा, पूजाअर्चा, तीर्थयात्रा इत्यादि सर्व साधनें स्वतः आत्मरूप झाल्याचें म्हणजे स्वतःचे ठायीं प्रकृति-नियंत्रणाचें आत्मसामर्थ्य प्रकट झाल्याचे अनुभव यावे यासाठींच आहेत. प्रारब्धवशात् ज्याला जो मार्ग लागला तो त्यानें दृढ-भावार्थानें चालवावा, स्थिरभाव ठेवण्यापूर्वी खऱ्याखोटचाचा जितका कसोशीनें शोध घ्यावयाचा असेल तितका घ्यावा; त्यांत कसूर करूं नये. परंतु एकदां भाव ठेविला म्हणजे मग तो दृढ होण्या-साठीं जें जें करण्यासारखें असेल तें तें सर्व करावें. हें कांहींच न करतां केवळ शाब्दिक विद्वत्तेच्या जोरावर साधन व संत यांचेवर वाटेल ते आरोप करणारांनीं 'सगुणभक्ती उच्छेदी । मुक्तक्रिया प्रतिपादी । स्वधर्म आणी साधन निंदी । तो येक पढत मूर्ख ॥४॥ आपले न ज्ञातेपणें । सकळांस शब्द ठेवणें । प्राणीमात्रांचें पाहे उणें । तो येक पढतमूर्ख ॥५॥' (दा. २–१०) या समर्थवचनाचें शांत चित्तानें मनन करावें.

तात्पर्य, संतवचनांचा अथवा संतचरित्रांचा आत्मानुभव-दृष्टचा परिपूर्ण विचार, एकदां नव्हे हजारदां केल्याशिवाय बुद्धीच्या जोरावर त्यांस दूषण देण्यास प्रवृत्त होणें वेडेपणाचें आहे.

# ७ सर्ग–चंद्रगिरीची घळ

'येके ठायीं बैसोन राहिला । तरी तो व्यापचि बुडाला । सावधपणें ज्याला त्याला । भेटी द्यावी ॥' 'भिक्षामिसें लहान थोरें । परीक्षून सोडावीं ।' अशी शिकवण देणारे योगेश्वर समर्थ एकट्या शहापूरच्या कुळकरण्याच्या उद्धारांतच या अवधीमध्यें गुंतून पडले असतील असें नाहीं. गुप्तपणा हें ज्यांच्या व्यापाचें मुख्य सूत्र त्यांच्या सर्व हालचाली आज तपशीलवार कशा कळूं शकतील? पूर्वचरित्रकारांच्या आधारावर कांहीं तर्क करीत बसावयाचें इतकेंच. 'शहापूर स्वामींचें मुख्य अधिष्ठान । मोक्षाचें भुवन भूमंडळीं॥४२॥' असें तंजावरकर भीमस्वामीकृत चरित्रांत । (दो. जु. च. पृ. १८३) म्हटलें आहे. 'समर्थें चंद्रगिरी निवास केले । पंचाननेसी समर्थ भांडले । कैलासनाथ प्रगट जाले । श्रीरघुनाथस्थापना करावया ॥ असें श्रीसमर्थ प्रतापकार (स. प्र. ३–६१) सांगतात. पंचाननासी म्हणजे वाघाशीं भांडण्याचा अथवा त्याला तेथून हुसकून देण्याचा प्रसंग तर बहुतेक सर्व घळींच्या बाबतींत घडलेला दिसतो. रामसोहळा ग्रंथांत (१–९) मेरुस्वामी वर्णन करितात, व्याघ्र दरीमाजीं पसरला । त्या गवीचे मुखीं समर्थ बैसला । मार्गविरोधें गडाडिला । पंचानन तो ॥९॥ अद्भुत तेज सत्ता दुर्धर । भयाभीत जाला वनचर[1] । आंगनिकटीनेंचि[2] सत्वर । बाहेरि पडिला ॥१०॥ गळां घालूनि करपाश । अवरोधिलें त्या व्याघ्रास । अभिनव समर्थमहिमेस । काय म्हणावें ॥११॥ हेंचि आश्चर्यसें वाटे जना । कळिकाळव्याघ्रावरोधना । क्षणामाजीं ब्रह्मांडें नाना । लीळा[3] रचोनि खची ॥१२॥ व्याघ्रासि कुरवाळोनि स्वकरें । सांगितलें समर्थें अत्यादरें । जें यात्रकरासि भयवारें । लागों नेदी तूं ॥१३॥ दुसरी गवी[4] दाखविली । तेथेंचि व्याघ्रें वस्ती केली । समर्थें गवी परिशोधिली । वोसाड ते ॥१४॥ तेथेंचि केला रहिवास ।'

---

१ वाघ, २ अंग चोरुन जवळून; ३ लीलेनें, सहज ४ गुहा

त्याच ग्रंथाच्या पुढील (१–१०) उल्लासांत मेरुस्वामींनीं घळीचें विस्तृत वर्णन करतांना म्हटलें आहे कीं–
समर्थ तपस्वी महाउदास । अखंड पर्वतींच निवास । चंद्रगिरीवर विशेष । राहणें समर्थांचें ॥ ४१ ॥ बद्धासि उपजे विरक्ति। अभक्तासि संभवे भक्ति । स्थळदर्शनेंचि मुक्ति । होय सकळां ॥ ४२ ॥ परम कठिण अवघडें । स्थळें विशाळें चहुंकडे । तुटले पर्वताचे कडे । संपुटाकारें[1]॥४३॥ दऱ्यादर्कुटचा विवरें । रमणीय गुहाकंदरें। सुशोभित स्थाणुशिखरें[2] । उंचस्थळीं बैसला ॥४४॥ निबिड तरुवर लागले । अति उन्नत सरळे । गगनासि बोलती लीले । पक्षी तेथींचें ॥४५॥ गिरिपाठारींचे जळवोघ । धराधबाबा अमोघ । खळाळ रिचवती[3] सैंध[4] । प्रवाह जाती ॥४६॥ अभिनव समर्थाची करणी । पाणी खेळऊनि धरणी । डवाबीत स्वयंभ पुष्करणीं[5] । अक्षोभ तोयें ॥ ४७ ॥ पुढें ६६ व्या ओवीपर्यंत चंद्रगिरिवर्णन मेरुस्वामींनीं चालविलें आहे, तें वाचकांनीं मुळांतून वाचावें.

हें घळीच्या भोंवतालच्या देखाव्याचें वर्णन मेरुस्वामींनीं केलें तें आपण पाहिलें; घळीच्या अंतरंगाचें आणि गिरिशिखरावरील उंच स्थळींच्या बैसकावरून दिसणाऱ्या भव्य देखाव्याचें वर्णन श्रीसमर्थ स्वतः करतात तें त्यांच्या पुढील पद्यांत पहा.

चंद्रगिरीचा डोंगर। त्यांत गुप्त येक विवर। तेथें राहे योगेश्वर । निरंजन ॥ १ ॥ रे नवल त्या निरंजनाचें । शिखर पाहों आकाशीचें । ऐसें पृथ्वीमध्यें कैंचें । पाहों जातां ॥ २॥ जागा सुंदर गहन । तेथें सुखावलें मन । वरी पाहतां गगन । सांटवलें ॥ ३ ॥ तेथें अखंड नाहीं वात । म्हणउनि जागा तो निर्वात।

---

१ द्रोणाच्या आकाराचे. २ पर्वतशिखरांवरील उंच ठिकाणच्या बैठकीच्या जागा. ३ खालीं पडतात. ४ स्वैर, सर्व. ५ चंद्रगिरीचें खोरें सगळें धुंडाळल्यास ही स्वयंभ–पुष्करणी सांपडल्यास सांपडेल कदाचित्. पण तें धुंडाळणें मात्र सहज होणार नाहीं.

शीतकाळीं घुमघुमीत । वस्त्र नलगे ॥ ४ ॥ कृष्णा कोन्या दोन्हीं-कडे । मध्यें पर्वताचे कडे । मंडळ पाहतां चहूंकडे । समाधान ॥५॥ तळीं असतीं शेतें भातें । तेथें फिरताती आउतें । नानापरीचीं मार्गस्थें । येती जाती ॥ ६ ॥ वरती सेरडें मेंढरें । गुरें सींगुरें वांसरें । ठाईं ठाईं गुराखी पोरें । क्रीडा करिती ॥ ७ ॥ भोंवतीं डोंगराचीं थाटें । दिसती कडे आणि कपाटें । सवेंचि येताती धुकटें । झांकोळती ॥ ८ ॥ तळीं पाहतां आकाश । दिसे दुसरें कैलास । तेथें जावया संतोष । वाटतसे ॥ ९ ॥ तया खालतीं आहे माण । वरतें आहे तळ कोंकण । कऱ्हाड दंतागिरि पट्टण । पंचक्रोशी ॥ १० ॥ राया रघुनाथाचें देणें । जालें हनुमंता कारणें । देव पहावया पारणें । डोळ्याचें ॥ ११ ॥ रामदासांचा विसांवा । रुद्र जाहला अकरावा । भक्तजन वेगीं धांवा । दर्शनासी ॥ १२ ॥ ( प्रथम समर्थांची वस्ती शहापुरास होती, नंतर चंद्रगिरीच्या घळींत ते गेले असें कोल्हापूरवर्णनाच्या त्यांच्या पद्यावरून दिसतें. )

किती सुंदर वर्णन आहे हें ! पण त्या सृष्टिसौंदर्यांत अथवा एकांतांतील समाधिसुखांत मग्न होऊन बसणें हें समर्थांच्या स्वभावांत नव्हतें. ‘चळवळ करितां त्याशीं तुळणा दिसेना’ हें तर त्यांचें वैशिष्टच. एकांतांत बसण्याचा हेतु समर्थ सांगतात–

अखंड येकांत सेवावा । अभ्यासचि करीत जावा । काळ सार्थ-कचि करावा । जनासहित । १७ ॥ उत्तम गुण तितुके घ्यावे । घेऊनि जनास सिकवावे । उदंड समुदाय करावे । परी गुप्त रूपें ॥ १८ ॥ दा. ११–१०

अखंड येकांत सेवावा । ग्रंथ मात्र धांडोळावा । प्रचीत येईल तो घ्यावा । अर्थ मनीं ॥ २० ॥ दा. १८–३

विवेक येकांतीं करावा । जगदीश धारणेनें धरावा । लोक आपला आणि पराञा । म्हणोंचि नये ॥ ४७ ॥ येकांतीं विवेक ठाईं पडे । येकांतीं यत्न सांपडे । येकांतीं तर्क वावडे । ब्रह्मांड-गोळीं ॥ ४८ ॥ येकांतीं स्मरण करावें । चुकलें निधान पडे ठावें ।

अंतरात्म्यासरिसें फिरावें। कांहीं तरी॥ ४९॥ जयास येकांत मानला। अवघ्या आधीं कळे त्याला। त्यावेगळें वडिलपणाला ठावचि नाहीं॥ ५०॥ दा. १८–१०

त्यांचें राहणें बहुधा दऱ्याखोऱ्यांत किंवा घळींत असे; त्या ठिकाणीं भरपूर एकांत सहजच मिळे. लोकसमुदायांत ते फार मिसळत नसत. अशा एकांतांत बसून ते जें काय करीत असतील, त्याची कल्पना वरील वचनांच्या आधारें थोडी होऊं शकेल. 'मुख्य यत्न विचाराचा त्यावरी बोलणें बरें।' 'चालणें सत्य नेमाचें नीति न्याय चुकों नये॥' हें त्यांच्या वागणुकीचें सार आहे. बाह्यतः शरीर एकांतांत स्वस्थ बसलेंसें वाटलें तरी अंतःकरणांत लोककल्याणाविषयींचे तळमळीचे विचार सदैव चालूच असत. अनेक पद्यांतून ती तळमळ व्यक्त झाली आहे. अशांपैकीं एक पद्य पुढें दिलें आहे.

संसारसासुरां तूं टाकोनि गेलासी। मायबापा कां निष्ठुर जालासी। देवराया मागुता कैं येसी। आजि अवस्था लागली रे मानसीं॥ ध्रु.॥ पराधीन न चले कांहीं केलें। देहपांगें मज बहु रे गांजिलें। निजधाम शांतीचें क्रोधें नेलें। मायबापा त्वांहि अव्हेरिलें॥ १॥ सर्व दुर्जन लागला यांचा संग। क्षणक्षणा होतसे मनोभंग। घडी एक रंग घडी विकल्पें वोरंग। पुरे संग आतां करावें निःसंग॥ २॥ दास म्हणे रे राघवा निजभावें। संग दुर्जनांचा सांभाळित जावें। किती म्हणोनियां धारिष्ट धरावें। मायबापा सर्वथा नुपेक्षावें॥ ३॥ स. गाथा १२८५

अशा प्रार्थनेबरोबर कार्याची विवंचनाहि मनांत चालावयाची. चाफळला एकदां गेले. तेथील आनंदराव देशपांडे, भानजी जोशी व चाफळ खोऱ्यास शिवरायातर्फे[1] मामलेदार असलेले नरसो

---

१ 'शिवरायातर्फे मामलेदार किंवा सुभेदार' हे शब्द हनुमंतस्वामी-कृत (वस्तुतः मल्हार रामराव कृत) बखरीच्या आधारें लिहिले

( टीप १७८ पानावर )

मलनाथ अंबरखाने या तिघांनीं समर्थांचा अनुग्रह घेऊन " श्री स्वामींस चाफळीं मठ करून दिल्हा; त्या मठांत येऊन समर्थ कधीं रहात. भानजी जोशी हे स्वामींजवळ नेहमीं राहूं लागले म्हणून त्यांस भानजी गोसावी नांव पडलें. शिष्यसंप्रदाय बहुत जाला; कोणी नेहमीं जवळ राहत, कोणी मठांत असत, कोणाकोणास मठ करून दिल्हे ते तेथें राहिले. "

## ८ सर्ग–तुंबाभर गाईचें दूध द्या

चाफळहून समर्थ कऱ्हाडास "रुद्राजीपंत देशपांडे यांचे घरीं आले. रात्रौ कीर्तन जालें, तें श्रवण करून रुद्राजीपंतांची बालविधवा कन्या आक्काबाई स्वामींस शरण आली. तिजला अनुग्रह देऊन पूर्ण बोधातें पावविली. ती नेहमीं स्वामींचे सेवेसी बरोबर रहाती जाली. "

पुढें समर्थ मिरजेस गेले. तेथें एक दिवस दोन प्रहरीं भिक्षेस निघाले असतां गोपजीपंत देशपांडे यांचे दाराशीं गाईचा गोठा पाहून समर्थांनीं तुंबाभर गाईच्या दुधाची भिक्षा मागितली. घरांतून कोणीतरी उत्तर दिलें ' सध्यां मारुतीला अनसुट धरलें आहे. पुनः या केव्हां तरी, मग देऊं.' आंगणांत वृंदावनाजवळ एक विधवा तरुणी नाथभागवताची पोथी वाचीत बसली होती; तिनें सहज वर पाहिलें तों तिला समर्थांऐवजीं मारुतीरायाचें रूप दिसलें. ती चटकन दूध आणण्यासाठीं घरांत गेली, तोंवर समर्थ निघून गेले होते! त्या तरुणीच्या म्हणजे वेणाबाईच्या मनास चुटपूट लागली.

---

( टीप १७७ पानावरून)

आहेत. त्या बखरींतील विधानांस श्रीसमर्थप्रतापांत ( ४–८ , ११–११ व १९–१५ पहा ) प्रत्यंतर मिळतें. मल्हार रामराव चिटणीस सारख्या बखरकारांस निःसंदिग्धपणें चूक ठरविण्याइतकें शिवसमर्थ-कालीन कागदपत्रांचें संशोधन अद्याप पूर्ण झालें नाहीं. म्हणून हनुमंतस्वामींकृत बखरीवर पूर्णतया विसंबू नये, परंतु तिला एकदम उतावळपणें मिथ्याहि ठरवूं नये हा सद्यःस्थितींत उत्तम मार्ग होय.

पुन: एकदां त्याच घरीं समर्थ अवचित आले. वेणाबाई वृंदावनाजवळ नित्याप्रमाणें पोथी वाचीत बसल्या होत्या. समर्थांस पाहतांच त्यांनीं उठून नमस्कार केला व नम्रतेनें आपल्या आसनाजवळ उभ्या राहिल्या. 'काय वाचतां ?' समर्थांनीं विचारलें. 'भागवतपारायण करतें, महाराज!' वेणाबाईंनीं उत्तर दिलें.

'पारायण करता यांतील मर्म ? हा भागवतधर्म समजून घेतला का ?'

'तें मर्म काय समजणार आम्हांला ? उपाध्यायांनीं सांगितलें म्हणून पारायण तेवढें करतें.'

'समजून घेतल्यावांचून नुसत्या पारायणाचें फल काय?'

इतकें म्हणून समर्थ निघून गेले. नंतर वेणाबाईंनीं तो समर्थांचा प्रश्न उपाध्यायास विचारला. तेव्हां त्यांनीं उत्तर केलें कीं, 'मर्म मला ठाऊक नाहीं. असले पवित्र ग्रंथ वाचल्यानें वाणी पवित्र होते, यास्तव तुम्हांस सांगितलें. मर्म कोणा साधुसत्पुरुषास विचारा.' हें उपाध्यायाचें उत्तर ऐकल्यावर वेणाबाईस समर्थदर्शनाचा ध्यास लागला. कांहीं दिवसांनीं समर्थ आले आणि वेणाबाईंनीं नमस्कारपूर्वक त्यांना कांहीं प्रश्न विचारले. ते प्रश्न व त्यांचीं उत्तरें सद्‌गुरु समर्थांच्या अभंगवाणींतून आपण ऐकूं.

प्रश्न– नमूं वागीश्वरी शारदा सुंदरी । श्रोता प्रश्न करी वक्तयासी ॥१॥ वक्तयासी पुसे जीव हा कवण । शिवाचें लक्षण सांगा स्वामी॥२॥ सांगा स्वामी आत्मा कैसा तो परमात्मा । बोलिजे अनात्मा तो कवण ॥३॥ कवण प्रपंच कोणें केला संच । मागुता विसंच कोण करी ॥४॥ कोण ते अविद्या सांगिजे जी विद्या । कैसें आहे आद्याचें स्वरूप ॥५॥ स्वरूप तें माया कैसी मूळमाया । ईस चाळावया कोण आहे ॥६॥ आहे कैसें शून्य कैसें तें चैतन्य । समाधान अन्य तें कवण ॥७॥ कवण जन्मला कोणा मृत्यु आला । बद्ध मुक्त जाला तो कवण ॥८॥ कवण जाणता कोणाची हे सत्ता । मोक्ष हा तत्त्वता कोण सांग ॥९॥ सांगा ब्रह्म-खूण सगुण निर्गुण । पंचवीस प्रश्न ऐसे केले ॥१०॥ स्फुट ओव्या ६४

उत्तर— नमूं वेदमाता नमूं त्या अनंता । प्रश्न सांगों आतां श्रोतयाचे ॥१॥ श्रोतयाचे प्रश्न जीव हा अज्ञान । जया सर्वज्ञान तोचि शिव ॥२॥ शिवपर आतमा त्यापर परमात्मा । बोलिजे अनात्मा अनुर्वाच्य ॥३॥ वाच्य हा प्रपंच माईक जाणावा । घडामोडी देवापासूनीयां ॥४॥ विषय अविद्या त्यागावी ते विद्या । निर्विकल्प आद्याचें स्वरूप ॥५॥ कल्पना हे माया तत्त्व मूळमाया । यासी चाळावया चैतन्यचि ॥६॥ नकार तें शून्य व्यापक चैतन्य । ईश्वर-अनन्य समाधान ॥७॥ जीव हा जन्मला जीवा मृत्यु आला । बद्ध मुक्त जाला तोचि जीव ॥८॥ ईश्वर जाणता ईश्वराची सत्ता । मोक्ष हा तत्वता ईश्वरचि ॥९॥ ईश्वर निर्गुण चेष्टवी सगुण । हेचि ब्रह्मखूण दास म्हणे ॥१०॥ दास म्हणे सर्व मायेचें करणें । मिथ्या रूप जाणे अनुभवी ॥११॥ स्फुट कविता ३९.

त्या काळीं स्वामीस बहुतां प्रकारें विनंति करून...... स्वामींची पूजा करून पित्यासह अनुग्रह घेतला. स्वामीचें ध्यान, व्यवहार पाहून कन्या व पिता उभयतां मनोभावें करून शरण; प्रार्थना करून स्वामींस कांहीं दिवस ठेवून घेतलें. पुढें स्वामी निघाले त्या समयीं त्यांच्या बरोबर वेणाबाईहि पित्याची आज्ञा घेऊन निघाल्या.

## ९ सर्ग—हा मूल आम्हांस द्यावा

मिरजेहून शिष्यगणांसमवेत समर्थ कोल्हापुरास आले. तेथें त्यांचे चित्तास फार प्रसन्नता वाटली; कारण ' प्रसादचिह्नानि पुरःफलानि ।' लवकरच त्यांना या ठिकाणीं एका निष्ठावंत शिष्योत्तमाचा लाभ व्हावयाचा होता. त्याच चित्तप्रसन्नतेंत निर्माण झालेल्या कोल्हापूरवर्णनाचा प्रसाद पहा—

केला काशी विश्वेश्वर । सेतुबंध रामेश्वर । न पहातां कोल्हापुर । व्यर्थ होय ॥१॥ पूर्वीं होता कोल्हासूर । म्हणौन नाम कोल्हापुर । तेथें लक्ष्मीचा अवतार । तुम्ही पहा ॥२॥ तेथुन पाहतां उत्तर । पुढे आहे केशापुर । पंचगंगेचें जें तीर । सुदंर नीर ॥३॥ वरतें जळसेनाचें तळें । तया तळ्यांत कमळें । तेथुनि दिसतें पन्हाळें । सारा गड ॥४॥ मार्कंडेयाचा डोंगर । त्याहून थोर रत्नागिर।


आला हिमाचळींचा केदार । भक्तांलागी ॥५॥ ऐका पुढील प्रसंग। आळते बाहे रामलिंग । नरसीपुरीं देव धिंग। नांदताहे ॥६॥ जागा लक्ष्मीचा सिराळें । तेथें निघती नागकुळें । श्रावणमासीं मुलें बाळें । खेळविती ॥७॥ क-हाडनगर सांगों काई । तेथें नांदते तुकाई । कृष्णासंगम ठाई ठाई । देवस्थानें ॥८ बहुलेश्वर रुद्रेश्वर। धारेश्वर चांपेश्वर । तेथें महिमा अपार रघुनाथाचा ॥९॥ चंद्रगिरी मध्यें गवि[1] । तेथें वास करी कवी । त्याचा जागा जो पुरवी। शहापूर[2] ॥१०॥ तेथें बहुसाल देऊळें । तळें रंकाळें पद्माळें। जळें वहाती निर्मळें । ठाई ठाई ॥११॥

कोल्हापुरास जगदंबेच्या देवालयांत समर्थांचीं कीर्तनें सुरू झालीं. करवीरास शिवाजी महाराजांतर्फे[3] या वेळीं पाराजीपंत कुळकरणी पारडगांवकर हे सुभेदार होते. तेहि समर्थांच्या कीर्तनास नित्य येत. एक दिवस त्यांच्या मनांत आलें कीं, अशा थोर सत्पुरुषांचा अनुग्रह आपण घ्यावा; म्हणून दुसरे दिवशीं त्यांनीं समर्थांस त्याप्रमाणें प्रार्थना केली. मान्यता मिळाल्यावर श्रीसमर्थांना घरीं नेऊन पूजाअर्चादि विधिपूर्वक त्यांनीं अनुग्रह घेतला. नंतर भोजनाच्या पंगति मांडल्या. त्या वेळीं तेथें सुमारें दहा वर्षांचा एक चुणचुणीतसा मुलगा साहित्यसामग्री करणें, पंगती मांडणें, रांगोळ्या घालणें, उणेंपुरें पाहणें इत्यादि कामें टापटिपीनें व झटपट करतो आहे, असें पाहून समर्थांस नवल वाटलें. त्याची चौकशी करतां कळलें कीं, तो पाराजीपंतांचा भाचा. त्याचे वडील कृष्णाजीपंत कुळकरणी बाभुळगांवकर हे पाराजीपंतांचे मामेभाऊ. वृत्ति वैराग्यसंपन्न असल्यानें एक पुत्र व पत्नी यांस घरीं सोडून कृष्णाजीपंत यात्रेस निघून गेले. यात्रा करीत असतां गंगेची कावड घेऊन कोल्हापुरीं आल्यावर ते जगदंबेच्या देवालयांतील एका ओवरींत उतरले. तेथें पाराजीपंतांनीं ओळखून त्यांस घरीं नेलें.

---

१ गुंफा. २ पूर्वी ज्या कवीची जागा शहापुरास होती तो आतां चंद्रगिरीच्या घळींत राहूं लागला. ३ पृ. १७७ वरील टीप पहा.

चारदोन दिवस राहिले. एके दिवशीं पहांटे उठण्याचे वेळीं पाराजीपंताचे बहिणीशीं लग्न करण्याविषयीं कृष्णाजीपंतास जगदंबेचा दृष्टांत झाला; पण त्यांच्या मनांत विचार आला कीं, पहिल्याच पाशांतून सुटण्याच्या प्रयत्नांत आहे आणि हा दुसरा कशाला? या विचारांत त्यांचा डोळा लागला, तों पुन: दृष्टांत झाला कीं, या मुलीशीं लग्न न कराल तर तिच्यासाठीं तुम्हांस पुन: जन्म घ्यावा लागेल. याच आशयाचा दृष्टांत पाराजीपंतासहि झाला. त्यावर दोघांच्या विचारें लग्नाचा मुहूर्त ठरला. पण कृष्णाजीपंतांनीं स्पष्ट सांगितलें कीं, 'मी प्रपंचांत गुंतून राहणार नाहीं!' तेव्हां 'तुमचे कुटुंबाचें संरक्षण मी करीन' असें पाराजीपंतांनीं मान्य केल्यावर तें लग्न झालें. त्या मुलीचें नांव रखमाबाई.



करवीर निवासिनी

याप्रमाणें गृहस्थाश्रमी झाल्यावर कृष्णाजीपंतांनीं मधूनमधून तीर्थयात्रेसहि जाऊन यावें. यथाकाल त्या दांपत्यास प्रथम पुत्र झाला; त्याचें नांव अंबेच्या नवसाचा म्हणून अंबाजी ठेविलें; त्यानंतर दुसरा मुलगा झाला, त्याचें नांव दत्तात्रय. पुढें कृष्णाजीपंत काशीस गेले व तिकडेच संन्यास घेऊन राहिले.

भीमस्वामी शिरगांवकर (दोन जुनीं चरित्रें यांतील 'भक्तलीलामृत' या चरित्राचे कर्ते) यांचे कनिष्ठ बंधु लक्ष्मण-

स्वामी यांनीं लिहिलेलें श्रीसद्‌गुरुस्तवराज नांवाचें श्रीसमर्थचरित्र (श्रीसमर्थवाग्देवतामंदिर–बाडांक ५५५) अप्रकाशित आहे. त्यांतील पुढील वृत्तान्त वरील माहितीहून वेगळा आढळला.

गंगातीरीं भोगुरचे कृष्णाजीपंत कुळकरणी स्वकर्मनिरत गृहस्थ होते. त्यांना बाबाजी नांवाचा एक पुत्र होता. त्याचें लग्न झाल्यावर कृष्णाजीपंतांचे कुटुंबाचा काळ झाला. तेव्हां पुत्राचे स्वाधीन प्रपंच करून कृष्णाजीपंत तीर्थयात्रेस गेले. प्रयागची कावड रामेश्वरीं व रामेश्वरचा सेतु प्रयागास अशा यात्रा तीन वेळां केल्यावर चौथ्या खेपेस करवीरीं आले. जगदंबेचें दर्शन घेतांना देवीच्या मस्तकावरील उजव्या बाजूचें फूल कृष्णाजीपंत सिंहासनावर डोकें टेंकून नमस्कार करतांना त्यांचे अंगावर पडलें. जवळ असणाऱ्या पुजाऱ्यांनीं मोठा जयजयकार करून तें फूल पंतांस दिलें.

करवीरास लग्न झाल्यावर सुभेदारांनीं कृष्णाजीपंतास रोजगार लावून दिला. वडील मुलगा अंबाजी याचे पाठीवर एक मुलगी झाली. तिच्यानंतर झालेल्या मुलाचें नांव दत्तात्रय. मुलांच्या मुंजी व मुलीचें लग्न करून पत्नीस व दोन्ही मुलांस भोगुरीं नेऊन ठेवावें असें पंतांनीं योजिलें, पण मुलें फार लहान म्हणून रखमाबाईनें नाकारिलें. त्यावर काशीस जातांना वडील मुलगा बाबाजी यास करवीरचा वृत्तांत कळवून व तेथील आपल्या भावंडांस व त्यांचे मातुश्रीस भोगुरला आणण्यास सांगून पंत पुढें गेले. त्याप्रमाणें बाबाजीनें घोडें व माणूस कोल्हापूरास पाठविला. पण मुलें लहान म्हणून रुक्मिणी ऊर्फ रखमाबाई गेल्या नाहींत.

येणेंप्रमाणें त्या मुलाचें वर्तमान पाराजीपंताकडून कळल्यानंतर समर्थांनीं त्या मुलास जवळ बोलावून नांव विचारिलें. 'अंबाजी' असें उत्तर मिळाल्यावर त्याला एक सवाई म्हणून दाखविली व ती लिहिण्यास सांगितलें; ती त्यानें लिहून दाखवितांच बिकट विकट अशा अकरा सवाया समर्थांनीं म्हटल्या व अंबाजीनें त्या सगळ्या बिनचूक लिहून दाखविल्या. गुरुरायांनीं घेतलेल्या चांचणी परीक्षेंत अंबाजी उत्तीर्ण झाला! तेव्हां समर्थ पाराजीपंतास म्हणाले, 'हा मूल आम्हांस द्यावा.' पाराजीपंत हात

जोडून नम्रतेनें म्हणाले, 'त्याजवर माझी सत्ता नाहीं. या मायलेंकरांचें पालनपोषण तेवढें मजकडे आहे. या मुलाबद्दल त्याचे मातुश्रीस विचारावें.' मातुश्रीस विचारतां तिनें उत्तर केलें कीं 'महाराज अंबाजीस नेतात आणि आम्हां दोघांस टाकितात! असें न व्हावें. आम्ही तिघेहि शरण आहोंत, आपण शरणांगतवत्सल आहांत.' हें उत्तर ऐकून समर्थ फार संतुष्ट झाले आणि त्या तिघांना अनुग्रहप्रसाद देऊन दुसरे दिवशीं तेथून निघतांना तिघां-सहि समागमें घेतलें. त्यांना पोहोंचविण्यास पाराजीपंत रत्नागिरी (ज़्योतिबा) पर्यंत बरोबर गेले होते. तिकडून फिरत फिरत समर्थ कऱ्हाड प्रांतीं परत आले आणि खंडोबाचे पालीजवळ शिरगांवीं मठ करून तेथें रखमाबाई व त्यांचीं मुलें यांना ठेविलें. समर्थ-काव्यांचें लेखन अंबाजी व दत्तात्रय कित्येकदां शिरगांवीं करीत.

अंबाजीच्या या चरित्रावरून एक तत्त्व कळून येतें; तें हें कीं, यथार्थ मुमुक्षत्व बाणल्यानंतर सद्गुरु आपण होऊन त्या मुमुक्षूकडे जाऊन त्याला अनुगृहीत करतात. 'यत्र यथार्थमुमुक्षुः तत्रैवास्ते यथार्थतत्त्वज्ञः । यत्रास्ति चातक इह तत्र घनो भवति शून्यगगनेऽपि ॥' तुकाराम महाराज यांच्या शिष्या बहिणाबाई, समर्थांचे दुसरे एक शिष्य तिसगांवचे दिनकर, उत्तर पेशवाईंतील सुरजी अजनगांवचे देवनाथ हीं याचीं आणखी उदाहरणें आहेत. स्वतःच्या ठायीं यथार्थ मुमुक्षुत्व बाणल्यानंतर बुवाबाजीला डरण्याचें कारण नाहीं. यथार्थ तत्त्वज्ञ सद्गुरु त्यांजकडे न बोलावितां जातील अथवा त्याला आपल्याकडे खेंचून ओढून घेतील. संतचरित्रांत अशीं शतशः उदाहरणें आहेत.

## १० सर्ग–प्रत्यहीं माझा नमस्कार । देवासी करावा ।

शके १५६६ चें सगळें वर्ष याप्रमाणें महाबळेश्वरापासून करवीरापर्यंत परिभ्रमण करण्यांत गेलें. या अवधींत महाबळेश्वर, वाई, शहापूर, चाफळ, कऱ्हाड, मिरज, करवीर इत्यादि ठिकाणीं शिष्य संप्रदाय झाला; त्यांत कित्येय वतनदार व कित्येक अधि-कारी होते; चाफळ व शिरगांव येथें मठ झाले, महाबळेश्वर, वाई

शहापूर या ठियाणीं मारुती–स्थापना झाल्या; अनेक साधुसंतांच्या म्हणजे तत्कालीन नेत्यांच्या समक्षभेटी होऊन परिचय झाला. हें प्रगट कार्य झाले; अप्रगट किती व काय असेल त्याचा आज अंदाजहि करितां यावयाचा नाहीं. 'गुप्त ते गुप्त जाणावें!' पण या व्यापात १५६६ वर्ष सपत येऊन १५६७ च्या श्रीरामनवमी महोत्सवाचे दिवस जवळ येऊं लागले; उत्सव कसा व कोठें करावयाचा ती योजना व्हावयाची होती. तिकडे टाकळीस उद्धव बालक–नव्हे आतां विशींतला तरुण, पण समर्थ माऊलीचें बालकच–उत्कंठित चित्तानें समर्थ माउलीची सारखी मार्गप्रतीक्षा करीत होतें. तेव्हां प्रथम उद्धवास बोलावून घ्यावें अशा विचारानें समर्थांनीं पंचवटीच्या श्रीरामोपासकांस एक पत्र पाठविलें. त्या पत्राची भाषा साधी पण गोड आणि त्यांतील भावना अति कोमल असल्यानें वाचकांनींही अंत:करण हळुवार करून तें पत्र वाचावें, म्हणजे त्यांतील उत्कट भक्तिप्रेमाचा आस्वाद त्यांस घेतां येईल.

जनस्थान गोदातटीं। परमपावन पंचवटी। जेंथें पडिली कृपादृष्टी। रघोत्तमारायाची ।।१।। तेथील रामउपासक। त्यांच्या सेवकांचा सेवक। तुम्हामध्यें मी येक रंक। सरतें करावें ।।२।। तुम्ही निकट देवापासीं। आणि मी पडिलों दुरिदेसीं। कृपाळुपणें रघुनाथासी। माझी करुणा भाकावी ।।३।। म्हणावें ते अनाथ। समर्था तूं दीनानाथ। म्हणावें ते पतित। तूं पतितपावनु ।।४।। म्हणावे तें परम किंकर। देवा तू करुणाकर। म्हणावे तें निराधार। आधार इछी ।।५।। सत्य मिथ्या तुझा म्हणवी। त्याची चिंता असों द्यावी। ऐसी करुणा करावी। नाना प्रकारीं ।।६।। तुम्हां दासांमधें मी हीण। माझे कोटयावधी अवगुण। परंतु आहे अनन्य। सेवक रघुनाथाचा।।७।।पुढें म्यां ऐसेंचि असावें। माझें मन न पालटावें। इतुकें देवासी मागावें। तुम्हीं बंधुवर्गी ।।८।। प्रत्यहीं माझा नमस्कार। देवासी करावा निरंतर। मज कारणें शरीर। इतुकें कष्टवावें ।।९।। बाळ वृद्ध नरनारी। सकळ भक्त कुमार कुमारी। समस्तांसी नमस्कारी। कृष्णातीरवासी ।।१०।। शुद्ध उपासना विमळ ज्ञान। वीतराग आणि ब्राह्मण्यरक्षण। गुरुपरंपरेचें लक्षण।

शुद्धमार्ग ॥११॥ ऐसें पंचधा बोलिलें । इतुकें पाहिजे यत्नें केलें । म्हणजे सकळहि पावलें । म्हणे दासानुदास ॥१२॥

श. १५६७ ची रामनवमी मसूरला झाली. तत्पूर्वी म्हणजे श. १५६६ च्या माघ-फाल्गुनांत हें पत्र लिहिलें असावें असें वाकेनिशी टिपण व बखर यांवरून दिसतें. शहापुरास सतीबाईचे भक्तीस्तव महारुद्रप्रतिष्ठेचा मोठा समारंभ झाला, त्या उत्सवास व तेथें होणाऱ्या कीर्तनास मसूर, रिसवड, सुपनें आदिकरून आस-पासच्या गांवांतील लोक येत. श. १५६६ च्या फाल्गुनांत समर्थ शहापुरीं असतां पुढील श्रीरामनवमीच्या उत्सवाचा विचार निघाला. आमच्या गांवीं हा उत्सव व्हावा अशी प्रत्येक गांवाची मनीषा, पण मसूरच्या भाग्यानें श्रीसमर्थांस आग्रहानें पाचारिलें आणि १५६७ ची म्हणजे समर्थांनीं पंचवटी सोडल्यानंतर कृष्णातीरची पहिली श्रीरामनवमी मसूर येथें झाली. वरील पत्राबरोबर गेलेल्या निरोपाप्रमाणें उद्धवहि कृष्णातीरीं येऊन पोहोंचले.

## ११ सर्ग–मसूरच कां निवडलें ?

'निवडलें' हा शब्द अल्पज्ञ लेखकानें नित्याच्या संवयीनें लिहिला खरा; पण त्यांत एक चूक झाली. 'निवडलें' म्हणण्यांत त्या निवडानिवडीचें कर्तृत्व समर्थांकडे येतें. परंतु 'भक्तें जें मनीं धरावें। तें देवें आपणचि करावें । तेथें वेगळें भावावें । न लगे कदा (२३॥ दा. बो. १०.७)असा सर्व भगवद्‌भक्तांचा अनुभव असतो आणि श्रीसमर्थचरित्रांत तर त्याचें सत्यत्व पावलोंपावलीं प्रत्ययास येतें. भगवदिच्छेनें या जगांतील विशिष्ट कार्यास्तव विशेष साम-र्थ्याच्या ज्या विभूति जन्मास येतात, त्यांच्या भावी कार्याची पूर्व योजना सहजासहजीं अगोदरच होत असते. त्या योजनेंतील भगव-दिच्छेचा गुप्त प्रभाव 'सकल करणें जगदीशाचें' अशी ज्यांची दृढ भावना असते त्यांस स्पष्ट जाणवतो. तुकोबारायांनीं अमुक केलें नाहीं नि समर्थांनीं तमुक केलें, असें आपण बहिर्मुखवृत्ति सामान्य माणसें म्हणतों; पण तत्त्वतः तें चूक आहे.

तसेंच 'देवानें भक्ताचें घर शाकारलें' 'चोखोबाचीं ढोरें ओढिलीं' 'जनीचें दळण दळलें' अशीं विधानें पाहिलीं कीं, असलीं क्षुद्र कामें

करणारा तो देव कसचा? ही खुळी कल्पना आहे' असें विद्वान् लोक प्रतिपादीत असतात. परंतु व्यवहारांतील एक दोन उदाहरणें पाहूं म्हणजे या भगवदिच्छेनुरूप घडणाऱ्या कृत्यांस 'खुळी कल्पना' म्हणणाऱ्यांच्याच कल्पना कशा खुळ्या–बिनबुडांच्या असतात तें ध्यानीं येईल. प्रजाजन व राजसेवक दोघेहि एकाच राजसत्तेचे अंकित; पण अधिकारी त्या सत्तेचे घटक–सत्तारूप बनलेले असतात; त्यामुळें अधिकाऱ्यास आवश्यक असणाऱ्या लहानशा टांचणीपासून तों मोठमोठ्या बंगल्यांपर्यंत सर्व वस्तूंची योजना राजसत्तेमार्फत अगाऊच झालेली असते. त्या त्या वस्तूंची तरतूद करण्यास अमूर्त राजसत्ता मूर्तिमान होऊन स्वतः येत नाहीं–तर अधिकारी सेवकासाठीं आपल्या अन्य सेवकांकडून ती अनेक कामें करवीत असते. त्याचप्रमाणें भक्तवत्सल त्रैलोक्यप्रभु अनन्यनिष्ठावंत भक्तांसाठींहि नानारूपांनीं व नानानिमित्तांनीं स्वतःचें कर्तृत्व प्रकट न होऊं देतां असंख्य लीला करीत असतो. त्यांतील भगवत्कर्तृत्व जाणण्यास भक्ताचेंच भाविक अंतःकरण समर्थ असतें. 'येरां गबाळांचें तें काम' नव्हे. थोडीं वर्षे झालीं. लाहोर येथील एका महात्म्याची गोष्ट एका हिन्दी मासिकांत प्रसिद्ध झाली होती. त्या सत्पुरुषास एक दिवस ऊंस खाण्याची इच्छा झाली; पण रामाची इच्छा असेल तर मिळेल ऊंस; नाहींतर नको अशा विचारानें त्यांनीं ती इच्छा कोणास कळविली नाहीं. २।३ तासांनीं त्यांचा एक शिष्य छोटी कार घेऊन आला आणि गुरुमहाराजांस कॅनालच्या कांठीं घेऊन गेला. दोघे गुरुशिष्य गाडींतून उतरून कॅनालच्या कांठावर बसले. शिष्यानें आपली टोपी मळली म्हणून पाण्यांत फेंकून दिली. 'पाण्यांत विनाकारण कां टाकलीस? एखाद्याला दिली असतीस तर त्याच्या उपयोगी पडली नसती का?' असें महाराज त्याला रागे भरले. तेव्हां वाहत चाललेली टोपी काढण्याच्या प्रयत्नास शिष्य लागला. खालीं कांहीं अंतरावर उसाच्या गंडेऱ्या विकणारा बसला होता; त्याच्या जवळचा मोठा ऊंस घेऊन शिष्यानें टोपी काढून धुऊन स्वच्छ करून येतांना गुरूंच्यासाठीं ऊंसहि आणिला आणि त्या उंसाच्या गंडेऱ्या करून गुरूंच्या पुढें त्यानें ठेविल्या. गंडेऱ्या पुढें

दिसतांच महाराजांस हंसू लोटलें; शिष्यास वाटलें आपलें आणखी कांहीं तरी चुकलें ! पण महाराज म्हणाले 'बघ रामाची लीला कशी आहे ती ! दुपारीं उंस खाण्याची माझ्या मनांत उद्भवलेली इच्छा मीं कोणास सांगितली नव्हती. मीहि ती विसरलोंच होतों. परंतु तुला व तुझ्या टोपीला निमित्त करून रामरायानें ती इच्छा अशा प्रकारें पूर्ण केली !' श्रीरामकृष्ण परमहंसांस जीं जीं तीव्र साधनें करण्याची इच्छा झाली, त्या त्या साधनांचे तज्ज्ञ दक्षिणेश्वरीं आपोआप येऊन पोंहोचले.

मसूरच्या श्रीरामनवमीच्या बाबतींत असाच प्रकार घडत गेला. सतीबाईसाठीं शहापुरास मारुतीस्थापना झाली; त्या निमित्तानें अर्चनविधि समारंभाचा होऊन भोंवतालचे ग्रामस्थ तेथें जमले; त्यांत पुढील रामनवमीची चर्चा निघून मसूरचें निमंत्रण समर्थांनीं स्वीकारलें. ह्या सर्व गोष्टी आघाओघानेंच घडत आल्या; परंतु त्यांत मोठ्या भावी कार्याचें बीज पेरिलें गेलें. शहाजी राजांचा व समर्थांचा परिचय तीर्थयात्रेपूर्वींच नाशिकास झाला होता. परस्परांच्या मनोगताची ओळख परस्परांस तेव्हांपासूनच झाली होती. मसूरचा परगणा त्यावेळीं शहाजीराजांच्या जहागिरींत होता.[1] मसुरास जहागिरदार या नात्यानें त्यांचें ठाणें होतें. राजे स्वत: जरी या वेळीं मसूरला नव्हते, तरी त्यांचे कोणी अधिकारी तेथें व्यवस्थेला असतीलच. त्यामुळें जहागिरीच्या मुख्य ठाण्यांत श्रीरामनवमीचा उत्सव झाल्यास त्याची वर्दी शहाजी राजांस पोहोंचणें विशेषसें कठीण नव्हतें. श्रीसमर्थ–शहाजींचा कांहीं पूर्व संकेत याबाबत ठरला असणें असंभवनीय नाहीं.असले गुप्त संकेत अनुमानानेंचजाणावे लागतात; अशांना 'चक्षुर्वै सत्यं' चा आधार कसा सांपडणार ?

महाबळेश्वरक्षेत्राचा निरामय एकान्त, वाई-कऱ्हाड-करवीर-सारखी प्रसिद्ध क्षेत्रें व मोठालीं गांवें, शेजारचें कृष्णाकांठचें उंब्रज आणि ठिकठिकाणचे वतनदार व अधिकारी शिष्य यांसारख्या उत्सवास आवश्यक अशा सगळ्या गोष्टी सोडून १५६७ चा रामनवमीचा

---

१ विशेष माहितीसाठीं श्रीसमर्थगाथा प्रस्तावना, पृ. २१–३८ पहा.

उत्सव 'मसूरलाच कां झाला ?' या प्रश्नाचें उत्तर दोन प्रकारचें मिळतें हें वरील विवेचनावरून ध्यानीं येईल. परमार्थदृष्ट्या भगवदिच्छेचा ओघ आणि ऐतिहासिक दृष्ट्या तेथील शहाजी-राजांच्या जहागिरीचें ठाणें, या दोन कारणांस्तव पुढील श्रीराम-नवमी मसुरास करण्याचें निश्चित झालें.

कैसी क्षेम राहेल जगति कैसीं देवदेवाल्यें तगती। कैसे कुटुंबवत्सल लोक जगती। कोणेकडे जातील हे ॥६०॥ स.प्र. २० या समर्थांच्या चिंताव्याधीवर दोन औषधें मसुरास मिळणार होतीं, म्हणून समर्थांच्या जिवलग रामप्रभूंनीं हा मसूरच्या उत्सवाचा योगायोग जमवून आणिला असें म्हणणेंच योग्य होईल.

## १२ सर्ग—अनन्यनिष्ठेचें अद्‌भुत दर्शन



मसूर मारुती

मसुरास त्या वेळीं ब्राह्मणवस्ती बरीच होती म्हणून त्यास ब्रह्मपुरी म्हणत. तेथें समर्थ आल्यावर कुळकर-ण्याच्या मातुश्रीनें त्यांचा अनुग्रह घेतला. लगेच महारुद्राची प्रतिष्ठा तेथें होऊन उत्सवाची सिद्धता होऊं लागली. टाकळीहून उद्धवहि आले होते; शिवाय कोल्हापूरच्या रखमाबाई, त्यांचे अंबाजी व दत्तात्रय हे दोन पुत्र, चाफळचे भानजी जोशी, कऱ्हाडच्या आक्का, मिरजेच्या वेणाबाई, तसेच गणेश गोसावी,

मुसळराम, इत्यादि ठिकठिकाणची शिष्यमंडळी आणि आसपासच्या गांवचा अनेक प्रकारचा लोकसमुदाय तेथें जमा होऊं लागला. उत्सवाची पूर्वसिद्धता जोरांत चालू झाली. पण मध्यंतरीं एक लहानसें विघ्न आलें.

मसूर परगणा शहाजी राजांस जहागीर होता व मसूरच्या कोटांत त्यांचें ठाणें होतें, तरी तेथें आदिलशाही कमाविसदारहि असे. उत्सवांत दररोज सकाळ संध्याकाळ छबिना निघावयाचा, त्या वेळीं रथांतील सिंहासनास उंच ऊंच निशाणाच्या काठ्या सभोंवार लावून व कित्येक मोठालीं निशाणें-पताका हातीं घेऊन मोठी शोभा आणिली जात असे. जिकडून रथ-प्रदक्षिणा व्हावयाची त्या मार्गांत एका जुनाट आंब्याची मोठी फांदी आडवी आली होती. तिजमुळें सिंहासनाच्या काठ्या जाण्यास अडचण पडेल असें दिसलें. ती फांदी तोडावी तर वरिष्ठांच्या हुकमाशिवाय त्या सरकारी झाडास हात लावावयाचा नाहीं अशी ताकिद तेथील आदिलशाही कमाविसदार यवनानें दिली. विघ्न आलें, परंतु 'भयकृत्भयनाशन' ह्या दोन्हीं रूपांनीं रामच नटला आहे, आणि तो जें जें करील तें तें स्वहिताचेंच असलें पाहिजे अशी दृढ भावना भक्तोत्तमांची असल्यानें विघ्न जसें आलें तसें तें गेलेंहि. कमाविसदाराच्या ताकिदीची वार्ता कानीं येतांच समर्थ "मनोवेगें पातशहापुढें जाऊन उभे राहिले. त्या काळीं ध्यान– पायीं पादुका, हातीं माळ, कौपीन, आंगावर एक छाटी." अशी मूर्ति पाहून पातशहानें जाणिलें कीं हे हिंदु फकीर आहेत आणि तत्काळ गादीवरून खालीं उतरून आदबीनें विचारिलें, 'आपण कोठून आलांत, काय हुकुम आहे?' तेव्हां समर्थांनीं मसूर येथील उत्सवास ठाणेदारानें आणिलेल्या अडथळ्याचें वर्तमान सांगितलें. त्यावर पादशहानें ठाणेदारास मोहोरसुद्धां चिठ्ठी करून दिली. आणि लगेंच स्वामी "अंतरिक्ष निघाले; हें पाहून पातशहानें आश्चर्य केलें." पातशहाची चिठ्ठी ठाणेदारास देऊन झाड तोडण्यास त्याची परवानगी घेऊन मारुतीपाशीं जेव्हां ते आले, तेव्हां 'उन्हांतच कोठें

जाणें झालें होतें ?' असें मंडळींनीं विचारिलें. त्या वेळीं विजापूराहून आणिलेल्या चिठ्ठीचें सविस्तर वर्तमान समर्थांनीं सांगितलें. ईश्वरप्रणिधान व योगाभ्यास यांच्या दृढ अभ्यासानें असे–ज्याला सामान्य माणसें चमत्कार म्हणतात– सिद्धींचे प्रकार घडू शकतात हा पौर्वात्य व पाश्चिमात्य अभ्यासकांचा अनुभव आहे. तेथें 'अन्यत्र कल्पना व्यर्थ कुतर्काची !'

फांदी तोडावयाची परवानगी मिळाली, पण ती तोडावयाची कोणीं ? खालीं मोठी खोल विहीर व तिजवर ती जाड फांदी आडवी वाढलेली; तिच्यावर चढणेंच अगोदर कठिण, त्यानंतर तोडणें ! तें व्हावें कसें ?

मनुष्याचा कांहीं तोडाया उपाय। नाहीं म्हणती काय करावें हो ॥ १० ॥ सर्वांचा उपाय राहिला जेधवां। अंबाजीसी तेव्हां आज्ञा केली ॥ ११॥ चरणावरी तेव्हां मस्तक ठेविलें। शस्त्र तें घेतलें हस्तामाजीं ॥१२॥

दोरीचा फांसा करून तो फांदीस अडकविला, कुऱ्हाडीस दोरी बांधून ती गळयांत घेतली आणि अंबाजी वर चढले. "तों स्वामी बोलिले कीं, 'पुढें बसून मागें तोडणें ! 'आज्ञा' म्हणोन पुढें बसून मागें बुडुख तोडूं लागले, तों फांदीसह विहिरींत पडले. हें सर्वजण पाहतात. दोन घटिका जाल्या, अंबाजी बाहेर येईना ! तो मृत्यु पावला असावा, अशा कल्पनेनें आक्कांनीं प्रार्थना केली कीं, 'अंबाजीस बाहेर काढून त्याच्या देहाचें सार्थक करावयाची आज्ञा जाली पाहिजे.' त्यावर स्वामींनीं हांसून विचारलें 'अंबाजी मेला कीं काय?' 'चार घटका होत आल्या, आतां कसा वांचेल?' आक्कांनीं उत्तर दिलें. लगेच स्वामी हांसत हांसत उठून विहिरीजवळ आले आणि विहिरीचे कांठांवर हात ठेवून 'अंबाजी !' म्हणून हाक मारिते जाले. त्याबरोबर पाण्यांतून अंबाजीनें 'ओ' दिली. पुन: स्वामी विचारतात, 'अंबाजी, कल्याण आहेस काय?' 'आपले कृपेंकरून कल्याण आहे.' आंतूनच उत्तर आलें.' तर कल्याणच,

बाहेर ये;' आज्ञा ऐकतांच अंबाजीनें बाहेर येऊन साष्टांग नमस्कार घातला. समर्थांनीं त्यांचें नांव 'कल्याण' ठेविलें आणि अकरा मण गूळ वाटिला 'स्वामींचा कवितासमुद्र अवघा' लिहिणारा हा कल्याण आपल्या एकान्तिक निष्ठेनें व सेवावृत्तीनें सद्गुरुरायांचा अत्यंत कृपापात्र झाला. ग्रामस्थांच्या सांगण्यावरून समजतें कीं, मारुतीमंदिराजवळ डाव्या हाताला ही विहीर होती; तेथें आतां घर झालें आहे. अंबाजी पाल्यांत पडला असें भक्तिलीलामृत व सद्गुरुस्तवराज यांत म्हटलें आहे.

## १३ सर्ग–पहिल्या उत्सवाची दुसरी देणगी

श्रीदासविश्रामधामाच्या सत्ताविसाव्या अध्यायांत मसूरच्या या श्रीरामनवमीस शिवराय आले असल्याचा उल्लेख आहे. त्यांत असंभवनीय कांहीं नाहीं. मसूर हें शहाजी राजांच्या जहागिरीचें ठाणें; तेव्हां वडिलांच्या जहागिरीच्या गांवांत जहागीरदाराच्या कर्त्या मुलानें येणें स्वाभाविक आहे. शिवरायांच्या १५६७ मधील मसूरच्या आगमनांत त्यांचा दुसरा एक हेतु दिसतो. शिवरायांचीं 'मावळांतील राजकारणें' यावेळीं जोरांत चाललीं होतीं. त्या राजकारणास साह्यभूत होतील अशा व्यक्ति व पोषक असे प्रसंग शोधणें हाहि एक या आगमनाचा हेतु असावा. राजकारणाच्या गुप्त मनोगतांस मसूरच्या उत्सवांत येणाऱ्या साधुसंतांचें दर्शन आणि श्रींचा तीर्थप्रसाद घेणें हीं दोन बाह्य निमित्तें होत.

मसूरला येण्यांतील शिवरायांचे सर्व हेतु आज संपूर्णतया कळणार नाहींत; पण ते कांहींहि असले तरी समर्थसद्गुरूंच्या चाणाक्ष व धोरणी दृष्टींतून त्या क्षत्रिय तरुणवीराची पाणीदार मुद्रा व तेजस्वी कर्तृत्व हीं सुटलीं नाहींत. या भेटीनें परस्परांचा वेध परस्परांस लागला हें निश्चित. भावी धर्मोद्धारास या तरुण-वीराचा चांगला उपयोग होण्यासारखा आहे हें श्रीसमर्थांनीं हेरलें.

शिवरायांचें राजकारण रोहिड खोऱ्यांतील श्रीरायरेश्वर या स्वयंभू स्थानाच्या आश्रयानें यापूर्वींच ५–६ वर्षें चालू झालें होतें. १५६१ त म्हणजे वयाचे दहावे वर्षाचे आंतच 'प्रतिपश्चंद्र रेखेव

वर्धिष्णुर्विश्ववंदिता । शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ।' ही त्यांची विश्ववंद्य मुद्रा प्रकटली होती. १५६०–६१ चे



श्रीशिव छत्रपति

सुमारास चाकण परगणा त्यांनी घेतला होता. बाह्यतः अलिप्तपणा व अमान्यता दर्शवीत, पण अंतःस्थपणें शिवरायाच्या स्वराज्यस्थापनेच्या प्रयत्नांस सर्वतोपरी साह्य देण्याचें धोरण शहाजीराजे व त्यांचे विश्वासु कारभारी दादाजी कोंडदेव यांनीं अवलबिलें होतें; स्वराज्याच्या शपथा रायरेश्वरीं झाल्या होत्या. दादाजींच्या उपदेशाचा आशय असा कीं,

"सर्व पृथ्वी यवनांनीं पादाक्रांत केली, स्थलें - किल्ले - जागा- फौज त्यांची भरली. या करण्यास आपणांस मातबर स्थळें असावीं, हिंदु राजे व हिंदु फौजा साह्यकर्त्या असाव्या; आपण परम श्रमसाहसांनीं दुष्कर्म (दुर्घट कर्म) करावें, त्या समयीं ईश्वराची अनुकूलता व सिद्ध पुरुषांचा आशीर्वाद असतां अशा गोष्टी घडतील."

वरपांगीं निषेधात्मक दिसणाऱ्या या दादाजींच्या सल्ल्यांतील मसलतीचे गुण तेवढे शिवरायांनीं उचलले, बाकीचा भाग टाकून दिला. या सुमारास शहाजी राजांचेंहि वजन विजापूर-दरबारांत वाढत चाललें होतें, देवधर्मगोब्राह्मणपीडापरिहार होऊन धर्मस्थापना करणारें स्वराज्य व्हावें अशी आतुरता शहाजीराजांस

होती. तथापि बाह्यत: ते आदिलशाहीचे अंकित असल्यानें त्यांनाहि जपूनच चालणें प्राप्त होतें. आदिलशाहीची ताबेदारी असतांनाच मसूर परगण्याची जहागीर व कऱ्हाडची देशमुखी शहाजीमहाराजां-कडे आली होती.

या शहाजी - दादाजींच्या अंतःस्थ प्रयत्नांच्या पार्श्वभूमीवर रायरेश्वरची शपथ आणि मावळांतील देशमुख, देशपांडे वगैरे वतनदार अनुकूल करून घेण्याचीं कारस्थानें इत्यादि प्रकारें शिवरायांनीं चालविलेलीं राजकारणें समग्र पाहिलीं म्हणजे त्या षोडशवर्षीय वीराची कर्तबगारी कोणाच्याहि नजरेंत भरण्यासारखी कशी वाढली होती, तें ध्यानीं येईल. तीनशे वर्षांनंतर सांपडलेल्या थोड्याशा कागदपत्रांच्या तोकड्या आधारावर जर त्या काळच्या शिवकार्याचें महत्त्व आज इतकें वाटत आहे, तर ज्यांच्या नजरेसमोर ते प्रसंग घडत होते त्या समर्थांना किती तरी पटीनें तें अधिक दिसलें असेल? उपासना पुढें करून आपल्या धर्मोद्धाराच्या कार्यांत देशमुख, देशपांडे, कुळकरणी, सुभेदार इत्यादि लोकांना गोवून घेणाऱ्या समर्थांना शिवरायाच्या तेजस्वी व सखोल कर्तृत्वाची ओळख त्या पहिल्या भेटींत झाली नसेल असें मानणें निःसंशय चुकीचें होईल. आपणाकडे येणारा प्रत्येक मनुष्य परमार्थास अधिकारी किंवा अनधिकारी आहे हें एका दृष्टिक्षेपांत रामकृष्ण परमहंस ओळखीत असत. योगेश्वर समर्थांजवळ तर तें सामर्थ्य प्रचण्ड प्रमाणांत होतें. तात्पर्य, या पहिल्या भेटींतच शिवरायांच्या स्वधर्म-निष्ठा, गोब्राह्मणपालनतत्परता, अपूर्व तेजस्विता, शौर्य, धैर्य इत्यादि क्षत्रियोचित अशा 'प्रतिपच्चंद्ररेखेव वर्धिष्णु' गुणसमुच्चया-कडे समर्थांचें लक्ष वेधलें गेलें, तर श्रीसमर्थांची वेधक शक्ति, धगधगीत वैराग्य, सप्रचीत वक्तृत्व, उत्कट भक्ति, ज्ञान, निःस्पृहता, धर्मोद्धाराची तीव्र तळमळ इत्यादि गुणांनीं शिवराय समर्थांकडे आकर्षिले गेले. तथापि यावेळीं विशेष रहस्याचीं बोलणीं झालीं असलीं तर तीं आपणांस आज कशीं कळावीं? संतमहात्मे कितीहि

सामर्थ्यवंत असले तरी त्यांच्या धर्मस्थापनेचे कार्यास्तव त्यांना राजसत्तेचें साह्य लागतेंच. कारण, राजसत्तेच्या पाठिंब्याशिवाय पाखंडी धर्मलंड नास्तिकांचा नीट बंदोबस्त होत नाहीं. राजसत्ता साह्यास असेल तर हें धर्मस्थापनेचें कार्य सुकर होतें–सुरळीत चालतें. नाहीं तर या पाखंड्यांच्या उपद्व्यापामुळें बिघडूं लागतें. तुकाराममहाराजांसारख्या सत्त्वमूर्तीलाहि शक्तीच्या साह्याची जरूरी भासतेच. समर्थांपुढें तर फार प्रचंड कार्य होतें. स्वधर्मस्थापनेस्तव ज्या विधर्मी प्रतिपक्षाशीं त्यांना सामना द्यावयाचा होता त्याला राजसत्तेचें पाठबळ परिपूर्ण होतें. राजसत्तेच्या पाठिंब्यामुळेंच तो फोंफावून बद्धमूल होऊं पहात होता–झाला होता त्यामुळें स्वधर्माभिमानी राजसत्तेच्या साह्याची आवश्यकता समर्थांस तीव्रतेनें भासूं लागली होती. अशा प्रसंगीं शिवरायांच्या रूपानें त्या स्वधर्मपालक अशा 'प्रतिपच्चंद्ररेखेव वर्धिष्णु' राजसत्तेचें दर्शन मसूरच्या उत्सवांत झालें; त्यामुळें त्यांचे अंतःकरणास केवढा उल्हास वाटला असेल!

## १४ सर्ग–आणखी एक हिरा लाभला.

मसुरास श्रीसमर्थांचा मुक्काम असतां शहापुरच्या सतीबाई प्रत्यहीं दर्शनास येत असत. त्यांजबरोबर त्यांनीं पुत्रवत् मानिलेला त्यांचा १०।१२ वर्षांचा भाचा (चुलत–बंधूचा मुलगा) भिकाजीहि नेहमीं येत असे. एक दिवस बाई येऊन नमस्कार करून खालीं बसली, पण भिकाजी तसाच उभा राहिला. तें पाहून अक्का म्हणाल्या, 'नुसता धटिंगणासारखा उभा काय राहिलास? स्वामींना नमस्कार करून हात जोडून उभें राहावें,' त्यावर भिकाजीनें विचारिलें कीं 'स्वामींस नमस्कार केल्यानें काय देतात?' हें ऐकून स्वामी हंसत हंसत म्हणाले कीं "स्वामी सांगतील तें ऐकशील तर मागशील तें देतील." 'काय सांगावयाचें तें सांगा' भिकाजी उद्गारला. स्वामींनीं आज्ञा केली "घे या विहिरींत उडी." त्या शब्दासरशीं

त्या मुलानें उडी टाकली ! हें पाहून "पोरानें आम्हांवर निमित्त देऊन प्राण दिला.–" असें म्हणत स्वामींनीं त्याच्या मागो-माग उडी घेतली. उडी घेतल्याचें मात्र भिकाजीला स्मरण होतें. पुढें विहिरीच्या आंत मंदिर, त्यांत सिंहासनारूढ स्वामी आणि जवळ आपण उभा असें भिकाजीस दिसलें. 'काय इच्छा आहे?,–' स्वामींनीं त्यास विचारलें. "महाराज, अनुग्रहकृपा करावी" अशी विनंति भिकाजीनें केली. पूजासामुग्रीची सर्व सिद्धता तेथें होती. पूजा करण्याची स्वामींची आज्ञा होतांच त्याप्रमाणें पूजा करून भिकाजीनें अनुग्रह प्रसाद घेतला. उभयतांचीं कांहीं प्रश्नोत्तरें होऊन भिकाजीस परम समाधान लाभलें. नंतर स्वामींनीं हात धरून त्यास बाहेर आणलें. उद्धव–कल्याणादिकां-प्रमाणें हा सद्गुरूंचेजवळ नित्य राहूं लागला; त्यायोगें याची योग्यता फार वाढली. पुढें तंजावरास मठ झाल्यावर समर्थांनीं भिकाजीस तेथें ठेविलें. तेच भीमस्वामी तंजावरकर होत; नाना स्वामी असेंहि त्यास तंजावर मठांतील एका अप्रकाशित बाडांत म्हटलें आहे.

## १५ सर्ग–मुसळाची करामत

मुसळराम नांवाचे एक समर्थशिष्य होते. प्रथम समर्थांशीं त्यांचा संबंध केव्हां आणि कसा आला, तसेंच ते मूळचे कोठचे राहणारे हें अद्यापि माहीत नसलें, तरी कृष्णातीरीं समर्थ आल्या-नंतर आरंभीं जे कित्येक तरुण त्यांचेकडे शिष्य-भावानें आकर्षित झाले त्यांत मुसळराम होते एवढें निश्चित. मुसळ करीं मुसळ नामा। मुसळीं हनुमानाचा दावी महिमा। गंगातीरीं धोंडरीत सामर्थ्य सीमा। महापुरीं मुसळ रोविलें ॥ ५१ ॥ स. प्र. १० असें त्यांचें वर्णन प्रतापांत केलें आहे. गोदातीरीं राक्षसभुवनाचे पूर्वेस सुमारें १॥–२ कोसांवर धोंडराई नांवाचें गांव 'अमृता' नदीचे कांठीं असून तेथें यांचा मठ नदीकिनाऱ्यालाच होता, तो महा-पुरांत वाहून गेला; परंपरा चालविणारेंहि कोणी उरलें नाहीं.

धोंडराईच्या नदींत जेथें मुसळरामांनीं पुरलेलें मुसळ वरून महापूर गेला तरी तसेंच राहिलें होतें, तेथें आतां मारुतिराय येऊन बसले आहेत. या मुसळरामांच्या कांहीं कविता श्रीसमर्थवाग्देवता-मंदिरांतील कित्येक बाडांत प्रकाशकाची वाट पहात आहेत. इतर समर्थसांप्रदायिकांजवळ जशी कुबडी, तसें यांचे खांद्यावर मुसळ असे आणि त्यावर शेंदराचे मारुति असत, म्हणून त्यांस मुसळ-राम म्हणत.

रामनवमीचा उत्सव आटोपून समर्थ मसुराहून गेल्यानंतर मागें मठांत मुसळराम होते. त्यावेळीं मसुरास एक तंटेखोर पठाण राहत होता. त्याच्या साथीदार फकिरांचा मेळा नेहमीं त्याच्या भोवतीं असे. एक दिवस नित्यक्रमाप्रमाणें मुसळराम भजन करीत भिक्षार्थ गांवांत हिंडत असतां त्यांच्याकडे त्या पठाण सरदाराची नजर गेली. कोण काय वगैरे चौकशी करून आपल्या नोकरांकरवीं मुसळरामास त्यानें ओढून आणविलें आणि ‘कुछ करामत बताव’ म्हणून हुकूम केला. मुखानें नामस्मरण व अंतःकरणांत समर्थ-ध्यान करीत मुसळराम स्वस्थ उभे होते. भोंवतालीं जमलेल्या फकिरांतील एक म्हातारा म्हणाला ‘हा सवा मणाचा लंगर आहे, तो ओढ पाहूं. जरासा तरी हालीव मग सही म्हणूं. नसेल हिंमत तर ठेव तें मुसळ खालीं न् हो चालता; चले जाव!’ तिकडून पठाणहि गरजला, ‘देखो–हरलास तर याद राख; तुझी काठी बिठी हिसकाऊन घेऊन हांकून देऊं.’ सगळेच गुरगुरूं लागले. मुसळरामांनीं समर्थचरणांचें स्मरण करून खांद्यावरचें मुसळ खालीं ठेविलें आणि म्हटलें, ‘ये लकडी पहिले उठाके तो बताव कोई.’ एकजण फकीर उचलूं लागला, त्याला हालेना. दुसरा आला त्याची तीच गति; एक एक करतां करतां सगळे जमून ओढूं लागले, पण तें जागचें हालेचना! तेव्हां मुसळरामाभोंवतीं हुल्लड करून शिव्यागाळ-मारपीट करावी असें त्यांनीं मनांत योजिलें; तों शिव्या द्यायला तोंड उघडेना आणि मारायला हात हालेना! सगळे दचकले, मनांतून घाबरले; इतक्यांत पठाणानें

जवळच्या माणसाच्या कानांत सांगितलें 'याच्यावर गोळी चालव आणि त्याचें तें देऊळ पाडून टाक.' मुसळराम आपले समर्थ-ध्यानांत मग्न. त्यासमयीं समर्थांनीं तेथें प्रकट होऊन त्या पठाणास एक सणसणीत चपराक ठेवून दिल्याबरोबर, 'माफ करो जी माफ करो' म्हणत पठाण हात जोडून शरण आला आणि बाकीचे वावरून सैरावैरा पळाले ! पठाण शरण येतांच समर्थांनीं सौम्यता धारण केली आणि त्या सर्वांना उपदेश केला :–

सुनो वा सुनो मुसलमाना। क्या है अकलका माना ।। जो कुछ है सो भूतखाना। इताल किस तरफ जाना ।। ध्रु. ।। किसके कई तरफ न जाना। आकल खुब खातिर ल्याना ।। अल्लाके दर्गामे जाना। वहां तो अलवत हक होना ।। २ ।। धणिका अलम है सारा। दुजा सुरिजन हारा ।। लगाया तेरा और मेरा। उससे चुकता नहि फेरा ।। ३ ।। गैबी तखत खोया सो पाया। वखत हजूरका आया ।। पैगंवरने बतलाया। सो तूं क्यौं नहि बे पाया ।। ४ ।। बाबा गैबी सुनावे। अल्ला आवे ना जावे ।। आकल खुब खातिर ल्यावे। पूरा पीरसूं पहुंचावे ।। ५ ।। स. गा. १७२०

बाबा गैबींचा हा रोकडा जबाब ऐकून ते फकीर व पठाण सगळेच शरण आले; सर्वांनीं समर्थ व मुसळराम यांची माफी मागितली. नंतर उभयतां गुरुशिष्य मठांत पोहोंचले, तों तेथें अगोदरच एका व्यापारी भक्तानें मारुतीरायास नैवेद्य करावयाचा म्हणून १०–१५ माणसांचा स्वयंपाक तयार करून ठेवला होता. समर्थ आल्याबरोबर जेवढा समुदाय त्यांच्याबरोबर आला होता, त्या सगळ्यांच्या पंगती गुर्वाज्ञेनें मांडिल्या. स्वयंपाक दहा पंधरा माणसांचा, इतक्या समुदायाला कसा पुरावा? पारपत्याधिकारी गडबडले ! समर्थ म्हणाले 'घाबरूं नका !' मारुतिराय संतुष्ट झालेना? येक अंतरात्मा पावल्या तृप्त। संतुष्ट पावती तेणें समस्त। अनुमानीं पडावें कासयातें। जयराम कर्ता मानिजे।।१०७।। ( दा. वि. धाम ४१ ) तें १०–१५ माणसांचें अन्न सगळ्या पंगतीस पुरून भिकाऱ्यांसहि मागाहून वाटलें! ऐन प्राणसंकटाच्या

वेळीं समर्थ धांवून आले आणि दुष्ट प्रकृतींचा यथायोग्य बंदोबस्त होऊन सर्वत्र आनंदीआनंद झाल्याचें पाहिल्यावर मुसळरामांचें हृदय भक्तिप्रेमानें कसें उचंबळून आलें असेल? त्यांनीं सद्गुरुचरणीं प्रार्थना केली–

भक्तजनसखा जिवाचा सांगाती। त्यासी काकुलती यावी माझी ॥ १ ॥ माझी सर्व चिंता श्रीरामासी लागो। तोचि नित्य जागो आत्मरूपी ॥ २ ॥ करुणेचा सागरू मनाचा गंभीरू। भव-सिंधूचा पारू पाववील ॥ ३ ॥ जेथें उभा दास तेथें राहे सहज। रामा हेंचि काज दास पाळी ॥ ४ ॥ पाळिलें प्रल्हादा नाना संकटांत। धन्य तू अनंत काय वर्णूं ॥५॥ संकटीं द्रौपदी आकांतीं ते बाहे। कृष्णा येरे पाहे कोण्ही नाहीं ॥ ६ ॥ आकांतीं धांवसी सांडूनियां सर्व। ऐसें हें अपूर्व भक्तिवेड ॥ ७ ॥ आकांत गजेंद्रा संकट मांडलें। तैं गरुडा सांडिलें वेग केला ॥ ८ ॥ अजामेळ पापी पुत्राचे प्रीतीनें। बाहतां बंधन त्याचें तुटे ॥ ९ ॥ शुकसनकादिक ऋषीकुळीं अनेक। मनाचा बोधक सत्यरूप ॥ १० ॥ अनाथ जाणोनि राघवाच्या भजनीं। मुसळ नसोनी राम ठेवी ॥११॥

अप्रकाशित, बाडांक १

सदाचारपूत अशा दृढ भावार्थाचें सामर्थ्य केवढें असतें तें या मुसळरामांच्या प्रसंगावरून ध्यानीं येईल; तसेंच ठायीं ठायीं महारुद्र स्थापून उपासना वाढविण्यांत समर्थांचा हेतु कोणता होता तेंहि कळेल. ज्यांस हा प्रसंग सत्य वाटेल अशांपैकीं एकादा तरी तें मानसिक व आत्मिक सामर्थ्य मिळविण्याच्या मार्गास लागण्याचा संभव आहे. पण त्या प्रसंगाविषयीं अश्रद्धा असेल तर पुढें साधन करण्याची इच्छा तरी कशी व्हावी ?

## १६ सर्ग–स्वप्नसाक्षात्कारानें खूण मिळाली!

१५६७ च्या श्रीरामनवमीनंतर पुढील दोन उत्सव मसूर-लाच झाले असावे. त्यांशिवाय या दोन वर्षांत अधिक कार्य काय

झालें त्याची माहिती तपशिलवार मिळावी अशी लेखक, वाचकांची उदंड इच्छा असली तरी, 'उदंड करी गुप्तरूपें । भिकाऱ्यासारिखा स्वरूपें ।', 'उदंड समुदाय करावे । परीं गुप्तरूपें' अशा प्रकारें अत्यंत गुप्तपणानेंच त्यांचीं महत्त्वाचीं कार्यें झालीं असल्यानें त्यांविषयीं निश्चित स्वरूपाची माहिती अधिक कळेलसें वाटत नाहीं. हीं उदंड कार्यें गुप्तरूपें करण्यास मैदानांतील शहापूर व मसूर हीं गांवें योग्य नव्हतीं; म्हणून प्रथम चंद्रगिरीकडे व नंतर चाफळकडे समर्थ वळले. सभोंवतीं सुंदर वनश्रीनें युक्त असा डोंगरांचा फेर, दासघळ-रामघळ-वाघाचा सडा अशीं कांहीं गुप्त व अवघड स्थानें, पश्चिमेस पाटणकडून कोकणांत जाण्यास अथवा उत्तरेस तारळ-खोरें, परळखोरें, त्यापलीकडील जावळी खोरें, जोरखोरें, कर्यात मावळ या भागांत म्हणजे शिवरायांच्या राजकीय कर्मभूमींत जाण्याचे गुप्त मार्ग, पर्वतमस्तकावरून उत्तरेस महाबळेश्वर, दक्षिणेस पन्हाळा–जोतिबापर्यंतचा टापू, पश्चिमेस कोयना खोरें आणि पूर्वबाजूस शिखर शिंगणापूर, एवढा विस्तीर्ण टापू नजरेंत येण्याची सोय, अशी अनेक प्रकारची निसर्गसिद्ध अनुकूलता चाफळला दिसली म्हणून शहापुरचें वा चंद्रगिरीचें मुख्य ठाणें चाफळला आलें. राजकारणहि त्यांत दिसतें, त्याचा विचार उत्तरार्धांत करूं. मुसळरामांच्या प्रसंगावरून त्या काळीं विधर्मीयांचे उपद्रव खेडचापाडयांतून कसे व किती तापदायक झाले असतील याची थोडीशी कल्पना येईल. भयाचा प्रसंग दिसला कीं लेंकरास जशी आईची आठवण प्रथम होते, तसें संकटसमयीं भक्तास देवाचें स्मरण तीव्रतेनें होतें. समर्थ रामास आळवीत होते.

कां गे निष्ठुर रघुवीरे वाडवेळ न बोलसी । आतां केव्हां येईल कृपा सांग केव्हां सांभाळिसी ।।धृ।। तुझे कृपेची पोसणी सुख-शब्दाची सुखवासी । जेचि क्षणीं न बोलसी तेव्हांच परदेश आम्हांसी ।।१।। रामीरामदास म्हणे तुजविण विदेश वाटला । आतां झड-करी सांभाळीं माझा प्राण हा फुटला ।।२।। पुढील कार्यास्तव योजिलेलें चाफळ खोरें रामप्रभूस मानवलें आहे याची प्रत्यक्ष

खूण समर्थांस हवी होती. त्यांनीं रामाची प्रार्थना तळमळीनें केली आणि प्रभूनें दर्शन देऊन त्यांचें समाधान केलें. पुढील श्लोक पहा–

उदासीन स्वामी न व्हावें दयाळा । स्नेहाळू मनांतील साक्षी कृपाळा । मला आजि ओसंडिता दुःख वाटे । अवस्ता बहू वाटतां कंठ दाटे ॥१॥ बहू गांजिलें या जनां दुर्जनाहीं । अवस्ता नये सांगतां दुःख कांहीं । किती भार म्यां घालणें या समर्था । त्वरें धांवणें पावणें हो अनाथा ॥२॥ बहू शीण म्या सोशितां जन्म गेला । कितीयेक अन्याय उदंड जाला । मनाचा मना प्रत्ययो सद्य आला । समर्थें बहूसाल सांभाळ केला ॥३॥ हिणें कोटि त्याहूनि मी हीण आहे । दिनें कोटि त्याहूनि मी दीन आहे । पतीतास आधार कोण्होच नाहीं । करूं अल्पही हीत नेणोंचि कांहीं ॥४॥ समर्थें उदासीन ऊदंड केलें । कितीयेक हें पाप माझें उदेलें । मला थार आधार कोठेंचि नाहीं । वृथा जन्मलों मी नव्हे दास्य कांहीं ॥५॥ मला जन्म माझा बहू जाड्य जाला । बहू जन्म याचा मला त्रास आला । किती शीण सोसूं समाधान नाहीं । जनाचा मना नावडे संग कांहीं ॥६॥ वियोगें तुझ्या झूरणी लागलीसे। मला स्वस्त कोठेंचि कांहीं न दीसे । बहू पोळलों या उपाधीसि दुःखें । बहू फूटला प्राण हा दुःख शोकें ॥७॥ दयाळा दया सीघ्र आधीं करावी । करूणार्णवा वूडतां धांव घ्यावी । बहूसाल निर्बूजलों मोहजाळें । त्वरें धांवणी सीघ्र कीजे कृपाळें ॥८॥

अशा तीव्र निजध्यासानंतर साक्षात्कार निश्चित होतो. समर्थांस तसा तो झाला हें तेच स्वतः सांगत आहेत. अनाथादिनाची समर्थांसि चिंता । त्वरें वोळला राम आनंददाता । अकस्मात स्वप्नीं समाधान केलें । समर्थें दिनालागि आनंदवीलें ॥९॥ दिनाचा सदा सर्वदा भार वाही । न पाहे मनीं अल्प अन्याय कांहीं । क्षमा सर्व केलें मला येश दिल्हें । म्हणे दास हें प्रत्यया सद्य आलें ॥१०॥ हा स्वप्नसाक्षात्कार झाल्यानें चाफळखोरें श्रीरामप्रभूस मानवल्याची खूण समर्थांस मिळाली आणि पुढील कार्य अधिक उत्साहानें चालू झालें.

## १७ सर्ग–अमंगलांतून मंगल निघालें

श्रीराम, लक्ष्मण, जानकी व हनुमान अशा चार मूर्ति करून देणेबद्दल एका पाथरवटास समर्थांनीं विचारिलें, त्यानें वर्षाची मुदत सांगितली. समर्थ म्हणाले 'बरं आहे; रघुवीराची इच्छा असेल तसें होईल,' आणि मंडळींच्या विचारें बांधकामास प्रारंभ करण्याचें ठरलें. प्रथम मंदिरास जागा निश्चित करावयाची, त्याकरितां आनंदराव देशपांडे वगैरे शिष्य मंडळी चाफळवाडीचे देशमुख प्राणजी बावर नाणेघोळ येथें रहात होते त्यांचेकडे गेली. देशमुखांनीं जागा देऊं केली, ती कुंभार डोहापलीकडे मांड नदीच्या दक्षिण तीरावरचें टेंकाड; दाट कळकीचीं बेटें व मसणवटी होती त्या ठिकाणीं. ती शिष्य मंडळी त्यामुळें फार खिन्न झाली. पण समर्थ म्हणाले 'खिन्न होण्याचें कारण काय? श्रीरामप्रभू आपला पाठीराखा आहे; त्याच्या इच्छेनें जें होतें तें उत्तमच असतें. माझ्या मंगलमय रामरायाचे श्रीचरण जेथें लागतील तेथें अमंगल औषधाला रहावयाचें नाहीं. अहो, सगळी भूमिच मूळची विष्णुपत्नी. तशांत हें टेंकाड म्हणजे मांडव्य ऋषींची यज्ञभूमि. कितीतरी पवित्र स्थान हें मूळचें! तेथें प्रेतसंस्कार करकरून माणसांनीं त्यास अमंगल बनविलें. 'चांडाळसंगति होईजे चांडाळ। होय पुण्यशील साधुसंगें ॥' मंगळाचे जें मंगळ अशा श्रीचरणांचा स्पर्श होतांच या स्मशानाचा पुनरपि कसा उद्धार होतो तें पहा तर खरें!'

सद्गुरु समर्थांच्या या उत्तेजनानें शिष्यमंडळींस हुरूप चढला आणि देशमुखांकडून त्यांनीं तें मसणवटीचें टेंकाड मिळविलें. बोलून चालून कित्येक वर्षांचें स्मशान तें; तेथें मांगल्य नि पावित्र्य कोठून असणार? तशांत गर्द झाडी व मोठालीं कळकींचीं बेटें; दर झाडाखालीं व दर बेटांत एक शेंदऱ्या देव बसलेला. ती जागा सर्व ग्रामस्थांस अत्यंत भयप्रद वाटत होती. झाडें व कळक तोडून देण्याची गोष्ट गांवकऱ्यांजवळ समर्थांनीं काढली, तेव्हां त्यांनीं

उत्तर दिलें, 'महाराज येथें हे शेंदरे देव पांचशें आहेत पांचशें ! 'दोन प्रहरां येथें आलें जरी कोणी । तात्काळ सळोनी[1] पडताहे ॥१॥'

समर्थांनीं झाडींत डोकावून पाहिलें, तों खरेंच 'आंत पाहती तों पांच शत गुंडे । शेंदुरें प्रचंड चर्चियेले ॥' त्यांना उचलण्याचें, नुसता हात लावण्याचें धैर्य कोणास होईना.

'ऐसें पाहतांचि स्वामी नीटावती । उचलोनि टाकिती गंगेआंत ॥ मांडगंगेंत कुंभार डोहाच्या तळाशीं त्या सगळ्या दैवतांना समर्थहस्तें मुक्ति मिळाली ! एक म्हसोबा तेवढा राहिला; तो कांहीं केल्या निघेना; तेव्हां समर्थ म्हणतात–'नुचलेसी जरी फोडोनी काढीन । श्रीराम स्थापीन याच स्थानीं ॥' त्यावेळीं तो म्हसोबा एका शूद्राचे अंगांत येऊन बोलूं लागला, स्वामीपुढें माझें कांहीं चालेना! मज कांहीं मान द्यावा या स्थानींचा । तेव्हां स्वामी वाचां बोलियेले ॥'

'तुम्हीं व तुमचा समुदाय उत्तम जन नव्हत; लोकांस उपद्रव करणार. या स्थानीं आतां श्रीराममंदिर होणार, श्रींची स्थापना झाल्यानंतर सहस्रावधि भक्त मंडळी येथें येतील, त्यांना तुमचें रहाणें येथें कसें परवडेल?' म्हसोबा म्हणतो 'स्वामीन्! आपला सर्वभूतीं भगवद्‌भाव असतां आम्हां सगळ्या भुतांखेतांना मात्र आज स्थानभ्रष्ट व्हावें लागलें ! आमचें कर्म; आपणाकडे काय बोल ? मी मात्र आपण ठेवाल तेथें राहीन, आज्ञेप्रमाणें चालेन. पण मला श्रीसेवेपासून वंचित करूं नये.' त्यावर आग्नेय कोंपऱ्यांत टेंकाचे खालचे बाजूस जांभळीच्या वृक्षाखालीं समर्थांनीं त्यास रहाण्यास जागा देऊन सांगितलें कीं, 'श्रीरामनवमींत रथोत्सवाचे पूर्व दिवशीं मापटेभर तांदूळ व एक नारळ आणि रथ परत आल्यावर श्रीवरून ओंवाळलेला दहींभात तुला प्रतिवर्षी मिळत जाईल. त्यावर स्वस्थ राहून कोणास उपद्रव करूं नये. अद्यापपर्यंत तो म्हसोबा त्या ठिकाणीं (आतां शाळेच्या व मठाच्या

---

१ छळ होऊन, पिशाच्यबाधा होऊन.


मध्यें) असून प्रतिवर्षी रथोत्सवाचे वेळीं त्याच्या मान त्याला दिला जातो.

अशा रीतीनें शेंदरे देव सगळे गेल्यावर झाडें व कळक तोडण्याचा प्रश्न आला. मंडळींच्या मनांतली भीति अद्यापि गेली नव्हती. तेव्हां 'हातीं शस्त्र स्वामी घेवोनि तोडितां। सर्वहि तत्वतां धाविन्नले ॥' दहाजणांचा हात लागल्यावर जागा साफ होण्यास कितीसा वेळ लागणार? स्थलशुद्धि उत्तम झाली! नंतर नरसो मलनाथ अंबरखानी, आनंदराव देशपांडे आदिकरून शिष्य-मंडळींनीं श्रीसमर्थ आज्ञनें शुभ दिवस पाहून पायाचा मुहूर्त केला आणि बांधकामास प्रारंभ झाला. श्रीसमर्थसंगतीनें त्या स्मशा-नाच्या टेंकाचा पूर्ण कायापालट होऊन गेला. भगवदिच्छेनें 'जंगल में मंगल'–स्मशानांत राममंदिर होतें तें असें.

## १८ सर्ग– देवालयें केलीं सामान्य हस्तें !

शके १५६७ च्या श्रीरामनवमीनंतर आरंभ होऊन १५६९ चें वर्ष संपण्यापूर्वी हें मंदिराचें बांधकाम पूर्ण झालें. एवढ्या तीन वर्षांत श्रीसमर्थ चाफळलाच एके ठिकाणीं बसून राहणें शक्य नाहीं. 'अखंड सावधान रे! प्रयोग प्रेत्न मान रे' असे त्यांचे व्यापक उद्योग प्रयोग सर्व काळ चालूच असत. वृद्ध मंडळींच्या मुखांतून ऐकलें आहे कीं, बांधकाम चालू असतां ज्या ज्या वेळीं श्रीसमर्थ चाफळला येत त्या त्या वेळीं स्वत: ते रचाईचें काम करीत असत. त्यांचे 'कारखाने प्रकरण' वाचलें म्हणजे ही लोकवार्ता सत्य असावी असें वाटतें.

मंदिर बांधण्यास लागणारें द्रव्य कांहीं चाफळच्या व कांहीं परगांवच्या भिक्षेंतून मिळत होतें. नाशिकचे गिरि गोसावी नांवाचे एक समर्थशिष्य मसूरला उत्सवास आले होते ते परत जातांना पुण्यास शिवछत्रपतींच्या उपाध्यायांच्या घरीं त्यांचें कीर्तन झालें; तेथें शिवराय कीर्तनश्रवणास गेले होते. कीर्तन आटोपल्यावर गिरि-गोसाव्यांचा सत्कार करण्यासाठीं त्यांजपुढें राजांनीं ३०० होन



चाफळचें श्रीराममंदिर

ठेविले; पण गोसाव्यांनीं तें द्रव्य स्वतः न घेतां मंदिराचे बांध-कामास्तव चाफळास पाठविण्याविषयीं सुचविलें; त्याप्रमाणें राजांनीं तें द्रव्य नरसो मलनाथ यांचेकडे पोहोंचतें केलें.

अध्यात्म व सत्सहवास यांविषयीं शिवरायांस स्वाभाविक आवड होती. त्याकरितां राजकारणांतून फुरसत मिळेल त्या वेतानें समर्थतुकारामादि साधुसत्पुरुषांकडे ते नेहमीं जात. अशा संतांच्या मुखांतून अनुभवाचे चार शब्द ऐकावयास मिळावे ही अपेक्षा. त्याप्रमाणें ते कित्येकदां समर्थांकडे आलेहि. परंतु कधीं समर्थ चाफळला नसावयाचे आणि कधीं असले तरी, 'सदा देवकाजीं झिजे देह ज्याचा । सदा रामनामें वदे नित्य वाचा'। याप्रमाणें मुखानें रामनामाचा घोष व हातानें मंदिराचें काम करीत आढळावयाचे; बोलायला सवड आहे कोठें ? असेंच एकदां राजे चाफळास येऊन बसले असतां, समर्थ हातांतील कामाच्या नादांत

असल्यानें त्यांनीं राजाकडे बराच वेळ पाहिलेंहि नाहीं. त्यामुळें राजांना अर्थातच वाईट वाटलें आणि कांहींशा रुसव्यानें ते बोलून गेले कीं, 'आम्ही इतक्या लांबून दर्शनासाठीं यावें आणि स्वामी महाराजांना आमच्याशीं दोन शब्द बोलण्याची अथवा आमच्याकडे नुसतें पाहण्याचीहि सवड असूं नये ! दुर्दैव आमचें; दुसरें काय ?' लगेच समर्थांनीं त्यांस सुचविलें कीं, "दर्शना न यावें होत तूं कष्टी। सुचवूं तंव येई घेऊं भेटी। उपासना खटपटी आम्हां असे ॥" राजे खिन्न मनानें निमुटपणें नमस्कार करून निघून गेले हें सांगणें नकोच.

असाच आणखी एक प्रसंग. मंदिराच्या बांधकामांत समर्थ सर्व शिष्यांसमवेत खपत होते; पाणी आणणें, गारा तयार करणें, चुना मळणें, तयार गाऱ्याच्या व चुन्याच्या पाट्या गवंड्यांस देणें, बेलदारांनीं घडलेले गुंडेपाटथर गवंड्यांस पोहोंचविणें, अशीं अनेक लहान मोठीं कामें समर्थ व त्यांचे शिष्य यांनीं रामनामाच्या गजरांत तन्मयतेनें चालविलीं होतीं. बहुतेक सगळा पांढरपेशा वर्ग; उन्हांतान्हांत असले काबाडकष्ट करण्याचें त्यांना फारसें माहित नाहीं, त्यामुळें सर्वजण अगदीं घामाघूम झाले होते.

'महाराज,' शिवरायांनीं नम्रतापूर्वक म्हटलें, 'आपण स्वतः जर असले परिश्रम करावयाचे, तर आम्हां लोकांचा जवळ असून काय उपयोग ? या सेवकास आज्ञा व्हावी, दुसऱ्या कोणास कपर्दिकेची तसदी न पडूं देतां हें देवालय तयार होईल. आपली फक्त आज्ञा व्हावी.' निःस्पृहमुकुटमणि समर्थांनीं काय उत्तर दिलें असेल बरें ?

समर्थ म्हणती शिष्यसमुदाय संप्रदाय माझा। देवालयें करवीन अनंत हस्तें ॥ १६ ॥ स. प्र. १९

या ठिकाणीं पैसा–फंडास हजारों रुपयांचें साह्य देऊं इच्छिणाऱ्या धनिकांना लोकमान्यांनीं दिलेलें 'मध्यमपदलोपी' उत्तर वाचकांस आठवेल. त्या दोघां महापुरुषांचे स्थल–काल व शब्द वेगवेगळे,

परंतु आंतील गाभा एकच–पैशापेक्षांहि जनतेच्या अंत:करणांची आवश्यकता त्यांना फार होती.

राजांस दिलेल्या उत्तरानुसार एकटें चाफळचेंच श्रीराममंदिर नव्हे तर अकरा मारुती व अन्य ठिकाणींहि 'समर्थें देवाल्यें केलीं सामान्यें हस्तें । सामान्यें मान्य केलीं समस्तें । पुढें पुढें कार्य करितील प्रशस्तें । अनंतहस्ति समर्थ ॥ १७ ॥ स. प्र. १९

## १९ सर्ग–दिनानाथ हा राम येणार आहे

मंदिराचें बांधकाम पूर्णतेस येत चाललें तसतशी मंडळींत मूर्तीविषयीं चर्चा सुरू झाली. मूर्ति कोठून मिळणार? कोणी म्हणें आम्ही करवितों; कोणी म्हणत, अमका मूर्तिकार फार चांगला आहे, त्याला सांगूं, तो लवकर तयार करील. आणि ही सर्व चर्चा ऐकून घेऊन समर्थ आपल्या आत्मारामास वरचेवर विचारीत 'रामा, जिवलगा, केव्हां येणार तुम्ही? अन् केव्हां आमच्या नेत्राचें पारणें फिटणार? पण अंत:करणांत प्रसन्नता होती आणि भावी कार्याचे सूचक असे शुभ शकुन वरचेवर त्यांस होत होते.

लवे नेत्रपातें स्फुरे आजि बाहे । दिनानाथ हा राम येणार आहे ।
जयाचेनि योगें सुखानंद लोटे । तया देखतां अंतरीं बाष्प दाटे ॥ १ ॥

इतक्यांत रंगनाथ स्वामीचें बोलावणें आल्यावरून समर्थ निगडीस गेले. श्रीरामराय भक्तकार्यासाठीं आपण होऊन धांव घेणार या विषयीं त्यांस पूर्ण निश्चिति होती. रंगनाथस्वामींचे वडील बाप्पाजी ऊर्फ निजानंदस्वामी यांचें समाधिस्थान कऱ्हाड; तेथें निगडीहून उभयतां गेले आणि पौषांत पुण्यतिथीचा उत्सव आटोपून समर्थ पुन: निगडीस परत आले. कांहीं दिवस निगडी येथें वास्तव्य झाल्यावर तेथून चाफळकडे निघाले. मार्गांत आंगापूरचे रानांत शिवनाभि म्हणून श्रीशंकराचें स्वयंभू स्थान, तेथें कृष्णातीरीं स्नानसंध्या करीत समर्थ बसले असतां ब्रह्मयज्ञादि कर्म आटोपल्यावर मानसपूजेस आरंभ झाला. "त्या समयीं कृष्णेच्या डोहांतून शब्द जाला कीं, 'श्रीरामचंद्रजीची मूर्ति येथें आहे, ही

घेऊन जावी.' हें ऐकतांच डोहांत उडी घालून पाहिलें, तों येक पाषाणावर मूर्ति श्रीरघुपतीची, क्षत्रिय ध्यान; हातीं दोन कमळें, रथावर मूर्ति उभी, लक्ष्मणजी दक्षिणेस, सीताबाई वामभागीं, उभयतांचे हातीं चामरें आणि मारुती सारथी; या ध्यानाची मूर्ति येक्या पाषाणावर रथाकृतिसुद्धां आणि दुसरी मूर्ति महिषासुरमर्दिनीची" अशा दोन मूर्ति बाहेर आणिल्यावर त्यांची पूजा करून त्या झोळींत घातल्या आणि बरोबर भानजी गोसावी होते त्यांच्या समवेत समर्थ निघाले चाफळकडे!



चाफळचे श्रीराम

हा प्रसंग घडत असतां आंगापूरचीं गुराखी पोरें जवळपास उभीं होतीं; समर्थ निघून गेल्यानंतर मुलांनीं ती वार्ता गांवांत जाऊन सांगितली. गांवकऱ्यांच्या मनांत आलें 'आमच्या रानांतील मूर्ति हे गोसावीबुवा कोण घेऊन जाणार? त्या मूर्ति परत आणल्या पाहिजेत.' लगेच निघाले पांचपंचवीसजण पाठलाग करीत. चरेगांवच्या रानांत सुखठाण्याचे खडीवर त्यांनीं समर्थांस गांठून म्हटलें 'बाबा, आमच्या गांवच्या मूर्ति आमच्या आम्हांला परत द्या. त्या न्यावयाच्या नाहींत.' तुमच्या गांवच्या कोठल्या? आम्हांस तर डोहांत सांपडल्या.' समर्थ उत्तर देते झाले. 'त्या आम्ही नेतों, तुमच्या गांवांतून नाहीं आणिल्या.'

गांवकऱ्यांनीं सांगितलें "पहिले त्या मूर्ति आमच्या गांवांत गणपतीच्या देवळांत होत्या. मोगलांचा दंगा झाला तेव्हां वाडवडिलांनीं त्या डोहांत ठेविल्या. त्या आमच्या आहेत, द्यायच्या नाहींत त्या."

'उत्तम!' असें उद्गारून मूर्ति तेथेंच काढून ठेविल्या आणि समर्थ व भानजी चाफळला आले. मागें अंगापूरकरांनीं आसपासच्या गांवचीं ५।५० माणसें आणि ४।५ गाडे आणविले आणि मूर्ति उचलण्याचा खूप प्रयत्न केला, पण व्यर्थ! कांहीं केल्या मूर्ति हालेचनात; थकले सगळे आणि शेवटीं चाफळास समर्थांस शरण गेले. 'चुकलों आम्ही, आपल्या मूर्ति आपण आणाव्यात' असें म्हणून समर्थांपुढें सर्वांनीं दंडवत घातले; तेव्हां सुखठाण्यास जाऊन त्या मूर्ति आणण्याविषयीं समर्थांनीं भानजीस आज्ञा केली आणि अंगापुरकरांस उत्सवांतील छबिन्यांत सिंहासनाच्या काठीचा पहिला मान दिला. भानजीच्या खांद्यावरील झोळींत बसून श्रीरामप्रभु चाफळला येऊन पोहोंचले; एकटे आले नाहींत. शक्तीसह-महिषासुरमर्दिनी जगदंबेसह आले. एकाची प्रतीक्षा चालली होती तेथें दोघे आले. देवाचें देणें असें असतें. श्रीसमर्थांच्या अंतःकरणांतून संतुष्टतेचा उद्गार बाहेर पडला! –

कळे पाळितो राम आम्हां दिनांचे। कृपासागरू भाव जाणे मनाचे।
नुपेक्षी कदां, संकटीं धांव घाली। तया देखतां मानसें तीं निवालीं ॥

## सर्ग २०–चाफळ येथील पहिली श्रीरामनवमी

शके १५७० सर्वधारी नामसंवत्सरीं चैत्र शुद्ध १ पासून या उत्सवास आरंभ झाला तेव्हांपासून एकदां १५९४ या वर्षी व पुढें छत्रपति राजाराम महाराजांच्या कारकीर्दीचीं कांहीं वर्षेखेरीज हा चाफळ येथील उत्सव अखंड चालला आहे " शिष्यमंडळींनी उत्सव चालवावा. कोणे समयीं स्वामींनीं असावें कोणे समयीं नसावें. 'दास डोंगरीं राहतो। यात्रा देवाची पाहतो।' हें समर्थांनींच

स्वतः वर्णन करून ठेवलें आहे. दिवसभर डोंगरांत कोणास कसे भेटत, काय उद्योग चाले, कोणती चाळणा करीत हें त्यांचें त्यांसच माहीत. रात्र पडल्यावर वेष पालटून मंदिराकडे यावें.[१] यात्रेकरू, कीर्तनकार वगैरे कोणाच्या कांहीं गैरसोई, तक्रारी असतील त्या गुपचीप ऐकून घेऊन पारपत्याधिकारी यांजकरवीं त्यांचा बंदोबस्त करावा, कोणा कथेकऱ्यास साथीदार नसेल त्याची व्यवस्था लावून द्यावी, कोणत्या प्रान्तांतून कोण आले, त्यांचें तेथील सुखदुःख कशा प्रकारचें आहे तें जाणून घ्यावें, दुःखपरिहारार्थ उपायचिंतन करावें, 'आपणांस जें जें अनुकूळ। तें तें करावें तात्काळ।' शक्य नसेल तेथें दुसरी कांहीं उपाययोजना करावी, सर्वांचा क्षेमसमाचार विचारून घ्यावा; असे अनेक उद्योग स्वतःची ओळख न होऊं देतां समर्थ करीत. लोकस्थिति अंतर्बाह्यच जाणून घेण्यासाठीं असले उत्सव समर्थ करीत होते. अशा समाजोपयोगी कार्याचें रूपांतर केवळ जेवणावळी, गाणेंबजावणें किंवा व्यक्तिगत मानपान यांत झालें असेल, तर तो दोष मूळ प्रवर्तकाचा नसून सद्यःकालांतील कार्यकर्त्यांचा आहे. उत्सवातील प्रत्येक बारीक सारीक गोष्टींतहि समर्थ कसे सावधानतेनें व सूक्ष्मतेनें लक्ष घालीत आणि त्यांची दृष्टि कशी चौफेर असे हें ज्यास जाणून घ्यावयाचें असेल त्यानें त्यांचें 'मानसपूजा' हें काव्य अभ्यासावें.

चाफळची उत्सवपद्धति अशी व्यवस्थित बसविली आहे कीं, तिला अन्यत्र तोड सांपडणें कठीण. तिचें पूर्णतः अनुकरण श्रीसज्जनगड येथील माघ व. ९ च्या उत्सवांत झालें आहे. पहांटे कांकडा होऊन ज्यानें त्यानें आपलें नित्यकर्म उरकल्यावर


---

१ समर्थ गुप्तेश्वर कथाकीर्तनीं परामृश घेती। धृपदे ताळधारी नाहीं त्यासी अनुकूल करिती। व्यस्ताव्यस्त गातां बोलता सुशब्दें सन्मानिती। भले संत महंत हो गातसा म्हणोनियां॥११॥ समर्थ गुप्तेश्वर तों दृष्टि पडेतिना। सन्मानशब्द श्रवणीं पडती नाना। अमानुषी महिमा विचित्र कळेचिना। स्वामि सर्वांतर्याम निर्धारें॥१२॥ स. प्र. १९

गाभाऱ्यांत श्रींचें अर्चन व बाहेर मंडपांत भजन उभें राहतें. अभिषेकादि पूजा झाल्यावर वाद्यघोषादि समारंभानें आरती होते. नंतर छबिना निघतो. आरतीस व छबिन्यास पुढीलप्रमाणें सिंहासनाचे मानकरी दुतर्फा उभे असतात. १ छत्र, १ अब्दागीर, १ उपाध्ये, २ मोर्चेलें, २ चवऱ्या, २ रुमाल, २ धनुष्यबाण, २ चोपदार, २ दिवट्या. मानकऱ्यांच्यापुढें भजनी दिंड्या, निशाणें, पताका, नाना प्रकारचा वाद्यघोष, सभोंवार सर्वत्र दर्शनेच्छु लोकांची गर्दी, व भगवन्नामाचा जयजयकार अशा समारंभानें पालखी मारुती-पर्यंत जाऊन तेथें महारुद्राची पूजा आरती करून परत मंदिरांत येते. नंतर दर प्रदक्षिणेस एक याप्रमाणें तेरा आरत्या ठरलेल्या क्रमानें म्हणत तेरा प्रदक्षिणा होतात. प्रदक्षिणा आटोपल्यानंतर सर्वांनीं श्रीपुढें उभें राहून —

कल्याण मागणें रामा । तुज क० ॥ ध्रु० ॥ तू जगजीवन तू मनमोहन । कोण आहे तुजविणें । रामा तुज० ॥ १ ॥ आम्ही हरिजन तूं जनपावन । बोलति वेद पुराणें ॥ २ ॥ देवहि आले भक्त मिळाले । आनंद तुझेनि गुणें ॥३॥ भक्त सुखी देव रावहि सुखी । दास म्हणे मज देणें ॥ ४ ॥

अशी प्रार्थना केल्यावर सर्वांना तीर्थ देण्यांत येतें. नंतर अध्यात्मरामायणांतील प्रारंभींच्या ३–४ सर्गांपैकीं रोज थोड-थोड्या भागावर ( रामनवमीचे दिवशीं श्रीरामजन्माचे श्लोक सांगतां येतील अशा बेतानें ) पुराण होतें. तोंपर्यंत महानैवेद्याची व पंगती मांडण्याची वेळ येते. पंगती वाढीपर्यंत ब्राह्मण–सुवासिनींची पूजा होत असते. नंतर श्लोक म्हणत भोजनें होतात. भोजनोत्तर किंचित्काल विश्रांति झाल्यावर मंडपांत सायंकाळचे सुमारास करुणाष्टकें, सवाया, वाके, बाण्या, कडके, भडके, वीर-भाटीव इत्यादि म्हणण्याचा परिपाठ आहे. त्या वेळीं चोपदार, दिवट्या, वगैरे सिंहासनाचे मानकरी उभे असल्यानें उत्सव-मंडपास राजदरबारची शोभा येते. मंगलारती झाल्यावर सकाळ-



चाफळचा दास मारुती



चाफळचा भीम मारुती

प्रमाणेंच पुनः छबिना निघतो, त्यावेळीं हवाया, नळे, चंद्रज्योति वगैरे दारूकाम उडविले जातें. छबिना परत आल्यावर श्रीपुढें १३ मनाचे श्लोक आणि नित्यनेमाचे दासबोधांतील दोन समास व चौथ्या दशकांतील तिथ्यनुक्रमानें येईल तो एक असे तीन समास वाचून झाल्यावर ग्रंथराजाची पूजा व आरती होऊन तीर्थप्रसाद दिला जातो. पुढें कीर्तन उभें राहतें. कीर्तनाची शेवटची आरती गाभाऱ्यांतच श्रीसन्मुख होते आणि श्रीचरणावरील निर्माल्य व खिरापत कीर्तनकारास प्रसाद म्हणून दिला जातो. आरती झाल्यानंतर प्रसाद येईपर्यंत –

जय हो महाराज । गरिबनवाज ॥६९०॥ बंदा कमीन हीन मैं सहिब । राखो मेरी लाज ॥ १ ॥ सेवक होकर सेवा मांगू । इतना साहबकाज ॥ २ ॥ छत्रपती तुम शेकदार सिव । इतना हमारा अर्ज ॥ ३ ॥

हें शिवाजीमहाराजांनीं केलेलें पद म्हटलें जात असतें, हा एक या उत्सवांतील विशेष आहे. दुसरा विशेष, कीर्तनाचे शेवटीं मानाचे विडे पुढीलप्रमाणें मानकऱ्यांस दिले जातात–१ कीर्तनकार, २ उपाध्ये, ३–१६ छत्री, अबदागीर, चवरी वगैरे सिंहासनाचे १४ मानकरी, १७ भंडारगृह, १८ सर्व पारपत्यगार. यानंतर खिरापत वाटल्यावर देव–भक्त सर्व आपापल्या ठायीं विश्रांतीस जातात.

चाफळच्या श्रीरामनवमीचें वर्णन समर्थप्रतापांत (स. ४) पुढीलप्रमाणें केलें आहे:–"चाफळ चंपावतीसी केली श्रीराममूर्तिस्थापना । विमळ मांडवी नदीतीरीं जाणा । देवदेवता देवतें भूतें नाना । समर्थें सर्वहि समजाविलीं ॥२॥ अनन्यभूतें दैवतें दोनी ठेविलीं । येक्या नारळें संतृप्त केलीं । रथोत्साहापूर्वीं सन्मानिलीं । इतरासी रिघो देईतना ॥३॥ पूर्वें लंबोदर समर्थें बैसविले । मागें पुढें मारुति स्थापिले । मध्यें देवालयीं श्रीरघुनाथजी अर्चिले । आकल्प संकल्प समर्थाचा ॥४॥ चंपावती भोंवतीं पुष्पावती तीर्थें । पात्रनें केलीं स्वामि समर्थें । श्रीगुरुचरणीं भावार्थें । परत्रपार

पाववितीं ॥५॥ धन्य चंपावती पुरवासी । सुखसेजे[1] श्रवणकीर्तनें जयांशी । धन्य पंचक्रोशीग्रामवासी । ध्वनि कर्णासी यात्रेचा ॥६॥ या चाफळच्या पहिल्या उत्सवास समर्थांनीं सर्व देवदेवतांस निमंत्रिलें, त्याप्रमाणें ते आल्यानंतर त्यांच्या यथोचित सन्मान करून समर्थांनीं त्यांची पाठवणी पण केली, असें गिरधर सांगतात. 'समस्त देवांचें आवाहन केलें । समस्त देवीं बीजें[2] केलें । समस्त देवांसीं सन्मानिलें अर्चिलें । सद्गुरूनाथसमर्थे ॥३०॥

## २१ सर्ग–या उत्सवपद्धतीचीं कांहीं वैशिष्ट्यें

चाफळ येथील श्रीरामनवमीच्या उत्सवाचे कांहीं विशेष विसाव्या सर्गांत निवेदिले. थोडे राहिले ते आतां सांगावयाचे आहेत. (१) सहस्रावधि चालती वधुजनें । देवासी ओवाळिती नीरांजनें । स्त्रियादिकांसी गुरुदेवदर्शनें । नीतिमर्यादा स्वामींची ॥३९॥ पुढें समर्थस्वामी आज्ञा करिताती । स्त्रियादिकांसी नीरांजनें वर्जिताती नाना युगधर्म लौकिक स्थिति । मर्यादा राहिली पाहिजे ॥४०॥ (स.प्र. २०) उत्सवास सहस्रावधि स्त्रिया येत, त्या पूजासमयीं श्रीरामास व समर्थांस जवळ जाऊन नीरांजनें ओवाळीत असत. परंतु स्त्रियांदिकांनीं गुरु आणि देव यांचें दर्शन दुरून घ्यावें आणि स्त्रियांनीं नीरांजनें ओवाळूं नयेत अशी समर्थांनीं आज्ञा केली, असा अर्थ या वचनांचा दिसतो; परंतु ४० व्या ओंवीचा अर्थ कोणी असा सुचवितात कीं पंगतींत ब्राह्मण सुवासिनींची पूजा करतांना स्त्रियांचे पंगतींत नीरांजनें ओवाळण्यास जाऊं नये असें समर्थांनीं सांगितलें. कोणताहि अर्थ घेतला तरी व्यवहारमर्यादा सांभाळिली पाहिजे हें मुख्य तात्पर्य आहे. (२) समर्थें नवरात्रीं तांबुल वर्जिले । देवद्विजअर्चनीं मात्र देवविले । प्राणसंरक्षणीं शातातप मुनि तैलपक्व बोलिले । प्राणोत्क्रमण नोहे तांबुलेंविण ॥१०॥ (स. प्र. १९) श्रीरामनवमीच्या नवरात्रांत सांप्रदायिकांनीं

---

१ अंथरूणावर पडल्यापडल्या कीर्तनश्रवण होत असे. २ आगमन.

तांबूलसेवन करू नये अशी समर्थांनीं आज्ञा केली. ( ३ ) समर्थे श्रीरामनवमीसी वर्जिले काले। का जे अयोध्येसी काले न जाले। श्रीपांडुरंगीं गोकुळीं स्थापिले गोपाळकाले। श्रीव्यंकटेशीं श्रीरंगीं वंदिले। अन्नप्रसादु ॥३९॥ समर्थ-सांप्रदायीं येकंकार नाहीं। येक विचार निरंतर पाहीं। नाना उन्मत्त द्रव्य न मनेति कांहीं। ब्रह्मचर्य श्रीरामउपासना ॥४०॥ (स. प्र. ७) अधिष्ठानीं यात्रेसी लळित नाहीं। रथोत्साहीं स्वानंदें मिरवणें पाहीं। भद्रीं श्रीराम बैसऊन भक्तांहीं। कारुण्यें उपकार आठविजे ॥४५॥ (स. प्र. २०) श्रीरामनवमीच्या उत्सवाचे अखेरीस गोपाळकाला न करतां, भक्तांचे आर्त मनोगत प्रभुरायास निवेदन करणारें रामराज्याभिषेकाचें कीर्तन आणि त्यानंतर रथोत्सव अशी मांडणी आहे. रथ निघतांच सगळ्या यात्रेला आपोआप समजावें कीं, ‘ रथ देवाचा ओढिला। यात्रेकरां निरोप जाला।’ आणि नंतर ‘ पुढें जायाचा गल्बला। ठाईंठाईं॥ भक्तजन म्हणती देवा। आतां लोभ असो द्यावा। धन्य सुकृताचा ठेवा। भक्ति तुझी॥’ व्यंकटेश, श्रीरंग किंवा जगन्नाथ या क्षेत्रांसारखा चाफळ येथें यात्रेकरूंना अन्नप्रसाद दिला जात नाहीं; अथवा पंढरपूर, गोकुळ येथील स्थानमाहात्म्यास अनुरूप असणारा गोपाळकालाहि चाफळास होत नाहीं. अद्यापपर्यंत तशीच व्यवस्था चालू आहे.



श्रीरामांचा रथ, चाफळ

आचारभ्रष्टता किंवा एकंकार अशा गोष्टींस श्रीसमर्थ-तुकारामासारखे मार्गदर्शक संतश्रेष्ठ मान्यता देत नाहींत, नव्हे

वर्णाश्रमधर्माचाराविरुद्ध असणाऱ्या आचरणास त्यांनीं सर्वस्वीं विरोधच केला आहे. या विषयाचें सविस्तर विवेचन करण्या-इतका स्थलावकाश नाहीं; तथापि त्याविषयीं समर्थांचा अभिप्राय स्पष्टपणें कळावा म्हणून त्यांचीं कांहीं निवडक वचनें पुढें दिलीं आहेत. (१) आधीं राखावा आचार। मग पहावा विचार। आचार विचारें पैलपार। पाविजेतो ॥२५॥ दा. १७-१० (२) आचार-उपासना सोडिती। ते भ्रष्ट अभक्त दिसती। जळो तयांची महंती। कोण पुसे ॥५६॥ दा. ५-२ (३) स्वधर्मकर्मउडवण। या नांव परमार्थ बुडवण। म्हणोनी स्वधर्मकरण। अगत्य आधीं ॥१८॥ ए. स. २० (४) मुक्तिदाता साधु तोचि तो जाणावा। जेणें संपादावा लोकाचार ॥८१॥ लोकाचार करी तो जना उद्धरीं। ज्ञाता अनाचारी कामा नये॥८२॥ ओ. श. ३. (५) अनाचारें ज्ञान कदा निवळेना। यहलोक कळेना परलोक ॥४२॥ स्फु. ओ. ५ (६) उच्छेदित आहे भक्ति सगुणाची। वाट साधनाची मोडतसे ॥ ७४ ॥ मोडतो आचार कर्म कुळाचार। करी भ्रष्टाकार पापरूपी॥ ७५ ॥ पापरूपी नर जाणावा साचार। करी एकंकार शब्दज्ञानें ॥७६॥ ओ. श. ४ (७) शब्दीं सर्व आत्मा म्हणावें। आचार सांडून भलतेंचि करावें। तें पाषांडमत जाणावें। विवेकी असेल तेणें ॥५८ ॥ रासभीं सोहळे भोगावे। मनुष्यें उकरडे भुरकसावे। ऐसें घडेल तरीच फावे। अभेद प्रपंचीं ॥ ६० ॥ प्रपंचीं अभेद हा विनोद। अभेद बोलणें हाचि भेद। जरि न कळे तो मतिमंद। मूर्ख अविवेकी॥ ६७ ॥ ए. स. १८ (८) भेदाभेदक्रिया देहीं। लागली हे सुटेचिना। जेथील विषयो तेथें। विपरीत करितां नये ॥१४॥ मुखेंचि सेविती अन्नें। अपानीं घालतां नये। अन्याय करिती तैसा। समान मानिती जनीं ॥१५॥ त्यागात्यागे देह चाले। समान करितां पडे। अभागी उमजेना तो। पाषांडी राक्षसी क्रिया॥ १७ ॥ मानपंचक २ (९) सृष्टीकरणीं अगत्य भेद। संव्हारें सहजचि अभेद ॥१७॥ दा. २०–८ (१०) समान देखणें आत्मा। समान करणें दया॥ वंद्य निंद्य विचारावें। हें मुख्य जाणती कळा ॥ १८॥ मा. पं. २. (११) भेटो

कोणी येक नर, धेड महार चांभार, राखावें त्याचें अंतर। याचें नांव भजन। दुःख नेदावें कोणाला, उंच नीच जरी जाला, अंतरात्मा वोळखिला, तोचि जाणा सज्जन। मिळाला तो भक्त जाला, दोष मिळेना तयाला, देव प्रत्यक्ष कोपला, अहंभाव दुर्जन। राजी राखावे सकळ, बरेपणें सर्व काळ, नित्य आनंदाची वेळ, काळ करी वंदन ( करुणाष्टकें )

अशीं आणखी शेंकडों संतवचनें मिळतील; पण या ग्रंथाचा तो मुख्य विषय नव्हे; सांप्रत जें आचारशैथिल्य समाजांत उत्पन्न झालें आहे त्याबाबत श्रीसमर्थादि महात्म्यांचा अभिप्राय वाचकांस कळावा म्हणून वरील वचनें दिलीं आहेत.

## २२ सर्ग–श्रीसमर्थांचें चाफळ

प्रस्तुतच्या चाफळ क्षेत्राचें स्वरूप आपण समक्ष जाऊन पाहूं शकतों; पण श. १५७० मधील चाफळ कसें होतें तें श्रीसमर्थांच्याच पद्यांतून पाहिलें पाहिजे.

भोंवता डोंगराचा फेर। मध्यें देवाचें शिखर। पुढें मंडप संपूर्ण। पंधरा खण ॥१॥ आठां खांबांवरी रचना। वरत्या येकेताळीस कमाना। कामकट्टाऊ नयना। समाधान ॥२॥ नाना तरू अंबे बनें। दोहींकडे वृंदावनें। वृंदावनीं जगजीवनें। वस्ति केली ॥३॥ पुढें उभा कपिवीर। पूर्वेकडे लंबोदर। खालें दाटला दर्बार। नानापरी ॥४॥ दमामे चौघडे वाजती। धडके भांड्यांचे[1] गाजती। फौजा भक्तांच्या साजती। ठाईं ठाईं ॥५॥ माही मोर्तबें निशाणें। मेघडंबें सूर्यापानें। दिंड्या पताका निशाणें। विंजणे कुंचे ॥६॥ काहाळा कर्णे तुरंग बाके। नाना ध्वनि गगन झांके। बहुवाद्यांचे धबके। परोपरी ॥७॥ ताळ मृदंग उपांग। ब्रह्मविणें चटक्या चंग। तानमानें माजे रंग। हरिकथेचा ॥८॥ घंटा घांट शंख भेरी। डफडीं पांवें वाजांतरीं।

---

१ तोफांचे.

भाट गर्जती नागरी। परोपरी ॥९॥ उदंड यात्राकरू आले। रंगीं हरिदास मिळाले। श्रोते वक्ते कथा चाले। भगवंताची ॥१०॥ नाना पुष्पें माळा तुरे। पाहों जातां अडस पुरे। रंग स्वर्गींचा उतरे। ठाईं ठाईं ॥११॥ गंधें सुगंधं केशरें। उदंड उधळती धुशरें। जगदांतरें हरिहरें। वस्ति केली॥१२॥ दिवटया हिलाल चंद्रज्योति। नळे आर्डाती उठती। बाण हवाव्या झरकती। गगनामध्यें ॥१३॥ उदंड मनुष्यांचीं थाटें। दिसताती लखलखाटें। येकमेकासी बोभाटें। बोलाविती ॥१४॥ उदंड उजळिल्या दीपिका। नामघोषे करताळिका। कित्तेक आईका आईका। शब्द होती ॥१५॥ खिरापतींची वांटणी।तेथें जाहली दाटणी। पैस नाहीं राजांगणीं।दाटी जाली॥१६॥ रंगमाळा नीलांजनें। तेथें वस्ति केली मनें। दिवस उगवतां सुमनें। कोमाइलीं ॥१७॥ रथ देवाचा वोढिला। यात्रेकरां निरोप जाला। पुढें जायाचा गलबला। ठाईं ठाईं ॥१८॥ भक्तजन म्हणती देवा। आतां लोभ असों द्यावा। धन्य सुकृताचा ठेवा। भक्ति तूझी ॥१९॥ दास डोंगरीं राहतो। यात्रा देवाची पाहतो। देव भक्तासवें जातो। ध्यानरूपें ॥२०॥

## २३ सर्ग--प्राणजीस प्राणदान

श्रीराममंदिर बांधण्यासाठीं मसणवटीची जागा देणाऱ्या प्राणजी देशमुखांची सहानुभूति पुढील स्थापनेच्या समारंभांत कशा प्रकारची असेल याची कांहींशी कल्पना वाचकांस करतां येईल. प्रतापकार सांगतात--समर्थस्थळीं चाफळीं ग्रामस्थीं कर मागितला। शिवराजें ऐकतां जीवघात आरंभिला। प्राणजीचा प्राण रक्षूनि समर्थे अभयंकर दिधला। सेवाभाग्य दिधलें चिरकाळें ॥१५॥ (स. प्र. १९) उत्सव झाल्यानंतर पुढील व्यवस्था करण्यासाठीं समर्थांनीं कांहीं मंडळी एकत्र केली आणि त्यांत दिवाकर गोसावी महाबळेश्वरकर यास आज्ञा केली कीं, 'तुमची निःस्पृहता श्रीचे पायीं समर्पून यावद्देह तों श्रीचे स्थलीं असावें.' तसेंच १ दिवाकर गोसावी, २ नरसींगराऊ अंबरखानी मुद्राधारी, ३ प्राणजी देशमुख,

४ नागोजीपंत देशकुलकर्णी व ५ नागोजी भावे नाइकवाडी नाणेघोलकर 'या पांचा जणांकडून श्रीच्या पुष्पावर श्रीनीं हस्त ठे(व)विले कीं, या अधिष्ठानाची भक्ति परंपरा करावी, सर्व साहृयता करावी, कानु कानुनाची यत्न होऊं न द्यावी, सर्वस्वेंसी साहृय असावें, म्हणून पुष्पावरी हस्त पाचजणांनीं ठेविले, ते काली पांचाजणांनीं श्रीस उभें राहून प्रार्थना केली कीं, आम्हांकडून श्रीच्या पुष्पावरी हस्त ठे(व)विले तरी श्रींनींही अधिष्ठानाची उदासीनता न केली पाहिजे; येविषीं श्रींनींहि श्रीच्या प्रसादपुष्पावरी मान्य म्हणून हास्यवदनें संतोषपूर्वक हस्त ठेविला.' (सां.का.ले.५२)

टेंकाडाच्या स्थलशुद्धीस १५६७ मध्यें आरंभ झाल्यापासून ही १५७० ची रामनवमी पार पडेपर्यंत अशीं कित्येक विघ्नें आलीं, पण श्रीरामकृपेनें त्यांचें निरसनही होत गेलें आणि प्राणजी बाबर व इतर चौघेजण श्रींच्या स्थानाचे यावद्देह व परंपरया अभिमानी झाले! चाफळचा सुंदर मठ पाहून त्यांत श्रीरघुनाथानें आंगापूरचे डोहांतून येऊन आपण होऊन वास केला. 'मंगलांचा मंगल' असा कौसल्येचा बाळ जो रामप्रभु त्यानें अमंगलावर मात करून दाखविली, भावी मंगलमय रामराज्याचा पाया घातला गेला, हें नुसतें मनांत येतांच आजहि आपलें अंतःकरण आनंदानें भरून येतें, मग तो प्रसंग ज्यांच्या प्रयत्नांनीं सिद्धीस गेला त्यांच्या अंतःकरणांत केवढा हर्षकल्लोळ उसळला असेल बरें! असो; वरीलप्रमाणें चाफळची व्यवस्था दिवाकरादि पांचजणांकडे सोंपवून समर्थ एका उपाधींतून सुटले आणि तिचा विस्तार अन्यत्र करण्यास मोकळे झाले.

## २४ सर्ग–कळिकाळव्याघावरोधन

भगवच्चिंतन अथवा अशींच दुसरीं अत्यंत महत्त्वाचीं कार्यें करणारांस कांहीं एकांत–कांहीं लोकांत, कांहीं गलबला–कांहीं निवळ असेंच वागावें लागतें. एकांतासाठीं समर्थांना घळी फार पसंत असत. जरंडेश्वरपर्वतांतील गुंफा, चंद्रगिरीची घळ, चाफळची

रामघळ व दासघळ, डेरवणची घळ, तारळखोऱ्यांतील कळंब्याची घळ, भैरवगड, हेळवाक व शिवथर येथील घळी, सज्जनगडची रामघळ अशा दहा अकरा लहान मोठ्या घळींचे उल्लेख त्यांच्या चरित्रग्रंथांत सांपडतात. सज्जनगडची रामघळ किंवा शहापूरची दासटेंकडी हीं दोन स्थानें मुद्दाम करविलेलीं दिसतात. बाकीच्या घळी या मूळच्या निसर्गनिर्मित खऱ्या; पण राहण्याच्या सोईच्या दृष्टीनें समर्थांनीं त्यांत कांहीं कमीअधिक केलेंहि असेल. सज्जनगडच्या रामघळीखेरीज बाकीच्या सर्व घळी अरण्यांत आहेत. हेळवाकची घळ तर घनदाट अरण्यांत मनुष्यवस्तीपासून अगदीं दूर अशी आहे. या घळींतून श्रीसमर्थांचा रहिवास होण्यापूर्वीं व्याघ्रादिकांचीच वस्ती तेथें असल्यानें ती ती घळ हातीं येण्यासाठीं त्या हिंस्र पशूंना तेथून काढून लावणें समर्थांस भाग पडलें. 'कठिण स्थळीं अगत्य राहणें । सिंहव्याघ्रेंसी हरिहरेंसी भांडणें । निरावलंब कड्यावरी धोत्रध्वजा लावणें । ब्राह्मण्य दावणें सृष्टीसी ॥ (स. प्र. ३–३६) असें गिरिधरांनीं म्हटलें आहे. इतर चरित्रग्रंथांतहि ह्या घळींत वस्ती करण्यापूर्वीं तेथील व्याघ्रपरिवारास निघून जाण्याची आज्ञा समर्थांनीं केल्याचें वर्णन आहे. हल्लीं झाडी फार कमी झालेली असतांना सुद्धां या घळींत अधून मधून वाघ येऊन राहिलेले जर आढळतात, तर तीनशें वर्षांपूर्वींच्या दाट अरण्यांत ते समर्थांना आढळले यांत नवल नाहीं. सातव्या सर्गातील चंद्रगिरीच्या घळीच्या वर्णनांत (पृ. १७५) 'भयभीत जाला वनचर । आंग निकटीनेंचि सत्वर । बाहेरि पडिला ॥ गळां घालूनि करपाश । अवरोधिलें त्या व्याघ्रास ।' असें मेरुस्वामींनीं म्हटल्याचें वाचकांस स्मरत असेलच. त्यांत असंभवनीय असें कांहीं नाहीं. परमेश्वराशीं तादात्म्य पावलेल्या योगेश्वराची ती सहज लीला आहे. सर्कशींतील सिंह इशाऱ्याप्रमाणें काम करीत नाहींसे दिसतांच प्रो. देवलांनीं त्याला हंटरच्या दांडक्यानें बडवून काढल्याचें प्रस्तुत लेखकानेंच एकट्यानें नव्हे तर शेंकडों लोकांनीं वाईस पाहिलें आहे; आणि हें केवळ त्यांनीं अंतःकरणांतील धैर्य

व जरबेची नजर यांच्या जोरावर केलें. समर्थ तर 'सकळां वडील' जो देव त्याच्याशीं तादात्म्य पावलेले योगेश्वर! त्यांच्या संकल्पांत व दृष्टिक्षेपांत केवढें प्रचण्ड सामर्थ्य असेल!! त्यांनीं 'चले जाव!' म्हणतांच वाघाला ती गुंफा सोडून जावें लागलें यांत आश्चर्य काय?

त्या समर्थसंकल्पापुढें कळिकाळ कसा थरथर कांपूं लागला होता याचें सूचक अशी ती घटना ठरली. श्रीसमर्थप्रतापसूर्य उदयास आला, त्याचीं महंतरूपी किरणें सर्वत्र पसरूं लागलीं. त्यायोगें नैराश्यांधकारांत चांचपडणाऱ्या ठिकठिकाणच्या जनतेस स्वोन्नतीच्या पाऊलवाटा दिसूं लागल्या. अनाचार-अन्याय-अनीति-जुलूम-स्वार्थांधता इत्यादि दुर्गुणांची वन्य श्वापदें लोकवस्ती-जवळचीं आपापलीं आश्रयस्थानें सोडून दूरच्या गिरिकंदरांत निघून जाऊं लागलीं. तसतसें लोकांत धैर्य येऊं लागलें; अन्यायी व जुलमी अशा परकी राजसत्तेला शक्य तो प्रतिकार करण्याचें सामर्थ्य आपल्यामध्यें आहे अशी जाणीव जनतेस होऊं लागली. विधर्मी प्रचारकांचे चाळे थंड पडूं लागले. कलिकालास थप्पड देणाऱ्या अशा अनेक जगदुद्धारक तत्कालीन घटनांची सूचना या व्याघ्रावरोधनांत आहे, तसेंच तें भावी कालासहि मार्गदर्शक आहे. म्हणून त्याला 'कळिकाळ व्याघ्रावरोधन' अशी व्यापक व सूचक संज्ञा मेरुस्वामींनीं दिली ती योग्यच म्हटली पाहिजे.

घळींतील हिंस्रपशू समर्थांच्या 'चलेजाव' या इशाऱ्याबरो-बर निघून गेले आणि त्या एकान्तामध्यें समर्थांनीं चिंतनास्तव आपलें आसन मांडिलें. चिंतन? होय, बाळपणापासून जें त्यांच्या मनांत घर करून बसलें होतें तें जनहितचिंतन, 'सकळ जन सुखावे तो कसा काळ फावे?' याचें चिंतन!

घळींतील हिंस्रपशु सहज गेले, त्या मानानें लोकांस 'त्राहि भगवान्' करायला लावणारे द्विपादपशु—पशु कसचे?—नरराक्षस! क्रौर्यांत पशु व राक्षस बरे—असें म्हणावयास लावणारे नरपिशाच्च ते, त्यांना हांकून लावणें सोपें काम नव्हतें. त्यावर उपाययोजना करण्यासाठीं हे खनाळ, दरेदर्कुटे, गवी–गुंफा मिळतील तेवढे

कमीच होते. या ठिकाणीं जगत्कल्याण व त्याकरितां आवश्यक असणाऱ्या धार्मिक व राजकीय मसलती तसेंच, आत्मानुसंधान, ग्रंथलेखन, शिष्यप्रबोधन अशीं अनेक कार्ये चालत. 'बहुत जनांस चालवून' 'नानामंडळें' हालविण्याचें सामर्थ्य देणारा विवेक या घळीच्या एकान्तांत 'ठाईं पडत' होता; ब्रह्मांडगोळीं तर्क वावरत होता; 'चुकलें निधान' ठावें पडत होतें. त्या एकांतांत चालणाऱ्या अनेकविध समर्थकार्यांची कल्पना पारतंत्र्यानें दुबळ्या व संकुचित बनलेल्या मनास कशी करितां येईल? 'समर्थासी पाहेल तो समर्थ। इतरांशीं न कळे हा गुह्यार्थ॥'

सर्वच घळींत प्रसंगोपात्त चालणाऱ्या व्यापांचें हें सामान्य वर्णन आहे. ते सगळे व्याप दिसण्यास समर्थचरित्राशीं समरस झालेली अंतर्मुख दृष्टीच हवी; बहिर्दृष्टीला ते आतां दिसावयाचे नाहींत. तथापि तेथील आजचें सृष्टिवैभव व प्रत्येक घळीचा रचनाविशेष समर्थभक्तांस कमी कौतुकास्पद वाटावयाचा नाहीं. या सर्गांत चाफळ खोऱ्यांतील रामघळ आपणांस पहावयाची आहे. 'समर्थें पर्वतीं केलें येक गुप्त सदन। प्रसंगें ठेवावया देवार्चन। सूर्यप्रकाश उदक सन्निध ऊर्ध्वगमन। मार्ग सोपान करूनि जावें' ॥४॥ असें या घळीचें वर्णन प्रतापांत (स. ७) केलें आहे. चाफळच्या नैर्ऋत्येस सुमारें दीड कोस असणाऱ्या डोंगरांत ही घळ असून रस्ता सगळा पाऊलवाटेचा आहे. सदाशिवशास्त्रींचा गर्व जेथें हरण केला तें स्थान वाटेंत लागतें. तेथून थोडें वर गेल्यावर कल्याणास सर्पदंश जेथें झाला व त्याकरितां वाडीच्या भैरवास अकरा मण गूळ वाटण्याचा नवस समर्थांनीं केला तें भैरववाडीचें ठिकाण येतें. पुढचा आणखी एक टप्पा चढून गेलें कीं मनुष्य घळीच्या पायथ्याशीं जातो. 'दास डोंगरीं राहतो। यात्रा देवाची पाहतो' हें समर्थांचें वर्णन याच घळीसंबंधीं असावें. 'असावें' म्हणण्याचें कारण त्याच डोंगरांतील या घळीच्या पूर्वेस असणाऱ्या दासघळींतूनहि 'देवाची यात्रा' दिसूं शकते.

समर्थांच्या ज्या घळी आज माहित झाल्या आहेत, त्यांत दोन मजले असलेली ही एकच घळ आहे. बाहेरून तिचे दोन मजले दिसतात, पण खालचें विवर धरून तीन मजले आहेत. प्रथम मधल्या मजल्यांत जातां येतें. तेथें १०।१२ माणसें बसूं शकतील. छतास भोंक पाडून वरच्या मजल्यांत जाण्याची सोय केली असून ४।५ माणसांना बसण्याइतकी जागा तेथें आहे. मधल्या मजल्यांत उजव्या हातास एक विवर असून त्यांतून ५।६ हात सरपटत गेल्यावर ३।४ माणसें बसतील एवढी वर्तुलाकार जागा आहे. तेथेंच एका खळग्यांत पाणीहि असतें. अशा या रम्य घळीचें दर्शन समर्थभक्तांनीं अवश्य घ्यावें

प्रतापांतील 'निरावलंब कडयावरी धोत्रध्वजा लावणें' या वचनावरून समर्थांचें वास्तव्य ज्या घळींत ज्या वेळीं असे त्या घळीच्या माथ्यावर खुणेसाठीं म्हणून एखादें वस्त्र तेवढ्या वेळेपुरतें ठेविलें जात असावें अशी कल्पना कोणी सुचवितात, तिची ग्राह्या-ग्राह्यता वाचकांनीं ठरवावी.

## ८५ सर्ग--अकरा मारुती

चाफळ–मसूर ते जोतीबा या त्रिकोणाकृति टापूंत शिंगण–वाडी, माजगांव, उंब्रज, मसूर, शहापूर, बहें, शिराळें, पारगांव व मनपाडळें या प्रत्येक गांवी एकेक व चाफळ येथें दोन असे अकरा मारुती समर्थांनीं स्थापन केलेले आहेत. वेणाबाईंच्या एका अभंगांत या अकरा मारुतींचें वर्णन पुढीलप्रमाणें आहे:––

चाफळामाजीं दोन उंबरजेसी एक। पारगांवीं देख चौथा तो हा ॥१॥ पांचवा मसुरीं शहापुरीं सहावा। जाण तो सातवा शिराळ्यांत ॥२॥ शिंगणवाडीं आठवा मनपाडलें नववा। दहावा जाणावा माजगांवीं ॥३॥ बाह्यांत अकरावा येणें रीति गांवा। सर्व मनोभावा पुरवील ॥४॥ वेणी म्हणे स्वामी रामदास समर्थ। कीर्ति गगनांत न समाये ॥५॥

या अकरा स्थानांच्या स्थापनेचे शक पुढीलप्रमाणें आहेत :–

१ शहापूर–शके १५६६ ( सतीबाईसाठीं स्थापना झाली. ) २ मसूर:–श. १५६७ मध्यें श्रीरामनवमीच्या अगोदर ही मूर्ति निर्माण झाली ३ व ४ चाफळ–श. १५७० ( चाफळच्या श्रीरामप्रतिष्ठापनेच्या वेळीं श्रीरामापुढें दास मारुती व मंदिराचे मागें कांहीं अंतरावर प्रतापमारुती अशीं दोन स्थानें चाफळास निर्माण झालीं. प्रताप मारुतीचें स्थानास 'भीम' अशीहि संज्ञा आहे. ५ शिंगणवाडी–श. १५७० ( येथें रामघळीकडे जातांना खडीवर कधीं स्नानसंध्येस वसत, तेथें लहानशी गोजिरी मारुती-मूर्ति स्थापन केली आहे. ) ६ माजगांव–श. १५७१ ( चाफळहून माजगांवावरून कृष्णास्नानास जातां येतां गांवांत मारुतीचें देऊळ कां नाहीं म्हणून ग्रामस्थांना समर्थांनीं विचारिलें, तेव्हां 'वेशीपुढें जो मोठा धोंडा आहे त्यासच आम्ही मारुती समजतों' असें ग्रामस्थांनीं उत्तर दिलें. त्यावरून त्याच धोंड्याची मारुतीरायाची मूर्ति करून तेथें स्थापिली.) ७ उंबरज–श. १५७१ (नित्य कृष्णा-स्नानासाठीं समर्थ उंबरजला जात. कधीं तेथें राहणेंहि होई. म्हणून तेथें मारुतीची स्थापना करून मठ बांधला. व त्यावर कल्याणशिष्य केशव गोसावी यांस ठेविलें.) ८ बत्तीस शिराळें ( किंवा लक्ष्मीचें शिराळें )–श. १५७६ ( येथें हरिपंत व महादाजीपंत देशपांडे वगैरे शिष्यमंडळींचे विनंतीवरून ही मूर्ति निर्माण झाली. इतर ठिकाणांच्या मानानें येथील मारुतीचें देवालय बरेंच मोठें आहे. शिराळ्यास जयराम गोसावी नांवाचे समर्थशिष्य होते, त्यांची समाधि देवालयाच्या समोरील एका शेतांत आहे. त्यांच्यासाठीं हें स्थान निर्माण झालें असेंहि कोठें म्हटलें आहे.) ९ व १० पारगांव व मनपाडळें–श. १५७३ (हीं दोन्ही गांवें जोतिबाच्या डोंगराचे उत्तरेकडील पायथ्याशीं जवळ जवळ आहेत. पारगांव येथील स्थापनेच्या वेळीं कांहीं न्यून पडलें त्यावरून ही मूर्ति तेथें फार दिवस राहणार नाहीं असें समर्थांनीं म्हटल्याचें बाडांक ९५० च्या बखरींत लिहिलें आहे.) ११ बाहे बोरगांव

शक १५७३. येथें कृष्णेच्या मध्यभागीं बेट आहे. कृष्णामहात्म्यांत तेथील कथा अशी आहे कीं, लंकेहून परत येतांना श्रीरामप्रभु कृष्णास्नानास तेथें उतरले आणि सीतामाई जवळच शिरटें येथें स्नानास राहिल्या. रामरायांनीं स्नासंध्यादि कर्मे करून तेथें शिवलिंग स्थापन केलें. (रामलिंग असें त्या स्थानाचें नांव आहे.) त्या वेळीं कृष्णेस उल्हास होऊन बहुत गर्जना करूं लागली. मारुतीराय मागें उभे होते. त्यांनीं मागें वळून पाहिलें तो महापूर येत आहे! तत्काळ त्यांनीं दोन्ही हात पसरून मागच्या मागेंच तो ओघ थांबविला; तो दोन गांवें मागें फिरला, तेथें डोह झाला. श्रीरामप्रभूंचें ध्यानविसर्जन झाल्यावर त्यांनीं मारुतीस आज्ञा केली कीं, कृष्णाबाईचा ओघ सोडून द्यावा. एकदम ओघ सोडला तर बहुत जीवांचा नाश होईल असें जाणून मारुतीरायांनीं तो तुंबलेला ओघ सोडीत सोडीत सोडला. त्यामुळें दोन प्रवाह होऊन मध्यभागीं बेट निर्माण झालें. त्या बेटावर श्रीरामलक्ष्मणांनीं स्थापन केलेलीं दोन लिंगें रामलिंग व लक्ष्मणलिंग या नांवानें प्रसिद्ध आहेत. दर्शनास समर्थ गेले, तेव्हां त्यांना तेथें मारुतीचें स्थान दिसेना. चौकशी केल्यावर ग्रामस्थांकडून कळलें कीं मागच्या बाजूस हा अक्षोभ्य डोह आहे, त्यांत देवाच्या पश्चिम भागास शंभर धनुष्यांवर भीमकुंडामध्यें मारुतीराय आहेत. त्यावर स्वामींनीं गांवकऱ्यांना विचारलें, 'अकरा खंडी नैवेद्याची सिद्धता करीत असाल तर मारुतीरायास घेऊन येतों' गांवकऱ्यांनीं तें मान्य केलें; तेव्हां समर्थांनीं डोहांत उडी घेतली. त्यावेळीं कृष्णा बोकील नांवाचा १४-१५ वर्षांचा मुलगा बरोबर होता, त्यानेंहि समर्थांच्या कमरेस मिठी घालून त्यांच्याबरोबर बुडी दिली. दोघेही अकरा प्रहरपर्यंत डोहांत होते. नंतर स्वामींनीं मूर्ति बाहेर काढून आणिली. तों तें ध्यान परमसुंदर सुवर्णमय व अकरा गज उंच होतें! त्याचें सर्वांस दर्शन करवून नैवेद्यास आणावें म्हणून आज्ञा केली. परंतु साहित्य सिद्ध नव्हतें; तेव्हां मारुतीराय म्हणाले, "या कालीं ही मूर्ति बाहेर राहणें योग्य नव्हे. म्हणूनच आम्ही डोहांत राहिलों, तुमच्यासाठी म्हणून बाहेर

यावें लागलें. तरी या मूर्तीची स्थापना येथें न करतां ती परत पूर्वस्थानीं ठेवावी. आणि येथें या ध्यानाची दुसरी मूर्ति आपल्या हातानें करून स्थापावी." त्याप्रमाणें ती मूर्ति समर्थांनीं डोहांत नेऊन ठेवली आणि चुना तयार करून त्या ध्यानाप्रमाणें जी नवी मूर्ति बनविली, तिची तेथें स्थापना केली. कृष्णाजीपंत बोकील जे या प्रसंगीं समागमें होते त्यांस पट्टाभिषिक्त श्रीराममूर्ति पूजेस देऊन गृहस्थाश्रम स्वीकारून प्रपंच–परमार्थ चालविणेविषयीं आज्ञा केली. ती राममूर्ति अद्यापि कोरेगांवीं बोकीलांचे वाड्यांत आहे. या स्थानासंबंधानें श्रीसमर्थांनीं केलेलें स्तोत्र अकरावी भीमरूपी म्हणून प्रसिद्ध आहे तें पुढीलप्रमाणें :–

बळें सर्व संहारिलें रावणाला । दिलें अक्षयीं राज्य बीभीषणाला । रघुनायकें देव ते मुक्त केले । अयोध्यापुरा जावयालागिं आले ॥ पथामाजिं कृष्णातिरीं रामराया । घडे राहणें स्नानसंध्या कराया । सिता राहिली सीरटें गांव जेथें । रघूराज तो पश्चिमेचेनि पंथें ॥ जपध्यान पूजा करी रामराजा । तयाचेपरी वीर सौमित्र वोजा । स्मरेना देहे चित्त ध्यानस्त जालें । अकस्मात तें तोय अद्भूत आलें ॥३॥ बळें चालिला ओघ नेटें भडाडा । नभीं धांवती लोटलाटा धडाडा । नदी चालली राम ध्यानस्थ जेथें । बळें विक्रमें पावला भीम तेथें ॥४॥ उभा राहिला भीमरूपी स्वभावें । बळें तुंब तो तुंबिला दोन गांवें । नदी एक वीभागिली दोन्ही वाहें । म्हणोनी तया नाम हें ऊर्णबाहे ॥ ५ ॥ सुखें लोटितां देखिलें रामलिंगा । बळें चालिली भोंवतीं कृष्णगंगा । परी पाहतां भीम तेथें दिसेना । उदासीन तें चित्त कोठें वसेना ॥ ६ ॥ हनूमंत पाहावयालागिं आलों । दिसेना सखा थोर विस्मीत जालों । तयावीण देवाल्य दीसे उदासें । जळांतूनि बोभाइलें रामदासें ॥ ७ ॥ मनांतील जाणोनि केला कुडावा । दिले भेटिचा जाहला थोर यावा । बळें हांक देतांचि जैसा गडाडी । महामेघ गंभीर तैसा कडाडी ॥८॥ रघूराज वैकुंठधामासि गेले । तधीं मारुती दास हे निरवीले । रघूनाथऊपासकांला प्रसंगें । सख्या





शहापूर मारुती




खडीचा मारुती सिंगणवाडी


उंबरज मारुती


बहेबोरगांव मारुती




पारगांव मारुती



मनपाडळें मारुती



हनुमानघाट-मारुती-श्रीक्षेत्र काशी



माजगांव मारुती




बत्तीसशिराळे मारुती

मारुती पाव रे लागवेगें ॥९॥ प्रभूचें महावाक्य त्वां साच केलें । म्हणे दास हें प्रत्यया सत्य आलें । जनांमाजि हें सांगतां पूरवेना । अवस्था मनीं लागली हे सरेना ॥ १० ॥

याप्रमाणें अकरा मारुतींची स्थापना अकरा स्थानीं होऊन पुढें त्या स्थानांस समर्थांचे आज्ञेवरून प्रत्येकीं अकरा बिघे प्रमाणें शिवरायांनीं इनामेंहि दिलीं. दिवाकरबंधु अनंत कवि यांनीं केलेल्या समर्थस्तुतींत या अकरा मारुतींसंबंधानें एक श्लोक आहे. (पृ. १५७ श्लो. ५ पहा )

समर्थांनीं केवळ अकराच मारुती स्थापन केले अशी जी कोणाकोणाची समजूत दिसते, ती मात्र चुकीची आहे. या अकरा मारुतींच्या स्थापनेपूर्वीं श. १५६६ च्या अगोदर पुरश्चरण-कालांत टाकळी येथें, तीर्थयात्राप्रसंगीं काशी येथें, नंतर कृष्णातीरीं आल्यावर महाबळेश्वर, वांई, शिरगांव, डोळेगांव या ठिकाणीं समर्थ-हस्तें मारुतींची स्थापना झाल्याचे उल्लेख आहेत. तसेंच १५७४ नंतर सारंगपूर, प्रतापगड, सज्जनगड इ. ठिकाणचे मारुती समर्थांच्या हातचे आहेत. श. १५७२ मध्यें परळीस नेहमीं राहणें म्हणून जरी वाकेनिशी टिपणांत म्हटलें असलें तरी बहें व मनपाडळें, या दोन्ही स्थापना १५७३ त झाल्या आहेत. पारगांवची स्थापना १५७४ मध्यें झाल्याचें ३५३ बाडांकांत म्हटलें असलें तरी ९५० बाडांकाची जी प्रकरणात्मक बखर आहे, तिच्या ३ ऱ्या प्रकरणांत म्हटलें आहे कीं मनपाडळें व पारगांव या दोन्ही ठिकाणीं एकाच मुहूर्तावर स्थापना झाल्या आणि दोन्ही ठिकाणीं एकाच वेळीं समर्थ भिन्नभिन्न देहानें उपस्थित होते. वाकेनिशी टिपणावरून १५७४ चे रामनवमीस समर्थ जांबेंत होते. पुढें १५७६ चे फाल्गुनी पौर्णिमेपर्यंत माहूर मातापूर, इंदूरबोधन व तिसगांव या भागांत त्यांचा मुक्काम होता. तेव्हां मनपाडळें व पारगांव यांची स्थापना एकाच मुहूर्तावर झाली, हा ९५० बाडांकाच्या बखरींतील उल्लेख बरोबर दिसतो.

हीं एवढींच अकरा स्थानें 'वारीचे अकरा मारुती' म्हणून विशेष महत्त्वाचीं कां मानलीं असावीत आणि यांच्या पूर्वीं व



परळी
उरमोडी नदी
कृष्णा नदी
स्केल
४ ० ४ ८ १२
तारळी नदी
शमनोपीर
पाली
शिरगांव
शिंगणवाडी
चाफळ
उंब्रज
मसूर
माजगांव
चरेगांव
शहापूर
दास टेकडी
चंद्रगिरी
कोयना नदी
वसंतगड
कऱ्हाड
कृष्णा नदी
वहे
वारणा नदी
शिराळें
पारगांव
मनपाडळें
कोल्हापूर
पंचगंगा नदी.

नंतरहि अनेक ठिकाणीं समर्थांचे हस्तें मारुतीरायांच्या स्थापना झाल्या असून त्यांना या अकरा स्थानांइतकें महत्त्व सांप्रदयांत कां नसावें हा एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे. चाफळ, शिवतर, परळी या भागांतील १५६७–७३ पर्यंतचीं शिवसमर्थांचीं राजकारणें पाहतां असें दिसतें कीं, कोल्हापूर प्रांतींचा मातबर किल्ला जो पन्हाळा तेथपासून शिवसमर्थांच्या चाफळ,शिवतर, परळी व राजगड या केंद्रांपर्यंत दळणवळण ठेवणारीं ही गुप्त अकरा ठाणीं असावींत. त्या दळणवळणाचें सांकेतिक नांव 'वारी' असावें, पुढें या स्थानांचें तत्कालीन राजकारणांमुळें आलेलें महत्त्व संपलें, तरी 'वारीचे अकरा मारुती' म्हणून त्यांचें धार्मिक महत्त्व अद्यापिहि कायम आहे. या विषयाचा अधिक विचार राजकारण काण्डांत होईल.

## २६ सर्ग–पूर्वार्धाचा उपसंहार

श. १५७० चे वैशाखांतील शिवानुग्रहानंतर श्रीसमर्थांनीं राजकारणाकडे विशेष लक्ष दिलें असावें असा प्रस्तुत लेखकाचा ग्रह पूर्वी होता. आणि त्यास अनुसरून सुंदरकाण्डांत येणाऱ्या विषयांची मांडणी प्रथम केली होती. परंतु 'सुंदर मठ' व 'सर्व ग्रंथास आरंभ' यासंबधीं शिवसमर्थचरित्रांतील प्रसंग तपासतां त्यांत राजकारणच आहे असें दिसूं लागलें, नव्हे मनाची निश्चिति झाली; १५६७ ची रामनवमी शहाजीराजांच्या जहागिरीच्या ठाण्यांत मसुरास झाली, त्याच्या शेजारींच शहापूर येथें समर्थांची संध्यासमठी बनली, कांहीं काळ शहापूर हें त्यांच्या कार्याचें केंद्र झालें, त्यानंतर चंद्रगिरीची गवी हें त्यांचें वसतिस्थान राहिलें, तेथून आणखी पलीकडे खोऱ्याचे अन्तर्भागांत चाफळला मंदिर होऊन तेथें १५७० मध्यें श्रीरामस्थापना झाली. तरीपण श. १५७१ चे श्रावणामध्यें (१५७६ त नव्हे) चाफळ सोडून पश्चिमेकडील निबिड अरण्यांत शिवतर खोऱ्यांतील घळींत सुंदरमठ निर्माण करून 'समर्थ दहा संवत्सरपर्यंत कोठें न जातां सर्व ग्रंथास आरंभ' करून राहतात

आणि पुन्हा १५७२ त परळीस 'नेहमी' राहण्यास येतात, परंतु १५७३ त बहें, मनपाडळें व पारगांव येथें मारुतीस्थापना करितात. आणि १५७४च्या रामनवमीस जांबेस जातात. या सगळ्यांचा अर्थ काय? मनास कांहीं काळ कोडें पडलें–शहाजी–शिवाजी राजांच्या १५७०–७४ या चार पांच वर्षांच्या इतिहासाच्या मननानें तें कोडें सुटलें–लेखकाचें स्वतःचें समाधान करण्यापुरतें तरी निश्चित सुटलें. इतर कोणास तें पटो अगर न पटो. अंतःकरणास हें पूर्णपणें पटलें कीं, १५६७ पासूनच समर्थांच्या धर्ममूलक राजकारणास प्रारंभ झाला असला आणि मसूर-शहापूर-चंद्रगिरी व नंतर चाफळ हें स्थानांतर राजकारणमूलक असलें तरी, त्या राजकारणास अधिक जोराचा उठाव १५७०तील शहाजी राजांच्या अटकेनंतर मिळाला. अर्थात् हा सगळा विषय राजकारणकाण्डाचा आहे. म्हणून प्रथम सुंदरकाण्डाची मर्यादा शिवानुग्रहापर्यंत–नव्हे राज्यदानापर्यंत योजिली होती, ती कमी करीत करीत चाफळचे श्रीराम व अकरा मारुती यांच्या स्थापनेपर्यंतचाच चरित्रभाग या सुंदरकांडांत वर्णिला आहे. राहिलेलें चरित्र उत्तरार्धांतील राजकारणकाण्ड, लोकोद्धारकाण्ड व उत्तर-काण्ड यांमध्यें येणार आहे. त्यांतच हें सुंदरमठाचें राजकारण व 'सर्व ग्रंथास आरंभ' यांचा अर्थ येईल. हा उत्तरार्ध त्वरित प्रसिद्ध होवो असा समर्थभक्त वाचकांनीं लेखकास आशीर्वाद द्यावा; कारण सज्जन वाचकांच्या कृपेचें बळ पाठीशीं असल्याविना पुढील काम लवकर उरकणार नाहीं.

स्वानुभवदिनकरांत म्हटलें आहे कीं, 'चरित्राचे ग्रंथ अपार जाले । ते वाचां न बोलवे ।' हें विधान वरवर पाहतां अर्थवादा-त्मक वाटतें. पण श्रीसमर्थवाग्देवतामंदिरांतील सर्व चरित्र–संभार अवलोकिला म्हणजे दिनकरांच्या विधानांत अत्युक्ति किंवा अर्थ-वाद नाहीं असें दिसून येतें. पुष्कळशीं चरित्रें श्रीसमर्थनिर्याणा-नंतर १२५।१५० वर्षांनीं लिहिलीं गेलीं असलीं व त्यांचें संकलन फार सूक्ष्म बुद्धीनें व सावधानतेनें करावें लागत असलें, तरी त्या काल्पनिक वाटणाऱ्या कथांतहि इतिहासाचे सुवर्णकण

आढळतात; चरित्रकारांच्या निष्ठेचें कौतुक वाटतें आणि त्यांतूनच श्रीसमर्थांच्या प्रचंड व्यापाचा साक्षात्कार हळूहळू होऊं लागतो. 'यस्य नाहंकृतो भावो बुद्धिर्यस्य न लिप्यते । हत्वाऽपि स इमाँल्लोकान्न हंति न निबद्धयते ॥' (ज्याच्या ठिकाणीं अहंभाव नाहीं आणि ज्याची बुद्धि अलिप्त आहे, त्यानें या सर्व लोकांस मारिलें तरी हत्येचें पाप त्यास बंधनकारक होत नाहीं) अशा कोटींतील महापुरुषाचें चरित्र तत्कालीन चरित्रग्रंथांच्या किंवा कागदपत्रांच्या अभावीं आज साद्यंत कसें कळेल ? त्यांतून त्यांचें सर्व कार्य 'उदंड गुप्तपणें' झालेलें! शब्द सोडलेला धडा वाचणारासारखी चरित्रलेखकाची अवस्था होते. कोणतेंहि चरित्रसाधन त्याज्य मानतां येत नाहीं, कोणावरहि पूर्ण विसंबून चालत नाहीं. पण एवढें मात्र निश्चित कीं पूर्वग्रह व स्वतंत्रबुद्धीची घमेंड बाजूस ठेवून आणि श्रीसमर्थचरणीं भार घालून कार्यास लागलें तर मार्गदर्शन होतें; साधनें उपलब्ध होतात–कोडीं उलगडूं लागतात. तथापि प्रखर सूर्यप्रकाश सुद्धां जाड काळ्या चष्म्यांतून मंदच दिसतो. तसें येथें झालें आहे. पूर्वचरित्रग्रंथांतील समर्थकथेचा जो प्रकाश अंतःकरणांत उमटला तो लेखकाची अल्पबुद्धि–अल्पविद्या यांमुळें वाचकांपुढें अल्पांशानेंहि ठेवितां आला नाहीं, याची जाणीव लेखकास आहे. पण काय करावयाचें ? समर्थांनीं ही लेखणी एकदां हातीं दिली; त्यांनीं जसें लिहविलें तसें बरें वाईट लिहिलें जात आहे, श्रीसमर्थभक्त ही अल्पसेवा गोड करून घेवोत.

[illegible]
अनुक्रम १८८३५अ वि: [illegible]
क्रमांक ७३२५ नों: दि: २५ [illegible]

॥ श्रीराम समर्थ ॥

# प्रार्थना

कल्याण करीं देवराया । जनहित विवरीं ॥ धृ ॥ तळमळ तळमळ होतचि आहे । हे जन हातीं धरीं ॥१॥ अपराधी जन चुकतचि गेले । तुझा तूंचि सांवरीं ॥ २ ॥ कठिण त्यावरी कठिण जालें । आतां न दिसे उरी ॥ ३ ॥ कोठें जावें काय करावें । आरंभिली बोहरी ॥ ४ ॥ दास म्हणे आम्ही केलें पावलों । दयेसी नाहीं सरी ॥ ५ ॥

## माझें गाऱ्हाणें

समर्थ देवा माझें मनोगत । परीक्षूनि बरवें यथोचित । तुझें दर्शन अपेक्षित । पुरवी मनकामना ॥ १ ॥ डोळे भरूनि सावचित्त । तुज पाहीन अखंडित । पुरवीं माझे मनोरथ । भेटी देईं दयाळा ॥ २ ॥ आळी घेतलिया बाळकें । माता त्यासि बुझावी कवतुकें । तेवीं मज सद्‌गुरुनायकें । भेटी देईं जननीये ॥ ३ ॥ मन धाय तंववरी । हृदईं धरीं झडकरीं । स्वानंदघन मधुरोत्तरीं । करीं समाधान माझें ॥ ४ ॥ कृपा करा जे झडकरीं । कुरवाळून सुखी करी । शरणागत उपेक्षा न करी । शरणागतवत्सला ॥ ५ ॥ अभीष्ट पुरवीं माझें । हीन दीन परि अंकित तुझें । वारीं मीपणाचें ओझें । कृपा करीं गुरुदेवा ॥ ६ ॥ जन्मोजन्मींचा सांगात । असतांचि चुकला अकल्पित । तो सनाथ करी कृतार्थ । याच भेटीनें देवा ॥ ७ ॥ तुजविण गति नाहीं दुसरी । साचचि जन्मलों तुझे उदरीं । माया लावूनि संसारीं । वेगळें घातलें ॥ ८ ॥ देऊनियां अहंकारा । घातलें मायेच्या सासुरा । नाना विपत्ती त्या गुरुदातारा । सोसूं मी हो किती ॥ ९ ॥ जन्म गेले ऐसेचि किती । सोशितां विकल्पभवयातायाती । आतां धीर पुरेना चित्तीं । ऐक माझें गाऱ्हाणें ॥ १० ॥

(या गाऱ्हाण्याचा कर्ता कोण तें समजलें नाहीं. परमपूज्य श्री. नानासाहेब देव यांनीं तें म्हटलेलें परवांच्या खेपेस अनेकदां ऐकिलें. कवि कोण हें त्यांनाहि आतां स्मरत नाहीं. पण तें प्रसिद्ध व्हावें अशी त्यांची इच्छा दिसली, म्हणून तें येथें दिलें आहे. )

# सूचि


अकोला ११०, १११, ११२
अनंत (कवि) भट महबळेश्वरकर१५६
अन्नपूर्णाबाई ८६, ८७
अहमदनगर ९०, १३९, १४४
आक्का १५४
आत्माराम महाराज दासविश्रामधाम कर्ते २२, ५०
आनंदमूर्ति १६२
आनंदराव देशपांडे १७७,२०२,२०४
आसनगांव २, ३, ६, १६
इंदूर (बोधन) ८७
उद्धव (शिवराम) ८७, ८८, ९४, ९५ १११, १३०, १५४
उद्धवसुत ८३
उंबरज १८८, २२३, २२४, २२८
एकनाथमहाराज १९, २०
एलिचपूर ११०, ११२, १४४.
औरंगजेब १३५, १३६, १४६
औरंगाबाद १३, १४४
अंगापूर २०७, २०८, २१९
अंबड १३, १४४
अंबाजी 'कल्याण' पहा
अंबाजीपंत शहापूरकर १६६, १६७
अंभोरा ११०.
करंदीकर, तात्यासाहेब ३१
कऱ्हाड १७८, १८४, १८८, १८९, १९४, २०७.
कल्याण १५३, १५४, १५८, १८२, १८३, १८४, १८९, १९१, १९२.
कारंजा ११०, १११.
काशी ४९, ९१, ११०, २३०
कृष्णाजीपंत कुलकर्णी (कल्याण-पिता) १८१, १८२, १८३.
कृष्णा बोकील २२५, २२६.
केशव गोसावी (कल्याणशिष्य) २२४.
केशव, नाथचरित्रकार २०.
केशवस्वामी १६३.
कोरेगांव २२६.
कोल्हापूर (करवीर) १८०, १८१, १८३, १८४, १८८, १८९, २३२.
गणेश गोसावी १८९
गणेशभट चाभाडे १, २, ३.
गया ११०
गिरि गोसावी २०४
गिरिधरपंत (दसकपंचक) ८६,८७,९१
गिरिधर (स. प्रतापकार) १७, २७, ४२,५९, ६६, ६९, ७५, ८१, १५८
गुलाबराव महाराज ६७
गोपजीपंत देशपांडे १७८
गोपीनाथ ८१
गंगा–गोदावरी १९, ५७, ५९ ६३, ६६, ६९, ७२, ७३, ७७, ७८
गंगाधर (रामीरामदास, श्रेष्ठ) १९,२१ २३, ४१ ५६, ५८, ५९, ६०, ६४, ६५, १२६, १२९

चाकण १९३
चाफळ १७७, १७८, १८४, १८९, २००, २०४, २०५, २०६, २०८, २०९, २१०, २१२, २१३, २१४, २१५, २१७, २१८, २१९, २२०, २२२, २२३, २२४, २३३, २३४
चित्रकूट १११
चोखोबा १८६
चंजी २७
चंद्रगिरी १५३, १६८, २१९, २३४
छत्तिसगड १११
छिंदवाडा ११०
जनार्दनस्वामी १९
जनाबाई १८६
जयपूर २६
जयराम गोसावी २२४
जयरामस्वामी १६२
जरंडेश्वर १६१, १६२, २१९
जानोजी पिसाळ १३९, १४०
जांब २, ३, ४, ५, ६, १३, १४, १६, १७, १८, १९, २८, ३१, ३२, ३३, ३४, ५७, ६२. ६६, ७६, ८३, ९९, २३१, २३४
जिजाईमाता ९०
जुन्नर ९०, १४८
जोधपूर २६
झाबऱ्या महार २, ३
टाकळी ६३, ७७, ८१, ८३, ८७, ९० ९४, १३०, १३१, १५४, १८५, १८९, २३१.
तानाजी (नरवीर) १७०
तिसगांव ५७,१८४,२३१
तुकाराम महाराज २५,२६,३८,५५ ८३, १०३, १६२, १८४, १८६, २०५, २१६
त्र्यंबकेश्वर ९०,१३०
दत्तात्रय १८२,१८३,१८४,१८९
दत्ताजी अनंत १६७
दसकपंचक ८६,८७
दादाजी कोंडदेव १९३,१९४
दिनकर (तिसगांवमठ) ५७,५९,६० ६९,७५,१४९,१५४,१८४,२३४
दिवाकरभट महाबळेश्वरकर १५३ १५६,२१८,२१९
देवनाथ ८४
धरणीधर देव १६२
धोंडराई १९६,१९७
नरसो मलनाथ १७८,२०४,२०५,२१८
नासुर्डी (नंदिनी) ७७,७८
नागोजीपंत २१९
नागोजी भावे २१९
नाणे घोळ २१८
निगडी २०७
पन्हाळा २००
परतुड १३,१४
परळी ४,१२,२१०,२२०,२३१, २३३ २३४
पारगांव २२३,२२४,२२९,२३१,२३४
पाराजीपंत १८१,१८२,१८३,१८४

पॉल ब्रंटन १६१
पृथ्वीराज चव्हाण १३४,१४२,१४४
पैठण ५,१९,२०,१४४,१४५
पंचवटी (जांब) १६,५०,५२,५३.
पंचवटी (नाशिक) ६६,६९,७०,७६
७७,७८ ८८,९२, ९३, ९४, ११०,
१४४,१४५,१४८,१८५
प्रतापगड २३१
प्रयाग ११०,१११,१८३
प्राणजी देशमुख २०२,२१८,२१९
बहिणाबाई १८४
बहें २२३, २२४, २२८, २३१, २३३
बाजीपंत (कमळाजीपंत) शहापूरकर
१६३, १६६, १६७
बालाघाट ११०, १३८
बाप्पाजी (निजानंदस्वामी) २०७
बावाजी १८३
वीड १,५, १७, ८१
बैतुल ११०
भानजी जोशी गोसावी १७७, १७८,
१८९, २०८, २०९
भानजीपंत बोदलापुरीकर ६, १०,
१३, १९, ६२
भीमस्वामी तंजावर ६३,६८,६९,१७४
भीमस्वामी शिरगांवकर ४२, १८२,
१९५, १९६
भैरवगड वाडी-(वऱ्हाड)११०,११२
भैरवगड-(सातारा जि.) २२०
भैरववाडी २२२
मनपाडळें २२३, २२४, २२९, २३१
२३४
मल्हार रामराव ४, १७७, १७८
मसूर १८६,१८८,१८९,१९०,१९२,
१९४, १९५, १९७, १९९, २००,
२२३, २२४, २३२, २३४
महाबळेश्वर १५५,१५६,१५९,१८४,
१८८,२३१
महादजीपंत देशपांडे २२४
महिपति बुवा ताहराबादकर ६, ८३
माजगांव २२३, २२४, २३०
माथुरबाबु ५३,५४
मालोजी राजे ९०,९१
माहुली १६१
माहुर ११०,१११,१४४,१४५,२३१
मिरज १७८,१८०,१८४, १८९
मुकुंदराज १११
मुसळराम १९०, १९६, १९७,१९८,
१९९, २००
मेरुस्वामी ३०,७२,७५, १०१,१०५,
१७४, १७५
यूजेन सँडो ५४, ५५
रखमाबाई १८२,१८३, १८४,१८५
रमण महर्षि ६७, १६१
राणुबाई (रेणुकाबाई) ६,७, ८,९,
१३,१९,२१,२२,२३,२४,२९,३०,
३१,३८, ४७,४९,६०,६२
राजाराम छत्रपति २०९
राजीम १११

रामकृष्ण परमहंस ५३,५४,६७,९१, १०३, १८८, १९४
राम जोशी २३, २४,
रामतीर्थ (स्वामी) १०३
रामय्या १६०
रामराजा १३९
रामीरामदास (गंगाधर पहा)
रामेश्वर १८३
राक्षसतागडी १३९
राक्षसभुवन १, १९६
रिसवड १८६
रुद्राजीपंत १७८
रो सर थॉमस १३६
रंगनाथ स्वामी १६२, २०७
रंगो लक्ष्मण ४
लक्ष्मणस्वामी ४२, १८२
लोकमान्य २०६
वसिष्ठ ६०
वाई १५९,१६१,१८४, १८८,२२०, २३१
वाडीचा हनुमान ११०,११२
वामनस्वामी १६२
वासुदेवानंद सरस्वति ६७
विजयानगर १३७, १३९
विजापूर ९०, १३५, १३७, १४४ १६५, १६६, १९१
विवेकानंद ५३, ८५, ९१, १६१
वेणाबाई १७,१५४,१७८,१७९,१८०, १८९, २२३
शहाजी महाराज ९०,९१,१८८,१८९, १९०,१९३, १९४, २३३,२३४
शहापूर १६३,१६६,१६९,१७४,१८१, १८४, १८५, १८६, १८८,१९५, २००, २२०, २२३, २२४, २२७, २३३,२३४
शाहूमहाराज १६१
शिखर शिंगणापूर २००
शिरगांव १८४, २३१
शिराळें ( बत्तीस ) २२३,२३०,२३४
शिवछत्रपति २७, ९०, १५१, १५४, १६०, १७७, १८१, १९२, १९३, १९४, २००, २०४,२०५, २०६, २१३, २३३, २३४
शिवत(थ) र १५३
शिवनेरी ९०
शंकर श्रीकृष्ण देव १४, ८१, १३३, २३६
शंकराचार्य १६१
शिंगणवाडी २२३, २२४, २२७
सज्जनगड–'परळी' पहा
सतीबाई १६६, १६७, १६८, १६९, १८६, १८८, १९५, २२४
सदाशिवशास्त्री २२२
सारंगपूर ३३१
सीता ९३
सुपनें १८६
सुरजी अंजनगांव १८४
सूर्याजीपंत ४ते १४, १७ ते २१,२३, २४, २८, २९, ३९, ४०,४३ते४६ ४९, ५५, ५८, ७२,७३, ७६, ७७
सेतुमाधवराव पगडी १४१
सोरटी सोमनाथ १३४
हनुमंतस्वामी ४, ५५, ११०, १७७
हरिनाथ ११०
हरिपंत देशपांडे २२४
हेळवाक २२०
हंसराजस्वामी १११
ज्ञानेश्वर ७९

REFBK-0008714

REFBK-0008714